म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्र-प्रवास
सं. क्र. ५।०४

# सुखाचे दिवस

रमेश मंत्री

REFBK-0021130

विश्वमोहिनी पुस्तक २३

# सुखाचे दिवस



# सुखाचे दिवस

५६४
29930

**रमेश मंत्री**

REFBK-0021130

विश्वमोहिनी

आता अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थकलाकामिनी ।
ते शारदा विश्वमोहिनी । नमस्कारिलि मिया ॥

प्रकाशक
आनद अंतरकर
विश्वमोहिनी प्रकाशन,
६२। १२ एरडवणे, पुणे ४११००४

प्रथमावृत्ती
२८ मार्च १९७५

© रमेश मंत्री

मूल्य . २० रुपये

मुखपृष्ठ . वसंत सरवटे

मांडणी ' आनंद अंतरकर

आतील चित्रे
वसंत सरवटे पृष्ठे १२, १७, २३, ३३, ४३, ५७, ६१
मारिओ पृष्ठे २९, ३१, ६३, ८९, १०३, १३१, १७५.

मुद्रक .
आ. अ. अंतरकर
हंस प्रिंटिग प्रेस,
४७४। १ सदाशिव, पुणे ४११०३०.

माझे न्यू यॉर्कचे स्नेही
शशिकांत देशमुख आणि
सौ. रंजना देशमुख यांना --

## रमेश मंत्री यांचे साहित्य

### विनोद

साखरेची चित्रे । वाटाण्याच्या अक्षता । कोल्ह्याची द्राक्षे । चोरवाटा । खसखशीचा मळा । कोल्हापुरी चिवडा । साखरपेरणी । सूर्याची पिले । सह्याद्रीची चोरी । ताजा कलम । जनू बांडे । स्वल्पविराम । जॅक पॉट । हसवाहसवी । कागदी वाघ । रुखवत । थट्टामस्करी । बायकोचा राग । पळसाला पाने पाच । दहीहंडी ।

### कादंबरी

तुमच्या पायी ठेविले मन । महानगर । अक्षर । उत्तरकाल ।

### प्रबंध

वृत्तपत्रव्यवसाय

### नाटके

वरातीमागून घोडे । करीन ती पश्चिम ।

### कथा

अखेरची शिकार

### प्रवासवर्णन

थंडीचे दिवस । नवरंग । क्षणाचा प्रवासी । सुखाचे दिवस ।

### विविध

हे अद्भुत जग । विझणारी आग ।

अनुक्रम

भुयारी गाड्यांचा अजबखाना ९
अतो झालं नि हसू आलं ! २१
अमेरिकेच्या महिला पुरुषांवर बलात्कार करायला तयार ! ३५
एका निवांत गावातले चार दिवस ४६
लास व्हेगसच्या जुगारी जगातल्या रात्री ५५
स्वप्ननगरी आणि चित्रनगरी ६९
सा रम्या नगरी — अखंड जत्रेचं गाव ८५
अमेरिकेची मायावती — मायामी ९७
अमेरिकेत महाराष्ट्राचा अभ्यास १११
नायगारा ते टोरंटो १२४
पुन्हा महानगर ! १३७
आणि पॅरिसच्या रात्री नग्न झाल्या ! १५१
कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही ... १६८

# भुयारी गाड्यांचा अजबखाना

५६८
२११३०

१

" काय मंत्री, तुम्ही अमेरिकेला जाणार असं ऐकलं '

" हो खरं आहे ते "

" तुम्ही एवढा खर्च करून जाणार, पण तिथं करणार काय ?"

" काहीच करायचं ठरवलेलं नाही मी नुसता जाणार अमेरिका पहाणार "

अमेरिका पाहून काहीतरी लिहिणार असाल तुम्ही ?" — डोळे बारीक करून संशयी नजरेने माझ्याकडे पहात विचारला गेलेला प्रश्न मी अमेरिकेविषयी लिहिणे, म्हणजे काहीतरी अनैतिक कृत्य करणे, असे या प्रश्नात गृहीत धरलेले असते

" लिहायचं असं काही ठरवलेलं नाही बुवा ! अमेरिकेविषयी इतक्या लोकांनी लिहिलं आहे, की म्या पामरानं त्यात भर घालावी असं काही मला वाटत नाही ! " मी म्हणतो, " एम्पायर स्टेट इमारतीची उंची आणि नायगारा धबधब्याची खोली किती हजार फूट आहे ही माहिती इथं मराठीचिये नगरी फार लोकांनी पोचती केली आहे "

" पण तुम्ही लेखक ! वारी फुकट घालवणार नाही — माझ्यावरचा अविश्वास ओतप्रोत भरलेल्या आवाजात छद्मी अभिप्राय मी अमेरिकेवर ' नाही – नाही ' म्हणत काहीतरी लिहिणार आणि आपला विश्वासघात करणार, ही माझ्या समोरच्या गृहस्थाची मनोमन खात्री

' लिहायचं असं ठरवलेलं नाही, तसंच काहीही झालं तरी लिहिणार नाही अशी प्रतिज्ञाही नाही काही वेगळा, वैयक्तिक अनुभव आला तर

लिहीन नाहीतर अमेरिका पाहून गप्प बसेन पण लिहाव अशी तळमळ लागली, तर मात्र केवळ इतरानी लिहिल म्हणून तो विचार सोडणार नाही "

माझ्या समोरच्या गृहस्थांच्या चेहेऱ्यावर निराशा आता आणखी काय खुसपट काढावे यावर अमळ विचार करून ते विचारतात, ' पण पधरावीस हजारांचा खर्च करून अमेरिका पाहिलीच पाहिजे अस आहे का ?"

" मी कुठ म्हणतोय् तस ? नाही पाहिली तरी चालत मी त्याचे म्हणणे मान्य करतो त्याना आणखी पुष्टी देण्यासाठी म्हणतो, ' आचार्य अत्रे यानी अमेरिका पाहिली नाही तरीही ते फार मोठे साहित्यिक होतेच "

पण इतका खर्च परवडतो तरी कसा तुम्हाला ?" माझ्या आर्थिक परिस्थितीची रात्रदिन चिंता करणारे —— आणि चिंता करण्यावाचून इतर काहीही न करणारे —— पांडूतात्या निष्कारण त्रस्त होऊन मला विचारतात

मी म्हणतो, " कोण म्हणतं मला परवडत म्हणून ? अहो हा खर्च मला मुळीच परवडत नाही !"

आता त्याचा चेहेरा उजळतो त्याना काहीतरी उणेपणा सापडल्याचा पुत्रजन्मा-सारखा आनद होतो. ते सहास्य मुद्रेने विचारतात, " मग हा न परवडणारा खर्च तुम्ही करता तरी कशाला ?"

मी खरे ते सागतो, " अहो, आयुष्यात मी सतत न परवडणाऱ्याच गोष्टी करीत गेलो आहे मी जर फक्त परवडणाऱ्याच गोष्टी केल्या असत्या, तर मी तुमच्यासारखाच राहिलो नसतो का ?"

त्यानतर ते गृहस्थ एक शब्दही न बोलता फणकाऱ्याने गेले, ते अजून भेटले नाहीत परदेशप्रवासाच्या अनेक फायद्यापैकी हा एक देशाटन केल्याने महाराष्ट्रातल्या अति विद्वानां-पासून काही काळ तरी बचाव होतो, हा जीवनातील एक मोठाच आनद आहे. परदेशात आपली पडिताची वगैरे मैत्री होतेच हे मात्र खरे नाही अमेरिकेत गेल्यावर आपला मुख्य सबंध येतो तो अमेरिकन वाणी म्हणजे डिपार्टमेंट स्टोअरवाला, बसचा ड्रायव्हर, भुयारी रेल्वेचा तिकिटविक्रेता किंवा ' सेल्फ सर्व्हिस रेस्टॉरंट'चा चालक आणि वर्तमानपत्रविक्रेता वाणी म्हटल्यावर जर कुणाच्या मनापुढे मळकट कपड्याचा, तेलकट गादीवर बसून कानात काडी घालीत, ' अरे हणम्या ! पाव किलो साखर दे रे बाधून त्या हाफ् पँटवाल्याला ! असा हुकूम सोडणारा, असे चित्र उभे रहात असेल तर ते अमेरिकन वाण्याचे नव्हे तिथे चटपटीत छोकऱ्या कमनीय कागदी पिशव्यातून तुमचे सामानसुमान बाधून देतात आणि ' टू डॉलर्स, ट्वेंटी प्लीज म्हणून उगीचच स्मित करतात त्यामुळे जरा प्रसन्न वाटते आणि पैसे गेल्याचे दु ख होत नाही. सबंध जन्मात मी आमच्याकडचा एकही वाणी चाळीस पैशाचे हिंगजिरे बाधून देताना हसलेला पाहिला नाही नसते एकेकाच्या नशिबात !

माझे अमेरिकेला जाण्याचे बेत खूप वर्षांचे जुने असले, तरी ते प्रत्यक्षात आले ते मात्र अगदी झपाट्याने अवघ्या साडेचार हजारात परतीचा प्रवास जाहीर झाला, तेव्हा

म्हटले जावे आपणही अमेरिका पहावी नवे जग काय आहे, कुठे चालले आहे हे चक्षुर्वै-सत्यम् पहावे थोडी मौजही करावी नाहीतरी इंग्लंडला जाऊन सोळा वर्षे झाली होती परदेशप्रवासाची खुमखुमी या सोळा वर्षांत अनेकदा आली पण या ना त्या कारणाने ते जमले नव्हते. अमेरिकेत तीन-साडेतीन महिने रहायचे म्हणजे बारा ते चौदा हजाराचा खर्च होता बरे, इतक्या लांब गेल्यावर पॅरिस, हॉलंड आणि लंडनला जावे, अशीही तीव्र इच्छा होती. परकीय चलनाचा प्रश्न फार अवघड नव्हता कारण माझा पगार मला परदेशात डॉलर्समध्ये मिळू शकत होता या साऱ्याचा विचार करून पैशाची जमवाजमव केली आणि अमेरिकेला जायचे निश्चित केले

अमेरिकेत रहाणाऱ्या अनेकांच्या नातेवाइकांनी माझ्याकडे काही (बाही) सामान दिलेच होते. कुणाचे फरसाण, कुणाच्या पुरणाच्या पोळ्या, कुणाचे पेढे, कुणाचे कपडे, कुणाचे पापड, तर कुणाच्या कुरड्या, असा व्यापारी माल मी बरोबर घेतला होता दोन मोठ्या बॅगा आणि एक छोटी अटॅची घेऊन मी कुटुंबियासह विमानतळावर वेळेपूर्वी तासभर हजर झालो तिथेही कुणीतरी सामान घेऊन आलेच होते आणि 'आमच्या साहेबांनी त्यांच्या जावयाला हे द्यायला सांगितलं आहे' असे म्हणून ते पाकिट माझ्या हातात दिले 'मी तो हमाल भारवाहक' या नम्र भूमिकेतून मी हे सारे सामान ठेवून घेत होतो पण घी देखा लेकिन बड्गा नही देखा' अशी माझी थोड्याच वेळात स्थिती झाली माझ्या दोन्ही बॅगांचे वजन करून तेथील एअर इंडियाचा अधिकारी अगदी सहजपणे म्हणाला, "एक्सेस बॅगेज चार्ज — वन थाउजंड, थ्री हड्रेड अँड सेव्हंटी रुपीज प्लीज

मी सर्दच झालो! तेराशेसत्तर रुपये सामानाचे वजन अधिक झाले म्हणून द्यायचे? — छे छे! ते शक्यच नव्हते एक तर इतके पैसे विमानतळावर कुणी नेत नाही दुसरे असे की, पैसे असले तरी जादा सामानाचे इतके पैसे देण्यापेक्षा तेच सामान अमेरिकेत खरेदी करणे स्वस्त पडले असते म्हणून मी भराभर दोन्ही बॅगा उघडल्या आणि अत्यावश्यक नसलेले सामान बाहेर काढले अमेरिकेत मित्रांना देण्यासाठी मी माझ्या काही पुस्तकाच्या पन्नाससाठ प्रती घेतल्या होत्या, त्यातल्या फक्त दोनतीनच मी ठेवून घेतल्या आणि बाकीच्या परत पाठवल्या काहीजणांचे सामानही मी आनंदाने परत दिले

विमानप्रवासाच्या बऱ्याच वर्णनाला वाचकाच्या परवानगीने फाटा देतो. कारण आमचं विमान हळूहळू सरकत आकाशात कसं झेपावलं, मग घर, रस्ते लहानलहान कसे दिसू लागले, आम्ही कमरेभोवती पट्टे कसे बांधले, एअर होस्टेसने आम्हाला कॉफी कशी दिली' वगैरे चिरपरिचित माहिती इतर प्रवासवर्णनात वाचता येईल पण थोडा वेगळा म्हणून लंडनचा अनुभव तेवढा देतो आमचे विमान मुंबईहून रात्री नऊला निघून दुसऱ्या दिवशी सकाळी अकराला लंडनच्या हीथ रो विमानतळावर पोचले पूर्वी मी लंडनला असताना श्रीमती गर्ट्रूड शार्प नावाच्या बाईची नि माझी मैत्री झाली होती माझे न्यूयॉर्कचे विमान लंडनला केव्हा पोचेल ते मी तिला आधी कळवले होते ती मला विमानतळावर भेटायला येणार असल्याचे तिने पत्र पाठवले होते तिला भेट म्हणून देण्यासाठी मी एक पातळही

बरोबर घेतले होते लंडनला उतरल्यावर मात्र मला समजले की मी 'ट्रॅन्झिट पॅसेंजर' असल्याने मला विमानतळाच्या ठराविक जागेबाहेर जाता येत नव्हते लंडनचा विमानतळ इतका प्रचंड आहे, की शार्पबाई कुठे असेल आणि कशी भेटेल याची काहीच खात्री नव्हती अखेर अनेक ठिकाणी चौकशी करताना एका तरुणीने सांगितले, " इथे पेजिंग सर्व्हिस आहे तिच्यावर मायक्रोफोनच्या साहाय्याने तुम्हाला तुमच्या मैत्रिणीला निरोप देऊन बोलावता येईल ' मी पेजिंग सर्व्हिसकडे गेलो माझे नाव त्या मुलीला सांगताच ती म्हणाली, ' तुमचं नाव मघापासून तीन वेळा अनाउन्स झालं तुम्हाला एक बाई भेटणार आहेत आणि त्या चौदा नंबरच्या पॅसेंजर एक्झिटजवळ उभ्या आहेत "


मी तिकडे गेलो, तेव्हा श्रीमती शार्प हातात एक पुस्तक घेऊन उभी होती, ते मला दिसले मी हात उचावला आणि तिनेही हात उचावून माझे स्वागत केले पण मला ट्रॅन्झिट कार्डवर तिच्याकडे जाणे शक्य नव्हते म्हणून मी विमानतळाच्या इमिग्रेशन अधिकाऱ्याकडे गेलो आणि माझा पासपोर्ट, तिकिट वगैरे दाखवून मला अर्धापाऊण तास बाहेर पडायचे आहे असे सांगितले तितक्यात विमानात माझ्या जवळ बसलेला एक ख्रिश्चन गृहस्थ म्हणाला, मीही तुमच्याबरोबर येतो " त्याला स्पष्ट नकार देता येईना पण त्या कामी त्याला निरुत्साही करण्यासाठी मी म्हटले, " पण मला माझ्या मैत्रिणीला भेटायचं आहे



त्यावर निराश न होता तो अधिकच उत्साहाने म्हणाला, " मीही तुमची मैत्रीण पाहीन " असा हा चौकस माणूस परदेशी नसून मुंबईचाच असला पाहिजे हे चतुर वाचकांनी ओळखलेच असेल

इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी माझ्या पासपोर्टवर शिक्का मारून मला चक्क सहा महिने इंग्लडमध्ये रहाण्याची परवानगी दिली ! मला सहा ताससुद्धा रहाणे शक्य नव्हते पण आता अधिक चौकशी न करता मी घाईघाईने शार्पकडे गेलो बरोबर तो शेजारी होताच. त्याने आमची भेट डोळे भरून पाहिली आणि ट्रॅन्झिट लौंजच्या बाहेर आल्याचे सार्थक झाल्याचे समाधान त्याला झाले असावे. मी शार्पला पातळ दिले. तिने माझ्यासाठी एक देखणे आणि भारी पुस्तक भेट म्हणून आणले होते, ते तिने मला दिले. सोळा वर्षांनतर

" एक्सेस बॅगेज चार्ज —
वन थाउजंड थ्री "



आमची ही भेट होत होती गेल्या वेळी मी लंडन सोडण्यापूर्वी एका स्टेशनावर तिने मला निरोप दिला होता त्यानंतर आता या सोळा वर्षांत नाताळला आणि माझ्या वाढदिवसाला तिचे शुभेच्छा कार्ड कधीही चुकले नाही अमेरिकेहून परत इंग्लंडला येऊन तिच्याकडे रहाण्याचे आश्वासन मी तिला दिले आणि ट्रॅन्झिट लौंजकडे परतलो कारण दोन तासापैकी दीड तास कधीच संपला होता आमच्या विमानाचे उड्डाण ध्वनिवर्धकावरून जाहीर होत होते तेवढ्यातल्या तेवढ्यात लंडन विमानतळावर एक ग्लास जर्मन बीअर घेतली आणि मी पुन्हा जंबो जेट'मध्ये आलो

लंडन ते न्यूयॉर्क हा प्रवास नेहेमीच कंटाळवाणा असतो कारण साडेसहा तासाच्या या प्रवासात सभोवती आकाश आणि खाली अटलांटिक महासागर याशिवाय काहीही दिसत नाही लंडनला पोचण्यापूर्वी बैरुतच्या आसपास मात्र रात्रीचे एक वेगळे दृश्य दिसले. त्या भागात तेलाच्या शेकडो खाणी आहेत त्याचा विषारी वायू जाळण्यात येतो, तो पेट-लेला प्रकाश विमानातून फार प्रभावी दिसतो रोमला येण्यापूर्वी रात्री आणखी एक विलक्षण दृश्य दिसले आमच्या विमानाखाली काळे ढग होते आणि त्या ढगांत विजा चमकत होत्या, कडाडत होत्या विजा नेहेमी आपल्या डोक्यावर, आकाशात पहाण्याची सवय असल्याने, आपल्या पायाखाली विजा चमकल्याचे ते दृश्य अद्‌भुत दिसले

दुपारी साडेतीनच्या सुमाराला न्यूयॉर्क यायचे होते पण आमच्या विमानाला उशीर झाल्याने आम्ही जवळजवळ तासभर उशीरा तिथे पोचलो मला उतरून घेण्यासाठी माझे एक मित्र येणार होते आणि ते आलेही होते असे मला नंतर समजले पण मला ते दिसले नाहीत आणि आमची चुकामुक झाली कस्टममध्ये माझ्याकडे आक्षेपार्ह असे काही नसल्याने मला काही अडचण येणार नाही अशी माझी समजूत होती पण अमेरिकन सरकारच्या कस्टम–खात्याच्या कार्डमध्ये 'माझ्याकडे कसलीही वनस्पती अथवा झाड नाही' असे छापले होते व त्यावर सही करायची होती ती सही करताना मात्र माझी पंचाईत झाली कारण पिटस्‌बर्ग येथील एका मित्राने मला आमटीत घालण्यासाठी कढीलिंबाचा पाला आणायला सांगितले होते आणि त्या पानाचा गठ्ठा माझ्या बॅगेत होता अमेरिकन कस्टमच्या अधिकाऱ्याना ती पाने निरुपद्रवी आहेत असे कितीही समजून सांगितले तरी त्यांना ते पटणार कसे ? कारण गांजा, अफू, चरस इत्यादी अमली वनस्पती अमेरिकेत कोणी आणू नयेत या हेतूने कस्टमच्या अधिकाऱ्यानी ही तरतूद केलेली होती परदेशातून अमेरिकेत आलेल्या झाडांचे रोग अमेरिकन झाडाझुडपावर पसरू नयेत हाही या नियमाचा एक उद्देश होताच पण माझ्याकडे वनस्पती आहे असे म्हटले तर तिची तपासणी तज्ज्ञाकडून होईपर्यंत मला विमानतळावरच थांबावे लागेल म्हणून मी देवावर भरवसा ठेवून वनस्पती नस–ल्याच्या कार्डावर सही केली आणि ते अधिकाऱ्याच्याकडे दिले सुदैवाने माझ्या सामानाची विशेष तपासणी झालीच नाही बहुधा माझ्या निरागस की काय म्हणतात त्या चेहेऱ्याकडे पाहूनच कस्टम अधिकाऱ्यानी 'हा बावळट माणूस बेकायदा असं काय आणणार म्हणा !' —– असा विचार करून मला मुकाट्याने जाऊ दिले असावे.

न्यूयॉर्कच्या अवाढव्य केनेडी विमानतळाच्या लॉबीमध्ये उभा राहून मी काही वेळ मित्राची वाट पाहिली प्रवाशांना सूचना देणाऱ्या गाइडमध्ये लिहिले होते की, अमेरिकेत टॅक्सी आणि बस् याच्या मधला ' लिमोसिन नावाचा खेचरासारखा प्रकार असतो त्या मोटारीत सातआठ उतारू घेतात आणि टॅक्सीपेक्षा कमी डॉलर्समध्ये ज्यालात्याला हव्या त्या जागी सोडतात म्हणून ' लिमोसिन कुठे मिळेल असे विचारायला इन्फर्मेशन'च्या बूथकडे गेलो ऐकण्यात आणि सागण्यात घोटाळा नको म्हणून सुवाच्य टाइप केलेला पत्ता त्या बाईसमोर ठेवला आणि ' व्हॅन वाइक एक्सप्रेस हायवे'ला जाण्यासाठी ' लिमोसिन ' कुठे मिळेल असे विचारले ती म्हणाली, ' अहो हे ठिकाण अगदीच जवळ आहे टॅक्सीन फक्त चारपाच डॉलर्समधे जाऊ शकाल " मी बाईवाक्यम् प्रमाणम् मानून टॅक्सी केली आणि मित्राच्या घरासमोर आलो तिथे इमारतीचा रक्षक म्हणाला, " ती दोघंही नवरा–बायको बाहेर गेली आहेत तुमचं सामान इथच ठेवा आणि थोडा वेळ फिरून या तोपर्यंत येतील ती '

मी सामान ठेवले आणि न्यूयॉर्कमध्ये एकटाच भटकायला निघालो समोरच एक कँडी स्टोअर दिसले आत जाऊन अमेरिकेतला पहिला चहा घेतला मग आठवले की आपल्या खिशात भलीमोठी पेढ्याची पुडी आहे आणि ती कुणाकडे द्यायची त्याचा पत्ता आणि फोन नंबर तीवर आहे मी कँडी स्टोअरमधल्या फोनमधे दहा सेंटचे नाणे टाकले आणि फोन केला ते लोक घरी होते त्यांनी लगेच येऊन पेढे घेऊन जायचे कबूल केले त्याप्रमाणे ते पत्नीसह आणि मुलीसह आपल्या मोटारीने आले आणि माझे मित्र घरी येई–पर्यंत मला फिरायला घेऊन गेले ' आपण आमच्या घरी चहाला नि जेवायला आलंच पाहिजे ' असा त्यांनी आग्रह केला. मीही ते मान्य केले थोड्या वेळाने त्यांनी मला घरी आणून सोडले पुढल्या चार महिन्यात आपल्या घरी येण्यासाठी त्यानी मला कधीही फोन केला नाही मराठी माणसे अमेरिकेत गेली तरी ' आमच्याकडे या ना एकदा ' या अंधुक निमत्रणाला जागत नाहीत आणि आपली अस्मिता का काय म्हणतात, ती कशी जागृत ठेवतात हे अमेरिकेत भेटलेल्या पहिल्याच मराठी माणसाने मला चागलेच दाखवून दिले अर्थात पुढे मात्र याच्या अगदी उलट वागणारे खूपच मराठी लोक मला भेटले, हे वेळीच नमूद केले पाहिजे

ज्याच्याकडे मी उतरणार होतो, ते शशिकांत देशमुख आणि त्यांची पत्नी रजना ही दोघे विमानतळावर माझी वाट पहात होती ती बिचारी सर्व प्रवासी सपेपर्यंत तिथे थाबली अखेर त्याना तिथल्या अधिकाऱ्यानी सागितले, आता या फ्लाइटचे दोनच प्रवासी शिल्लक राहिलेत. ते दोघेही शीख आहेत, आणि त्याच्या सामानात गांजा–चरस सापडल्यामुळं त्यांना विमानतळाबाहेर सोडण्यात येणार नाही त्या दोघाना त्याच रात्री आठ वाजताच्या विमानात बसवून भारताला परत पाठवण्यात येईल '

हे ऐकल्यावर देशमुख–पतिपत्नी घरी परतली आणि खाली ठेवलेले माझे सामान घेऊन आपल्या ब्लॉकवर गेली थोड्याच वेळाने मी फिरून घरी आलो आणि त्याचीमाझी

भेट झाली विमानतळावरून घरापर्यंतचा सातआठ मैलाचा रस्ता टॅक्सीने कापताना अमेरिकेबद्दलची पहिलीच गोष्ट माझ्या लक्षात आली ती ही की, रस्त्याने चालत जाणारा एकही माणूस मला दिसला नाही सर्व वाहतूक खाजगी मोटारी, बस, टॅक्सी अशा वाहनांनीच चाललेली होती रस्ते अवाढव्य रुंद होते आणि त्यावर सहा मार्ग (लेन्स्) होते मोटारींचा वेग पन्नास ते साठ मैलांचा होता सुसाट धावणे हा अमेरिकेचा आणि विशेषत न्यूयॉर्कचा अविभाज्य गुण

दुसऱ्या दिवशी मित्राबरोबर न्यूयॉर्क शहर पहायला बाहेर पडलो प्रथम गेलो तो मॅनहटनवर. हा भाग म्हणजे आपल्या मुंबईचा फोर्ट विभाग जगातील अत्यंत उंच इमारतींचा हा मॅनहटन भाग म्हणजे सर्वांत धनाढ्य लोकांच्या आर्थिक उलाढालींचा बालेकिल्ला पण त्या दिवशी रविवार होता म्हणून सगळीकडे शुकशुकाट होता आमच्यासारखे अगदी थोडे तुरळक लोक हिंडताना क्वचित दिसत होते पण तेही दबकतदबकतच स्वातंत्र्यदेवतेचे प्रथमदर्शन दुरूनच घेतले काही झाले तरी स्त्रीच ! एकदम सलगी बरी नव्हे अनेक लोक एकदम दांडगाई करून तिच्या पोटात शिरतात आणि डोक्यात जातात. पुरुष बायकाना आपल्या डोक्यावर घेऊन नाचतात हे अनेकदा दिसणारे दृश्य असले, तरी अनेक पुरुषाना डोक्यावर घेणारी ही एकटीच बया म्हटली पाहिजे ! न्यूयॉर्कमध्ये येणाऱ्याचे स्वागत करणारी ही देवता हसत नाही ती तशी गंभीरच आहे तिच्या चेहेऱ्यावरच्या या गांभीर्याबद्दल बोलताना एक अमेरिकन म्हणाला, " ती नुकतीच बाळंत झाली आहे ना ! तिनं स्वातंत्र्याला जन्म दिला, तेव्हाचा पुतळा आहे तो. "

न्यूयॉर्कच्या प्रेक्षणीय स्थळाची लांबी, रुंदी, उंची देऊन वाचकांना हैराण करण्याचा माझा मुळीच मानस नाही वॉशिंग्टनमध्ये मला एक अमेरिकन अधिकारी भेटला. सहज बोलताना तो म्हणाला, " तुम्ही प्रवासी लोक सारे काही पहाता अहो मी अजून लॉस एंजेलिसला गेलो नाही फार काय, न्यूयॉर्कला 'एम्पायर स्टेट बिल्डिंग'च्या शेजारच्या इमारतीत मी सहा वर्षे काम करीत होतो, पण त्या जगप्रसिद्ध इमारतीत मी कधीही गेलो नाही ती इमारत केव्हाही पहाता येईल अशा विचारानं मी रोज तिच्याकडे पहात असे माझ्या ऑफिसच्या खिडकीतून तिचे दहाबारा मजले दिसत होते पण त्या इमारतीत मी शिरलो नाही.

मी म्हटले, " मुंबईस येणारे हजारो अमेरिकन प्रवासी घारापुरीची लेणी पहातात मुंबईपासून ती अगदी जवळ आहेत पण मी मात्र ती अजून पाहिलेली नाहीत ! "

न्यूयॉर्क शहराचे वर्णन मी करीत नाही हे खरे पण या महानगरात रहाणे म्हणजे एक वेगळा, अविस्मरणीय अनुभव आहे हे मात्र खरे. या शहरात जगातील जितके वंश, धर्म, जाती, रंग आणि प्रकार दिसतात तितके इतर कोणत्याही शहरात दिसत नाहीत टोकियो हे सर्वांत अधिक लोकवस्तीचे (एक कोटी दहा लक्ष) शहर असले, आणि न्यूयॉर्क हे जगातील दुसऱ्या क्रमाकाचे (९५ लक्ष) शहर असले, तरी वैचित्र्यात या महानगरीचा क्रम वरचा आहे नीग्रो, चिनी, जपानी, भारतीय, मंगोलियन, पोर्ट रिकन, स्पॅनिश, इटा-

लियन, फ्रेंच, जर्मन -- अशा अनेक देशाच्या लोकाची न्यूयॉर्कमध्ये खिचडी झाली आहे, आणि त्या गोंधळातही एक प्रकारची सुसंगती आणि गंमत आहे अर्धनग्न हिप्पींच्यापासून पायघोळ झग्यात आकंठ झाकल्या गेलेल्या नायजेरियनापर्यंत सारे प्रकार इथे दिसतात त्या सर्वांना आवडणारे विविध प्रकारचे अन्न देणारी उपाहारगृहे आहेत आणि हजारो प्रकारच्या सौंदर्यांनी नटलेल्या मदनमस्त स्त्रियाही मुबलक पहायला मिळतात स्त्रियाच्याबद्दल बोलायचे, तर खुद्द अमेरिकन स्त्रियांत मला फारच थोड्या सुंदर स्त्रिया दिसल्या त्याच्यापेक्षा आमच्या महाराष्ट्रीय स्त्रियात सुंदरींचे प्रमाण कितीतरी अधिक आहे

न्यूयॉर्कच्या भुयारी आगगाड्या म्हणजे एक अजबखाना आहे लंडन, पॅरिस, टोरंटो या गावच्या भुयारी गाड्या फार सोप्या आणि सरळ आहेत पण न्यूयॉर्कच्या भुयारी रेल्वेत तुम्ही चुकला नाहीत तर तुम्ही स्वत ला नशीबवान समजले पाहिजे जगातल्या कोणत्याही रेल्वेस्टेशनला त्या स्टेशनचे नाव असते पण न्यूयॉर्कच्या भुयारी रेल्वेच्या स्टेशनचे नाव पहाण्यासाठी तुम्हाला ३५ सेंटचे तिकिट काढावे लागते कारण रस्त्यावर स्टेशनाची नावे

“ मिस्टर ! मघापासून मी तुम्हाला तीन वेळा एकच रस्ता सांगितला ! ”



नसतात, तर फक्त त्या स्टेशनवरून जाणाऱ्या भुयारी रेल्वेच्या लाइनचे नाव असते उदाहरणार्थ, ' आय् आर टी (IRT), ' इन्ड ' (IND) म्हणजे इंडिपेंडट, ' बी एम टी ' (BMT) — अशी नावे रस्त्यावरून खाली जाण्याच्या प्रवेशद्वारावर •असतात म्हणजे समजा, मुंबई ते पुणे या लाइनच्या सर्व स्टेशनावर त्या त्या स्टेशनचे नाव न लिहिता नुसते ' सेंट्रल रेल्वे ' असे लिहिले, तर तुम्ही काय शंख करणार ? ( न्यूयॉर्कमध्ये तसे करणेही कायद्याविरुद्ध आहे तुम्हाला अटक होईल. ) बरे एका लाइनचे नाव सर्वत्र एकच असावे अशी जर तुमची अपेक्षा असेल तर ती रास्त मानावी लागेल पण न्यूयॉर्क–मध्ये नव्हे लग्नानंतर माहेरचे नाव मुली बदलतात, त्याप्रमाणे विशिष्ट स्टेशननतर तीच लाइन वेगळ्या नावाने धावू लागते ' इंड रेल्वे सहाव्या अव्हेन्यूनंतर एकदम ' ब्रॉडवे ' लोकल होते, आणि चौतिसाव्या रस्त्यापासून ' आय् आर टी'ची काही कारण नसताना एकदम ' बी एम टी ' होते या सर्व घोटाळ्यात पडूनही तुमचे डोके ठिकाणावर राहिले, तर त्यावरही न्यूयॉर्कच्या भुयारी रेल्वेकडे उपाय आहे लंडन, पॅरिस या शहाण्या रेल्वे फलाटावर एकाच प्रकाराने येतात पण न्यूयॉर्कमध्ये तसे नाही तुम्ही एफ् गाडीने जाण्याच्या तयारीत असता, उतरणाऱ्या लोकाना बाजूला ढकलून तुम्ही कसेबसे आत शिरून उभे रहाता आणि तिसऱ्या स्टेशनवर उतरायचे म्हणून नक्की ठरवता त्याप्रमाणे तुम्ही तिसऱ्या स्टेशनवर उतरता पण तुमच्या अपेक्षेप्रमाणे ते स्टेशन जॅक्सन हाइट्स ' हे नसते, तर त्याच्या पुढचे सातवे स्टेशन ' क्वीन्स प्लाझा ' हे असते हा चमत्कार कसा झाला याचा तुम्ही विचार करता, तेव्हा तुम्ही ज्या गाडीतून नुकतेच उतरलेले असता ती तुमच्या पुढून जाते आणि तिचा पार्श्वभाग पाहिल्यावर तुमच्या लक्षात येते की आपण ' एफ्'च्या ऐवजी ' ई ' एक्स्प्रेसने प्रवास करीत होतो अर्थात आता उलट प्रवास करण्या-साठी तुम्ही विरुद्ध बाजूच्या प्लॅटफॉर्मवर उभे असता आणि टार्झनसारखी गाडीत अचूक उडी मारता ती गाडी दोन स्टेशनांनतर थांबते आणि सगळेजण उतरल्यावर तुम्हाला कळते की ही ' डबल ई ' (EE) गाडी असून पुढे जात नाही मग तुम्ही खाली उतरून चारसहा लोकांच्याकडे चौकशी करता की, ' जॅक्सन हाइट्स'कडे कोणती गाडी जाते ?

अमेरिकेतल्या भुयारी फलाटावर अशी चौकशी केली की, सहापैकी दोनजणांना तुमचे बोलणे समजत नाही. एकजण बहिरा असतो आणि उरलेले तिघे तीन उलट दिशा–कडे बोटे दाखवतात अशा वेळी उरलेल्या चौथ्या दिशेकडे जाऊन गाडी पकडणे हा एकमेव खात्रीचा उपाय असतो या साऱ्या घोटाळ्यातून समजा एखादा परकीय प्रवासी वाचलाच, तर काय करायचे असा प्रश्न न्यूयॉर्कच्या भुयारी रेल्वेच्या सचालकापुढे पडणे साहजिक आहे. त्यासाठी त्यांनी अशी उपाययोजना केली आहे की, एकेका स्टेशनची तीन किंवा चार नावे द्यायची उदाहरणार्थ, ज्याला आपण मर्त्य लोक जॅक्सन हाइट्स ' म्हणतो त्याला अमेरिकन रेल्वेवाले रुझवेल्ट अव्हेन्यू म्हणतात कारण त्यामुळे जास्तीत जास्त लोकाना चकवता येते असा त्यांचा रास्त अनुभव आहे त्याच्या पुढच्या स्टेशनला तीन नावे आहेत तुम्ही गाडीच्या कंडक्टरला जरी विचारले की, ' मला ' फॉरेस्ट हिल्स'ला उतरायच आहे.

कसा जाऊ ?' तो सांगेल 'कॉंटिनेंटल अव्हेन्यूला उतरा' तुम्ही तिथे उतरून 'फॉरेस्ट हिल्सला जाणारी गाडी कुठून सुटते' अशी चौकशी करा आपले हसू दाबीत जवळचा अमेरिकन सांगेल, द्राय सेव्हन्टी फर्स्ट अव्हेन्यू

आता हा एकाहत्तरावा अव्हेन्यू कसा गाठायचा ? खरे तर हे फार कठिण नाही. न्यूयॉर्कमध्ये तुम्ही साधारण चाळीस वर्षे राहिलात आणि तीन हजार वेळा चुकलात की तुम्हाला सहज कळेल, की कॉंटिनेंटल अव्हेन्यू, फॉरेस्ट हिल्स आणि सेव्हन्टी फर्स्ट अव्हेन्यू ही तिन्ही एकाच स्टेशनची नावे आहेत आता पुणे स्टेशनवर जर दिल्ली, कलकत्ता, मद्रास असे फलक सर्वत्र लावले तर ते गाव कोणते आहे हे जसे सहजपणे नक्की सांगता येईल, तसाच न्यूयॉर्कच्या सब्वेचा गोंधळही संपवता येईल

भुयारी रेल्वेचा हा गुंता आता अती झाला असे तुम्हाला वाटते ना ? पण तुमच्या सोयीसाठी या रेल्वे धावतात असे कुणी सांगितले ? आपण हा चक्रव्यूह कशासाठी तयार केला आहे, हे रेल्वेवाल्यांना चांगले माहीत असते रोज भुयारी रेल्वेने जाणाऱ्या लक्षावधी प्रवाशांपैकी एखादा बिलंदर प्रवासी हे सर्व अडथळे ओलांडून आपल्या इच्छित जागी जाण्याची शक्यता असते याची अधिकाऱ्यांना कल्पना नसते असे नाही त्यासाठी त्यांचा हुकमाचा पत्ता असतो तो म्हणजे भुयारी स्टेशन्सना निरनिराळ्या पातळ्या करायच्या आणि एका रेल्वेच्या डोक्यावरून दुसरी अशा रेल्वे धावडवायच्या 'क्वीन्स प्लाझा' या स्टेशनवर 'ई', 'एफ्', 'जीजी' आणि 'ईई' अशा चार रेल्वे आहेत तुम्ही तिकिट काढून खाली गेलात आणि वर्षभर जरी फिरत राहिलात, तरी त्या रेल्वेच्या खाली असलेली दुसरी रेल्वे सापडणार नाही ही माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते पहिली भुयारी रेल्वे जमिनीपासून चाळीस फूट खोल चालत असेल, तर त्याखालची रेल्वे ऐंशी फूट खोलीवर धावते ती कुठून निघते आणि कुठे जाते याची माहिती उघड करणाऱ्याला 'ऑफिशियल सीक्रेट्स ॲक्ट'खाली पंधरा वर्षांची शिक्षा होते असे म्हणतात 'व्हाइट हाउस'ची गुपिते फोडणाऱ्या जॅक अँडर्सन यानेही या अतिखोल रेल्वेचा सुगावा काढण्याच्या कामी पहिल्या पातळीवरच्या प्लॅटफॉर्मवरच हात टेकले ! न्यूयॉर्कच्या भुयारी रेल्वेचे गुपित फुटू नये म्हणून त्या गाड्याचा आवाज इतका मोठा ठेवण्यात येतो की अगदी चिकटून बसलेल्या माणसानाही एकमेकांचे बोलणे समजणे अशक्य असते. एका जागतिक समितीने असा निष्कर्ष काढला आहे की, न्यूयॉर्क सब्वे हे जगातील सर्वांत अधिक आवाज करणारे वाहन आहे

'टाइम्स स्क्वेअर' या स्टेशनवर गाडी बदलावी म्हणून मी तिथल्या वर्तमानपत्र-वाल्याला दबकत विचारले," एकशेअडुसष्टाव्या रस्त्याची रेल्वे कुठे मिळेल ?" त्याने वर्तमान-पत्रातून डोके न काढताच सांगितले," सरळ जा. मग प्लॅटफॉर्मच्या कडेला डावीकडे जा मग तिकिट घ्या, पॅसेज ओलांडा, खाली जा नि पाचव्या एन्ट्रन्सला उजवीकडे वळा.'

—अरे बाप रे ! इतकी लांब सूचना लक्षात रहायची म्हणजे कठिणच ! मी सरळ गेलो, प्लॅटफॉर्मच्या कडेला डावीकडे गेलो आणि पॅसेज ओलांडला सुदैवाने तिथे एक पेपरचा स्टॉल होता त्याला विचारले त्याने अगदी पहिल्याच पेपरवाल्यासारखी लांबलचक

सूचना दिली दहा मिनिटांनी तिसऱ्या प्लॅटफॉर्मवर आणखी एक वर्तमानपत्रवाला भेटला त्याला भीतभीत विचारले तेव्हा तो हातातला 'डेली न्यूज'चा अंक टाकून सत्रस्त होत्साता म्हणाला, "मिस्टर! मघापासून मी तुम्हाला तीन वेळा एकच रस्ता सांगितला!"

मग माझ्या लक्षात आले की, प्लॅटफॉर्मला वळसा घालून मी मघापासून त्याचत्याच जागी परत येत होतो आणि त्याच माणसाला रस्ता विचारीत होतो! मी लगबगीने तिथून निघालो आणि चालत्या जिन्यावरून रस्त्यावर आलो समोर दिसलेल्या पहिल्याच टॅक्सीत उडी मारून मी म्हटले, "वन सिक्स्टीएट स्ट्रीट प्लीज." इंजिन सुरू न करताच टॅक्सीवाल्याने मला सल्ला दिला, "तुम्ही सब्वेनं का जात नाही? टॅक्सीपेक्षा लवकर पोचाल तुम्ही तिथ"

मी म्हटलें, "मला आगगाडीची ॲलर्जी आहे तू चल"

"ओके." असे म्हणून त्याने आपली 'येलो कॅब' सुरू केली, आणि मी भुयारी रेल्वेला वरूनच नमस्कार केला!

# अती झालं नि हसू आलं !

२

न्यूयॉर्कच्या भुयारी रेल्वेतून मार्ग काढणं कठीण हे तर खरंच पण म्हणून न्यूयॉर्कच्या रस्त्यावर एखाद्याचा पत्ता शोधणं सोपं, अशी जर तुमची समजूत असेल तर ती चुकीची आहे त्यातून पत्ता सांगणारा जर आमचा मराठी गडी असेल तर हे काम अधिकच अवघड होतं न्यूयॉर्कला गेल्यावर असा कोणत्या तरी मित्राचा फोन येतो ' शनिवारी संध्याकाळी माझ्या घरी पार्टी आहे तू यायलाच पाहिजेस " मी विचारतो, पण तुझा पत्ता कसा सापडणार ?" मग तो यथेच्छ हसतो आणि माझी कीव करतो तो म्हणतो, "अरे, न्यूयॉर्कमधे पत्ता शोधणं ही जगातली सर्वांत सोपी गोष्ट आहे ! आमच्याकडे काय आहे की, सगळ्या आडव्या रस्त्यांना ' अव्हेन्यू ' म्हटलेलं असतं आणि उभ्या रस्त्यांना ' स्ट्रीट ' म्हटलेलं असतं प्रत्येकाला नंबर असतो प्रत्येक घराला नंबर असतो. सम नंबर रस्त्याच्या एका बाजूला, आणि विषम नंबर उलट बाजूला असतात आता समज, तुला ' ४४२, फिफ्थ अँड सेवंटी नाइन ' असा कुणी पत्ता दिला, तर सरळ फिफ्थ अव्हेन्यूवर जायचं त्याला छेदणारा एकोणऐंशी क्रमांकाचा रस्ता शोधायचा त्यावर ४४२ नंबरच्या इमारतीत तू जायचंस कळलं ?"

मी कळल्याचं कबूल करतो आणि विचारतो, ' हां ! मी हा नंबर लिहून घेतला आहे. तिथं किती वाजता यायचं ?"

त्यावर तो सांगतो, " छे छे ! अरे त्या पत्त्यावर तू मुळीच जाऊ नकोस गेलास तर तू ' मार्क अँड स्पेन्सर'च्या दुकानात जाशील माझ्या घरात येणार नाहीस !"

मी हताश होऊन विचारतो, ' अरे मग हा पत्ता दिलास कशाला ? न्यूयॉर्कमधे मी कुठकुठ जायच नाही म्हणजे तुझं घर सापडेल ते जर सागणार असशील, तर मला लाखो पत्ते उतरून घ्यावे लागतील ।"

तस नव्हे रे । माझ्यासमोर पेपर पडला आहे त्यातल्या जाहिरातीतला पत्ता मी तुला उदाहरण म्हणून दिला '

" बर, आता जगाला उदाहरणं घालायच सोडून तू सरळ तुझ्या घराचा पत्ता साग "

" ह टिपून घे आधी साग की, तू कुठल्या सब्वेजवळ रहातोस ?'

' व्हॅन वाइक बुलेव्हार्ड '

" गुड् । मग अस कर की, तिथून ' ई किंवा ' एफ् ' घे आणि फॉरेस्ट हिल्सला ये तिथ ' डबल ई ' घेऊन लेक्झिंटनला ये तिथ ' आय्–आर्टी ' घेऊन बोलिंग ग्रीनला जा आणि तिथ डबल एस् ' घे. मग प्रॉस्पेक्ट अव्हेन्यूला ये तिथं समोरच डबल आर दिसेल तिनं न्यू डट्रेक्टला जा "

' मसणात जा ! —– अस मी मनातल्या मनात वैतागानं म्हणतो. कारण यानं सागितलेला पत्ता घेऊन मी साधारण दोन वर्ष तरी जमिनीखाली गाडला जाईन अशी माझी खात्री असते तो सागतच असतो आता फरक एवढाच की, मी उतरून घ्यायचा थांबलेला असतो आणि नुसताच ऐकत असतो कारण याच्या पार्टीला या जन्मात तरी जायचं नाही हे पत्त्याच मार्गदर्शन ऐकतानाच मी ठरवलेल असतं त्याचं चऱ्हाट चालूच असतं " तर सब्वेमधून वर आलास, की पेनरोज अव्हेन्यू लागेल. तो ओलाडून थर्टी फिफ्थला ये तिथ तिसरा डावा घे

मी सगळ शातपणे ऐकून घेतो, आणि शनिवारी दुपारी ' मी आजारी असल्यानं पार्टीला येता येत नाही ' अस कळवायचा निर्णय घेतो एखादा क्रातिकारक कार्यकर्ता भूमिगत होतो म्हणजे काय होतं ते न्यूयॉर्कला गेल्यावर समजतं तो न्यूयॉर्कच्या भुयारी रेल्वेत खोलवर जमिनीखाली जाऊन दहाबारा वर्ष पत्ता शोधीत असतो !

अशाच माझ्या एका मित्रानं अगदी सोप्पा पत्ता सागितला तो म्हणाला, " अरे हा पत्ता तुला अगदी सहज सापडेल तू व्हॅन वाइकला बैस आणि एफ् ' ट्रेनन तिसऱ्या स्टॉपला उतर वर आलास की उजव्या हाताचा पहिलाच रस्ता सिक्स्टी फाइव्ह क्वीन्स बुलेव्हार्ड लागेल तिथ तू याव मी मोटार घेऊन येतो."

मी आज्ञापालन केल तिसऱ्या स्टेशनला उतरलो. तिथ सिक्स्टी फाइव्ह रस्ता किंवा क्वीन्स बुलेव्हार्डचा पत्ता नव्हता तिथ हिल साइड अव्हेन्यू होता स्टेशनमास्तरला विचारल्यावर त्यान सागितल की, व्हॅन वाइकपासून उलट बाजूला मी प्रवास केला आहे, म्हणून परत जमिनीखाली जाऊन सहा स्टेशन्स प्रवास करायला हवा. मी परत गेलो आणि ठरलेल्या जागी उभा राहिलो. पण तोपर्यंत माझा मित्र येऊन माझी वाट पाहून कटाळून गेला होता पण त्या शहाण्यानं मला दिशा सागताना कोणत्या बाजूला जाणारी सब्वे

मी घ्यायची हे सांगायला नको होतं का ? मी मॅनहटनकडे जाणारी रेल्वे घेणार हे गृहीत धरूनच त्यान मार्गदर्शन केल होत

आणखी असाच एक प्रसंग एका विद्वान मित्रान मला टाइम्स स्क्वेअर भुयारी रेल्वेन वर आल्यावर कँडी स्टोअरजवळ उभं रहायला सांगितल त्याची–माझी भेट कधीही झाली नाही उलट नतर फोन करून तो तणतणला की, “ मी दीड तास तुझी कँडी स्टोअरजवळ वाट पाहिली ! ' मी म्हटल, “ मीही जवळजवळ तेवढाच वेळ ताटकळत होतो. अरे गृहस्था ! टाइम्स स्क्वेअर ' स्टेशनमधून बाहेर पडण्याचे आठ रस्ते आहेत आणि त्या प्रत्येक रस्त्यावर निदान तीनतीन कँडी स्टोअर्स आहेत. त्यांपैकी कुठल्या रस्त्यान मी वर याव हे तू सांगायला नको होतंस का ? ”



“ युद्ध करण्यापेक्षा तरी ही कमी भयंकर गोष्ट आहे ! ”

एका विदुषीन मला घरी जेवायला बोलावलं नि सांगितलं की, " ग्रँड अव्हेन्यूच्या सब्वेच्या पहिल्या एक्झिटमधून वर या, नि तिथल्या टेलिफोन बूथजवळ थांबा मी गाडी घेऊन येते " मी बरोबर त्या जागी गेलो आणि टेलिफोनचं घरटं शोधीत चांगला अर्धा मैल चाललो परत येतो, तो ती बाई स्टेशनजवळ अस्वस्थपणे घड्याळाकडे पहात मोटार घेऊन उभी होती ती म्हणाली, " किती उशीर ? इथं पार्किंगलाही परवानगी नाही " मी मोटारीत बसत म्हटलं, ' अहो पण तुमचा तो टेलिफोन बूथ इथं कुठं नाहीच की ! मी केव्हाच आलो आहे आणि त्याला शोधतो आहे "

मोटार सुरू करताना इकडेतिकडे पहात ती म्हणाली, " अय्या ! खरंच की ! वर्षभरापूर्वी मी सब्वेनं ऑफिसला जायची, तेव्हा होता तो इथं हल्ली काढलाय वाटतं ! '

झालं का ? म्हणजे तिथून टेलिफोन बूथ हलवला याची हिला कल्पनाही नाही, आणि अस्तित्वात नसलेल्या खुणेच्या जागी ही मला थांबायला सांगते ! एकंदरीत, न्यूयॉर्क-मधे वेळ जात नसेल तर कुणाचाही पत्ता शोधावा एकेका पत्त्यात दोनचार दिवस आणि दोनचार डॉलर्स सहज निघून जातात

न्यूयॉर्कच्या भुयारी रेल्वेची ही तऱ्हा, तर बसची वेगळीच बसेस् ठराविक रस्त्या-वरूनच जातात बऱ्याच रस्त्यावर बस नसते बसला पस्तीस सेंटची मोड हातात घेऊनच उभं रहावं लागतं बसमधे मोड मिळत नाही आत शिरल्याबरोबर ड्रायव्हरजवळच्या पारदर्शक पेटीत पस्तीस सेंट्स टाकायचे तेवढे नसतील तर खाली उतरायचं. अचूक पैसे टाकल्यावर त्या बसमधून त्या रस्त्यावर कितीही लांब जाता येतं क्वचित बस बदलताना ' ट्रॅन्स्फर ' म्हणून तिकिट मिळतं ते पस्तीस सेंट्सऐवजी दुसऱ्या बसच्या ड्रायव्हरला दिलं, की ' हे तिकिट या बसवर चालत नाही पैसे टाका ' असं तो सांगतो मग आपण पुन्हा पस्तीस सेंट्स टाकतो वॉशिंग्टनमधे चाळीस सेंट्स आहेत पण स्टेट डिपार्टमेंटकडे ( अमेरिकन सरकारचं परराष्ट्रखातं ) जाणाऱ्या बसमधे हे पैसे तुम्ही टाकलेत, तर तुमच्याकडे पाहून सारेजण हसतील कारण अमेरिकेतच नव्हे, तर सबंध जगात मोफत धावणारी ही एकच बस् आहे ती फक्त अमेरिकेच्या परराष्ट्र–खात्यापर्यंतच जाते वास्तविक ही बस् त्या खात्यात काम करणाऱ्या नोकरासाठी असते पण प्रत्यक्षात त्या बसनं कुणीही प्रवासी मोफत प्रवास करू शकतो योगायोगाची गमत म्हणजे मी वॉशिंग्टनला होतो, तेव्हा आर्लिंग्टनहून पेन्सिल्वेनिया रस्त्याला निघालो रस्त्यावर एका अमेरिकनाला त्या बाजूला बस कुठून जाते असं विचारलं, तेव्हा तो एखादा कट शिजवीत असल्यासारखा, दबलेल्या आवाजात म्हणाला, उगीच पैसे वाया घालवू नका ! त्या समोरच्या खांबाजवळ स्टेट डिपार्टमेंटची बस येईल. तिच्यातून फुकट प्रवास करा ती बस त्या खात्याच्या नोकरा–साठीच आहे पण तुम्हीसुद्धा तिच्यातून दडपून प्रवास करू शकाल

मी म्हटलं, ' अहो पण मी खरोखरच स्टेट डिपार्टमेंटचा नोकर आहे !

त्यावर तो माझ्याकडे अविश्वासाच्या नजरेनं पाहू लागला आणि काहीही प्रत्युत्तर न करता फूटपाथ बदलून चालू लागला. मी अमेरिकन सरकारच्या माहितीखात्यात काम

करीत असल्यान परराष्ट्र–विभागाचा नोकर ठरतो यावर विश्वास ठेवण त्याला अशक्य झाल असाव

सागत होतो न्यूयॉर्कचं पण ती बस गेली आर्लिंग्टनवरून वॉशिंग्टनला न्यूयॉर्कला एकदा बसमधून जात होतो बरोबर एक महाराष्ट्रियन तरुणी होती तिच्याबरोबर रेडिओ सिटीमधे एक नाटक आणि सिनेमा पाहून परतत होतो वाटेत न्यूयॉर्कचा कुप्रसिद्ध बेचाळिसावा रस्ता लागला अमेरिकेतून आलेल्या प्रत्येक मित्रानं सागितल होत, ' न्यूयॉर्कला गेल्यावर फॉर्टीसिकड रस्ता पाहिल्यावाचून राहू नका ' तो दिसल्यावर त्या तरुणीला म्हटलं, ' तुम्हाला घर सापडेल ना ? मी उतरल तर चालेल का ?

ती म्हणाली, " हा रस्ता माझ्या परिचयाचा आहे तुम्ही गेलात तरी चालेल "

मी बसमधून उतरलो रस्त्याच्या दोन्ही बाजूना लैंगिक चित्रपट, लैंगिक विषयावरची पुस्तकं आणि तत्सम गोष्टींचा खच पडला होता. त्या ' तत्सम'मधे ' लाइव्ह शो ' म्हणून एक प्रकार असतो. त्यात छोट्याशा जागेत--म्हणजे चाळीसपन्नासजण बसतील एवढ्या जागेत--- मध्यभागी एक स्टेज असत त्या स्टेजवर एकामागून एक अशा तरुण मुली येतात आणि सगीताच्या तालावर अगावरचे एकएक कपडे काढीत अखेर पूर्णपणं नग्न होऊन कामुक नृत्य करतात या ' लाइव्ह शो'ला तीन डॉलर्स पडतात कुठकुठ दिवसा या लाइव्ह शोच तिकिट काढल तर लैंगिक चित्रपट मोफत दाखवण्यात येतात रात्री याच लाइव्ह शोच तिकिट पाच डॉलर्स असत

अमेरिकेत गेल्यावर सुरुवातीला ब्ल्यू फिल्म्सविषयी म्हणजे लैंगिक चित्रपटाविषयी खूपच औत्सुक्य असतं पण ती गोष्ट तिथ इतकी सुलभ आणि विपुल असते, की पुढंपुढं त्यात काहीच मौज वाटत नाही असे चित्रपट दाखवणारी बहुतेक थिएटर्स वीस टक्केसुद्धा भरलेली नसतात त्याच्या प्रेक्षकवर्गात बहुतेकजण पन्नाशी ओलांडलेले, थकलेभागलेले आणि निरुत्साही असतात त्याच्यापैकी कित्येकजण तर चित्रपटगृहात खुशाल पेंगतात किंवा झोपतात याला अपवाद एकच तो म्हणजे ' डीप थ्रोट ' या चित्रपटाचा ' टाइम ', न्यूजवीक ', ' न्यूयॉर्क टाइम्स ' या भारदस्त नियतकालिकानीही या चित्रपटाचा निषेधात्मक उल्लेख केला परिणामी त्याचे दर वाढले एरवी दोन ते तीन डॉलर्समधे असे चित्रपट कुठही उघडपण पहायला मिळतात पण ' डीप थ्रोट ' या चित्रपटाचा दर पाच डॉलर्स आणि तोही दोनदोन फर्लांगाच्या रांगेत उभं राहिल्यावर पहायचा !

मी या चित्रपटाला गेलो तेव्हा एन् बी सी ' टेलिव्हिजन कंपनीचे लोक रांगेत उभ्या असलेल्या स्त्रीपुरुषाच्या मुलाखती घेत होते माझ्या पुढ रांगेत पस्तीसचाळीसच्या दरम्यानच्या वयाची एक अमेरिकन बाई उभी होती. ' तुम्ही हा चित्रपट पहायला का जाता आहात ' अस तिला विचारण्यात आल, तेव्हा ती म्हणाली, " युद्ध ही भयंकर गोष्ट आहे युद्ध करण्यापेक्षा तरी ही कमी भयकर गोष्ट आहे. म्हणून मी हा चित्रपट पहाणार आहे "

माझ्या मनात आल ' या चित्रपटाबद्दल खूप टीका झाली आणि दोनदा पोलिसानी

हा चित्रपट बंद केल्यावर कोर्टात जाऊन हा सुटला म्हणून उत्सुकता वाटते,' असं त्या बाईनं सरळ सांगितलं असतं तर काय बिघडलं असतं ? पण तिनं उत्तर देताना असं गृहीतच धरलं होतं की, लढाई करणं किंवा लैंगिक चित्रपट पहाणं असे दोनच पर्याय पृथ्वीतलावर असल्यानं त्यातल्या त्यात कमी सहास्क अशा पर्यायाची निवड तिनं केली असावी !

गेल्या काही वर्षांत न्यूयॉर्कमधली गुन्हेगारी खूपच वाढली आहे त्यात 'मगिंग' नावाच्या प्रकाराला ऊत आला आहे रात्रीअपरात्री किंवा क्वचित दिवसाही एकट्या-दुकट्या पादचाऱ्याला गाठून चारसहा गुन्हेगार मारहाण करतात किंवा चाकू, सुरे वा पिस्तुल दाखवून त्याच्याजवळची चीजवस्त काढून घेऊन पळून जातात, त्याला मगिंग म्हणतात हे गुन्हे करणारे बहुतेकजण बेकार नीग्रो असतात गुंगी आणणाऱ्या औषधाची सवय झालेले लोकही त्यात सामील असतात

या प्रकारांची मला पूर्वसूचना मिळाली असल्यामुळं न्यूयॉर्कमधे मला मगिंगला तोंड द्यावं लागलं नाही हे खरं पण एकदा संध्याकाळी साडेपाचच्या सुमाराचा मी फिफ्थ अव्हेन्यू या गर्दीच्या रस्त्यावरून जात असताना पंचविशीच्या सुमाराचा एक नीग्रो अतिशय जोरानं धावत आला आणि त्याच्या मागोमाग रिव्हॉल्व्हर झाडल्याचे आवाज आले. मी झटकन जवळच्या दुकानात शिरलो तो नीग्रो गर्दीत कुठंतरी नाहीसा झाला असावा कारण त्याच्या मागोमाग इटालियनसारखा दिसणारा एक गृहस्थ हातात रिव्हॉल्व्हर घेऊन धावत होता आणि 'सन ऑफ बिच फकिंग बॅस्टर्ड' अशा शिव्या देत होता मी ज्या दुकानात इतर अनेक लोकांसारखाच घाईघाईनं शिरलो, त्या दुकानासमोरच तो इटालियन उभा राहिला आणि त्या नीग्रोचा नाद सोडून परत जाऊ लागला अर्थातच त्यानं रिव्हॉल्व्हर खिशात घातल्यानं आमच्यासारखे बध्ये बिनधास्त होऊन त्याच्याभोवती जमले त्याच्या बोलण्यावरून मला समजलं की, जवळच त्याचं जडजवाहिराचं दुकान होतं त्या नीग्रोनं त्या दुकानातला एखादा मौल्यवान खडा पळवण्याचा अयशस्वी प्रयत्न केला, तेव्हा त्याला धडा शिकवण्यासाठी दुकानदार त्याच्यामागोमाग गेला रिव्हॉल्व्हरच्या गोळ्या आपण हवेत झाडल्या असं त्याचं म्हणणं होतं पण त्याचं ते कृत्य इतरांना धोकादायक होतं हे मात्र खरं कधीकधी खरा गुन्हेगार सहीसलामत सुटतो आणि निरपराध माणसाला बळी व्हावं लागतं पण सुदैवानं त्या दिवशी तसं काही झालं नाही

न्यूयॉर्क अनेक चांगल्या गोष्टींबद्दलही प्रसिद्ध आहे मला न्यूयॉर्कमधली नाटकं अतिशय आवडली केवळ नाटकं पहाण्यासाठी तिथं जावं असं वाटण्याइतका त्यांचा दर्जा उत्कृष्ट असतो जगातली सर्वोत्कृष्ट नाटकं लंडनच्या रंगभूमीवर होतात त्याखालोखाल न्यूयॉर्कच्या 'ब्रॉडवे' विभागातल्या नाटकांचा दर्जा आहे ब्रॉडवे हे मॅनहटन भागातल्या एका हमरस्त्याचं नाव आहे त्याला छेद देऊन जाणारे जे अनेक रस्ते आहेत, त्यांपैकी बेचाळीस ते पन्नास क्रमांकाच्या रस्त्यावर न्यूयॉर्कची बहुतेक उत्तम नाट्यगृहं आहेत म्हणून ब्रॉडवे'वर एखादं नाटक येणं म्हणजे बूथ, हेलन हेस वगैरे नामवंत नाट्यगृहांत नाटक

लागणं या नाटकाचं नेपथ्य, अभिनय, लेखन, दिग्दर्शन इत्यादींचा दर्जा अमेरिकेतला सर्वोत्कृष्ट असतो या नाट्यगृहाच्या अवतीभोवती एखादं नाटक लागलं तर त्याला ' ऑफ ब्रॉडवे ' ( Off Broadway ) असं म्हणतात आणि त्याही पलिकडे नाटक चाललं, तर त्याला ' ऑफ ऑफ ब्रॉडवे ' म्हणतात

न्यूयॉर्कमधली नाटकं पहाताना मी जीवनातला काही अत्यंत सुखाचा काळ घालवला त्यासाठी गेलेला पैसा कारणी लागला असं वाटलं कधी एका दिवसात दोनदोन नाटकही पाहिली गॉर्कीचं ' एनिमीज ' पहाताना अभिजात नाटकाचा उच्च आनंद मिळाला, तर नील सायमनचं ' सनशाइन बॉइज ' हे हास्यरसप्रधान नाटक पहाताना उत्तम विनोदाचा खेळकर साक्षात्कार घडला ' शुगर ' ' नो नो नॅनेट किंवा पर्ली ' ही संगीतप्रधान नाटकं पाहून काव्यमय जीवनाचं दर्शन घडलं तर ' दॅट चँपियनशिप सीझन ' पहाताना आधुनिक आयुष्याचा सखोल अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करता आला. मानवी मनोव्यापारांचं मार्मिक दर्शन या व अशा नाटकातून घडलं आणि तासन् तास अद्भुत आनंदात घालवता आले

अमेरिकेच्या वारीचा हा एक फार मोठा फायदा झाला पण अमेरिकेत मी पाहिलेलं पहिलं नाटक न्यूयॉर्कमधलं नव्हतं तर वॉशिंग्टनचं होतं वॉशिंग्टनला मला आमच्या कचेरीतर्फे पाच दिवस प्रशिक्षण देण्यात येणार होतं, म्हणून मी एका भल्या दिवशी वॉशिंग्टनला जाण्याचा कमीत कमी खर्चाचा रस्ता कोणता आहे याची चौकशी केली. ग्रे हाउंड बसनं अकरा डॉलरमधे आणि पाच तासात जाता येतं असं कळलं. पण इतक्यात कळलं की, मुंबईहून येणारा एक मित्र मला जायचं होतं त्याच दिवशी न्यूयॉर्कहून वॉशिंग्टनला जाणार आहे म्हणून मी रविवारी त्याच्याबरोबर गेलो प्रवास उत्तम झाला चार तासांत वॉशिंग्टनला आलो ज्या प्रेसिडेंट हॉटेल'मधे माझं कचेरीतर्फे रिझर्व्हेशन करण्यात आलं होतं, ते हॉटेल अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाच्या निवासाजवळ म्हणजे व्हाइट हाउस'जवळच होतं. म्हणून अंदाजे त्या रस्त्यावर उतरलो

रविवार होता म्हणून दुकानं बंद होती तो भाग कचेऱ्यांचा — विशेषतः सरकारी कचेऱ्यांचा — असल्यानं सारं कसं शांत शांत होतं आजूबाजूला स्वच्छ, सुंदर, उंच इमारती, आणि हातात एक मोठी आणि दुसरी लहान अशा दोन बॅगा घेऊन मी ' हॉटेल प्रेसिडेंट ' कुठं दिसतं काय याचा शोध घेत उभा होतो रस्त्यावर एकही माणूस दिसत नव्हता, त्यामुळं विचारायचं कुणाला हाही प्रश्नच होता एखादी मोटार क्वचित येई आणि विमानासारखी भर्रकन निघून जाई जवळपास टेलिफोन असला तर त्या हॉटेललाच फोन करून विचारावं, अशा विचारानं मी आजूबाजूला पाहू लागलो समोर पोटोमॅक वीज कंपनीची अगडबंब इमारत उभी होती तिच्या जवळ पोस्ट ऑफिस होतं पण रविवार असल्यानं तेही बंद होतं.

मी टेलिफोनचा शोध घेण्यासाठी मागे वळून पाहिलं, तो हॉटेल प्रेसिडेंट ' हा मलामोठा फलक माझ्या मागे अवघ्या दोनच इमारती सोडून झळकत होता ! मी आनंदानं

निघालो आणि हॉटेलात शिरलो मुंबईच्या अमेरिकन कॉन्सुलेट जनरलन मला दिलेल ओळखपत्र दाखवून मी विचारल, माझी खोली राखून ठेवली आहे का ?" व्यवस्थापकान रजिस्टर पाहून 'होय' म्हणून सागितल आणि मी रजिस्टरवर सही करून माझ्या खोलीत गेलो खोली उत्तम होती एअर कन्डिशन्ड, गालिचे, स्वतंत्र बाथरूम, टेलिव्हिजन -- सर्व सोयी होत्या भाड होत दररोज बारा डॉलर्स पण मला ऑफिसतर्फे रोज पचवीस डॉलर्स मिळणार असल्यान ते मला महाग वाटल नाही

त्या वेळी सध्याकाळचे सातच वाजले होते रस्त्यावर सार सामसूम असल्यान फिरायला जाण्याचा विचारही करता येत नव्हता इतक्या लवकर जेवून झोपण्यातही गमत नव्हती म्हणून वॉशिंग्टनच्या काही मित्रांचे फोन क्रमाक शोधले आमच्याच कचेरीत पूर्वी मुंबईला काम करणारे एक मित्र श्री ताम्हाणे फोनवर भेटले मी आल्याच कळताच ते तावडतोब मोटार घेऊन आले त्यानी मला आपल्या घरी नेल आणि मग थोड मद्यपान करून छानपैकी अस्सल मराठी जेवण जेवलो त्यानी मला वॉशिंग्टनची सर्वसाधारण माहिती सागितली आणि काही मराठीभाषिकांचे फोन व पत्तेही दिले

सकाळी सहा वाजता उठलो आणि फोनवर मोठ्या दिमाखात ऑपरेटरला सागितल, ' एकशेबारा नबरच्या खोलीत एक चहा पाठवा " तिन त्याहून अधिक दिमाखात सागितल, " या हॉटेलमधे रूम सर्व्हिस नाही समोरचं कॅफेटेरिया साडेसहाला उघडत तिथ चहा मिळेल " अर्थातच समोरच्या उपाहारगृहाकडे डोळे लावून बसण्यावाचून गत्यंतर नव्हत बरोबर साडेसहाला त्यात दिवे लागले आणि मी तिथ जाऊन ताजातवाना होऊन परत आलो सव्वाआठला ऑफिसला गेलो ते अगदी अर्ध्या फर्लांगावर होत

ऑफिसमधे मला श्रीमती ब्लॅकबर्न यानी सांगितल, " तुम्ही अमेरिकन सरकारचे नोकर आहात तुम्हाला अमेरिकेतल्या कोणत्याही हॉटेलच्या दरात पधरा ते वीस टक्के कन्सेशन आहे. तुमचं ओळखपत्र दाखवा, म्हणजे दर कमी लावतील आता तुम्ही वॉशिंग्टनची प्रवासी बस् घ्या आणि शहरातली प्रेक्षणीय स्थळ पाहून या हे वॉशिंग्टनचं गाइड, हा नकाशा, हे ऑफिसच कुपन या कुपनामुळ तुम्हाला टूरिस्ट बसमधे कमी तिकिट पडेल आता तुम्ही गाव पाहून उद्या ऑफिसला आलात तरी चालेल "

मला खूपच आनद झाला कारण वॉशिंग्टनमधे ऑफिसच ट्रेनिंग म्हणजे अगदी आठ तास सतत काम असेल अशी माझी समजूत होती पण वॉशिंग्टन पहाणं हे ऑफिसचच काम आहे हे समजल्यामुळ आणि हॉटेलचे दरही मला कमी पडणार हे कळल्यान मला साहजिकच बर वाटल. मी ऑफिसच्या कामकाजाची थोडीफार माहिती घेतली आणि प्रवासी बस गाठायला निघालो त्या बसचा थाबा 'व्हाइट हाउस'च्या जवळच होता. त्या बाजून मी निघालो. अमेरिकेच्या निवडणुकीतले राष्ट्राध्यक्ष निक्सन याची मुख्य निवडणूक-कचेरी वाटेतच आहे अस आढळल पुण्याच्या एका कंपनीन श्री निक्सन याच्या छायाचित्राचे बिल्ले करण्याची व्यापारी तत्त्वावर तयारी दाखवली होती नमुन्यादाखल त्यानी काही बिल्ले माझ्याजवळ दिलेही होते म्हणून मी त्या निवडणूक-कचेरीत गेलो आणि त्यांच




व्हाइट हाउससमोर चाललेली विविध निदर्शने

पत्र नि बिल्ले तिथल्या एका प्रतिनिधीकडे देऊन सागितल की, 'याबाबतचा पत्रव्यवहार तुम्ही आता थेट त्या कारखानदाराशीच करा ' त्याच पुढ काय झाल हे मला या क्षणापर्यंत कळलेल नाही !

'व्हाइट हाउस'च्या किंचित अलिकडे समोरच्या फूटपाथवर 'ब्लेअर हाउस' हे अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या प्रमुख पाहुण्यांच निवासस्थान दिसल तिथ पतप्रधान जवाहरलाल नेहरू व नंतर पतप्रधान इंदिरा गाधी याचा काही काळ मुक्काम होता मी तसाच पुढ निघालो, तेव्हा 'हरे राम–हरे कृष्ण' पथाच्या एका तरुणीनं मला अडवून म्हटल, 'महाशय, आपण आमच्या चळवळीला काही मदत कराल काय ?" मी म्हटल, "बाई, मी या देशात पाहुणा आहे तुमचा हा पथ तर आमच्याच देशात उगम पावला मग तुम्ही मला या बाबतीत नवीन अस काय सागणार ?" ती म्हणाली, "मला तुमच्या महान देशाला येण्याची फार इच्छा आहे. तुम्ही भारतीयच आहात ना ? मग ठीक तर. तुम्ही मला मदत करू शकाल ? ' मी सागितल, बाई, मी फक्त चर्चा करू शकेन ' तीही म्हणाली, "ठीक आहे चर्चा तर चर्चा ! चला आपण समोरच्या कठड्यावर बसू या ' मग आम्ही 'व्हाइट हाउस'च्या कठड्यावर बसलो

सुमारे अठराएकोणीस वर्षांची ती कोवळी अमेरिकन तरुणी होती तिने अंगात लांबलचक भगवी कफनी घातलेली होती बाकी ब्रेसियर वगैरे घातल्याची काही खूण दिसत नव्हती तिच्या हातात 'हरेकृष्ण रामकृष्ण' पंथाच्या काही पुस्तिका दिसत होत्या तिचा चेहेरा सुंदर म्हणता आला नाही तरी बऱ्यापैकी होता आणि एका सहजतेची, निष्पापतेची त्यावर मनोहर झळाळी होती

"तुम्ही ऐन तारुण्यात अशा सन्यासी मार्गाकडे का वळलात ? मी सहज सुचणारा प्रश्न केला

"त्यात अगम्य असं काहीच नाही मी शाळेत 'बम्' होते सारखी नापास होत होते अभ्यासाकडे माझं लक्ष नव्हतं नाच, गाणी नि बॉयफ्रेंडस् यांत मी वेळ घालवीत असे माझे आईवडील माझ्यावर ओरडत माझ्या हातून शिक्षण पूर्ण होईल असा रंग दिसेना घरातलं वातावरणही माझ्या विरुद्ध होत होत कुठतरी डेस्परेट होऊन पळून जावंस वाटत होतं. तेवढ्यात या 'हरे राम हरे कृष्ण'–मोहिमेची माहिती वाचली त्यांच्या देवळात गेले मला तिथं मन शांती मिळाली, नामस्मरण करताकरता मी भौतिक व्याधी नि मनस्ताप विसरून गेले तेच पुढ चालू ठेवलं "

"रोज तुम्ही काय करता ?"

'ही पुस्तिका घ्या तीत आमची माहिती आहे आमच्या मंदिराचा पत्ताही आहे. एकदा समक्षच या माझ्या इतर सहकाऱ्यांना भेटा मग तुम्हीही आमच्या पंथात सामील व्हाल."

तुमच नाव काय ?" पुस्तिकेचे पचवीस सेंट्स तिला देत मी विचारलं

"हॅरियट वेस्ले पण मी या पंथात राधा म्हणून ओळखली जाते मला हिंदुस्थानची माहिती सांगा "

मी तिला मला माहीत असलेल्या भारताची थोडी माहिती सांगितली ती जर भारतात आली, तर तिला हवेचा, पाण्याचा त्रास होईल काय, फूटपाथवर उघड्यावर झोपावं लागेल काय इत्यादी तिच्या प्राथमिक प्रश्नांची मी उत्तर दिली, आणि कधीतरी त्याच्या मंदिराला भेट देण्याच आश्वासन देऊन बस पकडण्यासाठी निघालो 'व्हाइट हाउस'च्या माग मुख्य पाथ्याजवळ बस उभी होती ती सुरू व्हायच्या बेतात होती, म्हणून धावत जाऊन ती पकडावी असं मी ठरवलं ड्रायव्हरला माझ्यासाठी थांबण्याची खूण मी केली आणि गती वाढवली तोच तिथ जवळच बाकावर बसलेल्या एका महाराष्ट्रीय जोडप्याकडे माझं लक्ष गेल ती तरुण नवराबायको मोठ्या मजेन उन्हात लाह्या खात बसली होती. त्यांच्यापैकी तरुण गृहस्थ उभा राहिला आणि मला मराठीतून म्हणाला, "आपण रमेश मंत्री काय ?"

मी धावायचा थांबलो आणि म्हणालो, ' होय तुम्हाला काय माहीत ?"

"महाराष्ट्रात तुमचे फोटो पाहिले होते त्यावरून . . वर, तुमची बस निघते आहे.

माझ नाव जोगळेकर हे माझं कार्ड घ्या नि घरी या एकदा " अस म्हणून त्यान मला आपल कार्ड दिल मी कार्ड खिशात घालून बस पकडली पुढं वॉशिंग्टनजवळ बेथेसडा या गावी याच जोगळेकराची नि माझी पुन्हा भेट झाली.

आमच्या बसमधे सातआठच उतारू होते पण बस भरण्याची वाट न पहाता ठरलेल्या वेळी या बसेस सुरू होतात आमची गाइड कुणी कुमारी कायशी होती, तिन लगेच प्रेक्षणीय स्थळाची माहिती द्यायला सुरुवात केली पहिली स्वारी मॉल या वॉशिंग्टन-मधल्या सर्वांत मनोरम रस्त्यावर झाली कॅपिटॉल ' इमारतीपासून (अमेरिकेचे पार्लमेंट) वॉशिंग्टन स्मारक आणि त्याच सरळ रेषेत पुढ लिंकन स्मारक या पल्ल्याला ' मॉल ' अस नाव आहे मधे पाणी, दोन्ही बाजूना सुदर भव्य वृक्ष आणि त्याच्याजवळ आखीव, रेखीव नीटनेटके रस्ते आणि पुन्हा वृक्ष, अशी या पट्ट्याची रचना आहे हे अतिशय देखण दृश्य आहे पण अशा निवांतपणं पहाण्याच्या ठिकाणापासूनही प्रवाशाना फरपटत पुढच्या जागी नेण्यात येत कारण एक तास--चाळीस मिनिटात ती सफर पूर्ण करून त्या प्रवासी बसला




हरेराम हरेकृष्ण--पंथीयांची भर रस्त्यातील मिरवणूक

पुन्हा दुसरी सफर करायची असते मॉलवरून आम्ही केनेडींच्या स्मारकाकडे गेलो वाटेवर अज्ञात सैनिकांच्या स्मशानाला भेट दिली ज्या अज्ञात सैनिकांनी अमेरिकेसाठी आत्मार्पण केलं त्याच्या सन्मानार्थ हे भव्य सगमरवरी स्मारक बाधण्यात आल आहे

तिथून जवळच राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी याची दफनभूमी होती त्याच्या दोन लहान अपत्याच्या मधे केनेडी याच्या देहाच दफन करण्यात आल आहे हे स्मारक भव्य नाही, पण अगदी साध, उदात्त आहे तिथ एक ज्योत सतत जळत असते त्या स्मारकाजवळ गेल्यावर मला केनेडींच्या खुनाच्या वेळचे प्रसंग आठवले त्या दिवशी शनिवार होता कचेरीला सुट्टी होती म्हणून सकाळचे साडेसात–आठ वाजले तरी मी अथरुणात लोळत होतो अथरुणावर पडल्यापडल्याच सहज जवळच त्या दिवशीच वर्तमानपत्र उचललं मोठ्या ठळक अक्षरातली बातमी वाचून ताडकन उठून बसलो राष्ट्राध्यक्ष केनेडी यांची निर्घृण हत्या !' पुन्हापुन्हा बातमी वाचली कदाचित केवळ 'जखमी' असं असेल, हॉस्पिटलमधे नेल्याची बातमी असेल पण छे ! सार काही सपलं होतं नव्या राष्ट्राध्यक्षाचा शपथविधीही झाला होता केनेडींचं शव डलासहून वॉशिंग्टनला नेलं गेलं होतं.

मी घाईघाईन कपडे चढवले आणि कचेरीत गेलो कुणीही यायला सागितलं नव्हत तरी 'युसिस'चा जवळजवळ सारा नोकरवर्ग त्या शनिवारी हजर होता त्यानंतर बऱ्याच दिवसानी -- सुमारे वर्षभरान — केनेडींच्या स्मारकासाठी एक ग्रथालय अमेरिकेत काढायच असून त्यासाठी ज्याना साहाय्य करायच असेल त्यानी ते अमेरिकन कॉन्सुलेटकडे पाठवावं, अस नम्र आवाहन आल मी लहानशी रक्कम पाठवली त्याबद्दल ५ फेब्रुवारी १९६५ रोजी श्रीमती जॅकेलिन केनेडी याच मला आभाराचं पत्र आल त्या पत्रावर तिकिट नाही अमेरिकेच्या कॉंग्रेसनं खास कायदा समत करून जॅकेलिन केनेडींना जगात कुठंही विनामूल्य पत्र पाठवण्याची मुभा दिली होती तिकिटाच्या जागी जॅकेलिन केनेडी याची छापील सही आहे ते अमोल पत्र मी जपून ठेवल आहे

आर्लिंग्टन येथे केनेडी स्मारक पाहिल्यावर आम्हाला आणखी अनेक लहानमोठी स्मशानं दाखवली गेली मार्गदर्शिकाबाई सागतच होती, "त्या मोठ्या झाडाजवळ जनरल अमुक चिरनिद्रा घेत आहेत उजव्या उंच स्मारकाखाली कमाडर इन चीफ तमुक याना पुरण्यात आल आहे त्यापलिकडे सीफेस्ट झोपले आहेत उजव्या कोपऱ्याला एडवर्ड याचं स्मारक आहे. डाव्या कोपऱ्यात कर्नल सोमाजी गोमाजी "

आता आम्हाला त्या मृत व्यक्तींचं फार कौतुक राहिल नाही मुंबईचे एक मित्र पुढ शिकागोला भेटले ते म्हणाले, "अहो वॉशिंग्टनच्या गायडेड टूरचा मी धसकाच घेतला आहे ! एका स्मशानातून दुसऱ्या स्मशानात आणि तिथून तिसऱ्या स्मशानात नेतात त्या शहरात जिवत माणस रहातच नाहीत की काय अस मला वाटायला लागल !'

त्याचं हे म्हणणं खर होत केनेडींच्यासारख्या जगद्वंद्य नेत्याच्या स्मारकाजवळ कुणीही नतमस्तक होईल पण प्रवासी मोटार जर दोन हजार थडग्यापैकी शेकडो थडग्यां-पुढं उभी राहून, प्रत्येकजण कधी मेला, कसा मेला हे सांगू लागली, तर मात्र अती झालं

नि हसू आलं असा प्रकार होतो मृतांच्या अती सहवासामुळं आमच्या बसमधल्या सर्वांनाच आता ही स्मशानसफर कधी संपते असं झालं कॅपिटॉल, ' व्हाइट हाउस ' इत्यादी ठिकाणं मी स्वतंत्रपणं खास व्यवस्थेनं नंतर पहाणारच होतो म्हणून मी मधेच एका थांब्यावर त्या स्मशान–बसमधून उतरलो आणि वॉशिंग्टनच्या शिस्तबद्ध गर्दीत मिसळून गेलो

दुसऱ्या दिवशी कचेरीत गेलो एका अधिकाऱ्याबरोबर बोलताबोलता अगदी सहज खिडकीतून पाहिलं, तो ' YMCA 'च्या इमारतीचा भलामोठा फलक दिसला परदेशात या ' यंग मेन्स ख्रिश्चन असोसिएशन'च्या इमारतीत रहाण्याची स्वस्त आणि चांगली सोय



असते, असं मुंबईला मला कुणीतरी सांगितलं होतं म्हणून मी शंभर रुपये भरून त्या संस्थेचा आंतरराष्ट्रीय सभासद झालो होतो सभासदत्व देताना मला सांगण्यात आलं होतं की, अमेरिकेत व युरोपमधे या कार्डावर तुम्हाला कुठंही अल्प दरात रहाता येईल '

मी म्हटलं, ठीक आहे उद्यापासून इथं राहू जेवणाच्या सुटीत समोर जाऊन चौकशी केली आठ डॉलर्सला खोली होती लगेच पैसे देऊन दुसऱ्या दिवसासाठी खोली राखून ठेवली सध्याकाळी एखाद्या नाटकासिनेमाला जावं म्हणून 'वॉशिंग्टन पोस्ट'मधले कार्यक्रम पाहिले त्यात 'ओ ! कलकत्ता ।' या जगभर धमाल उडवून दिलेल्या नाटकाची जाहिरात दिसली पण फोन करून चौकशी केली तेव्हा कळलं की, हे नाटक नसून त्याच नाटकाचा चित्रपट आहे अमेरिकेत हे नाटक सध्या कुठंही चालू नाही असही मला सांगण्यात आलं अर्थातच दुधाची तहान ताकावर भागवून घ्यावी म्हणून मी त्या चित्रपटाला गेलो. आमच्या हॉटेलच्या मागच्या बाजूला असलेल्या 'एम्' रस्त्यावरच्या एका चित्रपटगृहात तो चित्रपट चालू होता पण तो पाहून नाटक पाहिल्याचं काही समाधान झालं नाही युरोपमधे गेल्यावर ते नाटक पहायचंच असं मात्र मी ठरवलं

'वाय एम सी ए'मधे गेलो खोलीची चावी घेऊन वर आठव्या मजल्यावर जाऊन पहातो, तो खोली अगदीच लहान, एअर कन्डिशनिंगची सोय नसलेली, सार्वजनिक स्नान-गृहाची, अशी होती पण मी दोन दिवसाचं भाडं आधीच भरलेलं असल्यानं आता नाइलाज होता सकाळी लवकर उठून स्नान करावं म्हणून गेलो स्नानगृह भलमोठं होतं त्यात चार नीग्रो आणि दोन श्वेतवर्णीय नग्न होऊन अंगावर शॉवर घेत होते आणि एकमेकांशी गप्पा मारीत होते

मी टॉवेल, साबण घेऊन तसाच परतलो आणि दोन दिवस अंघोळीला सुट्टी दिली ।

# अमेरिकेच्या आक्रमक महिला पुरुषांवर बलात्कार करायला तयार !

३

वॉशिंग्टनला आमच्याच कचेरीच्या एका विभागात अमान मोमीन नावाचा तरुण काम करतो असं मला कळलं म्हणून त्याला फोन केला योगायोग असा की, मोमीन हे कोल्हापूरजवळच्या वडगावचे आहेत आणि ते शिक्षणासाठी कोल्हापूरलाच होते लेखक म्हणून त्यानी माझं नाव ऐकलं होतं. मी त्याच्याकडेच रहायला यावं असा त्यानी आग्रह धरला, आणि मी 'वाय् एम्. सी ए.'चा कारावास सोडून त्वरेनं त्याच्याकडे गेलो वॉशिंग्टनच्या माझ्या मुक्कामात मोमीनची आणि माझी फार छान मैत्री जमली ते आणि त्यांच्या पत्नी ही दोघंही रसिक, साहित्य–संगीत–नाट्यप्रेमी असल्यामुळे रात्री बाराएक वाजेपर्यंत आमच्या गप्पा चालत आणि खाण्यापिण्याच्या मैफली झडत

एका सायंकाळी मी मोमीनच्या कचेरीत गेलो आणि त्याच्या मोटारीनं घरी जायला निघालो पण वाटेतच मोटार बंद पडली योगायोग असा की, ती मोटार ज्या इमारतीजवळ बंद पडली, ती इमारत आज जग गाजवते आहे त्या इमारतीचं नाव 'वॉटरगेट' चार इमारतींचा हा समूह असून मधल्या चौकात कारंजी आणि धबधबे सोडलेले आहेत त्यातून सतत पाणी वाहात असत, म्हणून या इमारतसमूहाचं नाव वॉटरगेट असं आहे डेमॉक्रॅटिक पक्षाच्या निवडणूकमोहिमेची मुख्य कचेरी याच इमारतीत आहे जेव्हा मी अमेरिकेत होतो, तेव्हा त्या इमारतीत घरफोडी (आधीच) होऊन गेलेली होती पण तिला आजच प्रचंड स्फोटक स्वरूप आलेलं नव्हतं. आमच्या बंद पडलेल्या मोटारीजवळ वॉटरगेटचा आसरा घेऊन मी

बराच वेळ उभा होतो मग मोमीन यानी फोनवरून मदत मागवली आणि कारखान्याच्या हवाली मोटार करून आम्ही टॅक्सीन घरी आलो वॉटरगेट या जगाला हादरा देणाऱ्या इमारतीची ही माझी एकुलती एक आठवण आहे !

कचेरीतर्फे मला अमेरिकेच परराष्ट्रखात, कॅपिटॉल हे अमेरिकेचं पार्लमेंट, राष्ट्राध्यक्षाच निवासस्थान ' व्हाइट हाउस ' वगैरे दाखवण्याची उत्तम व्यवस्था झाली परराष्ट्रखात्याच्या एका पत्रकार–बैठकीलाही मी हजर होतो या खात्याच्या इमारतीइतकी स्वच्छ, सुदर आणि सर्व अद्ययावत साधनानी युक्त अशी दुसरी इमारत मी पाहिली नाही या पत्रकार–बैठकीचा प्रत्येक शब्द आवाजरहित टाइपरायटरवर टाइप करून घेण्यात येतो आणि टेपरेकॉर्डरवरही उतरून घेण्यात येतो थोडयाच वेळान पत्रकारांना पत्रकार–बैठकीची सपूर्ण संहिता मिळू शकते परराष्ट्रकचेरीतून मी कॅपिटॉल इमारतीत गेलो तिथं अमेरिकन सरकारच्या माहितीखात्याच्या प्रतिनिधीनं मला पत्रकाराच्या दिवाणखान्यात नेलं प्रत्येक मोठ्या वृत्तपत्राला तिथ स्वतत्र मेज, टेलिफोन वगैरे व्यवस्था आहे ' यू एस् आय् ए. ' आणि ' व्हॉइस ऑफ अमेरिका यांनाही स्वतत्र व्यवस्था आहेत. अमेरिकेच्या प्रतिनिधी–सभेच्या आणि सीनेटच्या अधिवेशनाना मी पत्रकाराच्या खास कक्षेत हजर राहिलो आणि तिथल कामकाज पाहिलं

त्याच दिवशी भारताचे अर्थमत्री यशवतराव चव्हाण याची नॅशनल प्रेस क्लब ' या अमेरिकेच्या सर्वात मोठ्या पत्रकारसघटनेला भेट होती या पत्रकार–बैठकीला मी हजर होतो पण प्रामाणिकपणे सागायच तर श्री चव्हाण यांना पत्रकाराच्या प्रश्नांना चपखल उत्तर देणं जमलं नाही या पत्रकारसघटनेची अशी परंपरा आहे की, सबध पत्रकारबैठक झाल्यावर एक गमतीचा प्रश्न विचारायचा त्याचं उत्तरही गभीरपणे द्यायच नसून, खेळकरपण, विनोदानं द्यायच असत श्री चव्हाण याना गमतीचा प्रश्न असा विचारण्यात आला अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी एक स्त्री यावी अस तुम्हाला वाटत काय ?'

पण या प्रश्नातली गमत श्री. चव्हाण याच्या लक्षात आली नसेल किंवा त्याच्या चिटणिसांनी त्याना ' नॅशनल प्रेस क्लब'च्या या परपरेची पूर्वकल्पना द्यायला हवी ती दिली नसेल म्हणून ना. चव्हाण गभीरपणे म्हणाले, " अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाची निवड अमेरिकन नागरिकांनी करायची आहे त्यात मी काय सांगणार ? ' हे उत्तर ऐकून पत्रकारांचा उत्साह मावळला राष्ट्राध्यक्षांची निवड कोण करतं हे काय अमेरिकन पत्रकाराना माहीत नाही ?

सध्याकाळी मी जागतिक बँकेचे एक अधिकारी श्री वसंत करमरकर याच्याकडे रहायला जाणार होतो ठरल्याप्रमाणं पाच वाजता मी त्याच्या कचेरीच्या प्रवेशद्वाराजवळ गेलो तिथ मला एक नवी व्यवस्था पहायला मिळाली. जागतिक बँकेच्या गार्डस्‌जवळ प्रत्येक मजल्याच्या कॉरिडॉरच टेलिव्हिजनच्या साहाय्यान चित्रण होत होतं कुणीही सशयास्पदपणं वागताना दिसला तर तो कोण आणि कुठ आहे हे त्या गार्डसना त्याच क्षणी

कळत असे जवळच्या रस्त्याचही असच चित्रण होत होत त्यामुळ बाहेरून कुणी दरोडेखोर अथवा गुन्हेगार आले तर ताबडतोब खबरदारी घेता येत असे

पुणे येथील श्री वसंत करमरकर याना लहानपणीच पोलियो झाल्यान ते अपग झाले आणि ते कुबड्या घेऊन चालतात पण ते अत्यत बुद्धिमान आणि जिद्दीचे आहेत भारतात 'ॲक्चुअरी'ची परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण होऊन ते अमेरिकेत आले आणि तिथ उच्च शिक्षण घेऊन आता जागतिक बँकेत मोठ्या हुद्द्यावर आहेत अमेरिकन मोटार कपनीने त्याच अपगत्व लक्षात घेऊन त्याना चालवता येण्यासारखी खास मोटार करून दिली आहे आणि ते ती अगदी सहजतेन चालवतात ते मध्य–वॉशिंग्टनपासून सुमारे पचवीस मैलांवर रहातात मी सध्याकाळी भेटल्यावर श्री करमरकर म्हणाले, ' सहा वाजता श्री यशवंत-राव चव्हाण यानी मला बोलावल आहे येता का ?" मी रुकार दिला आम्ही दोघे भारताचे राज्यप्रतिनिधी श्री झा याच्या घरी गेलो बिचारे करमरकर तिथल्या सातआठ पायऱ्या माझ्या मदतीनं चढले आत गेल्यावर श्री चव्हाणाच्या चिटणीसानी सागितलं, ' त्यानी आपल्याला बोलावल होत खरं पण आत्ता ते झोपले आहेत ते भेटू शकणार नाहीत तरी काही हरकत नाही मी आहे ना बोलायला '

आम्ही चकितच झालो हीच अडचण ते चिटणीस श्री करमरकर याना फोन करून आधी सहज कळवू शकले असते आणि त्याचा कितीतरी वेळ नि त्रास वाचला असता पण ना चव्हाणाच्या त्या मराठी चिटणीसानी तेवढंही सौजन्य दाखवल नाही, तेव्हा आम्ही परत निघालो श्री करमरकराच स्वत'च्या मालकीचं सुदर घर आहे शनिवारी–रविवारी ते त्याच्या आवारातला बागबगीचा करतात त्यांची पत्नी, मुलगी आणि ते त्या घरात मोठ्या मजेन रहातात त्या रात्री जवळच मी श्री अनंत काणेकरांचे जावई श्री भागवत याच्याकडेही गेलो त्यानी मला भेटण्यासाठी अनेक मराठीभाषिक लोक बोलावले होते

आमच्या कचेरीजवळच्याच इमारतीत आर्ट बुकवाल्ड हे जगातील एक श्रेष्ठ विनोदी लेखक असतात–– म्हणजे त्यांची कचेरी तिथं आहे त्या इमारतीच्या काही भागात आमच्या कचेरीच्याही काही शाखा आहेत बुकवाल्ड हे माझे आवडते लेखक आहेत त्याची सर्व पुस्तक मी वाचली आहेत वृत्तपत्रातले विनोदी स्तभलेखक म्हणून जगात त्याचा पहिला क्रम लागतो त्यांचे स्तभ जगातल्या पाचशे वृत्तपत्रात एकाच वेळी प्रसिद्ध होतात त्यांची भेट मी एका अमेरिकन पत्रकार–मित्राच्या मध्यस्थीनं ठरवली तो मित्र–– लिओ मेझ लर–– आणि मी ठरल्या वेळी आर्ट बुकवाल्डच्या कचेरीत गेलो पण ते जेवायला गेले होते म्हणून आम्ही त्याची चिटणीस कुमारी एलिनॉर कोबी हिच्याशी गप्पा मारू लागलो अर्धे स्तन अनावृत्त राखणारी ही पचविशीची पोरगी फार मनमोकळी आणि प्रसन्न होती त्या खोलीत सगळ्या भिंतींवर सुमारे चाळीसपन्नास सर्टिफिकिट फ्रेम करून ठेवलेली होती मला साहजिकपणंच वाटल की निरनिराळ्या सस्थानी आणि व्यक्तींनी बुकवाल्डला दिलेली ही मानपत्र, शिफारसपत्र असतील आणि त्यान ती मोठ्या अभिमानान लावून ठेवली असतील

मी त्या मानपत्राबद्दल विचारताच एलिनॉर म्हणाली, छे' ! शिव्या देणारी जी अनेक पत्र बुकवाल्डला येतात, त्यांतली निवडक पत्र त्यान फ्रेम करून ठेवली आहेत त्याला आठवड्याला सुमारे तीनशे पत्र येतात त्यापैकी बरीच शिव्यागाळीन भरलेली असतात वाचा ना तुम्ही ती पत्रं"

मी पत्रं वाचू लागलो एका पत्रात लिहिलेल होत "You have been a nasty, ugly old man"

'Get the hell out of U S Try China or Siberia."

"तुमच्या लेखातलं एक अक्षरही मी वाचत नाही कृपा करून हे गलिच्छ लिखाण बद करा"

"तुम्ही माकड आहात !"

मी आणि माझ्या मैत्रिणी आम्ही सर्वजणी तुमचा अतिशय तिरस्कार करतो तुम्ही नरकात जाल"

"I hate you 30 times"

"Are you a writer or an idiot ?"

"You write unadulterated trash"

ती सारी मानपत्र वाचून मला खूपच गंमत वाटली. आर्ट बुकवाल्डची चिटणीस एलिनॉर जिथं बसली होती, तिच्या जवळच एका खुंटीला दोन दांडकी अडकवलेली होती त्या वस्तूही बुकवाल्डच्या चाहत्यानी त्याला भेट म्हणून पाठवल्या आहेत काय, असं विचारता ती म्हणाली, छे हो ! आमच्या बिल्डिंगमधे एकदा एका तरुणीवर अज्ञात इसमानं हल्ला केला तेव्हा आर्टन ही दांडकी विकत आणली आता जर माझ्यावर कुणी हल्ला केलाच, तर मी ते लाब दाडक हल्लेखोराच्या डोक्यात घालायचं आणि आर्टन ते आखूड दाडक टाळक्यात घालायचं, अशी आमची योजना आहे"

मी लिओ मेझलरला म्हटल, 'गड्या, या पोरीवर अत्याचार करण्याचा आपला बेत आपण सोडून दिला पाहिजे !

बुकवाल्ड अमेरिकेतल्या व परदेशातल्या पाचशे वृत्तपत्रांत लिहितो म्हणजे त्याचा स्तंभ पाचशे वृत्तपत्रात वापरला जातो. एका भाषणासाठी तो तीन ते पाच हजार डॉलर्स घेतो, अस एलिनॉरन सागितलं

इतक्यात बुकवाल्ड स्वत च आला त्यानं मोठ्या प्रेमानं आमच स्वागत केल जगातल्या आजच्या सर्वश्रेष्ठ लेखकाला भेटताना मला साहजिकच फार आनद झाला अमेरिकेच सरकार आणि सर्व प्रमुख नेते याच्यावर बुकवाल्ड अगदी निर्भयपण लिहितो आणि त्याची हवी ती थट्टा करतो त्यावरून मी त्याला म्हटल, "तुम्ही अमेरिकन सुदैवी म्हटले पाहिजेत आमच्याकडल्या नेत्याची अशी विनोदानसुद्धा थट्टा करण कठीण आहे, आम्ही आमच्या धर्मावरही थट्टेन लिहीत नाही"

बुकवाल्ड म्हणाला, 'आमचे सर्वच नेते खिलाडूवृत्तीचे असतात अस नाही काही–जण मला भरपूर शिव्याही देतात पण मीच त्या शिव्या खिलाडूपणं स्वीकारतो आणि

त्याना निरुत्तर करतो बराच वेळ गप्पा मारल्यावर बुकवाल्डन मला आपल नव पुस्तक भेट म्हणून दिल आणि त्यावर लिहिल,—

'To Ramesh
Perhaps someday you can write about
your leaders like I do ! Cheers ! '

बुकवाल्डच्या भेटीनंतर वॉशिंग्टनला लायब्ररी ऑफ कॉंग्रेसमधे गेलो हे जगातल सर्वांत मोठ ग्रंथालय इथ माझ्या अनेक पुस्तकाच्या अनेक प्रती ठेवलेल्या आहेत या अभिमानान मी भलताच खुषीत होतो धारवाडचे मोहन गद्रे हे या ग्रथालयात मराठी–विभागाचे प्रमुख आहेत अस ऐकलं होत, म्हणून त्याना फोन केला त्यानी मोठ्या आनंदान आणि आग्रहान मला बोलावून घेतलं मुंबईत असताना मला कधीतरी दिल्लीच्या कुठल्याशा संस्थेच अचानक छापील पत्र येई तुमच्या सह्याद्रीची चोरी या पुस्तकाच्या वीस प्रती वॉशिंग्टन येथील लायब्ररी ऑफ कॉंग्रेससाठी घेतल्या आहेत तरी आपण आपल त्रोटक चरित्र आणि आपल्या इतर मराठी पुस्तकाची नाव आणि तपशील पाठवावा ' त्यामुळ अमेरिकेला येण्यापूर्वीच मला ' लायब्ररी ऑफ कॉंग्रेस ' हे नाव परिचित होत कॅपिटॉल ' या अमेरिकन कॉंग्रेसच्या इमारतीजवळच हे ग्रथालय आहे

मी गेल्यावर श्री गद्रे यानी माझं स्वागत केल आणि मला मराठी विभाग दाखवला माझी निदान बारा ते पंधरा पुस्तक तिथ होती शिवाय इतर अनेक मराठी लोकाची पुस्तक साहेबाच्या राजधानीत पाहून मला आनद वाटला पण उत्सुकता होती ती अशी की, प्रत्येक पुस्तकाच्या वीस प्रती या ग्रंथालयाला कशासाठी लागतात ?

हा प्रश्न मी श्री गद्रे याना विचारला, तेव्हा ते म्हणाले, " आम्ही दोन प्रती ठेवून घेतो एक प्रत न्यूयॉर्कच्या सार्वजनिक ग्रथालयाला पाठवतो अमेरिकेतल्या ज्या विश्वविद्यालयात मराठी भाषा शिकवली जाते, अशा १७ विद्यापीठाना बाकीच्या प्रती पाठवतो " सतरा अमेरिकन विद्यापीठात आमची मराठी भाषा शिकवली जाते हे ऐकून मला आश्चर्य आणि आनद वाटला. म्हटल, ज्ञानेश्वर–तुकाराम अटकेपारच नव्हे तर अटलांटिकपार गेले बरं का ! मी गद्रेच्याकडून त्या सतरा विद्यापीठाची यादी घेतली त्यात शिकागो, पेन्सिल्व्हेनिया कॉर्नेल, कोलबिया, हवाई, इलिनॉय, वॉशिंग्टन, येल, टेक्सस, सिराक्यूज इत्यादींचा समावेश होता त्यापैकी एकदोन ठिकाणाचा तलास केवळ मराठी भाषेच्या प्रेमापायी मी लावला आणि त्याचे अनुभव काय आले ते मी यथावकाश सांगेनच पण लायब्ररी ऑफ कॉंग्रेसच्या मराठी–विभागाची मौज अशी की, सध्या मराठीचे जाणकार श्री गद्रे हे मराठी–विभागाचे प्रमुख नाहीत त्याना बढती मिळाली असून ते सीरियल्स'चे म्हणजे ' सीरियल ' नियतकालिकाचे मुख्य झाले आहेत

मराठी–विभागाच्या प्रमुख एक पजाबी बाई आहेत आणि विशेष म्हणजे त्याना मराठी भाषाच येत नाही ! मी विचारल, " हे कस काय हो ?" त्यावर मला सांगण्यात आल की, पजाबचे माजी मुख्य मत्री प्रतापसिंग कैरों याची ती भाची आहे, आणि तिला

कुठतरी नोकरी द्यायलाच हवी होती मराठी पुस्तकाची नाव इग्रजीतून ट्रॅन्सक्रिप्शन पद्धतीनं कार्डावर देण्यात येतात ती वाचून ही वशिल्याची भाची मराठी पुस्तकांच वर्गीकरण करते जगातल्या सर्वांत मोठ्या ग्रथालयात आमची पुस्तक आहेत हा भ्रम या माहितीमुळ नाहीसा झाला

वॉशिग्टनपासून सुमारे चाळीस मैलांवर वॉरिग्टन नावाच गाव आहे तिथ एका अमेरिकन महिलेन विठ्ठलाचं देऊळ केलं आहे अस कळल म्हणून एका मित्राबरोबर रविवारी सकाळी मी वॉरिग्टनला गेलो हवा उत्तम होती छानपैकी उन्ह होत रविवारी सहलीला जाणाऱ्याच्या मोटारींच्या रागा लागल्या होत्या वॉशिग्टनहून बाहेर पडणारे रस्ते मोटारींनी भरून गेले होते राजधानीकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोटारींची फारशी गर्दी नव्हती या चाळीस मैलाच्या प्रवासात रस्ता ओलांडणारा किंवा रस्त्यान जाणारा एकही माणूस दिसला नाही काही हमरस्त्यावर तर ' हिच हायकर्स नॉट अलाउड असे फलक होते

वॉरिग्टन हे फार रमणीय खेड आहे एका शेतात झाडाच्या राईत सौ नॅश या अमेरिकन बाईच घर आहे त्या घराच्या वरच्या मजल्यावर त्यानी विठ्ठलाची मूर्ती स्थापन करून देऊळ केल आहे सौ नॅश याच गाव वॉरिग्टन सहा वर्षांपूर्वी त्यांनी म्हैसूर राज्यातील स्वामी केशवदास यांची प्रवचन अमेरिकेत ऐकली.त्यांनी प्रभावित होऊन त्या भारतात स्वामींच्याबरोबर आल्या त्यानी हिंदुधर्माचा स्वीकार केला आणि हे नाव धारण केलं त्या अजूनही सिस्टर गीता या नावानंच अधिक महशूर आहेत म्हैसूर राज्यातून त्या महाराष्ट्रात आल्या पंढरपूरला गेल्या अशीच पांडुरगाची मूर्ती अमेरिकेत नेऊन देऊळ स्थापन कराव अशी त्याना तीव्र इच्छा झाली त्यानी मूर्ती करून घेतली आणि त्या अमेरिकेला विमानान निघाल्या त्याच विमानात त्याना एक भारतीय भेटला नॅश यानी त्याला कौतुकानं आपली मंदिराची योजना सांगितली तो म्हणाला, मी या मदिराची सारी व्यवस्था पहातो तुम्ही चिंता करू नका '

सौ नॅश यानी अमेरिकेच्या राजधानीत वॉशिग्टन इथ सुंदर मंदिर सुरू केल आणि त्याची व्यवस्था मोठ्या विश्वासान त्या भारतीयाकडे सोपवली त्या गृहस्थान व्यवस्था ठेवण्याच्या मिषान नॅशबाईंना भरपूर लुबाडल आणि पोबारा केला बाईंना फार दु ख झाल त्यांनी वॉशिग्टनहून मूर्ती आपल्या गावी आणली आणि आपल्या शेतीवाडीवरच्या घरातच तिची स्थापना केली तरीही पुन्हा वॉशिग्टनला भरीव पायावर मंदिर बाधण्याची त्याची योजना आहे

सध्याच्या मदिरात ग्रथालय आहे त्यात हिंदुधर्माचे अनेक ग्रथ आहेत. मदिराच आणि आजूबाजूच वातावरण पवित्र, स्वच्छ आणि प्रसन्न आहे आम्ही मदिरात गेलो नॅशबाईंनी आमच स्वागत केल, मदिराची माहिती सागितली पूर्वी एका भारतीयान त्याना लुबाडल्याच मात्र त्यांनी सांगितल नाही ती माहिती मला इतर ठिकाणाहून कळली. मदिरात पेटी, तबला, भजनाची पुस्तक आणि टेपरेकॉर्डर व भजनाच्या टेप्स आहेत आमच्यापैकी दोघातिघाना भजन येत होती ती त्यानी म्हटली आम्ही झांजानी ताल

घरला दोन तास उत्तम वातावरणात गेले येताना मन अधिकच उल्हसित आणि प्रसन्न झाल मला नॅशबाईच्या मंदिराची कल्पना आवडली मी लगेच आमच्या कचेरीच्या मार्फत तिची बातमी लिहून फोटोसह पाठवली ती महाराष्ट्र व म्हैसूर राज्यातल्या पचवीस वृत्त–पत्रानी प्रसिद्ध केली

अशीच भव्यतेची आणि महानतेची जाणीव मला वॉशिंग्टनच्या 'स्मिथ्सोनियन इन्स्टिटयूशन'ला भेट दिली, तेव्हा झाली या जागतिक कीर्तीच्या प्रदर्शनात अनेक विशेष वस्तू आहेत त्यात चद्रावर जाऊन परत आलेल पहिल अवकाशयान पहायला मिळाल. याच यानातून आर्मस्ट्राँग आणि इतर दोन चाद्रवीर सुखरूप परत आले होते या प्रदर्शनात आणखी एक लक्षात रहाण्यासारखी गोष्ट म्हणजे 'नॅचरल हिस्टरी' विभागात अनेक पक्षी, प्राणी, जलचर याची शरीर पेंढा भरून ठेवलेली आहेत त्या त्या विभागाची माहिती देणारे हेडफोन्स कानाला लावून जवळ गेलं, की त्या त्या प्राण्याचे व पक्ष्यांचे आवाज ऐकू

अमेरिकेत विठ्ठलनामाचा गजर करणाऱ्या श्रीमती नॅश ऊर्फ भगिनी गीता आपल्या घरातील विठ्ठलमंदिरात



येतात राइट बंधूनी उडवलेल जगातल पहिलं विमान इथ ठेवलेल आहे शिवाय प्रचड देवमाशाची प्रतिकृती, लक्षावधी पुस्तक, भूगर्भशास्त्रातील विविध नमुने, अवकाशयुगाची प्रगती दाखवणारे टप्पे, कलात्मक वस्तू — या सर्वच पहायच्या म्हटलं तर सतत तीन दिवस या प्रदर्शनाला भेट देत राहिलं पाहिजे या प्रदर्शनात रोज दोनदा ' पपेट शो '—बाहुल्याचा खेळही असतो विज्ञान आणि करमणूक यांचा सुदर मिलाफ ' स्मिथ्सोनियन 'मधे आढळतो

झाली एवढी विज्ञानाची सेवा खूप झाली, असं समजून मी आता माणसं पहावी या हेतूनं वॉशिंग्टनमधे चौकशी करू लागलो आमच्या वॉशिंग्टनच्या कचेरीत श्रीमती गेट्स या नावाची एक बाई आहे तिला मी म्हटल, " अमेरिकेत सध्या ' विमेन्स लिबरेशन ' म्हणजे स्त्रीस्वातत्र्याची मोहीम निघाली आहे, तिची थोडी कल्पना द्याल का ? " ती म्हणाली, " मी त्या संघटनेची सभासद नाही आणि मला बायकानी अशी दाडगाई केलेली आवडतही नाही समाजात आजच जे पुरुषाचं नि स्त्रियांच स्थान आहे, त्यावर मी खूष आहे पण तुम्हाला जर ' विमेन्स लिब् 'ची माहिती घ्यायची असली तर तुम्ही त्या सघट–नेच्या कचेरीत जाऊन तिथल्या कार्यकर्त्या स्त्रियाना अवश्य भेटा इथच एम् रस्ता आणि सोळावा रस्ता याच्या क्रॉसिंगवर ' विमेन्स लिब 'ची कचेरी आहे "

मी म्हटल, पाहू तर खरं या नव्या अमेरिकन स्त्रियांना काय म्हणायच आहे ते. म्हणून मी पत्ता शोधीत तिकडे गेलो एका चारमजली इमारतीच्या सर्वात वरच्या मजल्या-वर ती कचेरी असल्याचा पत्ता मला श्रीमती गेट्सनं दिला होता मी तिथं जाऊन पाहिल, तो तिथल्या बंद दारावर अनेक फलक होते त्यापैकी एक असा होता आगाऊ भेट ठरवल्याशिवाय दारावरची घटा वाजवू नका ' दुसरा फलक होता, दुपारी तीन ते पाच या वेळेतच फोन करा ' तिसरा फलक होता ' नोकरीची हमी नाही ' अशा निरुत्साही करणाऱ्या फलकाकडे पाहून, स्त्रियाची कचेरी ती हीच असावी असं मला वाटलं पण मी इतका जवळ असूनही घटा दाबू शकत नव्हतो हा अनुभव सर्वच पुरुषांना येतो स्त्रियाच्या अगदी जवळ जाऊनही आपण काही दाबू शकत नाही !

त्या सर्व फलकांत विमेन्स लिब 'चा फलक मात्र मला दिसला नाही याच आश्चर्य वाटल. पण तो दिसूनही उपयोग नव्हता. कारण मी भेट ठरवली नव्हती. मी निराशेन खाली उतरू लागलो, तेव्हा वर जाणारा एक अमेरिकन तरुण मला दुसऱ्या मजल्यावर भेटला मी त्याला विचारलं, ' विमेन्स लिबची कचेरी इथंच आहे ना ? " तो म्हणाला, ' नाही. पूर्वी ती इथं होती पण आता चौदाव्या रस्त्यावर १७५ क्रमाकाच्या घरात गेली आहे

मी त्या पत्त्यावर गेलो तळमजल्यावरच कचेरीचा फलक होता. पण दार बद होत. मी लहान अक्षरातला दुसरा फलक पाहिला. त्यावर लिहिलेल होत परत जाऊ नका. दोनतीनदा घंटा वाजवा आणि थाबा ' मी त्याप्रमाणं केलं दार उघडल नाही. पण वरच्या मजल्यावरच्या खिडकीतून एका सुदर तरुणीन डोकं बाहेर काढून विचारल, " कोण हवय् ? ' मी किंचित ओरडून सागितलं, " मी भारतातला एक लेखक आहे. मला ' विमेन्स



अमेरिकन स्त्री–स्वातंत्र्याच्या आक्रमक पुरस्कर्त्या

लिब 'ची माहिती घ्यायची आहे. '' तिनं मला थांबण्याची खूण केली आणि खाली येऊन दार उघडलं मी तिच्या मागून आत गेलो तळमजल्यावर कचेरी होती पण तूर्त तरी त्या कचेरीत कुणी नव्हत पहिल्या मजल्यावर मात्र आणखी तीन स्त्रिया होत्या. त्यांची वय पचवीस ते पचेचाळीसच्या दरम्यान असावीत मी माझी ओळख करून दिली एकीचं नाव होत मरिया दुसरीचं होतं पॅट्रिशिया तिसरी होती अशीच कुणीतरी चौथी थोडी वयस्कर होती तिच नाव होत मिसेस् स्नायडर

'बोला ! काय माहिती हवीय् तुम्हाला ? ' पहिलीन विचारलं

' म्हणजे तुमच्या चळवळीच सूत्र काय, तुम्हाला काय हव, तुमच्यावर अन्याय होतो अस तुम्हाला का वाटत —''

" हेच पहा ना। तुम्ही प्रश्न विचारता तोसुद्धा अशा सुरात की, खरोखर आमच्यावर अन्याय होत नाहीच, पण आम्हाला अन्याय होतो असं उगीचच वाटतं ! आमचं म्हणणं काय आहे ते तुम्हाला ' मिझ ' मासिकात आणि ग्लोरिया स्टॅनहीन, जर्मेन ग्रीयर अशा आमच्या नेत्यांच्या लिखाणावरून कळेल " पॅट्रिशिया तावातावाने म्हणत होती

" आम्हाला पुरुषांच्या बरोबरीनं पगार नि सारे हक्क हवे आहेत मरिया म्हणाली, " उदाहरणार्थ, अमेरिकेतील सार्वजनिक मुताऱ्यावर ' लेडीज् ' आणि ' जटलमेन ' लिहिलेलं असतं ते आम्हाला मान्य नाही आम्ही पुरुषांच्या मुताऱ्यातही जाणार पुरुषांनीही हवं तर आमच्या सार्वजनिक मुताऱ्याचा वापर करावा सर्वांनी एकच मुताऱ्या वापराव्यात "

मला ही सूचना बरीच धक्कादायक वाटली मी म्हटलं, " अहो, पण तुम्ही पुरुषांच्या मुतारीत गेलात आणि तिथं तुमच्यावर बलात्कार झाला तर ?"

सौ स्नायडर उत्साहानं म्हणाल्या, " अहो पण बलात्कार करून घ्यायला आम्ही तयार आहोत ना ! मग तुम्ही कशाला चिंता करता ? पण त्याबरोबरच हेही लक्षात ठेवा, तुम्ही पुरुषच बलात्कार करू शकता असं काही नाही आम्हीही तुमच्यावर बलात्कार करू ! त्याला तुमची तयारी असली पाहिजे ! "

त्या चार स्त्रियांनी बलात्काराची धमकी दिली, तेव्हा खरं तर मला मुळीच भीती वाटली नाही मी मनात म्हटलं, या फार सुंदर नसल्या तरी एक सुंदरच आहे नि बाकीच्या बऱ्यापैकी आहेत या काय माझ्यावर बलात्कार करणार ? उगीच आशा दाखवताहेत झालं ! '

मी म्हटलं, " तुम्ही खरच माझ्यावर बलात्कार करणार आहात का ?

' आम्ही आत्ता बलात्कार करणार नाही हो ! तुम्ही भलतेच आशावादी दिसताय ' मरिया हसून म्हणाली, " आम्हाला एवढंच म्हणायचं होतं, की जे जे पुरुष करू शकतो ते ते आम्हीही करू शकतो स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ पुढं नेण्यासाठी आम्ही बलात्कार करण्याचं दिव्यही करू

पॅट्रिशिया म्हणाली, ' आणि स्त्रियांच्यावरच्या बलात्काराचं निवारण कसं करावं त्याचीही व्यवस्था आम्ही केली आहे हा पहा बिल्ला हा बिल्ला आम्ही स्त्रियांना छातीवर लावण्यासाठी देतो. '

पन्नास पैशाच्या आकाराचा तो बिल्ला होता त्यावर स्त्रियांना सूचना होती SAVE A RAPE SAY YES.

म्हणजे बलात्कारापासून स्वत:ला वाचवा. ' होय ' म्हणा. '

याचाच अर्थ असा की, कुणी बलात्कार करू लागला तर त्याला तसदी न देता सरळ त्याच्या म्हणण्याला खुषीनं मान्यता द्या, म्हणजे तो बलात्कार न होता राजीखुषीचा मामला होईल बलात्कारापासून स्त्रियांना वाचवण्याचा तो अमोघ मार्ग पाहून मला त्या

स्त्रियाच्या चातुर्याच कौतुक वाटल, आणि समजस महिलांनी एखादा प्रश्न सोडवायचाच म्हटल की त्या कशा चातुर्यान तो सोडवतात हे मला पटल.

बलात्कारावरून आठवलं मी अमेरिकेत असताना न्यूयॉर्कच्या न्यायालयात एक खटला आला चाळिशीच्या वयाच्या एका अमेरिकन महिलेन एका चोरावर खटला भरला आरोप असा होता की, त्या चोरान एका रात्री ती घरात एकटी असताना घरफोडी केली त्यान घरातल्या साऱ्या मौल्यवान वस्तू आपल्याजवळच्या पोत्यात भरल्या जाताजाता त्यान तिच्यावर बलात्कारही केला, अस तिच म्हणण होत आरोपीच्या वकीलान विचारल, " पण तुम्ही प्रतिकार केला नाही काय ?"

त्यावर ती म्हणाली, मी प्रथम प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला पण त्यान मला सांगितल,' बाई, काही झाल तरी मी हे करणारच मग उगीच प्रतिकार करून त्यात अडथळा कशाला आणता ? तुम्ही जर या कामात माझ्याशी सहकार्य केलंत तर माझा कार्यभाग लवकर आटोपता येईल आणि तुम्हाला नको असलेल्या या अप्रिय प्रकरणातून तुमचीही लवकर सुटका होईल तुम्ही जितका प्रतिकार कराल तितक तुम्हाला जास्त वेळ यात गुतून पडाव लागेल. ' मला त्याचं म्हणणं समंजसपणाच वाटलं म्हणून मी बलात्कारात सहकाय केल "

वकील म्हणाला, ' अहो बाई, तुमच सहकार्य मिळवण्यात जर तो यशस्वी झाला असेल, तर त्यान केलेल्या कृतीला बलात्कार कसं म्हणता येईल ?"

अखेर बलात्काराचा आरोप नाशाबीत ठरला, आणि चोरीचा मामुली आरोप सिद्ध झाला या खटल्याबद्दल एका मानसशास्त्रज्ञान तर लिहिलं होत की, आपल्यावर बलात्कार व्हावा ही बहुतेक स्त्रियाची सुप्त इच्छाच असते त्यामुळ कुणी बलात्कार करू लागला तर या स्त्रिया जो प्रतिकार करतात तो मनापासून नसतो; तर अगदी वरवरचा म्हणजे प्रतीकात्मक असतो

स्त्रीपुरुषाच्या मैत्रीबद्दल महाराष्ट्रात, एका छान दिसणाऱ्या, चाळिशीपर्यंत आलेल्या स्त्रीशी मी एकदा बोलत होतो मी म्हटल, ' पाश्चात्य स्त्रिया मैत्री करतात ती अगदी पूर्ण असते हॉलडच्या एका मुलीची नि माझी मैत्री झाली आपल्यावर वयाच्या पधराव्या वर्षी बलात्कार कसा झाला हेसुद्धा तिनं मला अगदी मनमोकळेपणान सागितल. "

यावर ती मराठी महिला किंचितशा खेदान म्हणाली, ' अहो, आमच्यावर बलात्कार झाला असता तर मीसुद्धा ते तुम्हाला सागितल असत. पण काय करणार ? माझ्यावर कुणी बलात्कार केलाच नाही !"

मी म्हटल, ' तुम्ही सुदर दिसता अजून आशा सोडू नका होईल हो कधीतरी बलात्कार !"

# एका निवान्त गावातले चार दिवस

४

अमेरिकेतले शिष्टाचार हे एक स्वतंत्र लफडंच आहे. ब्रिटिश शिष्टाचार जितके कडक, तितकेच अमेरिकन शिष्टाचार सैल ब्रिटिश माणूस ऐन प्रेमाच्या अत्युच्च प्रसंगीही कोटाची आणि पँटची घडी मोडणार नाही अशाच बेतान प्रेम करील उलट अमेरिकन माणूस राष्ट्राध्यक्षाशी हस्तांदोलन करतानाही गबाळी पँट आणि अस्ताव्यस्त, गुंड्या न लावलेला शर्ट घालण्यात काही वावगं मानणार नाही वीसवीस वर्षांच्या मैत्रीनतरही ब्रिटिश माणूस 'मिस्टर बूथ' किंवा 'मिस्टर मॅनिंग' अस संबोधील, तर अमेरिकन माणूस ओळख झाल्याबरोबर 'रमेश', 'टॉम' अशी सलगीची हाक मारील. 'हाउ इज मोहन डुइंग नाउ ?' अस अमेरिकन माणसान विचारल, तर तो महात्मा गांधींच्याविषयी बोलत असावा हे उघड आहे 'इंदु केम टु वॉशिंग्टन' म्हणजे पंतप्रधान इंदिरा गांधींची अमेरिकेस भेट, आणि 'डिक इज नॉट सच ए बॅड बॉय' म्हणजे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष तुम्हाला वाटतात तितके वाईट नाहीत, असे अर्थ काढायला नव्यान अमेरिकेत आलेल्या माणसान शिकल पाहिजे

अमेरिकन बायकानी समानतेची कितीही चळवळ केली, तरी सामाजिक क्षेत्रात पुरुषानी आपल्यापुढ मान तुकवली पाहिजे, अशी त्यांची अपेक्षा असते पुरुषान पुढं होऊन दार उघडाव आणि स्त्रीला आधी जाऊ द्यावं, तिनं तोंडात सिगरेट धरली की पुरुषान काडी ओढून पेटवावी, मोटरीचं किंवा टॅक्सीच दार उघडून तिला आधी आत जाऊ द्याव नि मग आपण मोटरीत बसावं, अशा अनेक सर्वमान्य चालीरीती लोकशाही अमेरिकेत

आहेतच. पण चार लोकात बायकोच नवऱ्यान सदैव कौतुक करायच असतं मग तिचे कपडे किती छान आहेत, ती दिसते कशी सुदर, तिन केलेला स्वैंपाक किती रुचकर आहे याची इत्थभूत वर्णनं त्यानं करायची असतात आणि ती ऐकताना बायको सुखावत असतानाच इतरांनी ती वर्णन निमूटपण ऐकून घ्यायची असतात खर तर बऱ्याच वेळा तिन 'केलेल' जेवण म्हणजे डिपार्टमेंटल स्टोअरमधून आणलेल तयार थंड अन्न असतं आणि बायकोन ते ओव्हनमधे घालून केवळ गरम केलेल असत पण त्याबद्दलही तिची स्तुती केल्यावाचून नवऱ्याला गत्यतर नसत या साऱ्या जाचातून सुटण्यासाठी अमेरिकन पुरुषानीच स्वातत्र्याची आणि समानतेची चळवळ करायची वेळ आली आहे '

टॅक्सीवाल्याला टिप् देणं हे आपण आपल्या शिष्टाचारात बसवीत नाही पण अमेरिकेत टॅक्सीवाल्याला जर टिप् द्यायच सोइस्करपण विसरून तुम्ही मीटरवर दाखवलेलेच पैसे द्याल, तर तुमच्या बकोटीला धरून टॅक्सीवाला व्हेअर इज माय टिप् ? अस विचारायला कमी करणार नाही मग तुम्ही गाइडबुक आठवून किती टिप् द्यायची याचा हिशेब करता, तेव्हा टॅक्सीवाला वीस टक्क्याचा तयार हिशोब करून तुम्हाला मदत करतो. अशी धमकावणी दाखवून आणि पिस्तुल रोखून टिपचे पैसे घेतल्यावरही टॅक्सीचा ड्रायव्हर 'थँक यू सर ' असे सौजन्यपूर्वक आभार मानतो आणि मगच पसार होतो मला कधीकधी वाटतं की, अमेरिकेत फाशी देणारासुद्धा आधी फाशी जाणाऱ्याकडून टिप् मागून घेत असेल आणि मगच आपल कार्य करून आभार मानीत असेल ! अर्थात हे काम झाल्यावर फाशी जाणारा आभार कसे मानीत असेल, हे कोड अजून मला सुटलेल नाही

अमेरिकेत अशी अनेक न सुटलेली कोडी असतात. ती तशीच सोडून आपण आपल्या उद्योगाला लागावं हे बरं. पण वॉशिंग्टनमधला माझा उद्योग म्हणजे काही दिवसाचं कचेरीतर्फे मिळालेल प्रशिक्षण ते संपल्याबरोबर मी उद्योग सोडून निरुद्योगाला लागलो अमेरिकेत निरुद्योग हा मोठा उत्साहवर्धक असतो. सगळे कचेरीत जाण्यासाठी किंवा कचेरीतून घरी जाण्यासाठी धावपळ करीत असतात, तेव्हा आपण निवातपणं भटकायच दिसेल त्या आणि परवडेल अशा मद्यगृहात प्यायचं, उपाहारगृहात खायचं, उत्तम चित्रपट पहायचे, नाटक पहायची, नाइट–क्लबना भेटी द्यायच्या आणि मित्रमैत्रिणींबरोबर गप्पांचे अड्डे टाकायचे, असा माझा अमेरिकेतला भरगच्च निरुद्योग होता

वॉशिंग्टनमधे ' केनेडी सेंटर ' या अत्यत मनोहर नाट्यगृहात मी ' पिपिन नावाच संगीत नाटक पाहिलं त्यातली नृत्य, वेषभूषा आणि देखावे भव्य होते आणि कथानकही फँटसीच्या प्रकारच होत केनेडी सेंटर'मधे तीन प्रचड नाट्यगृह असून, एकात नाटक, दुसऱ्यात सगीताचे कार्यक्रम आणि तिसऱ्यात नृत्याचे कार्यक्रम होतात. इतकं भव्य नाट्यगृह मी दुसर पाहिलेल नाही 'पोटोमॅक' नदीच्या अत्यत रमणीय किनारी हे नाट्यगृह बांधलेल असून, त्याच्या विशाल लॉबीत अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी यांचा अर्धपुतळा आहे. 'केनेडी सेंटर'च्या एअर कडिशनिंगचा खर्च वर्षाला चाळीस लाख रुपयांवर आहे

या ' केनेडी सेंटर'जवळच्या एका प्रचड पुलावरून गेल, की मी जिथं रहात होतो

ते अर्लिंग्टनमधलं घर होतं एका संध्याकाळी मी एका बसमधे बसलो ही बस् पुलाकडून दुसरीकडे वळत होती मी उतरलो आणि पुन्हा बस् करण्याऐवजी त्या मनोहर पुलावरून चालतच घरी जावं, असा विचार केला छानशी संध्याकाळ होती गार वारे वहात होते आणि पुलावरून एकीकडे 'वॉशिंग्टन आणि दुसरीकडे अर्लिंग्टन असं सुंदर दृश्य दिसत होतं मी चालू लागलो समोरून वीसबावीस वर्षांची एक प्रमत्त अमेरिकन तरुणी येत असलेली दिसली तिच्या उघड्या मांड्यांवर एक लहानशी चड्डी होती आणि वर एक ब्लाउझसारखं वस्त्र होतं. त्याचाही गळा अर्धअधिक स्तन उघडे दिसावे इतका रुंद होता ती अगदी स्वच्छंदीपण, मोकळेपणानं चालत होती आम्ही समोरासमोर आल्यावर ती आपण होऊन हसून म्हणाली, ' हाय ।'' मीही ' हाय हाय ' केलं मला वाटलं, एवढ्या–वरच मुलाखत संपेल. पण ती तरुणी थांबली आणि तिनं मला विचारलं, ' तुम्ही भारतीय आहात काय ?" मी म्हटलं, "होय तुम्ही कसं ओळखलं ?" तिनं सांगितलं, " मी भारतात गेले होते मी आणि माझा मित्र सायकलीवरून हिचहायकिंग करीत होतो" मी विचारलं, ' तुम्हाला भारत आवडला का ?" ती म्हणाली, "काही दिवस रहायला चांगला आहे पण मी तिथं कायमची रहाणार नाही" मी विचारलं, "का ?" तिनं सांगितलं, "दोन महिने आम्ही भटकलो. तेवढ्यात आमच्या तीन चोऱ्या झाल्या दोन वेळा माझ्यावर बलात्काराचे प्रयत्न झाले त्यातला एक तर जवळजवळ यशस्वी झाला । अर्थात मी तो धोका पत्करलाच होता. त्यामुळं आम्ही पोलिसात गेलो नाही की कोर्ट–कचेऱ्या केल्या नाहीत" मग ती म्हणाली, " एनी वे, नाइस टु हॅव मेट यू हॅव ए गुड टाइम इन् वॉशिंग्टन."

मला अशा अनपेक्षित गाठीभेटी फार आवडतात थोडा वेळ गप्पाटप्पा तेवढीच मौज पुन्हा कोण कुठं गेला किंवा गेली त्याची कल्पना नाही लहानसा, प्रसन्न अनुभव असे चिकार अनुभव मला अमेरिकेच्या मुक्कामात आले अमान मोमीनकडे एका गायिकेचा आवाज ऐकला, तो अविस्मरणीय आहे एका रात्री अमान म्हणाला, " मी तुम्हाला असा आवाज ऐकवतो, की तो तुम्हाला दीर्घ काळ हाँट ' करीत राहील" त्यानं एक टेप लावली तो आवाज, त्या गाण्यातली दर्द हे सारं अप्रतिम होतं टेपमधेच ती गायिका कोण हे दिलं होतं ती पाकिस्तानची रेश्मा ही गायिका होती भारतातील सर्वच नामवंत गायकगायिकांनी रेश्माचं गाणं टेपवर ऐकलेलं आहे आणि ते त्यावर निहायत खूष झाले आहेत.

पुढं न्यूयॉर्कला श्री सी. रामचंद्र या नामवंत संगीतदिग्दर्शकांना मी रेश्माची टेप् ऐकल्याचं सांगितलं, तेव्हा त्यांनी मला त्या आवाजाविषयीची आपली आठवण सांगितली. अनेक वर्षांपूर्वी त्यांनी रेश्माचा आवाज ऐकला त्यावर ते इतके बेहद्द खूष झाले, की त्यांनी ठरवलं आपल्याला मुलगी झाली, तर तिचं नाव रेश्माच ठेवायचं योगायोग असा की, काही दिवसांनी त्यांच्या पत्नी सौ शांताबाई यांना मुलगी झाली आणि सी. रामचंद्रांनी तिचं नाव रेश्माच ठेवलं या गायिकेविषयी सांगताना ते म्हणाले, ' तिचं जीवन फार



केनेडी सेंटरच्या नाट्यगृहातील भव्य स्वागत-
गृह आणि राष्ट्राध्यक्ष केनेडी यांचा पुतळा

खोल दु:खानं भरलेलं आहे. म्हणूनच तिच्या गाण्यात हा दर्द आहे. केवळ परिश्रमानं तो आवाजात उतरणार नाही रेश्मा ही तरुण गायिका राजस्थानमधे होती ऐन तारुण्यात तिचं एका तरुणावर प्रेम बसलं रेश्माचं कुटुंब मोठं होतं आणि हे सारं कुटुंब रेश्माच्या गाण्याच्या उत्पन्नावर अवलंबून होतं अर्थातच कुटुंबियांना वाटलं की, हिनं लग्न केलं तर ही नवऱ्याबरोबर दुसरीकडे जाईल आणि आपल्यावर आर्थिक संकट कोसळेल म्हणून कुटुंबियातीलच काही लोकांनी रेश्माच्या प्रियकराचा खून केला त्यामुळं ती इतकी व्याकुळ झाली, की त्या दु:खातून ती कधीच सावरली नाही रेश्माच्या गाण्यातली वेदना अशी खोल आणि बोलकी आहे पाकिस्तानच्या निर्मितीनंतर ती तिकडेच गेली आणि नंतर तिचं

काय झालं ते कळलच नाही" रेश्माच्या गाण्याची टेप् मी वॉशिंग्टनला दुसऱ्या टेपवर उतरून घेतली आणि अजूनही मी तिचा उदासव्याकुळ आवाज ऐकत असतो

वॉशिंग्टनचा दहा दिवसाचा मुक्काम संपवून मी पिट्स्बर्गजवळ रहाणाऱ्या माझ्या एका जुन्या मित्राला भेटायला निघालो वॉशिंग्टन ते पिट्स्बर्ग असं विमानाचं तिकिट माझ्या ऑफिसनं काढून दिलं होतं सकाळी साडेआठला विमान सुटणार होतं. आदल्या रात्री फोन करून मी माझी जागा रिझर्व्ह केली होती अमेरिकेत विमानाचं रिझर्व्हेशन करणं अत्यंत सोपं नुसता फोन करून आपलं नाव सांगायचं आणि आपला फोन–नंबर द्यायचा विमान सुटण्यापूर्वी दहा मिनिटांपर्यंत तुमची जागा राखून ठेवली जाते. तोपर्यंत तुम्ही आला नाहीत, तर दुसऱ्याला जागा दिली जाते कसलाही जादा आकार नाही की दंड नाही की त्रास नाही

माझा मित्र आणि त्याची बायको—दोघंही सकाळी लौकर कामावर जात म्हणून आदल्या रात्री टॅक्सीला फोन करून ठेवला तेही काम अगदी सोपं नुसता फोन करून पत्ता द्यायचा नि कोणत्या वेळी टॅक्सी पाहिजे ते सांगायचं. अगदी अचूक वेळी, बरोबर त्या मिनिटाला दारात टॅक्सी उभी रहाते मी तशा ' रेड टॉप ' टॅक्सीनं विमानतळावर गेलो अमेरिकेतल्या अंतर्गत विमानवाहतुकीचा तो माझा पहिलाच अनुभव त्यामुळं उगीचच इकडच्या गावठी खेडुतासारखा मी चाळीस मिनिटं आधीच विमानतळावर गेलो विमानतळ अवाढव्य होता पण तुम्हाला विमान कंपनी माहीत असली की झालं ! मी ' अली गेनी' कंपनीनं जाणार होतो तिकडे विमानतळावर प्रत्येक कंपनीचे वेगळे विमानतळ असतात तुमच्या कंपनीच्या प्रवेशद्वारातच तुमचं स्वागत होतं आणि फ्लाइट नंबर सांगितला की गेट क्रमांक सांगितला जातो सामान पोचवायला आणि तिकिट चेक करायला एक मिनिटही लागत नाही. पण मी अठरा क्रमांकाच्या गेटवर गेलो तिथं येणाऱ्या आणि जाणाऱ्या विमानांचे उड्डाण क्रमांक, सुटण्याची वेळ, गेट क्रमांक—सारं काही टेलिव्हिजनवर स्पष्ट दिसतं

मी पिट्स्बर्गला उतरलो माझ्या मित्राला फोन करून सकाळी दहाला विमान-तळावर यायला सांगितलच होतं तो माझी वाट पहात उभाच होता. मला पाहून त्याला अतिशय आनंद झाला. कित्येक वर्षांनी आम्ही भेटत होतो त्याचं नाव विठ्ठल वर्दीकर. हा माझा अत्यंत जवळचा आणि अतिशय बुद्धिमान मित्र मी इंग्लंडला गेलो तो त्याच्याच उत्तेजनानं ' लन्डन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'मधे अनेक देशांच्या विद्यार्थ्यांत दुसरा क्रम मिळवून तो आता गेली बारा वर्षं अमेरिकेत अर्थशास्त्राचा प्राध्यापक म्हणून काम करीत आहे माझ्याशी हस्तांदोलन करून तो म्हणाला, " मी जाईन तिथं येऊन तुम्ही मला गाठताच, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे बुवा ! आता तुम्ही माझ्याकडे खूप दिवस राहिलं पाहिजे." मी म्हटलं, दोनतीन दिवस तूर्त राहीन. मग हवं तर पुन्हा येईन" त्यावर तो म्हणाला, " चला आधी आपल्याला इथून लवकर पळ काढायला पाहिजे. कारण मला पार्किंगला जागा मिळाली नाही म्हणून मी ' नो पार्किंग'च्या हद्दीत मोटार ठेवून

११९३०

आलो आहे. पोलिसांनी पाहिलं, तर ते क्रेनला लावून नेतील माझी मोटार आणि मग पन्नास डॉलर भरून सोडवून आणावी लागेल."

आम्ही बॅगा घेऊन जवळजवळ धावतच सुटलो. त्याची मोटार बाहेर नो पार्किंग हद्दीत सुखरूप होती. मी मोटारीत बसलो. आणि त्यानं मला विचारलं, "आधी पिट्स्बर्ग शहर पहाणार की आधी घरी जायचं?" मी म्हटलं, "इथला सगळा कार्यक्रम तुझ्या हाती!" विठ्ठल म्हणाला, "अरे बाबा, सुदैवानं आमचं गाव अगदी लहान आहे. आमच्या-कडे प्रेक्षणीय स्थळं असं एकही नाही. त्यामुळं आपला कार्यक्रम एकच — मद्यपान करायचं, भरपूर खायचं आणि पोटभर गप्पा मारायच्या।"

मी म्हटलं, "उत्तम! प्रेक्षणीय स्थळं काय, सारेच पहातात. पिट्स्बर्गमधून अशीच मोटारीतून एक चक्कर टाकू आणि घरी जाऊ." मग आम्ही पिट्स्बर्गमधून दोन चकरा मारल्या आणि तिथून चाळीस मैलांवर असलेल्या वेन्सबर्ग या त्याच्या गावी गेलो. जाताना वाटेत कुठल्याशा गावी थाबून त्यानं मला 'मॉल' हे अमेरिकन दुकानांचं केंद्र दाखवलं. 'मॉल' म्हणजे एका विस्तीर्ण जागेवर उभारलेलं तीनचारशे दुकानांचं प्रचंड केंद्र. त्यात जगातल्या जवळजवळ सर्व वस्तू मिळतात. हजार–दीड हजार मोटारी उभ्या करण्याची (पार्क) व्यवस्था या मॉलजवळ असते. आपण काही खरेदी न केली, तरी मॉलमधून नुसता फेरफटका मारणं हाही एक सुखद अनुभव असतो. माझा मित्र म्हणाला, "तुला जगातला सर्वात महाग सेंटही इथं फुकट लावायला मिळतो." त्यानं मला सुगंधाच्या दुकानात नेलं. तिथं नमुन्याच्या बाटल्या ठेवलेल्या असतात. 'चॅनेल'सारख्या जागतिक कीर्तीच्या सेंट्सचे नमुने आम्ही अंगाला लावले. त्यात कुणी काही गैर मानीत नाही. उलट, लोकांनी नमुना म्हणून ते वापरावेत, म्हणजे पुढं त्यांना त्या बाटल्या खरेदी कराव्याशा वाटतील, अशी दुकानदारांची अपेक्षा असते. अंगठ्याएवढ्या 'चॅनेल'च्या सेंटची किंमत सुमारे सव्वाशे रुपये असते. तो सुगंध कितीही आवडला तरी आम्ही खरेदी करणार नव्हतो. म्हणून फुकटातली तेवढीच कायदेशीर मौज आम्ही केली. त्या मॉलमध्ये अनेक चित्रकारही होते. ते तिथल्या तिथं कुणाचंही चित्र काढून दोनतीन डॉलर्सला देत होते.

मॉलमधे भटकून आम्ही रस्त्याला लागलो. एका मद्याच्या दुकानाजवळ थांबलो. जगातली सर्व उंची मद्यं तिथं होती. आम्ही 'शिवास रीगल', 'जॉनी वॉकर', 'डिंपल', 'जे बी', 'ड्रँब्युई व्हॅट', 'ओल्ड स्मगलर', 'नेपोलियन ब्रँडी' अशी इतकी मद्यं खरेदी केली, की ती आम्हाला महिनाभर तरी पुरली असती. मग आम्ही केंटकी चिकनच्या दुका–नात गेलो. तिथं चिकन उकडून तयार मिळतं. त्याचे दोन मोठे डबे घेऊन आम्ही घरी गेलो. वेन्सबर्ग हे वीसबावीस हजार वस्तीचं लहानसं, टुमदार, शांत गाव आहे. विद्यार्थी आणि प्राध्यापक हीच तिथली मुख्य वस्ती आहे. या गावी मी चार दिवस होतो. आणि तिथला माझा वेळ अत्यंत सुखाचा गेला. सकाळी उठून कॉलेजच्या बाजूला फेरफटका मारायचा. मग ब्रेकफास्ट. मग वाचन. नंतर उत्कृष्ट जर्मन बीयर घ्यायची आणि ती घेताघेता दिलखुलास, मनमोकळ्या गप्पागोष्टी. मग उत्तम मराठी पद्धतीचं जेवण. त्यानंतर

वामकुक्षी मग विठ्ठलच्या मोटारीतून आसपासच्या गावात फेरफटका त्याच्या दोन्ही मुली मोटार छान चालवतात थोडा वेळ पायी फिरणं किंवा ड्राइव्ह–इन्–थिएटरमधे चित्रपट पहाणं ही एक वेगळीच गंमत असते एकदा विठ्ठल मला म्हणाला, ' आज आपण रोमान्स पाहू ' मी विचारलं, " तो कसा काय दिसणार ? " त्यानं सांगितलं, ' ड्राइव्ह–इन–थिएटरमधे दिसतो " हे चित्रपटगृह म्हणजे विस्तीर्ण मैदान असतं एका टोकाला मोठा स्क्रीन असतो त्या मैदानात जाताना पैसे द्यायचे— तीन डॉलर्स मग मोटार उभी करायची आणि मोटारीत बसूनच चित्रपट पहायचा सभोवती सारा अंधार असतो मोटार उभी असते, त्या जागेजवळच खांबाला अडकवलेले हेडफोन्स असतात ते कानाला लावले की चित्रपटातले संवाद व इतर आवाज ऐकू येतात ते ऐकायचे नसतील तर नुसताच चित्रपट पहायचा अशा बहुतेक उघड्या चित्रपटगृहात दाखवले जाणारे चित्रपट चावट आणि अश्लील असतात सेक्रेटरी म्हणून काम करणाऱ्या पोरी आपल्या बॉसबरोबर रोमान्स कसा करतात, सेल्समन तरुण बायकांशी मौज कशी करतात, कॉलगर्ल्सचं रंगेल जीवन, असे या चित्रपटांचे विषय असतात अनेक आंबुकमाबुक अशा ड्राइव्ह–इन चित्रपटाना जातात अर्थात त्यांना चित्रपट पहायचा नसतोच मन पूत रोमान्स करायला बिनधास्त जागा त्याना हवी असते हे स्त्रीपुरुष हेडफोन्सही घेत नाहीत उगीच महत्त्वाच्या कामात अडथळे नकोत जवळ–पासच्या मोटारींतून अशा प्रणयी युगुलानी मारलेल्या मिठ्या किंवा घेतलेली चुंबनं अस्पष्ट प्रकाशात दिसतात मात्र एकदा का ती मोटारीच्या गादीवर आडवी झाली, की उत्सुक प्रेक्षकाला काहीच दिसत नाही असा थोडासा मोटारीतला शृंगार आणि थोडा पडद्यावरचा शृंगार पाहून आम्ही दोन्ही मोरू रात्री अकरापर्यंत घरी परतलो हा थोडासा आबट–शौकच ! पण प्रवाशानं सारं काही पाहून घ्यावं

एक दिवस माझा मित्र म्हणाला, आमच्या गावात एक चर्च आहे तिथला प्रीस्ट स्कॉट हा फार उमदा आणि समाजकार्याची तळमळ बाळगणारा आहे त्याच्या चर्चला भारताविषयी फार प्रेम वाटतं त्या चर्चमधे रविवारी दुपारी तू भाषण करणार काय ?'

" भाषण ? कशावर ? " मी विचारलं

' भारतासंबधी काहीही ऐकायची इथल्या लोकांना इच्छा आहे "

मी म्हटलं, " ठीक आहे करीन भाषण आपल्याला काय, तेवढीच गंमत ! '

मग विठ्ठलनं चर्चमधे जाऊन माझा रुकार कळवला रविवारी दुपारी मी आणि तो चर्चमधे गेलो माझी कल्पना होती की, फार तर पंधरावीस निवृत्त, धार्मिक लोक येतील पण ती खोटी ठरली चांगले शे–सव्वाशे अमेरिकन स्त्री–पुरुष आले होते. त्यांच्यापैकी ऐंशी टक्के स्त्रिया होत्या, आणि त्या चाळीस व पन्नास या वयाच्या दरम्यानच्या होत्या भाषणा-पूर्वी प्रमुख कार्यकर्त्यांच्या ओळखी करून देण्यात आल्या मग त्या स्त्रियानी स्वत केलेल्या रुचकर खाद्यपदार्थांचा अल्पोपाहार झाला. त्यानंतर माझं भाषण झालं. काय बोलायचं त्याचे मुद्दे मी आणि माझ्या मित्रानं तयार केलेच होते भारताची लोकसंख्या, शेती, सामा-जिक स्थिती वगैरेविषयी मी अर्धा तास भाषण केलं प्रेक्षकानी खूपच प्रश्न विचारले त्या

सर्वांना अमेरिका आणि भारत याचे संबध स्नेहाचे रहावेत अशी तळमळ दिसली एका स्त्रीन सागितल, ' आम्ही भारतातील अनेक हॉस्पिटल्सना आर्थिक मदत करतो आणि ही मदत योग्य कारणासाठी उपयोगात आणली जावी अशी आमची इच्छा आहे भारताची प्रगती होण्यात आम्हाला आनदच आहे बांगलादेश स्वतत्र झाला याबद्दलही आम्हाला खूप समाधान वाटल आम्ही बांगलादेशच्या लोकांना शक्य ते साहाय्यही केल आहे आमच्या सदिच्छा तुम्ही भारतीयाना कळवाव्यात अशी आमची विनती आहे '

तास–दीड तासाचा चागला कार्यक्रम झाला. जाहीर कार्यक्रमानतर अनेकानी येऊन गप्पागोष्टीही केल्या वेन्सबर्गच्या चर्चमधील ती सध्याकाळ मला समाजजीवनाच्या जाणिवेमुळ विशेष प्रसन्न वाटली. चार दिवसांचा मुक्काम सपवून मी दुसऱ्या दिवशी निघालो विठ्ठल पिट्स्बर्गपर्यत मला पोचवायला आला होता. ग्रेहाउड बसन मी निघालो आणि सध्याकाळी सहा–साडेसहापर्यत न्यूयॉर्कच्या पोर्ट अथॉरिटी या मुख्य बसस्टेशनला आलो

न्यूयॉर्कला परतल्यावर मी एका मित्राकडे जेवायला गेलो त्यानं विचारल, " तुम्ही जमैकात रहाता ना ? '



' मॉल ' या दुकानाच्या केंद्रात विश्रातीसाठी अशा रमणीय जागा ठेवलेल्या असतात

मी 'होय' म्हणून सांगितलं मुंबईचा जसा गिरगाव हा भाग तसा न्यूयॉर्कचा जमैका हा एक भाग आहे तो म्हणाला, "तुम्ही विमानतळावरून सरळ जमैकात गेलात हे नशीबच! गेल्या वर्षी एक गुजराथी विद्यार्थी आला, त्यानं धमाल केली!

त्या गुजराथी विद्यार्थ्याची कथा विलक्षणच आहे ही कथा नसून सत्यकथा आहे. मुंबईचा एक नथुलाल पटेल नावाचा विद्यार्थी न्यूयॉर्कला आला छोटालाल पटेल नावाच्या नातेवाइकाकडे तो उतरणार होता. हा छोटालाल न्यूयॉर्कच्या जमैकात रहात होता विद्यार्थी नथू केनेडी विमानतळावर उतरला पण त्याचं पत्र न मिळाल्यामुळं छोटालाल विमानतळावर येऊ शकला नाही विद्यार्थी आपली कस्टमची तपासणी करून प्रतीक्षागृहात आला पण त्याला छोटालाल न दिसल्यामुळं नाकासमोरच असलेल्या एका विमान कंपनीच्या कौंटरजवळ जाऊन तिथल्या तरुणीला तो म्हणाला, 'मला जमैकाला जायचं आहे कसा जाऊ ?" ती म्हणाली, तुमचं तिकिट पाहू" त्यानं तिकिट दाखवलं आंतरराष्ट्रीय विमानप्रवासात अशी एक सोय असते, की तुम्ही तुमच्या ठरलेल्या प्रवासापेक्षा जादा प्रवासाची तिकिटं काढू शकता पुढं तुम्हाला ती कोणत्याही इतर मार्गावरच्या प्रवासासाठी बदलून मिळू शकतात त्या विद्यार्थ्यानं तशी बरीच तिकिटं काढली होती विमान कंपनीच्या त्या तरुणीनं त्यांतली काही तिकिटं रद्द करून त्याला जमैकाचं तिकिट दिलं हे तिकिट न्यूयॉर्कमधल्या जमैकाचं नव्हतं, तर आफ्रिकेत जमैका नावाचा देश आहे त्या देशाचं होतं त्या बाईनं अननुभवी विद्यार्थ्याला मदत करायची म्हणून टॅक्सी बोलावली आणि त्याला जमैकाला जायचं आहे असं सांगितलं टॅक्सीवाल्यानं त्याचं सामान घेऊन लगवाडिया विमानतळावर नेलं आणि तिथल्या एजंटाला सांगून नथूलालला आफ्रिकेच्या विमानात बसवलं नथूलालच्या मनात थोडीशी शंका आली की, आपला छोटालाल विमानानं जाण्याइतका लांब रहातो की काय ? पण तो बिचारा अमेरिकेच्या झगमगाटानं इतका बावरून गेला होता, की कुणाला विचारलं तर आपण बावळट ठरू असं त्याला वाटलं. तो विमानानं आफ्रिकेतल्या जमैकाला उतरला तिथं विमानतळावर त्यानं टेलिफोन डिरेक्टरी काढली योगायोग असा की, तिथही कुणी छोटालाल पटेल होता अखेर आपला काका, मामा कोण तो सापडला म्हणून विद्यार्थ्यानं पत्ता टिपून घेतला आणि टॅक्सीनं तो छोटालालच्या घरी गेला त्या घरच्या बायकामाणसांनी त्याचं स्वागत केलं सध्याकाळी छोटालाल आल्यावर विद्यार्थी घाबरून म्हणाला, "मारा छोटालाल तो ये नथी ! — माझा छोटालाल हा नाही, दुसराच कोणी आहे !"

आता आली का पंचाईत ? पण जमैकाचा छोटालाल म्हणाला, "ठीक आहे बाबा. तू कुणीही असलास तरी इतक्या लांब आलाच आहेस तर चार दिवस राहून जा."

अशा रीतीनं विद्यार्थी नथूलाल आफ्रिकेतल्या जमैकात आठवडाभर राहिला, आणि मग विमानानं परत न्यूयॉर्कला येऊन तिथल्या जमैकात खऱ्या छोटालाल पटेलकडे गेला!

# लास व्हेगासच्या जुगारी जगातल्या रात्री

५

अमेरिका पहाणे हे माझे अमेरिकेला जाण्याचे मुख्य काम होते ते जास्तीत जास्त सुलभपणे आणि कमी खर्चात कसे करता येईल याची मी चौकशी करू लागलो. तेव्हा कळले की, 'व्हिजिट अमेरिका' नावाचे एक विमानाचे तिकिट मिळते ते एकवीस दिवस चालते त्या तिकिटावर अमेरिकेत कुठेही विमानाने जाता येते अमेरिकेतल्या नऊ लहानलहान विमान कपन्यानी मिळून हे तिकिट फक्त परदेशी प्रवाशासाठी सुरू केले आहे.

हे तिकिट घेऊन मी न्यूयॉर्कच्या केनेडी विमानतळावर एका सकाळी गेलो शिकागोचे तिकिट मागितले मला तिकिट मिळाले, त्यावर शिकागो असे लिहिलेले नसून 'ओहेर' असे लिहिलेले होते ते लक्षात आल्यावर मी तिकिटकचेरीजवळ परत येऊन सागितले की, मला ओहेरला जायचे नसून शिकागोला जायचे आहे त्यात पचाईत अशी झाली होती की, माझ्या बॅगेज-वर आधीच ओहेरची चिठ्ठी लागून ते तिकडे रवानाही झाले होते माझी तक्रार ऐकताच तिकिट देणारी लोभसवाणी छोकरी हसून म्हणाली, "अहो, हे शिकागोचच तिकिट आहे तियल्या ओहेर विमानतळाच नाव तिकिटावर घातलेलं आहे तिथल्या दुसऱ्या विमानतळावर तुम्ही चुकून जाऊ नये म्हणून ही खबरदारी घेतली आहे" मी आभार मानून निघालो पण मनात म्हटले, ही मोठी चमत्कारिक व्यवस्था खरीच! मुबईचे तिकिट मागणाऱ्या परदेशी प्रवाशाला 'साताक्रूझ' असे विमानाचे तिकिट दिले, तर त्याने शख करू नये तर काय करावे! मी मात्र तसे काही केले नाही कारण तिकिटावरचे नाव समजले नाही म्हणून असा

प्रकार करण्याची केनेडी विमानतळावर परपरा नसावी, असा मी साहजिकच कयास बाधला

केनेडीवरून शिकागोच्या ओहेर विमानतळावर गेलो 'अलीगेनी कपनीचे उत्कृष्ट विमान आणि सुदर हवाईसुंदरी साथीला होती 'सुदर सुंदरी' असे अजाणतेपणी लिहिलेले नाही काही हवाईसुदरी नुसत्या हवाईच असतात, म्हणून दोन्ही शब्द लिहिले आहेत. ओहेरला उतरलो, तेव्हा तिथले अपूर्व दृश्य पाहून सर्दच झालो या विमानतळाची भव्यता आणि गती याना जगात तोड नाही जगातला हा सर्वांत अधिक उड्डाणे असलेला विमानतळ दररोज तीन हजार विमाने येथून जातात, यावरून काही कल्पना येते का पहा म्हणजे दर सात सेकदाला एक विमान उडते 'एअर पोर्ट' या जगप्रसिद्ध चित्रपटात ओहेर विमानतळच प्रामुख्याने दाखवला आहे गावठी माणसासारखा या तळावरची अखड भिरभिर पहात माझ्या गेट नंबरला आलो मला न्यायला येणारे माझे मित्र तिथे दिसले नाहीत, तेव्हा मी त्याना फोन केला घटा वाजत होती, पण ते घरी नव्हते मग सी रामचंद्र जेथे उतरले होते त्या गुजराथी गृहस्थांच्याकडे फोन केला आणि मी कोण, काय ते सागितले विमानतळावरून गावात कसे आणि कुठे यायचे तेही विचारले तेव्हा अगदी सहजपणे ते गृहस्थ म्हणाले, "मिस्टर मत्री, तुम्ही विमानतळावर आहात ना ? मग लूप घ्या "

मी थक्कच झालो भारतात लूप हा प्रकार लोकप्रिय आहेच, पण तो मूलगामी असून समाजात खोलवर गेला आहे यात शका नाही पण शिकागोलाही कुटुंबनियोजन इतके जोरदार असेल याची मला कल्पना नव्हती अरे ! विमानतळावर उतरल्याबरोबर प्रत्येकाने आधी लूप घेतला पाहिजे म्हणजे काय ? शिकागोला येण्यातला माझा सर्वस्वी नम्र आणि सभ्य उद्देश मी त्या गृहस्थाना कळवळून सागितला पण ते म्हणाले, "तुम्हाला गावात यायच तर लूप घेतलाच पाहिजे त्याशिवाय इलाज नाही " मी म्हटले, असे चमत्कारिक गाव पृथ्वीतलावर इतर कोठेही नसेल पण रोमला जायचे तर रोमन लोकाच्या चालीरीती पाळल्या पाहिजेत, हे मला पॅरिसला चावटपणा चालतो हे कळल्यावरच पटले होते म्हणून विमानतळावर लूप कुठे मिळेल असा विचार करीत मी आजूबाजूला नजर टाकली

त्या प्रचड तळावर निदान पन्नाससाठ विमान कपन्यांचे गाळे होते, आणि प्रत्येकात तीनचार लावण्यवती तरुणी तिकिटे किंवा माहिती देण्याची कामे करीत होत्या त्याच्याजवळ लूप मागणे मला फारच अवघड वाटले समोरच तात्पुरत्या भाड्याने मोटारी देणाऱ्या 'ॲव्हिस' 'हर्झ' वगैरे कंपन्यांचे गाळे होते या दोन कंपन्यांत भयकर चढाओढ आहे अधिकाधिक सुदर आणि धाडसी छोकऱ्या नेमण्याबद्दल त्याची ख्याती आहे 'ॲव्हिस' कपनीने तर जाहीर केले होते की, आमची छोकरी तुम्हाला डोळा मारील आणि गालाचे चुंबनही घेऊ देईल, पण पुढे काय करायचे हा तुम्हा दोघाचा प्रश्न आहे '

'एअर वेस्ट 'सारख्या काही विमान कंपन्याही आपल्या हवाईसुदरींनी प्रवाशाना चुबन देण्यास हरकत घेत नाहीत—नव्हे, उत्तेजन देतात 'हर्झ' मोटार कंपनीच्या पोरी

प्रकार करण्याची केनेडी विमानतळावर परपरा नसावी, असा मी साहजिकच कयास बांधला

केनेडीवरून शिकागोच्या ओहेर विमानतळावर गेलो 'अलीगेनी' कपनीचे उत्कृष्ट विमान आणि सुदर हवाईसुंदरी साथीला होती 'सुदर सुंदरी' असे अजाणतेपणी लिहि- लेले नाही काही हवाईसुदरी नुसत्या हवाईच असतात, म्हणून दोन्ही शब्द लिहिले आहेत. ओहेरला उतरलो, तेव्हा तिथले अपूर्व दृश्य पाहून सर्दच झालो या विमानतळाची भव्यता आणि गती याना जगात तोड नाही जगातला हा सर्वांत अधिक उड्डाणे असलेला विमानतळ दररोज तीन हजार विमाने येथून जातात, यावरून काही कल्पना येते का पहा म्हणजे दर सात सेकदाला एक विमान उडते 'एअर पोर्ट' या जगप्रसिद्ध चित्रपटात ओहेर विमान- तळच प्रामुख्याने दाखवला आहे गावठी माणसासारखा या तळावरची अखड भिरभिर पहात माझ्या गेट नबरला आलो मला न्यायला येणारे माझे मित्र तिथे दिसले नाहीत, तेव्हा मी त्याना फोन केला घटा वाजत होती, पण ते घरी नव्हते मग सी रामचद्र जेथे उतरले होते त्या गुजराथी गृहस्थाच्याकडे फोन केला आणि मी कोण, काय ते सागितले. विमानतळावरून गावात कसे आणि कुठे यायचे तेही विचारले तेव्हा अगदी सहजपणे ते गृहस्थ म्हणाले, " मिस्टर मत्री, तुम्ही विमानतळावर आहात ना ? मग लूप घ्या "

मी थक्कच झालो भारतात लूप हा प्रकार लोकप्रिय आहेच, पण तो मूलगामी असून समाजात खोलवर गेला आहे यात शका नाही पण शिकागोलाही कुटुबनियोजन इतके जोरदार असेल याची मला कल्पना नव्हती अरे ! विमानतळावर उतरल्याबरोबर प्रत्येकाने आधी लूप घेतला पाहिजे म्हणजे काय ? शिकागोला येण्यातला माझा सर्वस्वी नम्र आणि सभ्य उद्देश मी त्या गृहस्थांना कळवळून सागितला पण ते म्हणाले, तुम्हाला गावात यायच तर लूप घेतलाच पाहिजे त्याशिवाय इलाज नाही मी म्हटले, असे चम- त्कारिक गाव पृथ्वीतलावर इतर कोठेही नसेल पण रोमला जायचे तर रोमन लोकाच्या चालीरीती पाळल्या पाहिजेत, हे मला पॅरिसला चावटपणा चालतो हे कळल्यावरच पटले होते म्हणून विमानतळावर लूप कुठे मिळेल असा विचार करीत मी आजूबाजूला नजर टाकली

त्या प्रचंड तळावर निदान पन्नाससाठ विमान कपन्याचे गाळे होते, आणि प्रत्येकात तीनचार लावण्यवती तरुणी तिकिटे किंवा माहिती देण्याची कामे करीत होत्या त्याच्याजवळ लूप मागणे मला फारच अवघड वाटले समोरच तात्पुरत्या भाड्याने मोटारी देणाऱ्या ॲव्हिस हर्झ वगैरे कंपन्याचे गाळे होते या दोन कपन्यांत भयकर चढाओढ आहे. अधिकाधिक सुदर आणि धाडसी छोकऱ्या नेमण्याबद्दल त्यांची ख्याती आहे ॲव्हिस' कपनीने तर जाहीर केले होते की, 'आमची छोकरी तुम्हाला डोळा मारील आणि गालाचे चुबनही घेऊ देईल, पण पुढे काय करायचे हा तुम्हा दोघांचा प्रश्न आहे.

एअर वेस्ट 'सारख्या काही विमान कपन्याही आपल्या हवाईसुदरींनी प्रवाशाना चुबन देण्यास हरकत घेत नाहीत—नव्हे, उत्तेजन देतात हर्झ' मोटार कपनीच्या पोरी

तर इतक्या रुंद गळ्याचा ब्लाउझ घेतात, की जवळजवळ अर्ध्याअधिक उन्नत उरोजाचे दर्शन होते ओहेर विमानतळावर सात सेकंदाला एक विमान उडत असेल, पण विमान कंपन्या आणि मोटार कंपन्याच्या प्रचंड कक्षेतून चक्कर टाकली, तर निदान दर एक मिनिटाला दोन अर्धे वक्ष या हिशोबाने प्रत्येक तासाला साठ सुंदर स्तन दिसतात, असे या रसिक, शृंगारिक क्षेत्रात रुक्ष गणित मांडता येईल नितंबाच्या आसपास घोटाळणारे स्कर्ट घातलेल्या स्त्रिया तर इतक्या दिसतात, की कमजोर हृदयाचा माणूस त्या गोऱ्या–गुबगुबीत सुंदर मांड्या पहाण्याच्या नादात विमानाकडे जायचेही विसरून जायचा शिकागोला उतरल्यावर लूपची इतकी आवश्यकता का भासते हे मला त्या वेळीच उमगले.

मी एका इन्फर्मेशनच्या बूथजवळ जाऊन अगदी अस्पष्ट आवाजात 'लूप म्हटले त्याबरोबर ती तरुणी प्रसन्नपणे आणि माहितगाराच्या नजरेने म्हणाली, 'तुम्हाला लूप हवंय ? -- छान ! तिसऱ्या दरवाज्यानं बाहेर जा उजवीकडे एक मिनिटावर लूपचा स्टॉप

" तुम्हाला लूप हवय् ?--- छान !




आहे वुइश यू नाइस स्टे इन् शिकागो ' म्हणजे लूप घेतल्यावर माझा शिकागोमधला मुक्काम उत्तम होणार याची त्या पोरीला खात्री होती उगीच नाही ती माहितगाराच्या नजरेने माझ्याकडे पहात होती !

मी तिसऱ्या दरवाज्याने बाहेर पडलो उजवीकडे एक मिनिट चाललो तिथे ' LOOP ' असे लिहिलेली बस उभी होती --- अरेच्चा ! ' लूप या नावाचे ठिकाण आहे तर ! आतापर्यंत मला लूपचे ठिकाण माहीत होते पण लूप नावाचीच जागा असते हे मला प्रथमच कळले. मी बसमधे बसलो आणि लूपचे तिकिट काढले नतर मला समजले की, शिकागोमधे लोकल गाडी मध्यवर्ती वस्तीत गोल चक्राकार फिरते, त्या भागाला लूप म्हणतात, आणि विमानतळ गावापासून पधरा मैल लांब असल्यामुळे गावात येणाऱ्या प्रत्येकाला आधी लूपला यावेच लागते तिथे पोचल्यावर माझे मित्र गोडबोले याना फोन केला ते घरी होते त्यांनी सागितले, " तुम्ही पामर हॉटेल'च्या लॉबीजवळ थाबा मी आणि सी रामचंद्र दहा मिनिटांत तिथं येतोच "

आमची बस पामर हॉटेल'जवळच थांबली होती म्हणून मी लॉबीबाहेरच फूट-पाथवर उभा राहिलो थोड्याच वेळात अण्णा ऊर्फ सी रामचद्र आले आणि त्यानी मला मिठीच मारली मग मी, गोडबोले आणि अण्णा निघालो अण्णानी रास्त सूचना अशी केली की, प्रथम आपण एखाद्या बारमधे जाऊ त्याशिवाय यथायोग्य ' सेलेब्रेशन ' होणार नाही आमचे मित्र गोडबोले हे मद्य न पिणारे होते पण त्यानी आम्हाला सहवास दिला

त्याच रात्री शिकागोच्या महाराष्ट्रमडळातर्फे दोन नाटिका होणार होत्या त्या नाटि-कांना आम्ही गेलो नाटिका फारच छान झाल्या मध्यतरात अण्णाच्या अध्यक्षतेखाली माझे भाषणही झाले मी विनोदावर बोललो आणि अनेक विनोदी प्रसंगाच्या आठवणी सागून श्रोत्याची बऱ्यापैकी करमणूक केली -- असा माझा अदाज आहे नाटिका रात्री अकराला सपल्या.

मग आम्ही गोडबोल्याचे मित्र अरुण टेंबे याच्या घरी गेलो हा अगदी उमदा, रसिक मित्र आहे आर्किटेक्ट म्हणून त्याने अमेरिकेत मोठे नाव कमावले आहे. त्याच्या कामाचे कौतुक करणारे सचित्र रकानेच्या रकाने अमेरिकन वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केले आहेत शरद गोडबोले त्यांच्याकडे जाण्यापूर्वी म्हणालेच, ' माझ्याकडे मद्य नाही पण त्याची कसर टेंबे भरून काढतील ' त्याचे म्हणणे अगदी खरे ठरले टेंब्याच्या घरी ' शिवास रीगल ', जॉनी वॉकर इत्यादी उत्तमोत्तम उंची मद्याच्या दहापधरा बाटल्या होत्या त्याचे घरही फार छान आहे मिशिगन तळ्याच्या समोरच एका उच मजल्यावर कडेच्या भिंती सपूर्ण काचेच्या असलेले हे घर आहे त्या काचातून समोरच्या रस्त्यावरची सरकत्या दिव्याची रहदारी आणि तलावाची सुदर शोभा पहात उत्कृष्ट मद्य घेण्यात मोठीच मौज होती मी, सी रामचंद्र आणि इतर मित्रानी ती मौज भरपूर लुटली. टेंबे यांना सगीताची फार आवड असल्यामुळे पार्श्वसगीत म्हणून अव्वल दर्जाचे खानदानी भारतीय संगीत टेपवर चालले होते. रात्री साडेतीन-चारच्या सुमाराला आमचे जेवण झाले आणि मी, सी. रामचंद्र व



**शिकागो शहराचा एक भाग लेक मिशिगन या सरोवराच्या काठचा रमणीय भाग.**

गोडबोले पतिपत्नी गोडबोल्यांच्या घरी परतलो आता त्या अवेळी अण्णाना त्याच्या घरी सोडणे गैरसोयीचे होते, म्हणून त्यानाही गोडबोले यानी आपल्या घरीच ठेवून घेतले.

रात्री कोणी कुठे झोपावे याची चर्चा झाली सौ गोडबोले मुलाच्या खोलीत झोपणार होत्या. तेव्हा मी गमतीने श्री गोडबोले याना म्हटले, " अहो, मी तुमच्या खोलीत झोपेन कारण तुमच्यासारख्या पवित्र माणसाच्या सगतीत मलाही थोड पुण्य मिळेल "

त्यावर सौ अनीता गोडबोले म्हणाल्या, " अहो, याच्या खोलीत झोपून जर पुण्य मिळाल असतं, तर मला आतापर्यंत मोक्ष मिळाला असता ! "

अनीताबाईंचे ते वाक्य ऐकून, स्त्रियाना विनोदबुद्धी नसते हा ठरीव साच्याचा आरोप किती खोटा आहे हे मला पटले

दुसऱ्या दिवशी गोडबोले यानी पेटी, तबला आणि तब्बलजी आणले मग अण्णांचे गायन मनमुराद ऐकले शिकागोला त्याचा कार्यक्रम व्हायचा होता, त्याची ती पूर्वतयारी होती शिकागोला 'वेदान्त सोसायटी'ची मुख्य कचेरी आहे तीही आम्ही पाहिली तिथले स्वामी भाष्यानद हे अकोल्याचे आणि मराठीभाषिक. त्यांना भेटून आणि त्याच्या सहवासात काही काळ राहून मनावर खोल छाप रुजली वेदान्त सोसायटीने शेतीवाडी विकत घेऊन आश्रमाचे उत्पन्न पाच लाख डॉलर्सवर नेले आहे आणि अमेरिकेत अनेक ठिकाणी शाखा उघडल्या आहेत सस्थेत मंदिर आहे आणि हिंदूंच्याप्रमाणेच अनेक अमेरिकन स्त्रीपुरुषही येथे हिंदू धर्मग्रंथाचा आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतात.

शिकागोहून मी लॉस एंजेलिसला जायला निघालो मी जे तिकिट काढले होते, त्यावर थेट लॉस एजेलिसला जाता येत नव्हते प्रथम डेन्हर येथे विमान कपनी बदलून

लास व्हेगसला जायचे, नि तिथून पुन्हा दुसऱ्या विमानाने लॉस एंजेलिसला जायचे, असा हा गुतागुतीचा प्रकार होता. मी शिकागोला तिकिट घेतले, तेव्हा तिकिटे देणारा गृहस्थ हसून म्हणाला, "तुम्ही व्हिजिट यू-एस-ए घेतलत का ? आता एकवीस दिवस इतके गरगर फिराल की पुन्हा विमानाचं तोंड पाहू नये अस वाटेल एनीवे, हॅव ए गुड डे "

मी त्याचा शकुनीय निरोप घेऊन शिकागो ते डेन्हर या विमानात चढलो तिथे हे विमान पोचून दुसरे सुटण्याच्या दरम्यान अर्धा तास अवकाश होता, म्हणून मी तसा निश्चिंत होतो विमानप्रवासात आणखी एक असा फायदा होता की, जेवण्याखाण्याचा अजिबात खर्च पडत नसे कारण विमानात चहा, कॉफी, ब्रेकफास्ट, लंच, डिनर, सपर -- असे खाण्याचे सर्व प्रकार त्या त्या वेळेनुसार भरपूर आणि उत्तम मिळत असत काही कंपन्या तर डिनरबरोबर मद्याची बाटलीही देत डेन्हरला जाताना मी या सोयीचा अर्थातच पुरेपूर उपयोग करून घेतला. लॉस एंजेलिसला पारसनीस नावाचे कोल्हापूरचेच एक मित्र गेली पन्नास वर्षे रहात होते त्यांना मी येत असल्याचे पत्राने कळवलेही होते त्यामुळे तिथे उतरण्याचीही चिंता नव्हती

डेन्हरला आमचे विमान ठरल्या वेळेपेक्षा वीस मिनिटे उशीरा पोचल्यामुळे आता दहा मिनिटात सामान घेऊन दुसऱ्या विमान कंपनीचे तिकिट घेऊन मी कसा जाणार ही मोठीच चिंता पडली तरी पण सामान हाती पडल्याबरोबर ते घेऊन मी धावतच 'एअर वेस्ट'च्या काँटरला गेलो आणि धापा टाकीतच लास व्हेगसचे तिकिट मागितले तो गृहस्थ म्हणाला, "अहो पण विमान सुटायला फक्त तीन मिनिट आहेत इंजिन सुरू झाल आहे नि विमानाचे दरवाजेही बंद झाले आहेत आता तुम्हाला विमान कस काय मिळणार ?

मी म्हटले, मी डेन्हरला अडकून पडलो तर माझी फारच पंचाईत होईल प्लीज काहीतरी करा नि मला हे विमान मिळवून द्या "

त्याने लगेच माझ्या बॅगेला टॅग लावून ती आत पाठवली, अर्ध्या मिनिटात माझे तिकिट दिले आणि जवळच्या फोनवरून विमानाच्या पायलटशी संपर्क साधून थांबायला सांगितले मी विमानाच्या दिशेने धावलो बंद झालेली विमानाची दारे उघडली आणि मी आत जाताच मिटली माझे स्वागत करणारी जपानी हवाईसुंदरी हसून म्हणाली, "आम्ही जवळजवळ निघालोच होतो यू आर लकी "

तिचा गुबगुबीत हात हातात घेऊन मी गमतीने म्हटले, ' आय ॲम टु हॅव ए ब्यूटि-फुल कंपॅनियन लाइक यू '

डेन्हरचे विमान लास व्हेगसला संध्याकाळी सातच्या सुमारास वेळेवर पोचले थोड्याच वेळात लॉस एंजेलिसचे विमान होते माझे सामान अजून घ्यायचेच होते विमाना-तून उतरून तळावर पाऊल टाकल्याबरोबर समोर पहातो, तर जुगाराच्या यंत्रांची रांगच्या रांग होती लास व्हेगस हे जुगाराबद्दल जगात सर्वांत सुप्रसिद्ध आणि कुप्रसिद्ध असे गाव आहे तिथे अगदी जागोजाग आणि कोपऱ्याकोपऱ्यावर जुगाराची यंत्रे आहेत त्यात दहा सेंटपासून अर्ध्या डॉलरपर्यंत कसलीही नाणी टाकून कळ ओढायची. तुम्ही नशीबवान असाल

तर एका नाण्याला शंभर, पन्नास किंवा दहा नाणी येतात माझी बॅग आणायला जाण्या-पूर्वीच समोरच्या यन्त्रात मी दहा सेंट टाकले ते गेले पुन्हा टाकले तेही गेले तिसऱ्यांदा टाकले आणि गिरणीतून पीठ पडावे तशी त्या यन्त्रातून भसाभसा शंभर नाणी आली मी मनात म्हटले, ' अरे ! ही तर मौज आहे ! पाहू आणखी दहाबारा नाणी टाकून ' ती मात्र सगळीच्या सगळी गेली तरीही दहा सेंटची सत्तरऐंशी नाणी मला फायद्यात पडली होती लास व्हेगसमधे माझे नशीब चांगले होते याचे हे पूर्वचिन्हच होते

पुढचे विमान थोड्याच वेळाने निघायचे असल्यामुळे मी ' एअर वेस्ट 'च्या सामा-नाच्या कौंटरजवळ आलो बहुतेक प्रवाशांनी आपले सामान नेले होते आणि तो ओकाबोका कौंटर दोन अनोळखी बॅगांसह आपल्याच भोवती फिरत होता त्याही बॅगा कुणा उतारूने नेल्या माझी बॅग आलीच नव्हती आता काय करावे, हा प्रश्नच नव्हता यापूर्वी कधीच माझ्यावर अशी आफत आली नव्हती आतापर्यंत लॉस एंजेलिसच्या विमानाचीही वेळ टळून गेली होती, आणि लास व्हेगसमध्येच मला मुक्काम करावा लागणार हे जवळजवळ ठरल्या-सारखे होते तरी पण प्रयत्नांती परमेश्वर की काय म्हणतात ते करून पहावे, म्हणून मी चौकशीच्या कौंटरवर आलो माझी बॅग आली नसल्याचे मी तिथल्या सद्‌गृहस्थाला सांगि-तले तो म्हणाला, " महाशय, हा फॉर्म भरून द्या. तुमच्या बॅगेतल्या वस्तूंची साधारण यादी द्या बॅगेच वर्णन द्या तुम्ही लास व्हेगसमधे कुठे उतरणार आहात हे त्यात लिहा तुमची बॅग मिळाली तर आम्ही ती तुमच्या पत्त्यावर पाठवून देऊ. बॅग चोवीस तासात मिळाली नाही तर आम्ही तुम्हाला नुकसानभरपाई म्हणून पाचशे डॉलर्स देऊ "

पाचशे डॉलर्स ! मला अतिशय आनंद झाला कारण माझ्या बॅगेतल्या सामानाची



" नुकसानभरपाई म्हणून आम्ही पाचशे डॉलर्स देऊ "

किंमत तीसचाळीस डॉलरहून अधिक झाली नसती ' देव करो नि माझी बॅग हरवो ' असा नवससुद्धा मी त्या वेळी केला कारण पाचशे डॉलर्समध्ये माझ मुंबई–न्यूयॉर्क–मुंबई हे तिकिट सुटत होत, नि वर चण्याकुरमुऱ्याला पन्नास डॉलर्स उरत होते ! मी वरकरणी कष्टाने पण अंतर्यामी आनंदाच्या उकळ्या फुटण्याचा अनुभव घेत फॉर्म भरला ' अशी दुसरी बॅग नाही हो मिळायची ' अशा अर्थाचा थोडा इंग्रजी शोकही केला लास व्हेगसचा पत्ता मलाच माहीत नव्हता म्हणून ' माझे उतरण्याचे हॉटेल ठरल्यावर मी कळवीन ' असे सात्वनपर आश्वासन देऊन मी लास व्हेगस गावात निघालो. टॅक्सी फारच महाग, म्हणून ' लिमोसिन'ने निघालो मी ड्रायव्हरला म्हटले, " डाउन टाउन. " (म्हणजे शहराचा मध्यवर्ती भाग,) तो म्हणाला, " स्ट्रिप –– स्ट्रिप सर. " तो काय म्हणतो ते मला कळले नाही. पण मी म्हटले, ' स्ट्रिप तर स्ट्रिप आपल्याला काय, गावात गेल्याशी कारण ! शिकागोच्या लूपला भ्यालो नाही, तो मी तुझ्या स्ट्रिपची कदर करणार ? चल लेका ! ' अर्थात हे सारे मनातल्या मनात ! उघडपणे मात्र मी ' थँक यू ' असे सौजन्यपूर्ण उद्‌गार काढून ड्रायव्हरने मागितले तेवढे साडेतीन डॉलर्स त्याच्या हातावर टिकवले

' स्ट्रिप ' म्हणजे भलतेच अफलातून प्रकरण निघाले जगातली काही सर्वांत बाद–शाही हॉटेले आणि पराकाष्ठेचे नाइट क्लब्स या स्ट्रिपवर आहेत. लॉस एंजेलिसचे डाउन टाउन आणि विमानतळ याच्या दरम्यान हा भयकर लखलखाटाचा भाग आहे हॉवर्ड ह्यूजेस या जगप्रसिद्ध कोट्यधीशाच्या मालकीची अनेक हॉटेले आणि नाइट क्लब्स या स्ट्रिपवर आहेत. या भागात दिव्यांचे इतके वैभव दिसते, की जगात इतरत्र तसे क्वचितच दिसत असेल. मी ' लिमोसिन'मधून सामान घेताना एका सहप्रवाशाला विचारले, " डाउन टाउन हेच काय ?" तो म्हणाला, ' नाही. आपण समोरच्या रस्त्यावर बससाठी उभे राहिलात तर ती आपल्याला डाउन टाउनला घेऊन जाईल मग मी समोरच्या रस्त्यावर बससाठी उभा राहिलो विमानतळावरून बस् येत होती मी स्वतःला प्रश्न केला की, तिथूनच मी डाउन टाउनची बस का घेतली नाही ? त्या प्रश्नाचे उत्तर ' मूर्ख म्हणून ' असे आले, ते मी न ऐकल्यासारखे केले

खरे तर मी निघालो होतो लॉस एंजेलिसला पण अचानक उतरलो लास व्हेगसला त्या वेळी मला एका साधूची गोष्ट आठवली एक साधू होता तो एका गावाहून दुसऱ्या गावी निघाला त्या वेळी वारा खूप सुटला होता साधूचे लांब केस उलटच्या वाऱ्याने सारखे त्याच्या कपाळावर आणि डोळ्यावर येत केस मागे सारूनसारून साधू कटाळला मग त्याने विचार केला ' आपल्याला याच दिशेने जायला पाहिजे असे कुठे आहे ? केस मागे सारण्याचा अखंड उद्योग करण्यापेक्षा आपण उलट बाजूच्या गावाला जावे कुठलेही गाव आपल्याला सारखेच. ' अशा विचाराने त्याने दिशा बदलली, आणि तो सुखाने दुसऱ्या गावाला पोचला.

लास व्हेगसच्या विमानतळावरून मी हातातली लहान अटॅची घेऊन आलो होतो त्यामुळे सामान कुठे ठेवावे हा प्रश्न नव्हता त्या वेळी रात्री आठ–साडेआठ वाजलेले

असावेत मी असा विचार केला की, लास व्हेगसच्या जुगारी अड्ड्यात रात्रभर जुगार खेळावा आणि सकाळी कुठल्यातरी हॉटेलात उतरावे, म्हणजे एका रात्रीचा रहाण्याचा खर्च वाचेल मागे पॅरिसमधे मी दोनतीनदा असेच केले होते सारी रात्र नाइट क्लबमधे घाल-वायची, आणि सकाळी हॉटेल पकडून दुपारी दोनपर्यंत झोपायचे म्हणजे एका रात्रीचे हॉटेलचे भाडे वाचते

बसने मी फर्मांट रस्त्यावर आलो त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी ' कसिनो ' म्हणजे जुगारगृहाचा प्रकाश इतका प्रचंड पडत होता, की ती रात्र आहे असे सांगूनही खरे वाटले नसते सूर्यप्रकाशाइतका स्वच्छ उजेड त्या लक्षावधी दिव्यांमुळे सबंध रस्त्यावर पडला होता ' गोल्डन नजेट ', ' हॉर्स शू , दि मिंट लास व्हेगस क्लब ', ' मिलियन डॉलर ' ' फ्रीमाँट ' अशा सबंध जगात प्रसिद्ध असलेल्या ' कसिनों'नी तो सगळा भाग खच्चून भरला होता

मी बसमधून उतरल्याबरोबर समोरच्याच जुगारघरात शिरलो तिथे निदान एक हजार तरी स्लॉट मशिन्स होती स्लॉट मशिनवर तीन गोल पट्ट्या वेगवेगळ्या प्रकारांनी



लास व्हेगस येथील जुगाराचा अड्डा

फिरत असतात त्या तिन्हींवर सारखीच चित्रे असतात म्हणजे सफरचंद, जोकर, तराजू अशा चित्राच्या पट्ट्या असतात आपण स्लॉट मशिनमधे नाणे टाकायचे आणि दांडा ओढायचा थोडा वेळ गरगर फिरून चित्राच्या त्या पट्ट्या थाबतात तुमच्या सुदैवाने जर एका रेषेवर तीन ॲपल्स किंवा तीन जोकर आले की त्या यत्रातून भसाभस शभर नाणी पडतात आपल्याजवळची नाणी सपली, तर मोड देणाऱ्या सुंदर तरुणी जवळच उभ्या असतात कागदाच्या छोट्या बालद्यातून दहा डॉलर्सची मोड मिळते अनेक वृद्ध स्त्रिया अशा बालद्या जवळ ठेवून रात्ररात्रभर या जुगारघरात स्लॉट मशिन्समध्ये आपले नशीब पहात असतात, स्लॉट मशिन हा लास व्हेगसच्या जुगाराचा सर्वांत लोकप्रिय प्रकार असला, तरी इतरही अनंत प्रकारानी या नगरीत चोवीस तास जुगार चालतच असतो. तुम्ही विमानतळावर उतरलात की टॅक्सीवाला तुमचे भाडे घेताना मोफत कूपन्स देतो या कूपन्सवर त्या त्या कूपनच्या जुगारघरात तुम्हाला तीनचार प्रकारांचा जुगार मोफत खेळता येतो कारण हा मोफतचा जुगार तुम्ही हरलात तर पैसे मिळवण्यासाठी तुम्ही आपल्या पदरच्या खर्चाने जुगार खेळणार. आणि मोफत कूपनवर तुम्हाला पैसे मिळाले तर अधिक पैसे मिळवण्यासाठीही तुम्ही जुगार खेळणारच, ही 'कसिनो'–चालकाची खात्री असते काही टॅक्सीवाले आणि 'लिमोसिन'वाले कूपन्स देतात, त्यात तीन जुगार आणि एक पेग व्हिस्कीही मोफत मिळते

जुगाराचे इतर प्रकार म्हणजे 'रौलट चक्र. त्या चक्रावर बसवलेला बाण ज्या आकड्यावर थाबेल, त्या आकड्यावर लावलेल्या पैशाचे दहापट मिळतात शिवाय पत्त्याचा जुगार, 'डाइस'चा ( कौरव–पाडव खेळले तसा द्यूत ) जुगार, असे अनेक प्रकार आहेत 'मिलियन डॉलर' म्हणून एक 'कसिनो' आहे त्यात दहा लक्ष डॉलर्सच्या नोटा काचे-मागे ठेवलेल्या पहायला मिळतात तुम्ही नशीबवान असाल तर शंभर डॉलर्सच्या जुगारावर दहा लक्ष डॉलर्स मिळवू शकाल एका 'कसिनो'च्या खास भागात किमान पन्नास हजार डॉलर्स लावावे लागतात तेवढी रक्कम रोखीत आधी प्रवेशद्वाराजवळ दाखवल्यानतरच या भागात प्रवेश मिळतो, मी या भागात प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न केला नाही, हे चतुर आणि छद्मी वाचकाना सागणे नकोच ! एका जुगारात तुम्ही या यत्राजवळ एक डॉलरची नोट ठेवायची वाऱ्याने ( सक्शन ) ती नोट आत ओढली जाते, तुमचा जुगार बरोबर आला तर शभर नोटा मिळतात, काही प्रकारात एक डॉलरला हजार डॉलर्सही मिळण्याची सोय असते

'कसिनो'चा आकार प्रचंड असतो एका वेळी दोनदोन हजार लोक बसू शकतील एवढा प्रत्येक 'कसिनो'त मद्याचा बार, कॉफीगृह वगैरे सोयी असतातच शिवाय नृत्याचे आणि सगीताचेही कार्यक्रम असतात मात्र पैसे मिळवण्याकडे लोकांचे इतके लक्ष असते, की अर्धनग्न आणि प्रमत्त सुदरींच्या नृत्याच्या बाजूला फार थोडी गर्दी असते 'कसिनो'मध्ये कुणालाही मोफत प्रवेश असतो, तरीही हे नृत्य पहाण्यात विशेष उत्साह कुणालाच नसतो जी काही मडळी या भागात जामया देत घोटाळत असतात, ती केवळ जुगार खेळण्यासाठी

आणलेला सगळा पैसा संपला म्हणूनच असावीत फार काय, लास व्हेगसमधे जी काही गर्दी दिसते, त्यापैकी ऐंशी टक्के प्रवासी असतात, आणि जुगारात पैसा हरल्यामुळे आता तिकिट कसे काढायचे म्हणून ही मंडळी इथे राहिली असावीत असे मला सारखे वाटत होते म्हणून लास व्हेगसला जाणाऱ्या प्रवाशांना एक सूचना करावीशी वाटते ती अशी की, तिथे जा, पण जातानाच परतीचे तिकिट काढा हजारो डॉलर्स खिशात टाकून कोट्यधीश होऊन परत येण्याच्या इराद्याने गेलेले अनेक लोक लास व्हेगसहून परत जाण्यासाठी ग्रे हाउंड बसचे भाडेही नाही अशा अवस्थेत आढळतात, म्हणून ही सूचना. अर्थात माझे विमानाचे तिकिट आधीच काढलेले होते त्यामुळे मला तशी काही चिंता नव्हती म्हणा

लास व्हेगसच्या जुगारीपणाबद्दल अनेक गोष्टी प्रचलित आहेत एक इसम आजारी पडला हॉटेलच्या मॅनेजरला त्याने खोलीतून फोन केला, ' मी अत्यवस्थ आहे मला औषधपाण्याची व्यवस्था करा " मॅनेजरने तत्परतेने त्या रोग्याकडे दोन स्लॉट मशिन्स आणि मोड देणारी एक सुंदरी पाठवली !

एका अमेरिकनाने आपली नवीकोरी मोटार एका पार्किंग मशिनजवळ उभी केली अमेरिकेत अशा पार्किंगच्या यंत्रात नाणे टाकले की तासभर पार्किंग करता येते तो बिचारा परत येऊन पहातो तर त्याची मोटार बेपत्ता ! त्याने पोलिसात तक्रार केली पोलिस चौकशीला आले त्यांनी मोटारीच्या जागी पहाणी करून सांगितले, ' मिस्टर, हे पार्किंग मीटर नाही जुगाराचं यंत्र आहे तुम्ही जिंकला असतात तर तुम्हाला शंभर मोटारी मिळाल्या असत्या पण तुम्ही हरलात म्हणून जुगार कंपनीनं तुमची मोटार नेली हे सगळं इथल्या कायद्याला धरूनच आहे "

एक इसम आजारी पडला त्याला लास व्हेगसच्या हॉस्पिटलमध्ये नेले डॉक्टरांनी त्याच्यावर शस्त्रक्रिया केली त्याच्या खिशातले पैशाचे पाकिट शस्त्रक्रिया करून बाहेर काढले डॉक्टरांनी पाकिट आपल्याकडे ठेवून घेतले रोगी चांगला बरा झाला आणि चालत गेला--- ऐंशी मैलांवरच्या आपल्या गावापर्यंत ! लास व्हेगसला जाणारा जुगारी सहा हजार डॉलर्सच्या मोटारीतून जातो आणि परत येतो तो ऐंशी हजाराच्या आगगाडीतून--- पन्नास सेंटचे तिकिट काढून !

काही लोकांची तर समजूत आहे, की लास व्हेगसच्या रस्त्यावर एकच प्रकारचा कचरा असतो--- नोटांचा !

अशा या विलक्षण जुगार-नगरीत मी रात्री एकपर्यंत निरनिराळ्या जुगारघरात जुगार खेळत होतो कधी हरलो, तर कधी जिंकलो सुदैवाने बऱ्याच वेळा मी जिंकलो थोडा विचार करून मी लास व्हेगसच्या स्लॉट यंत्राची टंगळ शोधून काढली मी अनुभवाने असे ठरवले की, एकाच यंत्रात तीनपेक्षा अधिक नाणी टाकायची नाहीत तीननंतर यंत्र बदलून दुसऱ्या यंत्रात पैसे टाकायचे कारण परम्युटेशन--कॉंबिनेशनच्या न्यायाने कधीतरी त्या यंत्रातून पैसे पडत असणारच. माझ्यापूर्वी काही लोक यंत्रात नाणी टाकून आणि दांडे फिरवून कटाळून गेले असणारच म्हणून वेगवेगळ्या यंत्रांत नाणी टाकली तर पैसे

मिळण्याची शक्यता असते या युक्तीने मी लास व्हेगसमध्ये फार नाही तरी पन्नासपाऊणशे डॉलर्स मिळवले आणि तिथला खर्च तरी भरून काढला

रात्रीचे दोन वाजले, तशी मला पेंग येऊ लागली आसपास पूर्वीच्याच उत्साहाने जुगार चालला होता पण मी मात्र फारच थकून गेलो होतो आदल्या रात्री मद्याच्या पार्टी-मुळे झोप नव्हती घरी यायलाच पहाटे साडेतीनचार झाले होते आणि पुन्हा सकाळी सातला पुढच्या प्रवासासाठी निघावे लागले होते म्हणून हातात जुगाराचे जादा पैसे आहेत तोपर्यंत आजच्यापुरते तरी निवृत्त व्हावे आणि चांगली सातआठ तास झोप काढावी असे मी ठरवले 'कसिनो' सोडून निघालो हॉटेलाची चौकशी केली ती सारी फारच महाग ! वीस डॉलर्स, अठरा डॉलर्स, पधराच्या खाली नाहीच नुसते तीनचार तास झोपण्यासाठी शभरदीडशे रुपये द्यायचे जिवावर आले कारण सकाळी सहाला गेलो तर एक दिवसाचे भाडे वाचणार होते झोप तर आता अगदी अनावर होत होती, आणि लास व्हेगसच्या सातआठ हॉटेल्स–मॉटेल्सनी जणू काही मला जुगारात पन्नाससाठ डॉलर्स मिळाल्याची बित्त-बातमी आधीच लागल्यासारखे भरमसाठ दर सांगायला सुरुवात केली होती मात्र तिथल्या हॉटेलात एक सोय असते बाहेरच 'निऑन साइन'चा बोर्ड असतो खोली रिकामी असेल तर 'Vacancy' असा फलक असतो, आणि जागा नसेल तर 'No Vacancy' असा फलक असतो त्यामुळे आत रिसेप्शनकडे जाऊन 'जागा आहे का हो ?' अशी विचारणा करण्याचा प्रश्न येत नाही फक्त दर विचारायचा आणि तो ऐकून परत फिरायचे एवढेच आपले काम असते

अर्धापाऊण तास फिरून दमल्यावर रस्त्यावरच्या एका बाकावर बसलो मग अचानक माझ्या लक्षात आले की, इतक्या मोठ्या रस्त्यावर हॉटेला–मॉटेलांचे दर भारी असायचेच आपण जरा आडबाजूला वाटमारी करावी म्हणून अमळ विश्रांती घेऊन आडबाजूच्या गल्लीबोळातली हॉटेले शोधू लागलो सुदैवाने एका आडबाजूच्या रस्त्यावर 'वेस्टर्न ' हॉटेल लागले तिथे दर फक्त सात डॉलर्स होता मी पटकन खोली घेतली विशेष गमत म्हणजे, माझा पासपोर्ट पाहून 'वेस्टर्न'चा व्यवस्थापक म्हणाला, " तुम्ही मुबईचे आहात ना ? मीही मुंबईला होतो आणि मुबईलाच रहाणारे लष्करातले एक कॅप्टनही आज या हॉटेलात उतरले आहेत " तो व्यवस्थापक खूपच तरुण होता तो मुबईला होता हे ऐकून मला आनद झाला मी म्हटले, " तुम्ही कोणत्या देशाचे ?"

तो म्हणाला, ' मी पाकिस्तानचा नागरिक आहे मी लास व्हेगसला शिक्षणासाठी आलो आहे."

मला गमत वाटली लास व्हेगसला जुगाराशिवाय दुसरे कसले शिक्षण मिळत असेल असे मला वाटले नव्हते मी स्पष्टच विचारले, " कसल शिक्षण ? जुगाराच ?"

त्याला तो प्रश्न अपेक्षितच होता तो हसून म्हणाला, " नाही. मी हॉटेल मॅनेजमेंटच शिक्षण घेतो आहे दिवसा शिकतो, रात्री इथ असिस्टंट मॅनेजर म्हणून काम करतो प्रत्यक्ष अनुभव मिळतो आणि शिक्षणाचा खर्चही भागतो " मला त्या माणसाची गमत

वाटली जगाच्या कुठल्या कानाकोपऱ्यात कोण कसा भेटतो या योगायोगाचेही कौतुक वाटले. मी सात डॉलर्स दिले एका रात्रीसाठी जागा घेतली जागा दुसऱ्या मजल्यावर होती, मला भाड्याची पावती देताना त्या व्यवस्थापकाने जुगाराची तीन कूपन्सही दिली होती आणि ब्रेकफस्टचे कूपन दिले होते त्या हॉटेलात खाणेपिणे मिळण्याची सोय नव्हती पण समोरच्या कसिनो'मध्ये ते कूपन दिल्यावर ब्रेकफस्ट मिळणार होता मी लिफ्टचे दुसऱ्या मजल्याचे बटन दावले. लिफ्ट दुसऱ्या मजल्यावर थांबलाही पण समोरचे दारच उघडेना, मी पुन्हापुन्हा बटण दाबले तरी दार बंदच मग विचार केला की, हा कसलातरी वेगळ्या प्रकारचा लिफ्ट असावा म्हणून आत फ्रेममध्ये छापील सूचना होत्या त्या वाचल्या. त्यात लिहिलेले होते की, ' दुसऱ्या मजल्यावर उतरताना तुमच्या पुढचे दार बंद असेल आणि पाठीमागचे दार उघडे असेल. म्हणून अबाउट टर्न करा आणि लिफ्टबाहेर पडा ' मी स्काउटसारखे अबाउट टर्न केले आणि पहातो तर खरोखरच लिफ्टचे मागचे दार उघडे होते. मी माझ्या खोलीवर गेलो खोली छोटी पण फारच छान होती स्नानगृह, टेलिव्हिजन, गालिचे, उत्तम पलंग, चार टॉवेल्स, चार साबण सारे काही पहिल्या दर्जाचे मी इतका दमून गेलो होतो की धोंड्यावरसुद्धा डोके ठेवून झोपलो असतो मग इथे तर काय, सारीच अव्वल दर्जाची व्यवस्था पुन्हा ही जागा आडबाजूला असल्यामुळे संपूर्ण शांतता मी गरम शॉवरखाली छानशी अंघोळ केली, आणि जो झोपलो तो दुसऱ्या दिवशी सकाळी साडे–अकरा–बारापर्यंत

एक वाजता जेवणाच्या वेळी ब्रेकफस्ट घेतला जवळ जुगाराची तीन कूपन्स होती त्यावर जुगार खेळलो हरलो पुन्हा पदरच्या पैशाने खेळलो. थोडे पैसे मिळवले हॉटेलवर येऊन साइट सीइंग म्हणजे प्रेक्षणीय स्थळाची फोल्डर्स पाहिली हूव्हर डॅम हे जगप्रसिद्ध धरण जवळच होते तिकडे जाण्यासाठी हॉटेलमध्ये नाव नोंदवले इतक्यात आठवण झाली ती माझ्या सामानाच्या बॅगेची विमानतळावर ह्यूवेस्ट कौंटरला फोन करून माझे नाव, सामानाचा टॅग नंबर, हॉटेलचे नाव आणि खोली नंबर हे तपशील दिले आणि ' माझी बॅग हरवू दे ' अशी परमेश्वराजवळ प्रार्थनाही केली.

मग दुपारी ग्रे लाइन बसने हूव्हर डॅम पहायला गेलो ७२५ फूट उंच आणि १२५० फूट लांब असे सिमेंट कॉंक्रीटचे हे अमेरिकेतील सर्वांत मोठे धरण इंजिनियरिंगच्या क्षेत्रात हे एक जागतिक आश्चर्य आहे या धरणामुळे लेक मीड हे विशाल आणि सुंदर कृत्रिम तळे कोलोरॅडो नदीवर तयार झाले आहे या धरणाच्या पोटात जाण्यासाठी लिफ्ट आहेत आणि धरणाच्या पोटात असलेले जगातील एक प्रचंड विद्युत्–उत्पादन केंद्र पहाता येते सध्या–काळी पाचच्या सुमाराला ' वेस्टर्न हॉटेल'वर परत आलो ह्यूवेस्ट विमान कंपनीचा फोन आला त्या बाजूने बोलणारा म्हणाला, " गुड न्यूज सर.

मी आनंदातिशयाने विचारले, " काय म्हणता ? बॅग हरवली ? फाइन ' थँक यू." मी फोन खाली ठेवणार तोच तो खलनायक म्हणाला, " नो नो सर आम्हाला आपली बॅग सापडली आहे ती डेन्व्हरलाच राहिली होती. इथं आणली आहे माझ्या समोरच आहे ती अर्ध्या तासात आपल्या खोलीवर पोचती केली जाईल व्हेरी गुड न्यूज सर, '

' ही कसली गुड न्यूज ? मला तर ही फारच शोकजनक बातमी आहे '' असे म्हणून निराशेने मी फोन खाली ठेवला सोडून दिलेले मांजर पळत यावे तशी माझी ती निळी बॅग खरोखरच अर्ध्या तासात माझ्या खोलीवर हातीपायी धडधाकट आली आणि मी फुकट मिळणार असलेल्या पाचशे डॉलर्सवर तिलांजली सोडली !

रात्री मी लास व्हेगसच्या नाइट क्लब्सना भेट द्यायचे ठरवले होते जगात कितीही प्रकारचे धाडसी नाइट क्लब असले, तरी लास व्हेगसची मौज काही वेगळीच, असे मी जुन्या आणि जाणत्या लोकांकडून ऐकले होते तेव्हा म्हटले, ठीक आहे आणखी दीडदोनशे उधळून टाकू जोपर्यंत मला कर्ज देणारे मित्र आहेत तोपर्यंत आपल्याला चिंता करायचे कारणच काय ? चिंता करायचीच तर माझ्या धनकोंनी करावी ! या विचाराने मी पचवीस डॉलर्सचे रात्रीच्या क्लब्सचे तिकिट काढले ही सफर रात्री नऊपासून पहाटे अडीच-पर्यंत चालणार होती लास व्हेगसमधील सर्वोत्कृष्ट नाइट क्लब्सना भेटी, मद्यपान, करमणुकीचे कार्यक्रम वगैरेंचा त्यात समावेश होता

या सफरीला ' फॅन्टॅस्टिक ' हे एकच विशेषण लागू पडेल ' सीझर्स पॅलेस ' ' डेझर्ट इन् ' ' फ्रंटियर ' 'सर्कस सर्कस ' अशा भव्य, मदमस्त नाइट क्लब्समध्ये सर्वांगसुंदर अशा नग्न तरुणी पाहिल्या, भान हरपवून टाकणारी नृत्ये, संगीत यांचे कार्यक्रम पाहिले, आणि जगातले सर्वांत श्रीमंत लोक जिथे ख्यालीखुशालीवर लाखो रुपये उधळतात अशी नितांत-सुंदर ठिकाणेही पाहिली आणि अमेरिकेला आल्याची कृतार्थता वाटली प्रत्येक नाइट क्लबमध्ये स्कॉच व्हिस्की होती आणि ती घेऊन येणाऱ्या पोरी तर स्वर्गातल्या अप्सरा वाटाव्यात अशा सौंदर्याच्या खनी होत्या काही ठिकाणी टॉपलेस म्हणजे स्तन संपूर्णपणे उघडे टाकलेल्या वेट्रेसेस होत्या इतरही भाग बहुतेक उघडेच होते जुगार, पैसा, लावण्य, यौवन, संगीत, मदहोषी या सर्वांची रेलचेल होती या सर्व नाइट क्लबमध्ये ' सर्कस सर्कस हा क्लब तर जगात अद्वितीय आहे सर्कशीच्या एका अजस्र तंबूतच हा क्लब आहे त्यात शेकडो दुकाने, मद्यगृहे, जुगारगृहे आहेतच, पण या क्लबचा विशेष असा की, जमिनीवरच्या टेबलांवर पाच हजार लोक जुगार खेळत असताना वर तंबूच्या तारांवर आणि झोपाळ्यां-वर सुंदर तरुणी सर्कशीचे खेळ करीतच असतात या नाइट क्लबला भेट देण्यासाठी आलेल्या आमच्यासारख्या प्रवाशांना स्कॉच व्हिस्कीची इतकी कूपन्स दिलेली असतात की आता पिऊन दमलो बुवा ' असे म्हणावे ' सर्कस सर्कस'सारखा अतिभव्य नाइट क्लब पृथ्वीच्या पाठीवर इतरत्र कुठे मी पाहिलेला नाही आणि असेल असे वाटतही नाही इथे आणि लास व्हेगसमध्ये इतरत्रही जुगाराचे पूजन एखाद्या देवतेच्या पूजेसारखे होत असते

यंत्राच्या खाचीत नाणे टाकून हवे ते मिळण्याची कमाल लास व्हेगसमध्येच दिसते मोड हवी तर खाच आहे, पेय हवे तर खाच आहे, खाद्य हवे तर खाच आहे, सिगरेट हवी तर खाच आहे, बूटपॉलिश हवे तरीही नाणे टाकायला खाच आहेच लास व्हेगसच्या त्या रम्य जुगारी रात्री माझ्या मनात गमतीचा विचार आला तो असा की, अमेरिकन परमे-श्वराने प्रथम स्त्रीचा शोध लावला तो केवळ नाणे टाकण्यासाठी खाच असावी म्हणून ! नंतर कल्पक माणसाने त्या स्त्रीचे आणि खाचेचे विविध उपयोग शोधून काढले असावेत !

# स्वप्ननगरी आणि चित्रनगरी

६

लास व्हेगसच जग जुगारी खरच पण हा जुगार केवळ पैशापुरताच मर्यादित नसतो माणस आपल्या आयुष्याचाही जुगार इथ खेळत असतात त्याची प्रचीती मला अगदी चमत्कारिक रीतीनं आली लास व्हेगसच्या पहिल्या रात्री अडीचतीन वाजता मी हॉटेल धुडाळीत होतो, तेव्हा मला अनेक चर्चेस् दिसली पण मी तिकडे दुर्लक्ष केलं होत मला वाटल, असतील इथले लोक फार धार्मिक जुगारी लोकानी काय देवावर विश्वास ठेवू नये ? त्यानी जरूर ठेवावा इतरांपेक्षा अधिक ठेवावा पण म्हणून काय चर्चची रागच्या रांग असावी ?

पण त्या रात्री माझ्या डोळ्यात झोप इतकी भरली होती, की लास व्हेगसच्या आमजनतेच्या धर्मप्रियतेवर अधिक विचार करण्याची शक्तीच माझ्यात उरलेली नव्हती दुसऱ्या दिवशी हॉटेलच कुपन घेऊन मी फॉमॉंट रस्त्यावरच्या एका हॉटेलात गेलो कारण मी रहात होतो तिथ फक्त खोल्या होत्या, आणि तिथ रहाणाऱ्या लोकानी चहापाणी, जेवण वगैरेची कुपन घेऊन दुसऱ्या हॉटेलात जाण्याची पद्धत होती तिकडे जातानाही पहातो तो दर हॉटेलजवळ एकएक चर्च ! विशेष म्हणजे प्रत्येक चर्चच्या वर ठळक अक्षरात पाटी ‘ओपन डे अँड नाइट’ किंवा ‘ओपन ट्वेंटी फोर अवर्स’

या पाटया पाहून मात्र यात अधिक काहीतरी पाणी मुरत असाव अस मला वाटल कुणी कितीही धार्मिक असला, तरी चोवीस तास प्रार्थनेसाठी सोय ठेवण्याची गरज नसते. मी ब्रेकफस्टचं कुपन दिल आणि ब्रेकफस्ट येण्याची वाट पाहू लागलो तोच एक अमेरिकन म्हातारी जागा शोधीत

माझ्या टेबलाजवळ आली आणि 'मी इथं बसले तर चालेल का ? ' असं तिनं विचारलं. मी मनात म्हटलं, ' गप्पा मारायला एखादी तरुणी असती तर बरं झालं असतं. पण ठीक आहे म्हातारी तर म्हातारी ! आपल्याला काय, नुसत्या गप्पाच मारायच्या आहेत


मग न्याहरी घेताघेता ' तुम्ही कुठल्या देशाचे ? भारताचे का ? अय्या ! मग इंडिया बाई फारच वंडरफुल ' वगैरे सारं रीतिरिवाजाप्रमाणं झालं. मग मी तिला विचारलं, लास व्हेगसइतकी चर्चेस मी अमेरिकेत इतरत्र कुठंच पाहिली नाहीत इथले लोक चोवीस तास येशूची प्रार्थना करतात, आणि इथले धर्मोपदेशक त्यांना रात्रदिवस प्रार्थना सांगत असतात, हा चमत्कारच नव्हे का ? "

त्यावर ती बाई हसून म्हणाली, " अरे बाबा, इथली चर्चेस प्रभू येशूची प्रार्थना करण्यासाठी नाहीत तर इथं तावडतोब घटस्फोट मिळतो, आणि घटस्फोट घेतल्याबरोबर लग्नही लावता यावं म्हणून इथं चर्च रात्रदिवस खुलं ठेवावं लागतं "

म्हणजे काय गंमत आहे पहा ! एका बायकोजवळ 'नातिचरामि' अशी शपथ घ्यायची, मग दुसऱ्या दिवशी सकाळी प्रीस्टजवळ जाऊन दोघांनीही " मी अतिचरण केलं, झक मारली " म्हणून कबूल करायचं, घटस्फोट घ्यायचा. मग शेजारच्या चर्चमधे लगेच जाऊन दुसरी बाई आणि दुसरा पुरुष यांचे हात धरून पुन्हा ' नातिचरामि ' म्हणायचं नि लग्न लावून दोघांनी आपापल्या नव्याकोऱ्या किंवा सेकंडहँड नवराबायकोबरोबर चर्चमधून बाहेर पडायचं, असे प्रकार घडतात तर इथं. मी त्या बाईला गंमत म्हणून हे सांगितलं. पण ती गंभीरपणं म्हणाली, ' अहो, तुम्ही थट्टा म्हणून जे सांगता ते इथं खरंच घडतं कधीकधी तर नवरा, बायको आणि प्रेयसी एकाच मोटारीतून लास व्हेगसला येतात एकाच हॉटेल-मधे रहातात चर्चमधे जाऊन नवरा-बायको प्रेयसीच्या उपस्थितीत घटस्फोट घेतात, आणि लगेच त्याच बोहल्यावर प्रेयसी चढते, आणि धर्मगुरू त्याचं शुभमंगल करून टाकतो गंमत अशी की पुन्हा ती तिघं त्याच हॉटेलात रहातात. फरक इतकाच की, सकाळची बायको आता प्रेयसी झालेली असते, आणि प्रेयसीचं रूपांतर अधिकृत पत्नीत झालेलं असतं ! "

अमेरिकेत रेनो आणि लास व्हेगस या दोन ठिकाणी घटस्फोट सुलभतेनं मिळतो, म्हणून घटस्फोटेच्छूंची तिकडे रीघ लागलेली असते. मला वाटतं, लास व्हेगसच्या धर्मगुरूंना ' शुभमंगल सावधान ' आणि ' शुभघटस्फोट सावधान ' यांशिवाय इतर मंत्र किंवा प्रार्थना माहीतच नसतील ! लास व्हेगसच्या चर्चजवळ बऱ्याच वेळा पाट्या असतात ' मॅरेजिस अँड डायव्होर्सेस इफेक्टेड विदाउट डिले. ( ' लग्न व घटस्फोट विनाविलंब मिळतील ' ) म्हणून मी म्हटलं की, इथं माणसं पैशाचाच जुगार खेळतात असं नाही, तर आपल्या आयुष्याचाही जुगार खेळत असतात लास व्हेगसमधून बाहेर पडताना माझ्या मनात जरा धागधुगीच होती कारण विमानतळावर कदाचित पोलिस-अधिकारी तुम्हाला दरडावून विचारायचा, " काय हो मिस्टर ! तुम्ही इथं येऊन लग्न केलंत की नाही ? निदान घट-स्फोट तरी घेतलात की नाही ? तुम्ही जर यापैकी एकही गोष्ट केली नसेल, तर तुम्हाला हे गाव सोडता येणार नाही ! "

सुदैवान ही भीती खोटी ठरली. मी लास व्हेगस सोडून लॉस एंजेलिसला जाण्यासाठी विमानतळावर आलो. तेव्हा तिकिट देण्यासाठी तिथल्या अधिकाऱ्यान माझ्याकडे पासपोर्ट मागितला असेल तेवढाच मी सकाळी सव्वाआठच्या सुमाराला विमानात बसलो प्रवास छानच झाला. चवदार न्याहरी आणून देणारी प्रसन्न हवाईसुंदरी होती आणि विमानात फक्त दहाबाराच उतारू होते लॉस एंजेलिसमधे कुठं उतरायचं नि कुठ रहायच याबद्दल मी निश्चित होतो कारण गेली पन्नास वर्ष हॉलिवुडमधे राहिलेले रामचद्र पारसनीस नावाचे कोल्हापूरचेच एक स्नेही काही दिवसापूर्वीच मुबईला आले होते त्यानी मला आपल्या घरी रहाण्याच आग्रहाच निमत्रण दिल होत हॉलिवुडसारख्या स्वप्ननगरीत



लॉस एंजेलिसमधील एक रमणीय रस्ता

' हॉलिवुड बुलेवार्ड ' या हमरस्त्यावर मी रहाणार होतो श्री पारसनीस याना मी न्यूयॉर्क-हून आठ दिवसांपूर्वीच पत्र टाकलेल होत आणि मी येणार असल्याच कळवल होत आता लॉस एजेलिसला उतरल्याबरोबर विमानतळावरच्या डिरेक्टरीत फोन नंबर पहायचा आणि त्याना फोन करून तिथं जायचं हे अगदीच सोप आणि साध काम होतं

मी लॉस एजेलिसला उतरलो टेलिफोन–डिरेक्टरी पाहिली, नबर शोधला, फोन केला, तेव्हा पारसनीस याचा आवाज ऐकू येण्याऐवजी एका बाईचा असा आवाज आला " आय ॲम सॉरी, मिस्टर पारसनीस हॅज लेफ्ट धिस अपार्टमेंट ॲंड हॅज मुव्हड् टु अनादर प्लेस विदाउट फॉरवर्डिंग अड्रेस धिस इज ए रेकॉर्डिंग आय ॲम सॉरी मिस्टर पारसनीस हॅज लेफ्ट —"

मी फोन बंद केला. पारसनीसानी ते घर सोडल असेल तर अर्थातच त्यांना माझ पत्र मिळालं असणं शक्य नाही म्हणजे सगळीच पंचाईत आली लॉस एजेलिससारख्या बादशाही शहरात माझी कुणाचीही ओळख नव्हती आणि कुठं जायचं, काय करायच हे काहीही ठरलेल नव्हत क्षणभर मी तिथंच बाकावर विश्रांती घेतली आणि काय कराव याचा विचार करू लागलो इतक्यात मला आठवण झाली की, मुकुंदराव किर्लोस्करानी मला ' स्त्री–किर्लोस्कर'च्या अमेरिकेतल्या वर्गणीदाराची यादी दिली होती ती यादी काढली ती यादी अकारविल्हे होती आणि पहिलच नाव ' अंजली कुलकर्णी, लॉस एजेलिस अस होत

ही बाई मराठी आहे, त्या अर्थी तिला पारसनीस कुठे रहायला गेले आहेत याची माहिती असेल, अशा अंदाजान तिला फोन करायच ठरवल तिच्या नावावर फोन नव्हता. पण रवींद्र कुलकर्णी या नावावर होता मी फोन केला, ' सौभाग्यवती अंजली कुलकर्णी आहेत का ?

' हो मी अंजलीच बोलते आहे आपण कोण ?"

' माझ नाव रमेश मंत्री आपली–माझी ओळख नाही. पण —

ओ ! रमेश मत्री म्हणजे लेखक तेच तुम्ही काय ? '

" हा लिहितो मी अधूनमधून "

' अहो मग आपली ओळख नाही अस काय म्हणताय् ⁄ मी तुमच खूपखूप वाचल आहे नि तुमची–माझी खूपच ओळख आहे तुम्ही कुठून बोलता आहात ?"

" मी लॉस एजेलिसच्या विमानतळावरून बोलतो आहे तुम्हाला रामचंद्र पारसनीस माहीत आहेत का ?"

' हो, आहेत की तुम्ही आधी अस करा की, आमच्या घरी या, आमच्याकडेच उतरा '

' अहो पण मी पारसनीसाच्याकडे रहाणार आहे त्याचा पत्ता मिळेपर्यंत फार तर —

" ते काही नाही त्यांचा पत्ता नतर शोधू मीच तुम्हाला न्यायला गाडी घेऊन आले असते. पण ह्यानी मोटार नेलीय् ऑफिसात पण आमचं घर विमानतळापासून अगदी पाच मिनिटांच्या रस्त्यावर आहे. पत्ता सिक्स–फोर–टू–सिक्स, वेस्ट एटिफोर्थ स्ट्रीट, असा आहे. टॅक्सीवाल्याला सागा तो बरोबर आणून सोडेल "

मी आभार मानून फोन ठेवला, आणि आपण लेखक असल्याबद्दलची धन्यता वाटली मी टॅक्सी केली आणि अंजलीच्या घरी गेलो ही कोण, कुठली, काय करते याची मला यत्किंचितही कल्पना नव्हती. टॅक्सीचा आवाज आल्यावर तिनं दार उघडल आणि प्रसन्न हसून माझ स्वागत केल ती तरतरीत, सावळी पण सुदर अशी तरुण गृहिणी आहे बोलण्यात सौजन्य, आर्जव आणि चेहेऱ्यावर बुद्धिमत्तेची छाप तिला वर्षभराचा मुलगा आहे त्याला अगावर घेऊनच मला तिनं माझी खोली दाखवली. मी सकोचानं म्हटलं, ' अहो पण मी रहायला आलो नाही नुसता पारसनीसाचा पत्ता सापडेपर्यंत — "

" अहो आलात तसे रहा आधी जेवून तरी घ्या मग पत्त्याची चौकशी करू. ' असं म्हणून अंजलीनं जेवण होईपर्यंत चहाही ठेवला. त्या वेळी सकाळचे साडेदहा वाजले होते आणि जेवण तयार व्हायला दीडदोन तास तरी होते. मी अंघोळ केली, चहा घेतला आणि एकदम मला एक आठवण झाली भारतातून येताना मी एका दिवाळी–अकाला अर्धीच कथा दिली होती, आणि ' उरलेली निम्मी कथा अमेरिकेतून पाठवीन ' अस सागितल होत सपादकांनी अर्ध्या कथेचा कपोज करून चित्राचा ब्लॉकही तयार ठेवल्याचं पत्र न्यूयॉर्कच्या पत्त्यावर पाठवल होत.

मी अंजलीला म्हटलं, ' तुमचा स्वैपाक चालू दे तोपर्यंत मी दिवाळी–अकाची कथा पूर्ण करतो

" केव्हा पाठवायची आहे ती ?"


' दसऱ्यापर्यंत तरी सपादकाना पोचली पाहिजे '

" दसरा केव्हा आहे ?"

" मला तरी काय माहीत ? तुमच्याकडेच काही कॅलेंडर–पंचाग असेल तर पहा

तिन कुठूनतरी एक मराठी तारखाच कॅलेंडर पैदा केल योगायोग म्हणजे त्या दिवशीच दसरा होता।

" अहो आजच दसरा आहे मला वाटलंच होत तुमच्यासारखे मोठे लोक घरी आले की दिवाळी–दसरा असतोच ! " अजली खेळकरपणं म्हणाली मग तिनं पारसनीसाच्या पुतण्याला फोन केला. फोनवर बोलून झाल्यावर ती आनदान म्हणाली, " आता तुम्हाला आमच्याकडेच रहायला हव ह कारण काकानी घर कुठ बदललय ते पुतण्यालाही माहीत नाही ! " मी पडत्या फळाची आज्ञा घेतली आणि अंजलीचा स्वैपाक होईपर्यंत दिवाळी–अकाची कथा पूर्ण करून टपालात टाकली मग मी रवींद्र कुलकर्णी व कुटुबाच्या सुखद सहवासात लॉस एंजेलिसला चारपाच दिवस राहिलो दोघांनीही अत्यत अगत्यानं माझी बडदास्त ठेवली दसरा म्हणून अंजलीनं गोडधोड केल. जेवण झाल्यावर मला लॉस एजेलिस



**डिस्नेलँड . उद्याच्या जगातील आगगाड्यातून आजच्या जगाचे प्रवासी असा प्रवास करतात.**

शहर पहावंस वाटल, म्हणून मी जवळच्या बसस्टॉपवरून गावात गेलो लॉस एजेलिस हे अमेरिकेतल एक अत्यत सुदर शहर आहे मी मात्र कसलीही योजना न करता त्या रमणीय गावातून वाट दिसेल तिकडे भटकत होतो दुसऱ्या दिवसापासून मी डिस्नेलँड, हॉलिवुड, लायन कट्री ही अमेरिकेतील अत्यत प्रेक्षणीय स्थळ पहायला जाणारच होतो पण हा पहिला दिवस मी यथेच्छ भटकून काढला येतानाही मी बसनं आलो पण कुठ उतरायच हे नक्की न आठवल्यामुळ वाट चुकलो. अखेर एका सार्वजनिक टेलिफोनवरून रवींद्र कुलकर्णींना फोन करून मी कुठ आहे ते सागितलं, आणि तिथ येऊन त्यांनी मला घरी नेलं दुसऱ्या दिवशी मी लॉस एंजेलिसजवळची प्रेक्षणीय स्थळ पहायला बाहेर पडलो

अमेरिकेत पहाण्यासारख सर्वांत आकर्षक स्थळ कोणत असेल, तर ते डिस्नेलँड हे आहे दर साल लक्षावधी प्रवासी न्यूयॉर्क–वॉशिग्टनहून दोनअडीच हजार मैलाचा प्रवास करून लॉस एजेलिसला येतात ते मुख्यत. डिस्नेलँड पहाण्यासाठी. लॉस एजेलिसपासून अठ्ठावीस मैलावर असलेल्या ॲनहीम गावी ही स्वप्ननगरी आहे व्यगचित्रपटाचा जनक वॉल्ट डिस्ने यानी या विलक्षण शहराची कल्पना काढली आणि १९५५ साली १ कोटी ७० लक्ष डॉलर्स खर्च करून ते वसवल

लॉस एंजेलिसच्या दुसऱ्याच दिवशी सकाळी मी डिस्नेलँडच्या ट्रिपसाठी नाव घातलं. रवींद्रनी मला एका हॉटेलच्या लॉबीत सोडलं, आणि ठरलेल्या वेळी ग्रे लाइनची बस् येऊन आम्हाला डिस्नेलँडकडे घेऊन गेली. तिथली पार्किंगची जागा दहा हजार मोटारी उभ्या करता येतील एवढी मोठी आहे. त्यामुळं कार पार्कपासून डिस्नेलँडच्या प्रवेशद्वारा-जवळ जाण्यासाठीसुद्धा ट्रॉली बसनं जावं लागतं. मग आमच्या बसमधल्या उतारूंचे दहा-दहाचा एक असे वेगळे गट करण्यात आले. प्रत्येक गटाच्या सभासदांना वेगळ्या रंगाचे बिल्ले देण्यात आले आणि त्यांच्यासाठी गाइड म्हणून काम करणाऱ्या मुलीलाही त्याच रंगाचा बिल्ला देण्यात आला. त्यामुळं डिस्नेलँडमधे फिरणाऱ्या हजारो गटांत आपला गट कोणता आणि आपली गाइड कोणती हे चटकन ओळखता येई. हे सर्व गट डिस्नेलँडमधे प्रथम एका आगगाडीत बसतात. ही आगगाडी सबंध डिस्नेलँडची फेरी मारते. दोनशे एकरांवर वसवलेल्या या नगरीचे सहा प्रमुख भाग पाडलेले आहेत. सबंध नगरीची

डिस्नेलँडमधील फॅन्टसी लँडचे प्रवेशद्वार मेन-स्ट्रीटवरील घोड्यांच्या गाड्याही दिसत आहेत.




प्रवाशाला एकदा कल्पना आली, की मग त्यान आपल्याला हव्या त्या विभागात अधिक वेळ फेरफटका करावा, अशी ही योजना आहे

'फॅन्टसी लँड' या विभागात किल्ले, पऱ्या, डिस्नेच्या चित्रपटातल्या अनेक व्यक्ती याचा समावेश आहे. 'अॅडव्हेंचर लँड'मधे ज्याना धाडसाची विशेष हौस आहे, त्याना हत्ती, सिंह, वाघ, गेंडे यांनी भरलेल जगल आणि सुसरींनी भरलेल्या नद्यातून फेरी मारता येते 'टुमॉरो लँड'मधे चद्रावर सफर करता येते. 'फ्रन्टीयर लँड'मधे अमेरिकेच्या 'वाइल्ड वेस्ट' भागातील घोड्याच्या गाड्या, स्टीमबोट वगैरे पहायला मिळतात 'मेन स्ट्रीट' या भागात १८९० च्या अमेरिकेतच आपण रहातो आहोत असा भास होतो त्या काळातील इमारती, हॉटेले, मद्यालये, नृत्यालये वगैरे या भागात दिसतात एका मद्यालयात त्या काळातील नृत्य करणाऱ्या सुदरीही आहेत भुताच्या महालात स्मशानातून प्रेत वर येताना दिसतात आणि भुत आपला पाठलाग करतात असाही भास होतो. चाचेगिरीच्या काळात चाचेलोक प्रवाशाना कसे लुबाडत आणि क्रौर्यान त्यांचे खून करीत, हेही एका विभागात दिसत. 'टुमॉरो लँड'मधे भविष्यकाळात जग कसं असेल याचं कल्पनारम्य चित्रण केलेलं आहे चद्रावर सफर करायची, तर रॉकेटमधे बसल्यावर खाली पृथ्वी दूरदूर जाताना दिसते आणि काही काळानं चद्रावर आपलं रॉकेट उतरल्याचाही भास होतो 'टुमॉरो लँड'मधे एका छोट्या गाडीत बसून अणू आणि परमाणूच्या पोटातही शिरता येत. प्रकाश, रंग, ध्वनी, बाहुल्या इत्यादींचा विलक्षण चतुर उपयोग करून डिस्ने यांनी जगातील एक आश्चर्य निर्माण केल आहे. या नगरीत गेल्यावर कोणीच प्रौढ रहात नाही प्रत्येकजण लहान मुलाच्याच उत्सुकतेन आणि अधाशीपणानं सर्व काही अद्‌भुत पहातो आणि जीवनातील सर्व चिंता विसरून अगदी तल्लीन होऊन जातो.

एका साहसी सफरीत आपण लहानशा नावेत बसून जातो. तेव्हा आपला गाइड सागतो, "मी तुम्हाला घेऊन जातो आहे खरा, पण तुमच्यापैकी कितीजण जिवंत परत येतील याची मी खात्री देऊ शकत नाही. कारण या जंगलात विषारी बाण मारणारे जगली लोक आहेत, सुसरी आहेत, सिंह आहेत. ज्यानं–त्यान आपापल्या जबाबदारीवर याव" नाव थोडी पुढे जाते आणि नदीच्या किनाऱ्यावर माणसाच्या डोक्याच्या कवट्याचा एक ढीग दिसतो आपला मार्गदर्शक म्हणतो," हा ढीग म्हणजे माझा पहिला प्रवाशाचा गट" इतक्यात एक प्रचड सुसर जबडा वासून आपल्या नावेपुढं येते. आपला मार्गदर्शक हातातल पिस्तुल तिच्यावर झाडतो. ती मरून पडते. असे अनेक थरारक प्रसग या स्वप्ननगरीत रचण्यात आलेले आहेत.

लॉस एजेलिसचं आणखी एक जागतिक आकर्षण म्हणजे हॉलिवुडला भेट. आमच्या लहानपणी अमेरिकेची पहिली ओळख होत असे ती चित्रपटांनी हाणामारीचे चित्रपट हॉलिवुडकडून येत. ज्या हॉलिवुडच्या दिलचस्प कथा नंतरही अनेकवार ऐकल्या, त्या चित्र–पटनगरीला भेट देणं हे लॉस एंजेलिसला येणाऱ्या प्रवाशाचं एक लाडक कर्तव्य असत. म्हणून मी दुसऱ्या दिवशी हॉलिवुड पहायला जायच असं ठरवलं. आदल्या रात्री मी अरुण



**डिस्नेलॅंड मार्क ट्वेनच्या काळातील या अवाढव्य बोटीतून होणारा रमणीय प्रवास.**

फडणीस या इंजिनियराकडे राहिलो होतो. कुलकर्णी पतिपत्नींचे हे मित्र. त्यानी एक दिवस मला आग्रहान आपल्याकडे नेलं होत.

सकाळी सहाला मी उठलो. पण फडणीस जागे झाले नव्हते त्याच्या खोलीच्या दारावर नॉकिंग करून नि त्यांना हाक मारून जाग करण्याचा मी प्रयत्न केला पण रात्री ' हेअर ' नाटक पाहून आम्ही सर्वचजण खूप उशीरा आल्यान त्याना जाग येईना ते लवकर उठले नाहीत, तर साडेआठला हॉलिवुडच्या बस् स्टेशनपर्यंत आपण जाणार नाही आणि लॉस एंजेलिसचा एक दिवस फुकट जाईल, असं मला वाटलं या वेळी तिथली टेलिफोनची उत्तम व्यवस्था माझ्या साहाय्याला आली मी टेलिफोन ऑपरेटरला फोन करून आमचा नंबर दिला आणि सांगितल की, या फोनवर फोन करून इथं झोपलेल्या गृहस्थांना उठवा ती आश्चर्यान म्हणाली, " अहो पण तुम्ही तर उठलेलेच आहात ना ? ' मी सांगितल, " बाई, या घरात दोन फोन आहेत. एका रिसीव्हरवरून मी बोलतो आहे पण बेडरूममधे श्रीयुत फडणीस आहेत, त्याना जाग करण्यासाठी हा खटाटोप आहे. " त्यावर तिच्या लक्षात ती परिस्थिती आली आणि तिन लगेच फोन करून फडणीसाना हाक मारली



हॉलिवुडमधील चायनीज थिएटरच्या प्रांगणात रमेश मंत्री. आपल्याही पायाचा ठसा तिथल्या सिमेंट-वर उठतो की काय हे पहाण्याचा एक प्रयत्न.


हॉलिवुडला जाणारी टुरिस्ट बस् आठ वाजता ' हिल्टन हॉटेला'त येणार असं मी केलेल्या चौकशीत मला कळलं होतं फडणीसांनी विचारलं, " पण कुठल्या हिल्टन'मधे ? लॉस एंजेलिसला तीन ' हिल्टन ' हॉटेल आहेत. आता मात्र मी गडबडलो कारण मी चौकशी केली तेव्हा उत्तर देणाऱ्यान कोणत्यातरी ' हिल्टन'चं नाव घेतलं होतं खरं पण मला वाटलं होतं की, हिल्टन एकच असणार, मग आणखी तपशील कशाला हवा ? पण इथं ' बीव्हर्ली हिल्टन ' आदी तीन हिल्टन ' हॉटेलं एकाच गावात होती आणि तिन्ही हॉटेलांतलं अंतर पधरावीस मैल तरी होतं मी अंदाजानं कोणत्यातरी ' हिल्टन'चं नाव सांगितलं तेव्हा फडणीस म्हणाले, " ते तर आमच्या ऑफिसजवळच आहे मी तुम्हाला तिथं सोडतो " सकाळी आठ वाजता तिथं बस् येणार होती, म्हणून त्या वेळेपूर्वी दहा मिनिटं आधीच आम्ही तिथं पोचलो. चौकशी केली तर साडेसातलाच तिथं बस येऊन गेल्याचं कळलं म्हणजे माझ्या ऐकण्यात किंवा आठवणीत घोटाळा झाला होता आणि आता त्यात काहीही करता येणार नव्हतं. कारण आम्ही गावापासून सोळा मैल लांब होतो अर्थातच मला मग त्या हिल्टन'पासून विमानतळावर जाणाऱ्या बसनं गावात परतावं लागलं.

लॉस एंजेलिसमधे मग मी चायना टाउन, सिव्हिक सेंटर, शेतकऱ्यांचा बाजार, मेक्सिकन टाउन वगैरे विभाग एकट्यानंच भटकून पाहिले एका चित्रपटगृहात ' दि मॅन ' नावाचा सिनेमा लागलेला दिसला. त्या कादंबरीबद्दल मी खूप ऐकलं होतं, पण ती वाचली नव्हती अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष एक निग्रो झाला तर काय होईल याचं चित्रण त्या कादंबरीत होतं, म्हणून मी तिकिटाच्या खिडकीजवळ गेलो सिनेमाचं तिकिट काढणारा माणूस दिसला म्हणून त्या बाईला इतका आनंद झाला, की तिनं मला मिठी मारायचीच

काय ती शिल्लक ठेवली ! आत जातो तर दरवाज्यावर मॅनेजरन माझं 'व्ही. आय पी'-सारख स्वागत केलं डोअरकीपर तर जवळजवळ हारतुरे घेऊनच उभा होता जगात सर्वात अधिक चित्रपट तयार करणाऱ्या लॉस एंजेलिसमधे एखाद्यान सिनेमाच तिकिट काढल तर त्याचा नोबेल प्राइझ' मिळाल्यासारखा सत्कार का करतात हे मला समजेना.

मी दरवाज्याजवळ जातो न जातो तोच तो जपानी व्यवस्थापक माझ्या जवळ येऊन आदबीन शिर लववून म्हणाला, "साहेब, आपण बसा, म्हणजे मी सिनेमा सुरू करायला सांगतो" मी आत जाऊन पहातो, तर सबंध चित्रपटगृह अक्षरश रिकाम! मी एकटाच प्रेक्षक. अमेरिकेत सिनेमाच्या ठराविक वेळा नसतात तो सकाळी दहा ते रात्री बारापर्यंत चालूच असतो. आपण केव्हाही जायचं नि केव्हाही उठून जायचं मी ज्या सिनेमाला गेलो होतो तिथ एकही प्रेक्षक नसल्यान अर्थात तो सुरूच करण्यात आलेला नव्हता माझ्या मनात आलं या क्षणी थिएटरची निदान दहाबारा माणसं मला एकट्याला चित्रपट दाखवण्यासाठी उभी आहेत त्यांचा पगार, एवढं प्रचड बादशाही चित्रपटगृह उबदार ठेवण्यासाठी होणारा विजेचा खर्च कसा काय भरून निघत असेल? 'दि मॅन' चित्रपट मला पहिल्या अर्ध्या तासानतर कटाळवाणा वाटला, पण माझ्यान मधूनच उठून जाण्याच धैर्य होईना कारण माझ्या सेवेसाठी सज्ज असलेल्या त्या कर्मचाऱ्यांच्या भावनाची कदर करणं मला भाग होत

संध्याकाळी मी दमूनभागून कुलकर्णी याच्या घरी आलो, तेव्हा मला श्री माटे यांचा फोन आला होता अस कळल मला काही हे नाव आठवेना. मी त्याना फोन केला तेव्हा ते म्हणाले, "अहो तुम्ही मला लॉस एंजेलिसला येणार असं पत्र पाठवल होतत" त्याना



लायन कट्री भागातील एक दृश्य

मी पत्र पाठवलं होतं खरं; पण मी ते साफ विसरून गेलो होतो। मी म्हटलं, "माफ करा बुवा. मी विसरून गेलो" त्यावर त्यांनी सांगितलं, "शनिवारी मी तुमच्यासाठी इथल्या मराठी लोकांची सभा बोलावली आहे तेव्हा तुम्ही शनिवारची रात्र आमच्यासाठी ठेवा आणि सभा झाल्यावर आमच्याकडेच रहा." मी ते कबूल केलं. कुलकर्णी, फडणीस, माटे यांच्याशी बोलताना मला कळलं होतं की, लॉस एजेलिसला महाराष्ट्र-मंडळ नाही म्हणून मराठीभाषिकांच्या त्या समेत तिथं महाराष्ट्र-मंडळाची स्थापना करावी, असा विचार मी केला.

शनिवारी रात्री एका मोठ्या हॉलमधे ही सभा झाली चाळीसपंचेचाळीस मराठी कुटुंबं हजर होती प्रथम जेवणाचा कार्यक्रम झाला त्यासाठी तिथल्या मराठी स्त्रियांनी आपापल्या घरून रुचकर खाद्यपदार्थ करून आणलेले होते जेवणानंतर सभा झाली एखादी संस्था स्थापन केली तर कोणत्या अडचणी येतील याची उपस्थितांपैकी काहींनी कल्पना दिली त्याला मी व इतरांनी समर्पक उत्तरं दिली महाराष्ट्र-मंडळाच्या स्थापनेबद्दल सर्व बाजूंनी खेळीमेळीची चर्चा झाली महाराष्ट्र-मंडळ स्थापन करण्याचा रीतसर ठराव संमत झाला 'ॲडहॉक' समितीचीही निवड झाली महाराष्ट्र-मंडळातर्फे मराठी पुस्तकं मिळावीत म्हणून ग्रंथालय स्थापन करावं, अशी मी सूचना केली ग्रंथालयाला साहित्यिका-चंच नाव असावं आणि लॉस एजेलिसला स्थापन व्हायच्या ग्रंथालयाला 'आचार्य अत्रे ग्रंथालय' असं नाव द्यावं, असा ठराव मी मांडला, आणि तो संमत झाला.

लॉस एजेलिसच्या मुक्कामात एक दिवस मी लायन कंट्री पहायला गेलो शहरापासून तीसपस्तीस मैलांवर लॅगुना हिल्स विभागात हा फार मोठा विभाग पशूंसाठी राखून ठेवलेला आहे या लायन कंट्रीचं वैशिष्ट्य असं की, इतर पशुसंग्रहालयात पशूंना पिंजऱ्यात ठेवतात तसं इथं ठेवीत नाहीत या विभागात सिंह, वाघ, हत्ती, जिराफ, पाणघोडे वगैरे हिंस्र पशू मोकळे सोडलेले असतात, आणि त्यांना पहायला जाणाऱ्यांनी बंद मोटारीतून किंवा बंद बसमधून जायचं असतं त्यामुळं हे पशू जंगलात जसे मुक्तपणं हिंडतातफिरतात, तसे ते इथे पहायला मिळतात या पशूंना मोकळं सोडण्यापूर्वी अर्थातच शिक्षण देण्यात येतं आणि काही महिने त्यांना अलग ठेवून, मोटारीतून लोकं येण्याची सवय करावी लागते बस् या विभागातून तीन तास सावपणं चालते आणि प्रत्येक प्रकारच्या पशूजवळ उभी राहून त्याची माहिती दिली जाते जे लोक स्वतःच्या मोटारीतून स्वतंत्रपणं सफर करणार आहेत, त्यांच्यासाठी टेपरेकॉर्डर मिळतात त्या टेप्सवर सर्व विभागाचं वर्णन ऐकता येतात हत्ती, सिंह वगैरे पशू आपल्या बसच्या अगदी काचेजवळ येऊन आपल्याकडे उत्सुकतेनं पहातात तेव्हा खूपच मौज वाटते. या लायन कंट्रीवर काढलेल्या एका व्यंगचित्रात सिंहाचा छावा आपल्या आईला म्हणतो, "आई ग, या माणसांना असं बंदिस्त पिंजऱ्यात डांबून ठेवणं म्हणजे क्रूरपणाची कमाल आहे, नाही ?"

लायन कंट्रीमधे पोपटाचा फार छान खेळ पहायला मिळतो या भागात पोपट तारे-वरून सायकल चालवतात, क्रिकेट खेळतात, प्रेक्षकांच्या खांद्यावर बसून त्यांच्या गालांचे

नाजुक पाये घेतात, पत्ते खेळतात,पत्त्याचा जुगारही खेळतात, गाडी ओढतात, तोफ उडवतात, अमेरिकेच निशाण फडकवतात आणि इतर अनेक खेळ खेळतात लहान मुलाइतकाच प्रौढानाही हा भाग मनोरंजक वाटतो

लॉंग बीच विभागात 'क्वीन मेरी' ही जगप्रसिद्ध आगबोट लोकांना खुली असते अस कळलं म्हणून मी एक दिवस ती अवाढव्य बोट पहाण्यासाठी गेलो एका काळी ही जगातली सर्वात मोठी बोट होती ८१ हजार टनाची आणि एक हजार फुटांहून अधिक लांबीची ही बोट आता केवळ एक वस्तुसग्रहालय म्हणून नागरून ठेवलेली आहे प्रवासी आणि कर्मचारी मिळून तीन हजारांहून अधिक लोक या बोटीतून प्रवास करीत असत, या



डिस्नेलॅंड . शिकारी बाण मारणारे
लोक व सहल करणारे प्रवासी.

बोटीत उत्तम उपाहारगृह, मद्यपानगृह, मत्स्यालय वगैरे पहायला मिळतात. बोटीच्या पोटात जाऊन आतली यंत्रसामग्रीही दाखवली जाते

आता राहिलं होत हॉलिवुड ते तर पाहिलच पाहिजे अस होत या हॉलिवुडचा इतिहास असा की, 'काउट ऑफ मॉटे क्रिस्टो ' नावाच्या चित्रपटाच १९०८ साली शिकागो येथे चित्रीकरण सुरू झाल पण लॉस एंजेलिसच उत्तम हवामान, भरपूर मोकळी जागा, समुद्रकिनारा आणि कामगारवर्ग सहज मिळण्यासारखी स्थिती, यामुळ हा चित्रपट तयार करण्याचं काम पुढ लॉस एजेलिसमधे सध्याच्या हॉलिवुड या विभागात नेण्यात आल ही जागा चित्रपट–निर्मात्याना इतकी लाभदायक ठरली, की एक वर्षात पधरा कंपन्या तिथं निघाल्या १९१४ साली सेसिल बी डीमिल आणि सॅम्युअल गोल्डविन यानी तिथ चित्रपटनिर्मिती सुरू केली मग चार्ली चॅप्लिन, डग्लस फेअरबँक्स, हॅरोल्ड लॉइड, ग्रिफिथ, ग्रेटा गार्बो, रूडॉल्फ व्हॅलेंटिनो अशा जागतिक कीर्तीचे दिग्दर्शक, नट, नटया यानी हॉलिवुड गजबजून गेलं. 'युनिव्हर्सल ', ' मेट्रो गोल्डविन मेयर ', ' ट्वेंटिएथ सेंचरी फॉक्स , ' वॉर्नर ब्रदर्स ', ' कोलबिया अशा आतरराष्ट्रीय चित्रपट कपन्यानी चित्रपट–उत्पादन आणि गुण–वत्ता याचे जागतिक विक्रम याच हॉलिवुडमधे केले गेल्या पधरावीस वर्षांत मात्र दूरचित्र–वाणीच्या आक्रमणामुळ हॉलिवुडची अधिसत्ता बरीच कमी झाली अनेक स्टुडिओ बंद झाले, आणि इतरानी चित्रपटगृहासाठी चित्रपटाची निर्मिती करण्याऐवजी दूरचित्रवाणी–साठी निर्मिती करण्यावर भर दिला अमेरिकेत दर आठवडयाला चाळीस चित्रपट दूर–चित्रवाणीवर दाखवण्यात येतात, यावरून चित्रपटगृहाचा ऱ्हास का झाला हे सहजच समजून येत

हॉलिवुडची सफर हा फार सुखद आणि आठवणीत रहाण्यासारखा अनुभव होता युनिव्हर्सल स्टुडिओ'च्या आवारात प्रवाशाचं स्वागत झाल, आणि चित्रपटसृष्टीच्या या जागतिक राजधानीत चित्रपटांची निर्मिती कशी होते याची प्रात्यक्षिकासह माहिती आम्हाला देण्यात आली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी याच्या जीवनावर ' पी टी –– नाइन ' या नावाचा एक चित्रपट काढण्यात आला होता. त्या चित्रपटात, वादळी समुद्रात केनेडी यानी आपली नाव कशी हाकारली हा भाग आम्हाला दाखवण्यात आला मग या दृश्याच चित्रीकरण कस करण्यात आलं याच प्रात्यक्षिक दाखवलं गेलं प्रेक्षकातून एक पुरुष आणि एक स्त्री याना निमत्रण देण्यात आल प्रथम एक सुदर तरुणी काम करायला तयार झाली. मग एक पुरुषही आला त्या दोघाना नावेसारख्या दिसणाऱ्या एका लाकडी प्लॅटफॉर्मवर उभ करण्यात आलं त्या नावेमाग चित्रपटाचा पडदा होता त्या पडद्यावर समुद्राच्या प्रचंड लाटांचा चित्रपट दाखवण्यात येत होता, आणि स्प्रिंगच्या साहाय्यान पुढची नाव हलवण्यात येत होती या शिकाऊ नायक–नायिकानी आपली नाव भयकर धोक्यात असल्याचा अभिनय केला मग आमच्यासमोर या दृश्याच चित्रीकरण करून लगेच चित्रपट दाखवला गेला तेव्हा वास्तविक त्या पडद्यावरच्या लाटा होत्या तरी खरोखरच दोघजण खवळलेल्या समुद्रातून प्रवास करीत आहेत अस दिसलं. शेवटी आमच्या मार्गदर्शिकेनं सुचवल्याप्रमाणं प्रेक्षकांतल्या

त्या तरुणीनं नायकाला चुंबन घेऊ दिलं, तेव्हा इतर अनेकांना त्या कामासाठी आपण तरी जायला हवं होतं असं वाटलं

'युनिव्हर्सल' स्टुडिओच्या पधरावीस एकराच्या विस्तीर्ण जागेत अनेक दृश्य उभारण्यात आली होती अमेरिकेच्या 'वेस्टर्न' चित्रपटातल्यासारखं एक दृश्य होतं आणि घोड्यावरून होणाऱ्या हाणामारीच्या दृश्याचं तिथं चित्रीकरण केलं जात होतं एका विभागात इजिप्तमधलं एक खेडं तयार करण्यात आलं होतं. ओबडधोबड गावातल्या गुत्यात मारामारी कशी होते याचं एक प्रात्यक्षिक आम्हाला दाखवण्यात आलं त्यात दोन लोकांची जंगी फाइट दाखवली आणि मग तिसरा माणूस हातात सुरा घेऊन एकाच्या पाठीत खुपसणार, तोच आणखी एकजण येऊन त्याच्या डोकीत दारूची बाटली फोडतो आणि तो सुरा घेतलेला माणूस बेशुद्ध पडतो, हे दृश्य दाखवलं. आणखी एका ठिकाणी, जळत्या घरातून तिसऱ्या मजल्यावरून एका स्टंटमॅननं उडी मारलेली दाखवली

आमचा प्रेक्षकांचा जथा एका विभागातून छोट्या आगगाडीतून चालला होता. खेड्याचं दृश्य अगदी हुबेहुब मांडलेलं होतं आमची गाइड म्हणाली, " आता या खेड्यावर मी पाऊस पाडून दाखवते तिनं एक बटन दाबलं — आणि चमत्कार म्हणजे मुसळधार पाऊस पडू लागला! आम्ही मात्र त्या दृश्याबाहेर असल्यानं कोरडे ठणठणीत राहिलो होतो. थोड्याच वेळात त्या चित्रनगरीतल्या खेड्यातले रस्ते पाण्यानं तुडुंब भरून वाहू लागले पुन्हा बटन दाबल्यावर पाऊस थांबला आमच्या गाइडनं सांगितलं की, अशा पावसाच्या दृश्यासाठी उंच झाडांवर पाण्याची कारंजी ठेवली जातात आणि त्यामुळं पाऊस पडल्याचा बरोबर भास होतो

'युनिव्हर्सल' स्टुडिओमधे असे अनेक चमत्कार पाहिल्यावर आम्हाला नट-नट्यांची प्रसाधनगृह दाखवण्यात आली तसंच हॉलिवुडमधे चित्रपटासाठी मेकअप कसा करतात याचीही प्रात्यक्षिकं दिसली. वृद्धांना तरुण आणि तरुणांना वृद्ध कसं करता येतं हे आमच्यासमोर तसं करून दाखवलं गेलं. त्यानंतर हॉलिवुडमधे रहाणाऱ्या अनेक नामवंत चित्रतारका आणि तारे यांची घरं — अर्थात बाहेरूनच — दाखवण्यात आली मग आम्ही शहरातून फेरफटका मारला शहरात सर्वांत महत्त्वाचं स्थळ म्हणजे 'चायनीज थिएटर'. या ठिकाणी हॉलिवुडमधे तयार झालेल्या सर्व महत्त्वाच्या चित्रपटांचे पहिले खेळ होतात त्याचा आकार चिनी पॅगोडासारखा आहे चित्रपटाच्या प्रीमियरच्या वेळी नायक-नायिकांनी इथल्या पटांगणात ओल्या सीमेंटमधे स्वाक्षरी करायची अशी प्रथा असल्यानं ग्रेटा गार्बो, चार्ली चॅप्लिन, एलिझाबेथ टेलर, मार्लन ब्रँडो, रिचर्ड बर्टन, बेटी ग्रेबल, मेरिलिन मन्रो अशा अनेक नामवंतांच्या सीमेंटमधल्या सह्या, हातांचे पंजे, पायाचे छाप या ठिकाणी पहायला मिळतात. 'सन्सेट बुलेवार्ड' हा हॉलिवुडमधला विशेष ख्यातनाम रस्ता अत्यंत मनोहर आहे या रस्त्यावर जगप्रसिद्ध सतारवादक रविशंकर यांचं घर मी पाहिलं 'सन्सेट बुलेवार्ड'वर फ्रेंच, इटालियन, स्कँडिनेव्हियन अशा अनेक देशांची उंची उपाहारगृहं आहेत. हॉलिवुडमधल्या नट-नट्यांची ही भेटण्याची केंद्रं आहेत.

लॉस एंजेलिसच्या मुक्कामात शेवटच्या रात्री कोजागिरी होती अंजलीचा उत्साह कोजागिरीच्या दुधापेक्षाही उतू जात होता तिने रवींद्रला, मला आणि तिच्या मुलाला पाटावर बसवलं — अरे खरंच ! तिथं पाट नाही, पण गालिच्यावर असावं — आणि ओवाळलं मग आम्ही सर्वजण टिपूर चांदण्यात समुद्रकिनारी गेलो खूप भटकलो, गप्पा मारल्या घरी येऊन भांड्यातल्या दुधात चंद्र पाहिला आणि गरम दूध पिऊन कोजागिरी साजरी केली

दुसऱ्या दिवशी सकाळी साडेआठला रवींद्रचं ऑफिस होतं आणि आठ–चाळीसला माझं सॅन् फ्रॅन्सिस्कोचं विमान होतं सकाळी आठ वाजता मी निघालो रवींद्रबरोबर मोटारीत बसणार, तोच अंजलीला आठवण झाली. ती म्हणाली, "अहो, मंत्रींचा फोटो घ्यायचा राहिलाच. मी कॅमेरा आणते फोटो काढू या." मी पाचसहा दिवस तिथं होतो; पण फोटो काढण्याची कल्पना आमच्यापैकी कुणालाच सुचली नाही हे खरं मला विमान चुकण्याची भीती होती. कारण आठ–चाळीसनंतर दुपारी अडीचला विमान होतं, आणि सॅन् फ्रॅन्सिस्कोचे प्रभाकर आपटे आणि सौ. कुंदा आपटे सकाळी सव्वादहाला मला उतरून घेण्यासाठी विमानतळावर येणार होते. मग घाईघाईतच रवींद्र, अंजली आणि मी यांनी एकमेकांचे फोटो काढले कॅमेरा पोलॅरॉइड असल्यामुळे ताबडतोब दीडदीड मिनिटात फोटोही मिळाले, आणि सव्वाआठ वाजता आम्ही निघालो. मला चटकन तिकिटही मिळालं आणि विमान सुटण्यापूर्वी पाच मिनिटं मी विमानात शिरलो. कॅलिफोर्नियातील सुखद दिवसांची आठवण घोळवीत पुढल्या मुक्कामाकडे निघालो.

# सा रम्या नगरी —
# अखंड जत्रेचं गाव

७ सॅन् फॅन्सिस्को जादू–ई–नगरी पॅरिसच्या खालोखाल मला या शहराच आकर्षण होतं. या शहराला दुसरं पॅरिस म्हणतातच मुळी. लॉस एंजेलिस ते सॅन् फॅन्सिस्को हा विमानाचा प्रवास फक्त एका तासाचाच आहे पण तोही मी अधीरतेनंच केला. त्या शानदार विमानतळावर सराईत पाखरा-सारखं विमान उतरलं.त्यापूर्वीच मी विमानाच्या खिडकीतून सॅन् फॅन्सिस्कोच दर्शन घेतलं प्रिय व्यक्तीला आधी ताटातल्या तुपात पहाव तस

विमानतळावर प्रभाकर आपटे आणि सौ. कुंदा आपटे ही दोघं मला उतरून घेण्यासाठी आली होती त्याचीमाझी पूर्वीची ओळख नव्हती आणि आम्ही एकमेकाना पाहिलंही नव्हतं पण लेखक म्हणून माझी जी काही थोडी पुण्याई होती ती मला या वेळी उपयोगी पडली. आपटे पतिपत्नीं-बरोबर मोटारीतून जाताजाताच त्या रम्य नगरीच धावत स्वरूप दिसल ही एक खानदानी नगरी आहे लग्नसमारंभात जशी एखादी इनामदारीण किंवा संस्थानिक राणी भारदस्तपणं सौंदर्याची पखरण करीत संचार करते, तशी ही नगरी मला वाटली. पॅरिसच्या सँ एलिझा या रस्त्यावरच ही उच्च रहाणी आणि उच्च सौंदर्यसरणी दिसते. फिस्कोमधे मात्र ती जवळजवळ सर्वत्रच दिसते

आपटे याच्या घरी गेलो योगायोग असा की, त्या दिवशी सुटी होती आणि त्याच्या घरी 'लग्नाची बेडी' या नाटकाची तालीम चालली होती दलाल, मुळे वगैरे पतिपत्नीही तालमीसाठी आलेली होती तालमी जोरात सुरू झाल्या. आपटेकुटुंबही नाटकात काम करीत होतं. प्रत्येकजण नोकरी

करून फावल्या वेळात नाटकात काम करीत होता त्यामुळं भाषण पाठ करायला त्याना वेळ मिळण कठिणच होत. अर्थात सवाद अस्खलितपण येत नव्हते. म्हणून भाझं मत विचारल्यावर मी सुचवल, " खूप नाटकांत भाषणं पाठ नसतात तुम्ही एखादा प्रॉम्प्टर पडद्याआड ठेवलात, की काम होईल " त्यावर कुंदा आपटे म्हणाल्या, " आम्हाला सवाद नाही आठवले तरी चालेल. पण आम्ही प्रॉम्प्टर ठेवणार नाही कारण एक प्रॉम्प्टर पडद्याआड गेला की आमचा एक प्रेक्षक कमी होईल ना ! सॅन् फ्रॅन्सिस्कोत इतके कमी मराठी लोक आहेत, की एकही प्रेक्षक गमावणं आम्हाला परवडणार नाही ! "


परदेशात नाटक बसवायचं तर अशा अनेक तडजोडी कराव्या लागतात. सॅन् फ्रॅन्सिस्कोच्या मंडळींनी त्यासाठीच ' लग्नाची बेडी ' हे सबंध नाटक न करता फक्त पहिला अंकच करायचा ठरवल होतं ! आपल्या घरापासून दहाबारा हजार मैल लाब असलेल्या या मराठी माणसांच वेड खरोखर कौतुकास्पद होत तालमीला जागा नाही, शनिवार–रविवारच्या सुट्याना विश्रांती न घेता तालमी कुणाच्या तरी घरी आलटूनपालटून करायच्या, कुठलातरी हॉल नाटकासाठी घ्यायचा, आणि त्या वेळीही चाळीसपन्नास प्रेक्षक आले तरी डोक्यावरून पाणी गेल ! अशा प्रतिकूल परिस्थितीतही ते लोक हौसेन नाटक बसवीत होते न्यूयॉर्क, फिलाडेल्फिया, टोरंटो इथ मराठी लोकाची सख्या तरी भरपूर आहे पण सॅन् फ्रॅन्सिस्कोत सगळी मराठी कुटुब पन्नासच्या आसपास असतील म्हणजे शेसव्वाशे माणस त्यापैकी तीसचाळीस टक्के लोकानाच नाटक पहायला येणं जमत

तालमी झाल्यावर सध्याकाळी आपटेकुटुबान मला गावातल्या सहलीला नेल. नाइट क्लब्स आणि ब्ल्यू फिल्म्स यानी भरलेल्या ' ब्रॉडवे ' रस्त्यावरून रपेट केली बंदराजवळच्या भागात गजबजलेल्या वस्तीतून आम्ही गेलो गोल्डन गेट ब्रिजवर लागलेली दिवाळी पाहिली आणि मग गावातल्या उच टेकडीवर गेलो या टेकड्याना ' ट्विन पीक्स ' अस नाव आहे या टेकड्यावरून दिसणार रात्रीच सॅन् फ्रॅन्सिस्को अविस्मरणीय आहे. लक्ष दिव्यांची पखरण झाली होती त्या स्थिर दिव्याबरोबर जहाजांचे हळुवारपणे हलणारे दिवे, समोरून येणाऱ्या मोटारींचे द्रुतगतीचे दिवे आणि दूरवर जाणाऱ्या मोटारींचे मागचे धावणारे लाल दिवे यांनी एक मनोहर कॅलिडिओस्कोप तयार केला होता त्या सौंदर्यनगरीचा तो विजेरी थाट वरातीतल्या सीमतिनींच्या डौलासारखा रास्त गर्वाचा वाटत होता त्याची भरपूर मौज अनुभवून आम्ही घरी परतलो

दुसऱ्या दिवशी सकाळी मला फोन आला आहे अस सौ आपट्यानी सागितलं, तेव्हा मला कुणाचा फोन असेल याचा अंदाज येईना कारण सबध गावात माझ्या ओळखीच दुसर कुणीच नव्हत. मी फोन घेतला, तेव्हा ' मी अण्णा बोलतो आहे " असा सी रामचद्राचा परिचित आवाज ऐकला आणि मला अतिशय आनद झाला. ते आणि त्याचे एक मित्र सॅन फ्रॅन्सिस्कोच्या एका हॉटेलमधे उतरले होते आणि त्यानी मला त्या दिवशी सध्याकाळी श्री. मुळ्ये याच्याकडे जेवायला बोलावल होत आपटे पतिपत्नींबरोबर तिकडे यायच मी कबूल केल त्या सकाळचा आमचा कार्यक्रम सॅन फ्रॅन्सिस्कोच प्राणिसग्रहालय

पहायचा होता आपटे हे फार उमदे आणि हौशी मित्र आहेत. त्याना जंगलात, वनात, उद्यानात फिरणं, तिथ तंबू ठोकून दोनचार दिवस मुक्काम करणं, प्राणिसंग्रहालयाला भेटी देण फार आवडतं त्याच्याबरोबर मी प्राणिसंग्रहालयात गेलो आम्ही दोघानी आइस्क्रीम कँडी खात, फोटो काढीत दुपारपर्यंतचा वेळ अगदी मस्त मजेत काढला सिंह, हत्ती, झेब्रा, अस्वल हे सारे प्राणी आम्ही राणीच्या बागेतल्या मुलांच्या उत्सुकतेनं पाहिले

आपट्याना तिथल्या प्राण्याची बारीकसारीक माहिती होती हे पाहून मी चकित झालो हत्ती किती आहेत, त्यात पिल्ल किती आहेत, नवा वाघ केव्हा आणला, अस्वलीण मेल्यापासून तिथला एकाकी अस्वल कसा उदास असतो, सीलच्या खाण्याच्या वेळा कोणत्या आणि तेव्हा ते खेळ कसा करून दाखवतात, पेटिंग झूमधे जाण्यात काय गमत असते, पोपटाच्या नव्या जातीत कोणती भर पडली आहे, हा सगळा तपशील त्या प्राणिसग्रहालयाच्या क्युरेटरपेक्षा आपट्याना अधिक माहीत असावा पेटिंग झूमधे लहान मुलाना — आणि



रम्य नगरी सॅन फ्रॅन्सिस्को. लोकाना समुद्रात मोटारी नेता याव्यात म्हणून नगरपालिकेने हा एकोणीसशे फुटांचा सुंदर रस्ता आतपर्यंत नेला आहे.

प्रौढांनाही — आत सोडल जात. या झूमधे ससे, हरण, बकरीची पिल्ल किंवा शेरड, कुत्रे, बदकं, मांजर असे निरुपद्रवी प्राणी ठेवले जातात आत जाऊन या प्राण्यांना जवळ घ्यायच, कुरवाळायच, त्याना खाऊ घालायच आणि त्याच्या मऊ स्पर्शाची मौज अनुभवायची मुल तर तासन तास या पेटिंग झूमधे रमतात

तिथून आम्ही जपानी टी गार्डनमधे गेलो. हे तर नंदनवनच आहे सुदर छोटे जपानी वृक्ष, फळं, फुलं आणि त्यात असलेल जपानी चहा–घर. या चहा–घरात जपानी पद्धतीचा चहा मिळतो. जवळच गुलाबाची बाग आहे. तिथ पन्नाससाठ प्रकारचे गुलाब. त्याच्या जाती, त्यांचे सुवास याची प्रभाकर आपटे यांना बित्तबातमी होती गुलाबाच्या बागेतून आम्ही 'पॅलेस ऑफ फाइन आर्टस्' या कलावस्तुसग्रहालयात गेलो आणि चित्रकला, शिल्पकला इत्यादींचे उत्कृष्ट नमुने मनमुराद पाहिले आता दुपारचे दीडदोन वाजले होते, आणि कोणत्याही इतर कलेपेक्षा आम्हाला त्या वेळी पाककला अधिक प्रिय होती आपटे म्हणाले, " आता आपण 'फिशर्मन्स व्हार्फ'ला जाऊन काहीतरी खाऊ."

'फिशर्मन्स व्हार्फ' ही सॅन फ्रॅन्सिस्कोची अमोल भेट आहे या ठिकाणी सागरी अन्नाचे इतके प्रकार मिळतात, की अलम दुनियेत त्याला तोड नाही एखाद्या जागतिक जत्रेसारखा हा भाग दिवसाचे चौदा ते सोळा तास फुललेला असतो त्याच्या टेलर रस्त्यावर आणि आसपास बीअर, व्हिस्की, ब्रँडी वगैरेंचे उत्कृष्ट आणि स्वस्त बार आहेत आणि त्या बारमधे किंवा फूटपाथवर असलेल्या हजारभर छोट्या दुकानात कोणत्याही प्रकारचं सागरी अन्न अगदी ताज्यातलं ताजं मिळतं बऱ्याच दुकानात पाण्यात जिवंत मासे असतात. आपल्या आवडीचा मासा निवडायचा आणि तो तुमच्या डोळ्यादेखत बाहेर काढून हवा तसा दहा मिनिटात पकवून दिला जातो.

या व्हार्फवर मी अगदी छोटी जिवत कासवं पाहिली. ही कासव आकारान सातआठ वर्षांच्या मुलाच्या तळहाताएवढी असतात आणि घरी पाळण्यासाठी ती विकली जातात तिथं पैसे भरले की जगात कुठेही विमानान ही कासव पाठवण्याची व्यवस्था केली जाते हिरवट रगाची ती छोटी कासव फारच सुदर दिसतात

'फिशर्मन्स व्हार्फ'पासून असख्य नावा निघतात आणि परत येतात सॅन् फ्रॅन्सिस्कोच्या किनाऱ्याजवळून या नावांतून सफर करता येते स्वतःच चालवायच्या छोट्या यात्रिक नावाही भाड्यान घेता येतात या नावातून फिरणारी असख्य जोडपी माशासारखी पाण्यातून सळसळत जात होती त्यांचा अवखळ उत्साह इतका ससर्गजन्य होता, की ते दृश्य पाहून इतिहासातल्या नाना फडणीसांचं चित्रसुद्धा खळाळून हसल असत! सॅन् फ्रॅन्सिस्कोच्या किनाऱ्यावर दर वर्षी १४ ऑक्टोबरला कोलबस–जयतीला एक नागरिक कोलबससारखा पोषाख करून सहकाऱ्यांसह एका नावेतून उतरतो, तो समारभही मोठा वेधक असतो

'फिशर्मन्स व्हार्फ'जवळच टेलर रस्ता ओलाडला, की 'ब्रॉडवे' रस्त्यावर नाइट क्लब्स खच्चून भरलेले आहेत आदल्या दिवशी आपट्याच्याबरोबर त्या भागात वरवर चक्कर टाकली होती. पण नाइट क्लबमधे शिरण्याच धाडस झाल नव्हत मात्र दुसऱ्या




सॅन फ्रान्सिस्को येथील मासळीबाजार

दिवशी अण्णासाहेब बरोबर असल्यामुळे तसा काही संकोच धरण्याचं कारण उरलं नव्हतं आम्ही त्या भागात गेलो तेव्हा वास्तविक दुपारच होती पण हे 'नाइट' क्लब चालूच होते सकाळी अकरापासून पहाटेपर्यंत ते चालूच असतात आम्ही दोनतीन क्लबात गेलो सुंदर तरुण पोरी अंगावरचे सगळे कपडे हळूहळू दूर करीत होत्या आणि संगीताच्या तालावर नृत्य करीत होत्या अशा क्लबात प्रवेश फी नसते, पण मद्य किंवा इतर पेय घेणं सक्तीचं असतं त्याला तीन डॉलर्स पडतात बारमधे साठ सेंटला मिळणारा व्हिस्कीचा पेग इथं तीन डॉलर्सला मिळतो आणि तोही भेसळीचा असतो म्हणून बीअर ही अधिक विश्वसनीय

आम्ही दिवसाच रात्रीच्या क्लबाची मौजमजा पाहून बाहेर पडलो सॅन् फॅन्सिस्कोच्या केबल कारचा अनुभव अजून घ्यायचा होता आपल्याकडे मुंबईला पूर्वी ट्रॅम्स होत्या तशाच प्रकारच्या या केबल कार्स आहेत पण याची मुख्य तार जमिनीखाली असते ती अखंड फिरत असते वरून जाणारी केबल कार सुरू करताना त्या कारने चिमट्याने ती धावणारी तार पकडायची आणि थांबायचं असेल तेव्हा तार सोडून ब्रेक लावायचा रस्त्यावर उभं राहिलं की जमिनीखालून धावणारी अर्ध्यापाऊण इंच जाडीची ती तार दिसू शकते

आता आमची सॅन् फॅन्सिस्कोच्या आसपासची नावेची सफरच काय ती राहिली होती तीही आम्ही केली. तीनचारशे लोक जाऊ शकतील एवढ्या मोठ्या यान्त्रिक नावेतून आम्ही निघालो मायक्रोफोनमधून येणारा गाइडचा आवाज माहिती देत होता " हा जुना

तुरुंग ऐन समुद्रात उंच खडकावर बांधलेल्या या तुरुंगातून पळून जाण्याचा धाडसी प्रयत्न अनेक कैद्यांनी केला पण त्यांची प्रेतं किनाऱ्याला लागली आतापर्यंत फक्त एकच तरुण जिवंतपणे किनाऱ्याला लागला आहे हा बे ब्रिज — जगातला सर्वांत लांब पूल यावरून दर वर्षी शेसव्वाशे लोक आत्महत्या करतात तो हिरवा ठिपका दिसतो, ते युकॅलिप्टस् ( निलगिरी ) झाडांचं बन हा गोल्डन गेट पूल याचा इतिहास विलक्षण आहे १९२८ साली जोसेफ स्ट्रॉस यान या पुलाची कल्पना मांडली, तेव्हा लोकांनी त्याला वेड्यात काढलं. कारण ज्या तारांवर हा पूल आधारला जाणार होता, त्यांना सहा कोटी तीस लक्ष पौंडाचा दाब सहन करावा लागणार होता समुद्रात दोनशे फूट खाली खणून पुलाचा पाया बसवायचा, आणि पूल तयार झाल्यावर उन्हाळ्यात उष्णतेमुळं पोलाद प्रसरण पावून पुलाची लांबी सोळा फूट वाढेल आणि तो तेवढा खाली लोंबेल अशी स्ट्रॉसनं आखणी केली होती लोक म्हणत, ' हा माणूस खराचा खेळण्यातला पूल बांधणार आहे की काय ?' पण ही सबंध योजना स्ट्रॉसनं तयार केली. आणि बँक ऑफ अमेरिकानं कोट्यवधी डॉलर्सचं कर्ज देऊन १९३७ मध्ये हा गोल्डन गेट पूल सुरू झाला "

अशी पाण्यातल्या सय सफरीबरोबरच गतकाळातली सफरही होत होती. मधूनच सीगल पक्षी बोटीच्या डेकवर येत आणि लोकांनी त्यांच्यासाठी हवेत उडवलेले शेंगदाणे हवेतल्या हवेत अचूक टिपून घेत अशी पक्ष्यांची, निसर्गाची, पशूंची, पाण्याची, माणसांची, उंची मद्याची, रुचकर अन्नाची मौज सॅन् फॅन्सिस्कोमधे लुटतालुटता माणूस सुखानं दमून जातो.

' पॅलेस ऑफ द लीजियन ऑफ ऑनर'मधे सुरुवातीलाच जोन ऑफ आर्कचा पुतळा आहे आणि ऑगस्ट रोदाँ यानी तयार केलेला जगप्रसिद्ध ' थिंकर ' हा पुतळाही आहे फ्रेंच व इटालियन कलेचे उत्कृष्ट नमुने इथं आणि ' पॅलेस ऑफ फाइन आर्टस्'मधे आहेत

अमेरिकेत सर्वच मोठ्या शहरांत चायना टाउन्स ' आहेत पण त्यांत अस्सल आहे ते सॅन् फॅन्सिस्कोचं तिथं रस्त्यावर उभं राहून लालबाग—परळसारख्या गर्दीत उभं राहून हातगाडीवरचं चिनी अन्न खाण्याची मौज काही वेगळीच अशा अनेक प्रकारच्या गमती—जमतींत सॅन् फ्रॅन्सिस्कोचे सोनेरी दिवस काही क्षणासारखे भुर्रदिशी उडून गेले. सॅन् फ्रॅन्सिस्को हे अखंड जत्रेचं गाव आहे यात शंका नाही या गावाहून निघताना सी. रामचंद्र यांनी मला एक बाहुली दिली जिम्मी नावाच्या त्यांच्या मुंबईतील एका पारशी मित्रानं ती त्यांच्याजवळ दिली होती आणि मायामीला असलेल्या आर्थर शिग्ली नावाच्या अमेरिकनाला ती द्यायची होती सी रामचंद्र मायामीला जाणार नव्हते म्हणून त्यांनी माझ्याकडे ती बाहुली दिली होती वारा आल्याबरोबर मान हलवणारी आणि कंबर लचकवणारी दक्षिण—भारतीय पद्धतीची ती बाहुली होती.

सॅन् फ्रॅन्सिस्कोचा निरोप जड अंत:करणानं घेऊन मी ' ह्यूजेस एअरवेस्ट ' कंपनीच्या विमानानं निघालो. मायामीला थेट जावं असा प्रथम विचार होता. पण अंजली कुलकर्णीनं सांगितलं होतं की, ' न्यू ऑर्लिन्स फार छान आहे, पहाच ' म्हणून सॅन् फ्रॅन्सिस्कोच्या

तळावर मी न्यू ऑर्लिन्सचं तिकिट घेतलं पण ते थेट नव्हतं प्रथम फोनिक्सला जायचं, तिथं विमान बदलून डलासला जायचं, आणि तिथून पुन्हा विमान बदलून न्यू ऑर्लिन्सला जायचं, अशी ही बिकट वाट होती. पण आता मला अमेरिकन विमानांचा भरपूर सराव झालेला होता म्हणून मला या वाकड्यातिकड्या वाटेची चिंता वाटली नाही 'ह्यूजेस एअरवेस्ट' विमानात शिरल्याबरोबर पिवळ्या स्कर्टमधल्या हवाई-सुंदरीनं एक फॉर्म मला दिला विमानात फक्त दहाबाराच उतारू होते विमान सुरू झाल्यावर मी तो फॉर्म पाहिला 'तुम्हाला ही सर्व्हिस कशी वाटली? तिकिट लगेच मिळालं काय? हवाईसुंदरी सौजन्यानं वागली काय? 'तुम्हाला इतर काही अडचण आली काय? तुम्ही काही सुधारणा सुचवू शकता काय?' असे अनेक प्रश्न त्या फॉर्ममधे होते मी त्या फॉर्मचा अभ्यास करीत असतानाच एक गोड, तरुण हवाईसुंदरी माझ्या जवळ ब्रेकफास्ट घेऊन आली आणि म्हणाली, 'आपली न्याहरी झाली की मी तुम्हाला फॉर्म भरायला मदत करीन " अर्थातच मी भराभर न्याहरी आटोपली याचं कारण असं की, अमेरिकेतल्या काही विमान कंपन्यातील हवाईसुंदरींच्या बरोबर मर्यादित आणि सौम्य रोमान्स केला तरी चालतो, आणि 'ह्यूजेस एअरवेस्ट' ही त्यांपैकी एक कंपनी आहे, अशी 'टिप' मला माझ्या एका जुन्या आणि जाणत्या मित्रानं दिली होती

"माझं नाव क्लेअर." ती सुंदरी माझ्या जवळच्या जागेवर बसून म्हणाली, "आणि



सॅन् फ्रॅन्सिस्कोच्या किनाऱ्यावर उन्हात वनभोजनाला गेलेले एक कुटुंब

आपलं काहीतरी अवघड भारतीय नाव आहे हे मी पॅसेंजर लिस्टवरून पाहिलं माझ्या उच्चारात चूक झाली तर तुम्ही मला हसाल, म्हणून मी नुसत सर म्हणते "

" चालेल, चालेल नावात काय आहे ?" वगैरे नम्रता मी दाखवली तिच्या अर्धवट झाकलेल्या व अर्धवट उघड्या अशा पुष्ट उरोजाकडे पहाण हे मला अवघड होत होतं कारण ती माझ्या शेजारी बसली होती समोर बसली असती तर हे कार्य सुलभ झाल असत

" आता फॉर्म " ती सौम्य हसून म्हणाली

' छान आहे ना तुमचा फॉर्म ' — तिच्या रसरशीत शरीराकडे पाहून मी म्हणणार होतो. पण ती विमान कंपनीसाठी भरायच्या फॉर्मविषयी बोलते आहे, हे लगेच माझ्या लक्षात आल आणि मी माझ ' नावरिता नावरेना अस माझ अचपळ मन आवरल त्या फॉर्मवर इतके किचकट प्रश्न होते पण माझ्या मनातला प्रश्न मात्र त्यावर नव्हता तो प्रश्न म्हणजे, ' तुझ्याशी नर्म प्रणय करण्याची परवानगी असते, ही अफवा खरी आहे काय ?'

ती मला अगदी रेलून बसली होती आणि तिचे उघडे बाहू मला ढुश्या देत होते मी समोरच्या कागदावर नजर फिरवण्याचा प्रयत्न करीत होतो बुकिंग, व्यवस्था, खाद्यपेय वगैरेंबाबत मी ' उत्कृष्ट फारच छान ' अशा खुणा केल्या हवाईसुंदरीचा कॉलम आला, तेव्हा (मनात) म्हटल, ' आता ये पोरी अशी रगणात ! ' तिन माझ्याकडे मिस्किल नजर टाकीत लाघवी भाषेत विचारल, " मी तुम्हाला सहकार्य देते आहे ना ?"


मला एकदम केळकर आठवले मी छद्मीपणान म्हटल, " म्हटलं तर देतेस, म्हटल तर नाही. " (याच नक्की भाषांतर मी कस केलं असेल याची भाषाशिष्यवराना चिंता असेल तर मी सागतो मी म्हटल, " It depends on what you mean by cooperation. " )

त्यावर ती हसून विचारती झाली, " म्हणजे तुम्हाला कोणत्या कामात माझं सहकार्य अपेक्षित आहे ? ' या सरळ प्रश्नानं मात्र माझीच पचाईत केली. ती बोलण्या-चालण्यात तशी चतुर असावी यात काहीच आश्चर्य नाही माझ्यासारखे शेकडो प्रवासी तिला आपल्या कामात भेटत असणार. मी चाचरत ' त्याच काय आहे . म्हणजे मी ऐकल होत ' अस अस्पष्ट बोलू लागलो, तेव्हा तिन माझी अडचण ओळखून म्हटल, " ओ, आय सी ! अबाउट दॅट माइल्ड फ्लर्टिंग. वेल, यू कॅन, इफ यू कॉल होल्डिंग माय हॅंड फ्लर्टिंग. ' ( ' हा हां ! प्रणय म्हणता होय ? ठीक आहे. माझा हात हातात घेण हे तुम्हाला फ्लर्टिंग वाटत असेल तर माझी हरकत नाही " )

मी म्हटल, चला ! हात तर हात ! विमान चालू असताना ' न्यूयॉर्क टाइम्स ' उघडून पोलिसानी चरस–गाज्यासाठी कुठकुठ छापे घातले हे वाचण्यापेक्षा एका तरुण सुदरीचा लुसलुशीत हात हातात घेतलेला बरा ! तिन अर्धापाऊण तास छान गप्पा मारल्या दोन वर्षांत नोकरी सोडून आपल्या प्रियकराबरोबर लग्न करणार असल्याची बातमी

चाणाक्षपणं माझ्या कानावर घातली भारतात सतत पडणाऱ्या दुष्काळाबद्दल सहानुभूती व्यक्त केली फोनिक्सहून दुपारी चारच्या विमानान आपण अल्बुकर्कला जाणार असल्याचं सांगितल, आणि माझा पुढील प्रवास सुखाचा जावो अशी शुभेच्छा व्यक्त करून विमान कंपनीचा फॉर्म आणि आपला हात माझ्याकडून घेऊन ती लंच करण्यासाठी पडद्याआड गेली

दुपारी दोन वाजता फोनिक्सला उतरलो सहा वाजता 'टेक्सस इंटरनॅशनल'च्या विमानान डलासला मी नऊ–चाळीसला पोचणार होतो आणि तिथून दहा वाजून वीस मिनिटांनी न्यू ऑर्लिन्सला निघणार होतो रात्र विमानात काढायची, पहाटे न्यू ऑर्लिन्सला जायच, मग दिवसभर गावात चक्कर टाकून पुन्हा पुढे मायामीला विमानान जायच, असा सज्जड बेत मी आखला होता फोनिक्सच्या विमानतळावर चार तास वेळ फुकट घालवण्यापेक्षा गावात जाऊन यावं म्हणून मी सामान तळावरच्या लॉकर्समधे ठेवलं आणि बसन गावात गेलो अमेरिकेतल्या इतर गावासारखंच फोनिक्स तशीच प्रचंड सुपर मार्केट्स, हॉटेल, बार, उपाहारगृहं, उद्यानं, सिनेमागृह एका बारमधे छानपैकी जर्मन



सॅन् फ्रॅन्सिस्कोची जगप्रसिद्ध केबल कार

'बडवायझर' बीअर घेतली आणि विमानतळावर परतलो टेक्सस लाइनचं तिकिट आणि वेळापत्रक घेतलं. नऊ–चाळीसला डलासला विमान पोचतं आणि दहा–वीसला पुढचं विमान निघतं याची वेळापत्रकात पाहून पुन्हा खात्री करून घेतली 'एअरवेस्ट'च्या हवाईसुंदरी उतारूंसाठी कायकाय करतात याची वार्ता इतक्या जवळच्या टेक्सस लाइनच्या हवाई-सुंदरींच्यापर्यंत पोचलेली नव्हती, म्हणून त्या विमानात फक्त दोनदा कॉफी आणि केकच मिळाले आणि लिहिण्यासारखं काही न घडता दहा मिनिट उशीरा मी डलास विमान-तळावर पोचलो.

डलास हे नाव माझ्या मनात उग्र कल्पना निर्माण करीत होतं कारण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी याचा खून याच गावी झाला अशा रक्तरंजित गावात आपल्याला रहावं लागत नाही याबद्दल समाधान मानीत मी 'एअरवेस्ट'च्या कौंटरवरून सामान घेतलं आणि रात्री दहा वाजता 'टेक्सस इंटरनॅशनल'च्या तिकिटकौंटरवर आलो मी त्या तिकिट-विक्रेत्या बाईपुढं माझा 'व्हिजिट यू. एस ए' पास ठेवला आणि विचारलं, "न्यू ऑर्लिन्सची फ्लाइट दोनशेसहा मला मिळेल का? वेळ आहे का तेवढा?" कारण माझं विमान दहा मिनिट उशीरा आलं होतं

त्या बाईनं हातातल्या वेळापत्रकाकडे पाहिलं मग वर डोकं करून माझ्याकडे पुन्हा निरखून पाहिलं आणि गणित चुकणाऱ्या शाळेतल्या मुलाला बाई समजावून सांगतात तसं ती मला म्हणाली, "भरपूर वेळ आहे की! तुमचं विमान उद्या सकाळी दहा वाजून वीस मिनिटांनी आहे"

मी थक्कच झालो. तिची काहीतरी चूक झाली असावी म्हणून मी माझ्या हातातलं वेळापत्रक तिच्यापुढं करून म्हटलं, 'पण यात तर --"

"मीसुद्धा तेच वाचते आहे' तिनं आपल्या हातातलं वेळापत्रक दाखवीत म्हटलं, "हे नऊ–चाळीस रात्रीचे आहेत, आणि हे दहा–वीस दिवसाचे आहेत"

"पण रात्रीला एकवीस–चाळीस असं तरी छापायचं या दोन्हीतला फरक कळणार कसा?" मी विचारलं

"ते अगदीच सोपं आहे आमच्या वेळापत्रकात दिवसाचे आकडे पातळ टाइपमधे आणि रात्रीचे जाड टाइपमधे छापलेले असतात." तिनं स्पष्टीकरण केलं मी निरखून पाहिलं तिचं म्हणणं अर्थातच खरं होतं

"म्हणजे मला रात्रभर डलासमधे रहावं लागणार?" मी अविश्वासानं विचारलं.

"यू आर वेलकम् इन डलास" तिनं आपलं ठेवणीतलं हास्य काढून म्हटलं

मीही तिचे खोटेखोटे आभार मानले. नुसतं गोड हसून 'सुस्वागतम' म्हणायला हिचं काय जातं? खुनाचा इतिहास असलेल्या या अनोळखी डलासमधे रहायचं कुठं आणि कसं? हॉटेल किती लांब असेल? पैसे किती पडतील? टॅक्सीवाला रात्री भलतीकडे नेईल काय?-- असे अनेक प्रश्न मनात आले विमानतळ आता जवळजवळ रिकामा होत होता. तिथं असलेल्या एका निग्रो पोलिसाला म्हटलं, "माझ्याजवळ तिकिट आहे पण मी इथंच

बाकावर रात्रभर बसल तर चालेल का ?" त्यान माझ्याकडे सशयान पहात सुचवलं, "तुम्ही इथं फार अन्कम्फर्टेबल व्हाल समोरच दोनतीन हॉटेल्स आहेत तिथ का रात्रीसाठी रहात नाही तुम्ही ?' मी मनात म्हटल, 'लेका, हॉटेलचे अठ्ठावीस डॉलर्स तुझा बाप देणार आहे की काय ?' वरकरणी मात्र मी क्षीण हास्य करून हॉटेलात रहाण्याची ती अभिनव आणि अपूर्व कल्पना सुचवल्याबद्दल त्या पोलिसाचे आभार मानले आणि सामान उचलून निघालो अर्थात मी विमानतळाच्या लॉबीबाहेर न जाता मघाच्या त्या पोलिसाच्या नजरेच्या टप्प्यापासून लांब जाऊन एका खुर्चीवर बसलो, आणि डलासच्या या त्रागड्यातून कस सुटाव याचा विचार करू लागलो.

आणि अचानक मला आठवल की, घोलकर या नावाचा कोल्हापूरचा एक तरुण डलासमधे रहात होता त्याचमाझ लांबच काहीस नातही होत वॉशिंग्टनला त्याचा कुणी-तरी बोलताबोलता उल्लेख केला होता मी डलासची टेलिफोन डिरेक्टरी पाहिली त्यात 'घोलकर, अरुणकुमार' हे नाव सापडल बुवा ! सार्वजनिक फोनवरून त्याला तीन वेळा फोन केला, तरी तो एंगेज्ड लागला फोन बिघडलाय की काय हेही कळेना. अखेर चौथ्यादा केलेला फोन लागला एकदाचा ! माझं नाव ऐकताच त्यान विचारल, "अहो रमेश मत्री —ते लेखक — कोल्हापूरचे — तेच का तुम्ही ?" मी 'होय' म्हणून सांगितल्यावर तो म्हणाला, 'या एवढ्या रात्री तुम्ही डलासला कुठ आणि कसे आलात ? तुम्ही माझ्याकडेच रहायला या तुम्ही कुठ आहात सांगा मी मोटार घेऊन येतो "

मी विमानतळावर गेट क्रमांक एकोणीसवर आहे अस सांगितलं आणि कुमार घोल-करन आपण चाळीस मिनिटात तिथं येतो असं आश्वासन दिल, तेव्हा मी सुटकेचा नि श्वास टाकला जगाच्या कुठल्याकुठल्या कोपऱ्यात कोणकोण अचानक भेटत याच मला तेव्हा फारच कौतुक वाटल

पाऊण तासातच कुमार घोलकर आला त्यानं मला खूप वर्षांत पाहिल नव्हत, मोठ्या अगत्यान त्यानं माझं स्वागत केल घरी पोचण्यापूर्वी तो मोटारीतच मला म्हणाला, "तुम्ही डलासला आला आहात, तर तुम्हाला एक जागा दाखवलीच पाहिजे ! त्या जागे-बद्दल मला अतिशय खंत वाटते ' असं म्हणून त्यानं आपली मोटार स्टेनॉडस फ्रीवे रस्त्यावर नेली याच रस्त्यावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष केनेडी याचा खून झाला होता. आम्ही दोघे मोटारीतून खाली उतरलो आणि रात्री अकरा—सव्वाअकरा वाजता ती जागा मी निरखून पाहिली जिथ केनेडींचा खून झाला, तिथ आता एक स्मारक उभारलेल आहे अतिशय साधं, उदात्ततेला आव्हान देणार.

२२ नोव्हेंबर, १९६३ डलासजवळच्या फोर्ट वर्थ या ठिकाणी चेंबर ऑफ कॉमर्समधे भाषण दिल्यानतर राष्ट्राध्यक्ष केनेडी, सौ जॅकेलिन केनेडी, राज्यपाल कॉनेली आणि सौ कॉनेली उघड्या मोटारीतून डलासमधे आले होते. हजारो नागरिक रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभे राहून राष्ट्राध्यक्षाच स्वागत करीत होते केनेडींची मोटार स्टेनॉडस फ्रीवे

रस्त्यावरून जात असताना दुपारी साडेबारा वाजता अचानक केनेडींच्यावर पहिली गोळी झाडली गेली त्याबरोबर ते खाली कोसळले पाठोपाठ त्याच्यावर दुसरी गोळी झाडली गेली आणि लगेच तिसरी रक्ताच्या थारोळ्यात ते पडलेले असतानाच जॅकेलिन केनेडींनी हंबरडा फोडला आणि त्या पतीच्या अंगावर पडल्या गव्हर्नर कॅनेली यानाही तीन गोळ्या लागल्या आणि त्याच्या बरगड्यांत घुसल्या राष्ट्राध्यक्षाची मोटार त्या प्रचंड कोलाहलात आणि गोंधळातच अत्यंत द्रुतगतीनं जवळच्याच 'पार्कलँड' रुग्णालयात नेण्यात आली. तिथ त्याच्या शरीरातल्या गोळ्या काढल्या गेल्या. पण एक वाजता त्याच निधन झाल. दोन वाजून एकोणचाळीस मिनिटांनी उपराष्ट्राध्यक्ष जॉन्सन याचा राष्ट्राध्यक्ष म्हणून चालत्या विमानातच शपथविधी झाला

त्या विलक्षण रक्तरंजित इतिहासाच्या जागेवर मी सुन्न होऊन उभा होतो. समोरच 'टेक्सस स्कूल बुक डिपॉझिटरी'ची सहा-मजली उंचीची इमारत दिसत होती.त्यात्र इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून राष्ट्राध्यक्ष केनेडींच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. त्यांचा खुनी ली हार्वे ओसवाल्ड याला खुनानंतर दोन तासातच पकडण्यात आलं. पण त्याचाही २४ नोव्हेंबरला खून झाला. राष्ट्राध्यक्ष केनेडी याच शव 'व्हाइट हाउस' आणि 'काँग्रेस'मधे दर्शनासाठी ठेवण्यात आल, आणि २५ नोव्हेंबरला आर्लिंग्टन स्मशानात त्याचा दफनविधी करण्यात आला त्याच्या खुनाच्या जागेनं मनावर उमटवलेल भीषण, भव्य चित्र कधीही न पुसल जाणार अस आहे.


# अमेरिकेची मायावती — मायामी

८

सबंध अमेरिकेत टेक्सस हे अगदी वेगळं राज्य आहे त्याचं क्षेत्रफळ इतकं मोठं आहे, की फ्रान्स, बेल्जियम, हॉलंड आणि स्वित्झर्लंड हे चार देश या एका राज्यात बसू शकतील ! टेक्ससवर फ्रेंच, स्पॅनिश आणि मेक्सिकन अशा सर्व माजी राज्यकर्त्यांचा सांस्कृतिक परिणाम दिसतो हे एकच राज्य असं आहे की, १८४५ साली अमेरिकेच्या संघराज्यात विलीन होण्यापूर्वी टेक्सस हे स्वतःच एक प्रजासत्ताक राष्ट्र होतं !

भरपूर मैदानं, कुरणं, पेट्रोल, गोठीवाडे (रँच) असल्यानं या राज्याला एक दणकट व्यक्तिमत्त्व लाभलं आहे अमेरिकेतल्या इतर कोणत्याही राज्यापेक्षा टेक्ससमधे अधिक पेट्रोल निघतं. या राज्यातून निघणारा नॅचरल गॅस तीन–चतुर्थांश अमेरिकेला पुरतो गाई, बैल, घोडे यांची निपज करणं हा टेक्ससचा मशहूर व्यवसाय आहे. या केंद्रांना ' रँच ' म्हणतात. त्यातली ' किंग रँच ' नावाची रँच आठ लक्ष मैल पसरली आहे ! शेतीसाठी, मांस खाण्यासाठी किंवा इतर उपयोगासाठी लाखो जनावरं या रँचेसवर पाळण्यात येतात. त्यातूनच ' काउबॉय ' संस्कृतीचं उगम झाला.

मात्र टेक्सस म्हणजे काउबॉय संस्कृतीच आहे असं नाही. अवकाश–संशोधनाचं जगातलं सर्वात मोठं केंद्र टेक्ससमधल्या ह्यूस्टन या गावी आहे. ' नॅसा ' ( ' नॅशनल एरॉनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन ' ) या नावानं ते विख्यात आहे. टेक्सस हे नाव अमेरिकन इंडियनांच्या ज्या शब्दावरून आलं आहे, त्याचा अर्थ ' मित्र ' असा आहे. कारण न्यू मेक्सिको



टेक्सस राज्यात 'काउबॉय महोत्सवा'त
रस्त्यारस्त्यावर अशी नृत्ये होतात.

आणि टेक्सस याच्या सीमेवरच्या अल् पॅसो गावाजवळ पूर्वी दोन्ही राज्यातले आदिवासी भेटत आणि एकमेकाना टेक्सस म्हणजे मित्र म्हणत कोणतीही गोष्ट प्रचंड, अवाढव्य प्रमाणावर करण हे टेक्ससमधल्या लोकाच वैशिष्ट्य आहे त्याबद्दलच्या अनेक लोककथा आणि विनोद अमेरिकेत लोकप्रिय आहेत. एकदा दोन टेक्सन मित्र मोटारींच्या दुकानात गेले एकान सर्वात महाग अशी लिंकन कस्टम ' गाडी पस्तीस हजार डॉलर्सला घेतली पण पैसे मात्र दुसऱ्यान दिले पहिला म्हणाला, ' अरे गाडी मी घेतली तू कशाला पैसे दिलेस ?" तेव्हा दुसरा म्हणाला, ' त्यात काय झाल ? सकाळी आपल्या दोघाच्याही चहाचे पैसे तू दिले नव्हतेस का ? म्हणून तुझ्या मोटारीचे पैसे मी दिले, एवढच !"

एकदा एक टेक्सन विमानात चढताना अवजड बॅग जिन्यावरून नेत होता हवाई-सुंदरी म्हणाली, " आपली बॅग सामानाच्या होल्डमधे ठेवली तर चालेल का ?" टेक्सन म्हणाला, " बाई, ही बॅग नाही. हे माझं पैशाच पाकिट आहे "


जगातले हौशी लोक आपल्या मुलाना खेळता याव म्हणून कुत्रा विकत घेतात टेक्ससमधले लोक मात्र आपल्या कुत्र्याचा वेळ जावा म्हणून त्याच्याबरोबर खेळण्यासाठी मुलंच विकत घेतात

एअरकंडिशनिंग करणाऱ्या एका कंपनीत जाऊन एका टेक्सनन विचारल, प्रवासात मला उष्णतेचा त्रास होतो सबध टेक्सस राज्य एअरकंडिशन्ड करायला काय खर्च येईल हो ?"

टेक्सनच्या स्नानगृहात तीन नळ असतात एकातून थड पाणी येत, दुसऱ्यातून गरम पाणी येत आणि तिसऱ्यातून व्हिस्की येते.

एकदा माणूस मेल्यावर स्वर्गात गेला. तिथ सुवर्णाच्या रस्त्यावरून अमृत पीतपीत तो निघाला असताना, त्याला हातापायांत बेड्या घातलेले दहाबारा लोक दिसले त्यांच्यावर पहारा ठेवण्यासाठी चार शस्त्रधारी पोलिस उभे होते स्वर्गात कैदी पाहून नव्या माणसाला आश्चर्य वाटल त्यानं विचारलं, ' यांना अस अडकवून का ठेवल आहे ?'

पहारेकरी म्हणाले, ' हे टेक्ससचे नागरिक आहेत स्वर्गातून पळून जाऊन पुन्हा टेक्ससमधे रहायचा ते प्रयत्न करीत होते, म्हणून त्याना बेड्या घातल्या आहेत !



चद्रावर माणूस पाठवण्याची सर्व पूर्वतयारी जिथून झाली ते अवकाशसशोधनाचे जगातील सर्वांत मोठे, ह्यूस्टन येथील ' नॅसा'चे अवकाश-सशोधन-केंद्र


न्यूयॉर्कला आलेल्या एका टेक्सनला त्याचा न्यूयॉर्कचा मित्र जगातली सगळ्यात उंच अशी ' एम्पायर स्टेट ' ईमारत दाखवीत होता ती इमारत पाहून टेक्सन म्हणाला, " हात्तिच्या ! हीच ती उंच — उंच म्हटली जाणारी इमारत होय ? अरे माझी कपडे ठेवण्याची कपाटं याच्यापेक्षा उंच आहेत "

फ्रान्सला गेलेला एक टेक्सन परत आल्यावर आपल्या मित्रांना सांगू लागला, " या फ्रेंच लोकांचं जेवण फारच नाजुक बुवा ! अरे एकदा जेवल्यावर आठ दिवसातच पुन्हा भूक लागते ! कसला तो भिकारडा देश ! "

असं हे टेक्सस अवाढव्याच राज्य त्या राज्यात मी अनपेक्षितपणं उतरलो. अर्थात योगायोगानं का होईना, पण मी तिथं उतरलो हे फार बरं झालं. माझा मित्र कुमार घोलकर यानं मला रात्री बाराला घरी नेलं मग आम्ही ' व्हॅट सिक्स्टीनाइन'चा आस्वाद घेत चिकार गप्पा मारल्या रात्री दोनअडीच वाजता कुमारनं भारतीय पद्धतीचं चवदार ' चिकन ' केलं जेवण झाल्यावर मी म्हटलं, ' अरे बाबा, ' टेक्सस इंटरनॅशनल ' विमान कंपनीला फोन करून उद्या न्यू ऑर्लिन्सच्या विमानाचं दहा—वीसचं रिझर्व्हेशन करून ठेव "

त्यावर कुमार म्हणाला, " छे छे ! आता तुम्ही उद्या कसचे जाताय ? डलास पाहून, आमच्या कचेरीला भेट देऊन, आम्ही सुरू केलेली दुकानं पाहून मग जा. चारपाच दिवस थांबलात तर तुमच्या हस्ते माझ्या एका दुकानाचा उद्‌घाटनसमारंभ करायचा आहे ' मी म्हटलं, मंत्र्यांच्या हस्ते उद्‌घाटनं होतात, पण तो मंत्री मी नव्हे ! "

कुमारनं मला मोठ्या आग्रहानं ठेवून घेतलं सकाळी साडेआठ—नऊला आम्ही उठलो त्यानं ऑफिसला फोन करून ' आज कामाला येत नाही, पण दुपारी एक चक्कर टाकीन ' म्हणून कळवलं वुडार्ड नावाच्या एका अमेरिकन मित्रानं आणि घोलकरनं मिळून ' वुडार्ड ' या नावाची स्वतःचीच कंपनी काढली आहे आर्किटेक्ट्स, इंजिनियर्स आणि रीअल इस्टेट डेव्हलपर्स म्हणून ही कंपनी प्रचंड योजना हाती घेऊन पार पाडते तिथल्या राज्य—बँकेची इमारतही माझ्या मराठी मित्रानं बांधली आहे, ही मला आनंदाची गोष्ट वाटली त्यानं मला जवळच्या गावातल्या एका शाळेची इमारत दाखवली या इमारतीचा आर्किटेक्ट कुमार घोलकर आहे आणि अगदी वेगळ्या पद्धतीची ही शाळा आहे इतर शाळांसारख्या या शाळेला खोल्या नाहीत सर्व वर्ग एकाच प्रचंड घुमटाकार छपराखाली भरतात प्रत्येक वर्गाला रंग वेगळा दिलेला आहे, एवढंच या शाळेच्या प्रवेशद्वाराशी ८० फूट लांब आणि वीस फूट उंचीचं म्युरल केलेलं आहे त्या म्युरलचं चित्र मुंबईचे प्रख्यात चित्रकार बाबूराव सडवेलकर यांनी तयार केलं आहे मानवाच्या ज्ञानाचा विकास दाखवणारी ती विलक्षण परिणामकारक चित्रपट्टी घोलकर यांनी मुद्दाम मुंबईहून तयार करून आणली आहे टेक्ससमधल्या एका लहान गावातल्या शाळेत मराठी चित्रकाराचं नाव पाहून वेगळंच समाधान झालं शाळेच्या मुख्याध्यापिकाबाईनं आमचं स्वागत करून आम्हाला तीनचार वर्गांत नेलं, आणि सर्व वर्ग एकाच हॉलमधे असले तरी त्यांचा एकमेकांना कसा उपद्रव होत नाही ते दाखवलं अशी शाळा बांधण्यातलं तत्त्व सांगताना घोलकर म्हणाला, लहान



न्यू ऑर्लिन्समधील ‘ फ्रेंच क्वार्टर ’ या विभागात जुन्या फ्रेंच पद्धतीची घरे मुद्दाम राखून ठेवण्यात आली आहेत.

मुलाना वर्गातल्या खोल्यात गुदमरल्यासारखं होत शाळा म्हणजे चार भितींत डांबून ठेवल जाण, ही मुलाची परंपरागत कल्पना अशा खुल्या इमारतींमुळे बदलून जाते


शाळा पाहिल्यावर आम्ही घोलकरच्या कचेरीत गेलो ‘ केनेडी स्पेस सेंटर’मधून चद्रावर माणूस पाठवणारी अवकाशयान सोडली जातात, ते केंद्र पहाव असा माझा विचार असल्याचं मी सांगितल. तेव्हा श्री वुडार्ड म्हणाले, “ तुम्हाला तिथ काहीच पहायला मिळणार नाही. कारण जेव्हा एखाद अवकाशयान सोडल जाणार असत, तेव्हाच ‘ केनेडी स्पेस सेंटर’वर मोठी हालचाल असते एरवी ती जागा म्हणजे शेकडो एकराचा ओसाड माळ आणि त्यावर जागोजाग उभारलेले प्रचंड पोलादी लॉंचिंग पॅड्स् -- म्हणजे ज्यावरून अवकाशयान सोडतात ते सापळे -- एवढंच दिसेल त्यात काहीही पहाण्यासारख नाही तुम्हाला अवकाश-सशोधनाची झलक पहायचीच असेल तर ह्यूस्टनला जा नॅसाच्या केंद्रात तुम्हाला ते पहायला मिळेल ”

तो दिवस मी आणि घोलकरन डलासमधे यथेच्छ भटकून काढला रात्री दोनतीन नाइट क्लब्सना गेलो सकाळी मी वुडार्डचा सल्ला मानून ह्यूस्टनला जायचं ठरवल कुमारन मला विमानतळावर पोचवल आणि ‘ टेक्सस इटरनॅशनल ’ विमानानं मी अकरा वाजता ह्यूस्टनला पोचलो सामान लॉकअपमधे ठेवल आणि बसन ‘ नॅसा’च्या केंद्रात गेलो मला न्यू ऑर्लिन्सच दुपारी तीनच विमान पकडण्यासाठी अडीच वाजेपर्यंत

परत यायला हवं होतं मी 'नॅसा'च्या आवारात गेलो आणि मला आढळलं की, तो परिसर इतका अवाढव्य होता की मोटारीशिवाय सर्व इमारतींत जाणं महा कर्मकठिण ! मला एकदम आठवलं की, जॉन किल्मर नावाचा आमच्या ऑफिसचा एक अमेरिकन अधिकारी 'नॅसा'मधे पब्लिक रिलेशन्स ऑफिसर आहे म्हणून मी रिसेप्शनकडे त्याची चौकशी केली तिथल्या बाईनं आपल्याजवळची डिरेक्टरी पाहून सांगितलं की, जॉन किल्मर वर्षभरापूर्वीच 'नॅसा'चं ह्यूस्टनचं काम सोडून दुसरीकडे गेले 'नॅसा'च्या त्या अफाट पसरलेल्या इमारतीं-पैकी तीनचारच इमारती प्रेक्षकांना खुल्या होत्या इतर इमारतींत अवकाशयानांचं आणि इतर तांत्रिक काम चालू असल्यानं त्या इमारतींत प्रवेश खुला नव्हता तरी पण मी जे पाहिलं तेही खूपच होतं. चंद्रावर जाऊन आलेल्या अवकाशवैमानिकाचे कपडे, चंद्रावरचे खडक, चंद्रावर उतरणारं यान, अवकाशात यान कसं फिरतं त्याची प्रतिकृती, चंद्रावर संचार करणाऱ्या वैमानिकाचं संभाषण, त्याच्या शिक्षणाची व्यवस्था वगैरे पहाण्यात दोन तास तरी सहज गेले मला त्यातल्या त्यात विशेष प्रेक्षणीय वाटली ती अवकाश-वैमानिकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था सुमारे दोनशे फूट परीघाचा काचेचा घुमट आहे त्यातली सर्व हवा काढून घेतलेली आहे त्यामुळं वजनरहित अवस्थेत काय अनुभव येईल ते वैमानिकांना इथंच कळतं या घुमटात ताशी दहा ते सतरा हजार मैल वेगानं फिरणारं यान पोलादी दांड्याला जोडलेलं असतं आणि त्या यानात बसून अवकाश-वैमानिक पुढं अवकाशात येणारा गतीचा आणि वजनरहिततेचा अनुभव घेतात

आता मला परत जाणारी बस पकडण्यासाठी धावपळ करणं भाग होतं मी 'नॅसा'च्या आवारातल्या बसस्टॉपवर गेलो, तेव्हा कळलं की अजून तासभर तरी तिथं बस येणार नव्हती पण पाच मिनिटांच्या रस्त्यावर असलेल्या हॉटेलमधे मात्र लगेच बस मिळेल. मी जवळपास पाहिलं. पण कुठलंही हॉटेल नव्हतं अधिक चौकशी करताना कळलं की, 'पाच मिनिट म्हणजे मोटारीची पाच मिनिट तसं ते हॉटेल दीड मैल लांब आहे' म्हणजे निकालच लागला ! त्या थंडीत आणि वाऱ्यात दीड मैल चालायचं म्हणजे सत्त्वपरीक्षा होती हे एक, आणि चालत जाण्यातला वेळ जमेला धरला तर तीनचं विमान चुकणार होतं हे दुसरं काय करावं हे सुचेना कोणी मोटारवाला लिफ्ट देईल काय म्हणून मी पाहू लागलो तोच 'नॅसा'ची लंच टाइम झाली आणि लोक भराभर मोटारी दौडवू लागले.

पहिल्याच मोटारीला मी हात वर करून थांबवलं आणि त्या हॉटेलचं नाव सांगून तिथं सोडता का' म्हणून विचारलं त्या गृहस्थानं दार उघडलं आणि 'प्लीज कम इन्' म्हणून माझं स्वागत केलं. तो गोरापान होता, पण अमेरिकन नसावा, कदाचित अरब राष्ट्रातला असावा, असा विचार माझ्या मनात आला मी काही विचारणार, तोच त्यानं म्हटलं, "तुम्ही भारतीय असणार. कुठले ?" मी म्हटलं, 'मुंबईचा. आपण ?" त्यावर तो हसून म्हणाला, "मीही मुंबईचाच " मला वाटलं, हा थट्टा तर करीत नाही ? मी आश्चर्यानं विचारलं, "आपण मुंबईला कुठं रहाता ? आपलं नाव --"




न्यू ऑर्लिन्समधील नाइट क्लब्सचा रस्ता –– बुर्बान स्ट्रीट

तो म्हणाला, " मी मलबार हिलवर रहातो माझं नाव दोशी मी तीन वर्षं 'नॅसा'त काम करतो आहे. अवकाशयान उभारण्याच्या तंत्रविषयक विभागात मी काम करतो आणि जवळच तीन मैलावर रहातो –– अरे ! हे पहा, तुमचं हॉटेल आलंच !'

मुंबईचे आम्ही दोघे 'नॅसा'सारख्या संस्थेत भेटलो आणि अगदी ऐन गरजेच्या वेळी त्यानं मला लिफ्ट दिली, या योगायोगाचं मला फार कौतुक वाटलं मी त्याचे मनःपूर्वक

आभार मानले आणि समोरून येणारी ह्यूस्टन एअरपोर्टची हिरवी बस पकडली तिथं न्यू ऑर्लिन्सचं तिकिट लगेच काढल आणि 'सदर्न एअरवेज'न बरोबर तीनला निघालो 'नॅसा'मधे मला मिळालेल्या लिफ्टमुळे मी किती सुदैवी ठरलो, हे दुसऱ्या दिवशीच्या पत्रावरून मला कळल. कारण मी ह्यूस्टन विमानतळावरून निघाल्यानतर पधरा मिनिटाच्या आतच तिथं एक भयंकर प्रकार घडला

नॉर्थ सेंट्रल कपनी'च विमान मायामीकडे तीन–वीसला निघणार होतं सारे प्रवासी आत शिरले होते विमानाच इजिन सुरूही झाल होत आता विमानतळाच गेट आणि विमानाचे दरवाजे बद होणार, इतक्यात पन्नाशीच्या सुमाराचा एक गृहस्थ आणि त्याचा वीस वर्षांचा मुलगा त्या गेटकडे धावत आले गेटवरच्या माणसान तिकिट मागितल,



मायावती मायामीमधील रमणीय हॉटेलाची रांग या हॉटेलाच्या एका बाजूला समुद्र आणि दुसऱ्या बाजूला कालवा आहे प्रत्येक हॉटेलचा स्वतत्र स्विमिंग पूल आणि स्वतत्र किनारा आहे.



**मायामीची घरे आणि त्याच्यापुढील बागा, हिरवळी
किती सुदर ठेवली जातात त्याचा एक नमुना**

तेव्हा बापान त्याच्यावर रिव्हॉल्व्हरच्या चार गोळ्या झाडल्या आणि तो रक्ताच्या थारोळ्यात तिथल्या तिथ मरून पडला. जवळच्या गेटवरचा सरक्षक मदतीसाठी धावला, तेव्हा त्याचाही खून पाडण्यात आला. ते दोघे हल्लेखोर विजेच्या वेगानं 'नॉर्थ सेंट्रल' विमानात घुसले आणि त्यानी वैमानिकावर रिव्हॉल्व्हर रोखून विमान पळवून नेल ! ते दोघे हल्लेखोर तुरुगातून पळून आलेले होते आणि आता त्यांना अमेरिकेतून क्युबात पळून जायच होत या घटनेनं ह्यूस्टनच्या विमानतळावर भयकर गोंधळ माजला लोक सैरावैरा धावू लागले. दोनतीनशे शस्त्रधारी पोलिसानी विमानतळ वेढला आणि तीन तास सर्व विमानाची वाहतूक या तळावर बद करण्यात आली. मला ह्यूस्टनला पोचायला पधरा मिनिटं जरी वेळ लागला असता, तर काय झालं असत याची कल्पनाही करवत नाही नंतर सध्याकाळच्या वृत्तपत्रावरून कळल की ते विमान कुठल्याशा तळावर पेट्रोल सपल्याच्या मिषानं उतरवण्यात आल आणि मशिनगनधारी पोलिसानी हल्लेखोरांना अटक केली

न्यू ऑर्लिन्सला मी सध्याकाळी पोचलो, तेव्हा विलक्षण थडी होती आणि वारही जोराच सुटल होत या गावात माझ कुणीही ओळखीचं नव्हत आणि असण्याची शक्यताही नव्हती (पुढ वर्षभरान मी त्याच गावी गेलो, तेव्हा पारगावकर हे मराठीभाषिक भेटले

आणि त्यांनी मला आपल्या घरी रहाण्याचा आग्रह केला पण पहिल्या वेळी मात्र मला ओळखणार तिथं कुणी निघेल असं वाटलं नव्हत. ) विमानतळावरून गावात जाण्यासाठी मी ' लिमोसिन ' केली गाडीत मी एकटाच होतो तेव्हा साहजिकच ड्रायव्हरशी थोड्या गप्पा मारल्या. त्याच्या मतानं फ्रेंच क्वॉर्टर हा न्यू ऑर्लिन्सचा भाग पाहिलाच पाहिजे असा होता. मी गावातल्या मध्यवर्ती विभागात उतरलो. फ्रेंच क्वॉर्टरजवळचं हॉटेल गाठल. ते फारसं महाग नव्हतं. आठनऊ डॉलर्स एवढाच दर होता. खोलीत सामान टाकून मी छानपैकी अंघोळ केली आणि फ्रेंच क्वॉर्टरच्या दिशेनं निघालो.

हा भाग म्हणजे जुन्या फ्रेंच आर्किटेक्चरच्या नमुन्यांची आणि पॅरिसची काही अंशी झलक असलेला असा आहे जवळच नाइट क्लब्सचा विभाग आहे. म्हटल, आलोच आहे तर न्यू ऑर्लिन्सचे नाइट क्लबही पाहू अशा कार्यक्रमाला सोबत असेल तर अधिक गंमत येते. पण त्या रात्री माझ्याबरोबर कुणीच नव्हत मी कनॉल रस्ता ओलांडला आणि नाइट क्लब्सनी खच्चून भरलेल्या बुर्बान गल्लीत शिरलो या गल्लीत दोन्ही बाजूंनी मद्याचे बार आणि नाइट क्लब्स आहेत. एक नाइट क्लब असा आहे, की त्यात पुरुषच स्त्रियांचे कपडे घालून नृत्य करतात हे पुरुष इतके सुंदर आणि नाजुक असतात, की पैज लावूनही ते पुरुष आहेत असं वाटणार नाही. दुसरा एक नाइट क्लब आहे, तो खास स्त्रियांच्यासाठी आहे, पण त्यात कधीकधी पुरुषही बदल म्हणून जातात या क्लबात बळकट आणि रेखीव बांध्याचे पुरुष हळूहळू कपडे काढून नग्न होतात आणखी एका क्लबात एका प्रचंड काचेच्या प्याल्यात एक मदनमस्त तरुणी सर्व कपडे काढून तुमच्यासमोर स्नान करते मग ती तशीच नग्नावस्थेत खाली उतरते, अंग पुसते, आपल्या पुष्ट स्तनावर आइस्क्रीमचे गोळे ठेवते आणि प्रेक्षकांपैकी कुणीही येऊन जिभेन ते आइस्क्रीम खाव असं आव्हान देते अर्थात ते आव्हान स्वीकारून आइस्क्रीम संपल्यावरही जीभ फिरवणारे रसिक प्रेक्षकात असतातच ! (मात्र तो मी नव्हे ! )

या बुर्बान रस्त्यावर आणखी एक वेगळा प्रकार पाहिला. तो म्हणजे झोपाळ्यावर बसलेल्या अर्धनग्न युवती. अनेक नाइट क्लब्सच्या इमारतींच्या पहिल्या मजल्यावरच्या दारात झोपाळे बांधलेले आहेत आणि त्या झोपाळ्यांवर नाइट क्लबमधे भाग घेणाऱ्या पोरी शरीर जवळजवळ उघडे टाकून झोके घेतात क्षणात रस्त्यावरून त्यांच्या प्रमत्त टांगा दिसतात आणि दुसऱ्या क्षणी झोका आत गेल्यान त्या पोरी अदृश्य होतात हा प्रकार मी पॅरिस जमेला धरूनही इतर कोणत्याही नाइट क्लब्सच्या रस्त्यावर पाहिला नाही.

मी दुसऱ्या दिवशी सकाळीच मायामीला जायच ठरवल. पण रात्री बरच जागरण झाल्यामुळ सकाळी दहासाडेदहापर्यंत जाग आली नाही. मी विचार केला, ठीक आहे. मायामीला तरी कोण माझ्यासाठी मुहूर्त काढून हातात माळ घेऊन उभी आहे ? जमेल तेव्हा जाऊ. लिमोसिनमधून विमानतळावर जाताना न्यू ऑर्लिन्सच निसर्गसौंदर्य पाहिलं असेल, तेवढच. न्यू ऑर्लिन्स विमानतळावर गेलो. आत शिरण्यापूर्वीच सायदैनिकाचा मथळा नजरेस पडला : ' Air Line closed . Thousands stranded. ' (विमान कंपनी

बंद पडली हजारो लोकांची गैरसोय ) मला वाटलं, अशी मोडकी विमान कंपनी म्हणजे मी जिचं तिकिट आता काढणार आहे, ती ओझार्कच असणार ! म्हणून घाईघाईनं वर्तमान-पत्र घेतलं पहातो तर ती जर्मनीतल्या कुठल्यातरी विमान कंपनीची बातमी होती सुटकेचा निःश्वास सोडून आत गेलो साठसत्तर विमान कंपन्यांचे कौंटर्स होते. पण त्यात ओझार्कचा कौंटर दिसेना म्हटलं, आपल्या मनात आलेली अशुभ कल्पना खरीच ठरली असेल. पण ओझार्क ही इतकी किरकोळ कंपनी असावी, की ती बंद झाल्याची बातमी देण्याचीही महत्त्व सायदैनिकाना वाटलं नसेल तीनचार कौंटर्सवर 'सॉरी, डोंट नो' असं ऐकल्यावर एका कौंटरवर कळलं की ओझार्कचा स्वतंत्र कौंटर नाही. पण सदर्नच्या कौंटरवर ओझार्कचं तिकिट मिळेल त्याप्रमाणं तिकिट मिळालं आणि संध्याकाळी पाचच्या सुमाराला मी मायामीला पोचलो

मायामीचा विमानतळ मी पाहिलेल्या सर्व विमानतळांत अत्यंत सुंदर, स्वच्छ, प्रसन्न आहे जगातले लक्षाधीश आणि कोट्यधीश यांचं हे विश्रांतीचं ठिकाण त्यामुळं अर्थातच त्या विमानतळाची बडदास्तही तशीच ठेवली पाहिजे. मी तळावर उतरलो आणि पाच मिनिटं चालू लागलो, तोच एक फलक दिसला. त्यावर लिहिलं होतं की, विमानाचा पायलट आणि तळावरचा ग्राउंड इंजिनियर यांचं संभाषण ऐकायचं असेल, तर या खाचेत दहा सेंट टाका आणि फोन कानाला लावा. मी म्हटलं, ऐकू तर खरं

मी दहा सेंट टाकले, आणि आल्टिट्यूड, हवामान, विमान उतरण्याचा विभाग, क्रमांक असं काही अगम्य संभाषण ऐकून दोनतीन मिनिटांनी फोन खाली ठेवला सामान घेऊन बाहेर आलो 'वाय एम् सी ए'च्या स्वस्त जागेत रहावं असं ठरवलं आणि फोन केला. आठ डॉलर्सला जागा मिळेल असं कळलं 'लिमोसिन' मिळेना म्हणून टॅक्सी केली. वाय एम् सी ए'ला ने म्हणून सांगितलं

टॅक्सी सुरू करताना ड्रायव्हर म्हणाला, "तुम्हाला मी पूर्वी पाहिलं आहे" मी आश्चर्यानं म्हटलं, "मला ? नसेल हो !" ड्रायव्हर म्हणाला, "तुम्ही मायामीच्या प्राणि-संग्रहालयाला वाघ, हत्ती, सिंह वगैरे प्राणी पुरवता ना ? अहो गेल्या उन्हाळ्यात मीच तुम्हाला झूपर्यंत सोडलं नव्हतं का ? तुम्ही ते प्राणी भारतातून आणता, होय ना ?"

मला गमत वाटली. ते प्राणी आणणारा मी नव्हतो, पण कोणी भारतीय वाघ, सिंह, हत्ती इतक्या दूरवर नेऊन त्यांचा व्यापार करतो ही माहिती मला मोठी रंजक वाटली तो धाडसी व्यापारी काहीसा माझ्यासारखा दिसत असावा हे उघड होतं मी त्या टॅक्सीड्रायव्हरला तसं सांगितलं. त्यावर तो म्हणाला, "तो माणूस पहा, दर वर्षी उन्हाळ्यात येतो मीसुद्धा एके काळी युद्धात भारतात होतो मी माझगाव डॉकमधे होतो मुंबईच्या लोकांनी मला फार प्रेमानं वागवलं. तुम्ही मुंबईचे आहात, म्हणून मला विशेषच आनंद झाला मायामीमधे मी तुमच्यासाठी काही करू शकेन, तर मला खचितच बरं वाटेल तुम्ही 'वाय एम् सी ए.'ला उतरणार आहात का ?" मी होकार दिला. त्यावर तो म्हणाला, "तुम्हाला जे हवं ते करायला तुम्ही स्वतंत्र आहात पण सल्ला म्हणून देतो.

हल्ली मायामीच्या 'वाय एम् सी. ए'मधे गुन्हेगार नीग्रोंच पेव फुटलय. चोऱ्यामाऱ्या सर्रास होतात तुम्हाला 'वाय एम् सी ए'पेक्षा स्वस्त आणि अधिक चागल्या दर्जाच हॉटेल दिल तर चालेल? त्यात माझा फायदा एवढाच की, एका मुबईकराची मी सेवा करू शकल्याच समाधान"

मी विचारात पडलो असे आपण होऊन मदत देऊ इच्छिणारे लोक लफगे असण्याचीही शक्यता असते पण परदेशात आपल्याला तो माणूस लफगा असेल अशी खात्री तरी कशी देता येईल? पण मला वाटल, हा हॉटेलच दाखवणार आहे. तो काही मला कुठं धोक्याच्या खाजगी घरात नेत नाही. मग जायला काय हरकत आहे? मी त्याच्याबरोबर गेलो त्यानं मला लेमिंग्टन रस्त्यावरच्या उत्कृष्ट 'लेमिंग्टन हॉटेल'मधे नेलं रस्त्यावर टॅक्सी पार्क करून तो आत व्यवस्थापकाकडे आला आणि म्हणाला, "हे मुबईचे माझे मत्र आहेत. याना अगदी सवलतीच्या दरातली उत्तम खोली द्या"

त्या अनोळखी टॅक्सीड्रायव्हरच्या ओळखीन मला फक्त सहा डॉलर्सला अतिशय सुंदर, शात, टी व्ही.–टेलिफोन वगैरे सर्व व्यवस्था असलेली खोली मिळाली मी त्याचे आभार मानले आणि टॅक्सीच्या भाड्याबरोबर एक डॉलर टिपही दिली पण माझा डॉलर परत करून तो म्हणाला, 'नाही! मित्रांच्याकडून मी टिप घेत नाही. हॅव ए नाइस स्टे. गुड नाइट"

त्या रात्री मी आर्थर शिग्ली याना फोन केला त्यांच्या मुंबईच्या मित्रान त्याच्यासाठी भेट म्हणून एक बाहुली दिली असल्याच सागितलं ते म्हणाले," या मित्राला मी अजून पाहिलेलही नाही, पण आमची मैत्री खूपच वाढली आहे कशी ते उद्या सागेन. उद्या सध्याकाळी तुम्ही माझ्याकडे जेवायला येऊ शकाल का? साडेसातला मी तुमच्या हॉटेलवर येईन"

दुसऱ्या दिवशी मी मायामीच्या एका साइटसीइंग टूरमधे सामील झालो मायामी हे अमेरिकेतल आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण शहर. अत्यत स्वच्छ, नितान्तसुंदर मोठमोठे धनवान इथं विश्रांतीसाठी 'बे बिस्केन' भागात येऊन रहातात अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाचंही या भागात एक निवासस्थान आहे. इथली नगरपालिका जगातल्या इतर कोणत्याही नगरपालिकेपेक्षा वेगळी आणि अत्यंत कडक आहे. मायामीला प्रत्येकानं आपल घर सुदर ठेवलच पाहिजे, घराबाहेर छानसा बगीचा केलाच पाहिजे, आणि त्या बागेतला पालापाचोळा वेळच्या वेळी काढून टाकलाच पाहिजे, असा नियम आहे. जर एखादा घरमालक यांपैकी काही करीत नसेल, तर नगरपालिका आपली माणसं पाठवून ती काम करते आणि घरमालकाकडून तो खर्च वसूल करते घराचं आर्किटेक्चर कस असाव, घराला बाहेरून रंग कसा असावा, घर फार उच असू नये, हे सर्व नगरपालिका ठरवणार. वर्षातून दोनदा मालकानं घराला रंग दिला नाही तर नगरपालिका रग देते. अर्थात खर्च मालकाला भरावा लागतो! कुत्री फिरवण्याचे वेगळे रस्ते आहेत. समुद्रकिनारा, भरपूर पाणी, डोळ्यात तेल घालून स्वच्छता आणि सौंदर्य राखून ठेवणारी नगरपालिका, जगातील

श्रीमान लोकांच वास्तव्य आणि 'हेल्थ रिझॉर्ट' म्हणून लाखो लोकांच विश्रांतिस्थान, या कारणामुळं मायामी हे अत्यंत नयनमनोहर आणि उत्साहजनक शहर झाल आहे या शहरातली चार–पचमाश लोकवस्ती प्रवाशाची असते आणि अर्थात ते हॉटेलात रहातात. त्यामुळ मायामीचा हॉटेलव्यवसाय हा अत्यत जोरदार आहे त्यांचा रुवाब काही वेगळाच आहे. प्रत्येक हॉटेलला प्रायव्हेट बीच म्हणजे खाजगी समुद्रकिनारा आहे आणि स्विमिंग पूल आहे या मायामीच्या हॉटेलांच्या खानदानीबद्दल आणि खादाडीबद्दल अनेक कथा प्रचलित आहेत उदाहरणार्थ, मायामीची हॉटेल्स इतकी शिस्तीची आहेत, की तिथ अघोळ करतानासुद्धा अंगावर सूट आणि नेकटाय असावा लागतो !

बेलबॉयन खोलीत सामान आणून ठेवल्यावर त्याला टिप देण्यासाठी प्रवासी मोड शोधू लागतो मोड मिळत नाही अस पाहून प्रवासी त्याच्या हातावर पाच डॉलरची नोट ठेवून म्हणतो, " अरे याची मोड घेऊन ये " बेलबॉय ती नोट खिशात घालून सलाम करून सांगतो, " साहेब, मायामीमधे पाच डॉलर हीच चिल्लर. त्याखालची मोड इथ मिळत नाही "

मायामीत एखाद्या हॉटेलचा रंग ओला नसेल, तर ते जुनपुराण झालं अस मानतात

मायामीत इतकी हॉटेल्स आहेत, की आणखी दोन हॉटेल तिथं बाधली, तरी सबध मायामी गाव अटलांटिक महासागरात बुडून जाईल !

मायामीतल एक हॉटेल इतक मोठं आहे, की आपल्याला स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळावा असा अर्ज त्या हॉटेलतर्फे अमेरिकेच्या मध्यवर्ती सरकारला करण्यात आला आहे

अशा या श्रीमती मायामीत माझ्यासारखा मराठी मध्यमवर्गीय माणूस बेधडक हिंडत होता आतापर्यंत मी सोळा देशांच्या सफरी केल्या आहेत त्यामुळं मला कुठही बिचकायला होत नाही, आणि श्रीमत लोक किंवा धनाढ्य देश, वस्त्या याचं दडपणही पडत नाही मायामीच्या एका प्रचंड हॉटेलवर ग्रीक पद्धतीचं शिल्प होत, त्याची इथं आठवण झाली त्या हॉटेलच्या पोर्चजवळ खाबाऐवजी ग्रीक लोकाच्या अवाढव्य मूर्ती होत्या आणि त्या मूर्तींनी हॉटेलच्या आठमजली इमारतीचा भार आपल्या डोक्यावर घेतला आहे अस ते शिल्प होत आमची गाइड बाई म्हणाली, " त्या मूर्तींनी डोक्यावर कसल ओझं घेतल आहे, माहीत आहे ? त्या हॉटेलच्या कर्जाचा बोजा त्याच्या मस्तकावर आहे ! "

मायामीचं नदनवनतुल्य निसर्गसौंदर्य जितक आठवणीत रहातं, तितकीच आणखी एक गोष्ट लक्षात रहात असेल तर ती म्हणजे तिथल्या अमेरिकन म्हाताऱ्या ! मायामी– इतक्या संख्येन आणि वयान म्हाताऱ्या स्त्रिया आयुष्यात मी इतरत्र कुठही पाहिल्या नाहीत. मोठमोठ्या हॉटेलांच्या व्हराड्यात खुर्च्या टाकून एकमेकीशी गप्पा मारीत बसलेल्या किंवा रस्त्यावरची रहदारी पहात जुन्या आठवणींत रमलेल्या इतक्या म्हाताऱ्या बायका तिथ दिसतात, की मायामीत चार दिवस रहाणाऱ्याला अमेरिका हा साठीसत्तरीपलिकडच्या बायकाचाच देश आहे की काय असं वाटेल. अमेरिकेत–– आणि जगाच्या बहुतेक इतर

देशांत— पुरुषाच्यापेक्षा स्त्रिया दीर्घायुषी असतात. या निवृत्त झालेल्या आणि त्याच्यापैकी बऱ्याच विधवा स्त्रिया उत्तम हवेसाठी मायामीत येऊन मुक्काम ठोकतात आणि दिवसच्या दिवस खुर्च्यांवर बसून बराच काळ कठतात म्हाताऱ्या असल्या तरी या बाया विलक्षण उत्साही असतात नव्या ओळखी काढण, ' तुमच्या भारतात आता अन्नपरिस्थिती कशी आहे ?' अशी चौकशी करणं, अधूनमधून फिरायला, पोहायला किंवा नौकाविहाराला जाण ही काम त्या उत्साहान करतात सौंदर्यप्रसाधनं वापरण्यात या बायकाचा हात कुणीही धरू शकणार नाही.

अमेरिकेत ऐन तारुण्यातल्या पोरी मुळीच प्रसाधनं न वापरता नैसर्गिक सौंदर्यावर आणि यौवनावर भाव मारतात पण वय जस वाढत तसा कृत्रिम प्रसाधनावरचा विश्वासही वाढू लागतो त्यामुळ मायामीतल्या विपुल वृद्ध स्त्रियाच्यासाठी कोपऱ्याकोपऱ्यावर ' ब्यूटी सॅलन्स ' आहेत, आणि त्यांच्या गुलाबी खुणा शहरातल्या हजारो म्हाताऱ्या स्त्रियांच्या चेहेऱ्यावर पहायला मिळतात. त्यातली एखादी म्हातारी आपल्या प्रेमात पडू नये म्हणून मायामीत मला फार कष्ट पडले पण अखेर त्यात मी यशस्वी झालो कारण एकदा मी रस्त्यावरून एकटाच भटकत असता एका रंगलेल्या आणि रंगेल म्हातारीन आपली ' कॅडि-लॅक ' थांबवून मला ' लिफ्ट ' दिला. पण तिच्या वयाबद्दल आदर दाखवून मी भारतातल्या दुष्काळाबद्दलच चर्चा करून माझी कशीबशी सुटका करून घेतली !

# अमेरिकेत महाराष्ट्राचा अभ्यास

१

मायामीतील सर्वात प्रेक्षणीय ठिकाण म्हणजे मत्स्यालय. जगातलं हे सर्वात मोठं आणि अत्यंत आकर्षक असं सी–अक्वेरियम आहे त्यात देवमासा, शार्क, प्रचंड कासवं, सील प्राणी वगैरे सागरी जीव नुसते ठेवलेले आहेत असं नाही, तर त्यातले बरेच प्राणी खेळ करून दाखवतात सील प्राणी क्रिकेट खेळतात, प्रचंड फ्लिपर मासे जळत्या कड्यांतून उड्या मारतात, एक सील पियानो वाजवतो, कपाळावर चेंडू किंवा पाण्याचा भरलेला ग्लास घेऊन जिन्यावर चढतो आणि उतरतो, वेगान जाणाऱ्या मोटारीची नक्कलही करतो देवमाशांच्या खेळात दोन अवाढव्य देवमासे पाण्याच्या वर पंधरा फूट उंच लावलेली घंटा वाजवतात आणि चेंडून खेळतात पाण्यावर जाऊन ते प्रचंड धूड खाली पाण्यात कोसळतं, तेव्हा पाण्याचे उंच फवारे उडतात आणि काही प्रेक्षक भिजतात एक मासा त्याच्या ट्रेनर बाईसाठी काठावर येऊन गोड— किंवा खारटही असेल— चुंबनही देतो क्रूर शार्क मासा इतर प्राण्यांना कसा कुरतडून खातो याचं प्रात्यक्षिकही इथं दाखवण्यात येतं एका दोरीला बांधून काही मासे शार्क माशाच्या तळ्यात सोडण्यात येतात आणि ते शार्क आपल्या जेवणाचे लचके तोडतात. लाल रक्त पाण्यात मिसळून जातं.

फ्लिपर माशाचा मनोहर खेळ चालू होता, तेव्हा माझ्या जवळ एक साठीच्या घरातलं जोडपं बसलं होतं त्यातल्या बाईचं लक्ष त्या छानदार खेळाकडे नव्हतंच त्या ठिकाणीही ती घरगुती कुरबुरी काढून पिरपिर करीत होती. " आपण मोठ्या सुनेकडे गेलो होतो, तेव्हा तिनं मला धड


जेवायलासुद्धा घातल नाही तुम्हाला नि मला लंच, डिनर किती कमी देत होती. आपण पुन्हा मोठ्या सुनेकडे जायचं नाही " नवरा बिचारा मनात म्हणत असेल की, घरगुती कटकटी विसरायला आपण इथं आलो पण इथही तेच ऐकायच, तर एवढा लांबचा प्रवास करून आलोच कशाला ?

सी–अक्वेरियमचा कार्यक्रम चांगला तीनचार तासाचा भक्कम असतो तो मनमुराद पाहून मी हॉटेलवर आलो. आर्थर शिग्ली मला न्यायला सध्याकाळी ठरल्या वेळी आले. जिम्मी म्हणून मुबईला त्यांचा जो मित्र आहे, त्याची गमतीची गोष्ट त्यांनी सागितली. ते म्हणाले, " या जिम्मीला मी अजून पाहिलेलही नाही. पण मी एक घरगुती रेडिओ–स्टेशन चालवतो त्याला ' हॅम रेडिओ ' म्हणतात या जिम्मीच्या घरीही असच हॅम स्टेशन आहे एकदा माझ्या रेडिओवर त्याच्या रेडिओचे सिग्नल येऊ लागले मग आम्ही सभाषण सुरू केल त्यातून पत्रव्यवहार सुरु झाला भेटीच्या वस्तूही आम्ही एकमेकांना पाठवल्या. त्यान आपल्या कुटुबियांचे फोटो पाठवले आणि मीही पाठवले. जशी पत्र–मैत्री असते, तशी आमची ही रेडिओ–मैत्री आहे ! " मग शिग्लीनी आपल्या पत्नीची ओळख करून दिली जिम्मीन मुबईहून पाठवलेल्या वस्तूसह त्यानी माझा आणि आपल्या पत्नीचा फोटो काढला आपल्याला भेटवस्तू मिळाल्याचा पुरावा म्हणून त्यानी तो फोटो मुबईला जिम्मीकडे पाठवून दिला जिम्मीची बान्द्रा इथं लाकडाची वखार आहे तो एक उत्साही पारशी आहे त्याची काही लांबलांब पत्रंही शिग्लीनी मला दाखवली स्वत शिग्ली हे मायामीच्या टेलिव्हिजन केंद्रात तज्ञ म्हणून काम करतात जगाच्या कुठल्या कोपऱ्यातले लोक दुसऱ्या कोपऱ्यातल्या लोकांशी कसा सवाद साधतात आणि त्यांना त्याचं किती कौतुक असत, हे पाहून मला आनंद झाला.

दुसऱ्या दिवशी मी मायामीहून जाणार होतो न्यूयॉर्कला जावं आणि तिथून अमेरिकेत पहाण्यासारखी राहिलेली दोन ठिकाणं म्हणजे डेट्रॉइट आणि नायगारा धबधबा ही पहावी असा माझा आधी विचार होता न्यूयॉर्कला माझं दुसर काही काम नव्हत. पण माझ्याजवळचे पैसे सपत आले होते, आणि माझ्या पगाराचे दोन चेक न्यूयॉर्कला वटवून पैसे घ्यायचे एवढच माझं न्यूयॉर्कच काम होतं पण मी स्वत शीच म्हटल, ' हे चेक मायामीला वटतात की काय ते पाहू तरी ! ' समोरच एक बँक होती, तिथं गेलो तियला व्यवस्थापक म्हणाला, ' फ्लॉरिडाच्या स्टेट बँकेत प्रयत्न करून पहा ' तीही चार पावलावरच होती कॅशियर म्हणाला, ' व्यवस्थापकाना भेटा ' व्यवस्थापकाकडे गेलो माझे चेक, आयडेन्टिटी कार्ड, पासपोर्ट दाखवला त्यावर तो व्यवस्थापक म्हणाला, " मी तुमचे पैसे अवश्य देईन पण मला सांगा, मायामी तुम्हाला कस शहर वाटल ?" मी म्हटल, " मला तुमचा गाव फारच आवडला. " त्यावर ते म्हणाले, ' तुम्हाला रहाण्या–जेवण्याचा काही त्रास झाला नाही ना ? मी कधी भारतात गेलो नाही. पण माझे दोनतीन भारतीय मित्र आहेत आमचं मायामी म्हणजे प्रवाशाच गाव आहे त्यामुळं क्वचित मायामीच्या नागरिकाकडून तुमच्याशी तुटक वर्तन झाल असेल,

दुर्लक्ष झाल असेल तर मी त्याच्या वतीन दिलगिरी व्यक्त करतो " मी म्हटल, " छे छे ! उलट मला इथ फारच चांगली वागणूक मिळाली " मग त्यानी माझ्या कामाची, साहित्याची, रहाण्याच्या व्यवस्थेची आस्थेन चौकशी केली आणि काही साहाय्य हव असल्यास आपण आनदान देऊ असं सांगितलं नतर ते स्वत कॅशियरजवळ आले आणि चेकच्या मागे आपली ओळख घालून त्यानी मला पैसे दिले ओळखदेख नसताना आणि चेक वटवण्या-सारखं रुक्ष काम असतानाही त्या व्यवस्थापकान जो जिव्हाळा दाखवला तो सस्मरणीय आहे. त्याच्यामुळं माझा न्यूयॉर्कला जाण्याचा वेळ आणि त्रास वाचला. मी त्याचे मन पूर्वक आभार मानून हॉटेलवर आलो विमानाच्या वेळा पाहिल्या आणि शिकागोला माझे मित्र अरुण टेंबे याना फोन केला सध्याकाळी विमानतळावर येऊन मला घरी नेण्याच त्यांनी आनंदानं मान्य केल

सध्याकाळी ठरल्याप्रमाण अरुण हा उमदा, हसतमुख तरुण विमानतळावर आला होताच त्यान आपल्या कॅडिलॅकमधून मला घरी नेल वाटेत बऱ्याच घरावर आणि दुकानावर राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरलेले पाहून मी त्याच कारण विचारल तेव्हा अरुणन सागितल,




डॉल्फिन माशाची कसरत

" काल रात्री शिकागोला भयकर रेल्वे–अपघात झाला ऐंशी माणस ठार झाली आणि दोन–अडीचशे जखमी झाली हा अपघात आमच्या घरासमोरच झाला. रात्रभर आम्हाला किंकाळ्या, आरडाओरडा, अँब्युलन्सचे आवाज ऐकू येत होते माझी बायको हॉस्पिटलमधे काम करते तिला तातडीचा ड्यूटी कॉल आला ती रात्रभर तिथंच होती. या अपघाता-बद्दल शोक करण्यासाठी राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवण्यात आले आहेत. आज राष्ट्राध्यक्ष निक्सन शिकागोला येणार होते पण अपघातामुळ त्याची भेट पुढं ढकलली आहे. "

हा अपघातही मोठ्या विलक्षण रीतीन घडला होता. एक आगगाडी त्या स्टेशनवर थाबली लोक उतरले गाडी पुन्हा चालू झाली मग काही उतारूंच्या लक्षात आल की आपल्याला त्या स्टेशनवर उतरायच होत म्हणून त्यानी गाडी थाबवली त्याना उतरता यावं म्हणून ड्रायव्हरन पुढ गेलेली गाडी पुन्हा प्लॅटफॉर्मवर आणली दरम्यान मागून भरधाव येत असलेल्या आगगाडीला पुढची गाडी स्टेशनवरून निघून गेल्याचा आधीचा संदेश मिळाल्यामुळ ती गाडीही त्याच प्लॅटफॉर्मवर आली आणि दोन गाड्यांची भयंकर टक्कर झाली रात्री आमच्या घरातील काचेच्या खिडक्यांतून त्या दोन्ही भकास, भग्न गाड्या मोडून पडलेल्या दिसत होत्या

अरुणचे एक मित्र डॉ माद्रेकर म्हणून होते त्याची खूप इच्छा होती, की मी त्यांच्याकडे लॅन्सिगला जाव, एखादा दिवस रहाव माझा तर बेत होता की शिकागोहून डेट्रॉइटला जायच, तिथ फोर्डचा मोटर–कारखाना पहायचा आणि मग नायगाराचा धबधबा पाहून न्यूयॉर्कला परतायच माझ विमानाच एकवीस दिवसाच तिकिटही संपत आल होत फार तर तीन दिवस उरले होते रात्री अरुणन माद्रेकरना फोन केला. आणि तो माणूस इतका आर्जवी, ऋजू वाटला, की मी माझा पूर्वीचा बेत बदलून त्याच्याकडे एक दिवस रहायच ठरवल आणि माझा तो निर्णय अत्यत योग्य होता असा मला अनुभव आला. लॅन्सिग गावापासून विमानतळ पचाहत्तर मैलावर होता म्हणजे मला उतरून घेण्यासाठी डॉ. माद्रेकराना दीडशे मैल प्रवास करावा लागणार होता पण तो त्यानी आनदान केला

सध्याकाळी पाचच्या सुमाराला मी विमानतळावर उतरलो सामान घेतलं आणि प्रवाशांच्या लॉबीत गेलो तिथं कुणीही भारतीय नव्हता मी माद्रेकराना पाहिलेलं नव्हतं त्यामुळ ते कसे दिसत असतील याची कल्पना नव्हती पण त्या लहानशा विमानतळावर ते एकच भारतीय असणार होते, म्हणून मला वास्तविक अडचण भासू नये पण एकही भारतीय दिसेना, तेव्हा माद्रेकराच्या घरी फोन करावा की काय याचा मी विचार करीत होतो. तोच समोरच्या दरवाज्यातून एक अतिशय देखणा, गोरापान तरुण धावत येताना दिसला तो एखादा ग्रीक तरुण असावा अस मला वाटल तोच तो माझ्या समोर येऊन धापा टाकीतच म्हणाला, तुम्ही रमेश मत्री का ? मी विद्याधर. " पुरुषातच काय, पण सुदर बायकात त्याला ठेवला, तरी त्याच सौंदर्य लक्षात याव असा तो होता मी त्याच्याशी हस्तादोलन केल आणि म्हटलं, " तुम्ही फार गडबडीत आलात वाटतं ? " विद्याधर म्हणाला, " वेळ झाला म्हणून गाडी पार्क केल्याबरोबर धावतच निघालो " मग आम्ही



मायामीमधील सी–अक्वेरियम देवमाशाना कसरतीच्या दरम्यान खाऊ म्हणून छोटे मासे देण्यात येत आहेत.

त्याच्या मोटारीन निघालो तो अतिशय बुद्धिमान, रसिक आहे, हे लगेच कळून आल गणित हा त्याचा विषय त्या विषयात त्यानं एवढ नैपुण्य संपादन केल होत, की तिशी ओलांडण्याच्या आतच तो गणिताचा फुल प्रोफेसर झाला होता मिशिगन स्टेट विद्या– पीठातील तो सर्वात तरुण प्रोफेसर होता त्याच्या हाताखाली अनेक अमेरिकन गणितज्ञ काम करीत होते त्याला सगीताची, साहित्याची खूपच आवड होती. त्यानं मराठी काही साहित्य वाचल होत

आम्ही ज्या दिवशी विद्याधरकडे गेलो, तो दिवस अमेरिकेत हॅलोविन या सणाचा

होता हा चेटकिणीचा सण असतो त्या दिवशी सध्याकाळी लहान मुलं भुताखेतांचे मुखवटे तोंडावर चढवून मोठ्या लोकाना अडवतात आणि " ट्रिक ऑर ट्रीट ?" असा धमकीवजा प्रश्न विचारतात त्याना म्हणायच असत की, " बऱ्या बोलानं आमची खडणी द्या, नाहीतर आमची एखादी ठेवणीतली क्लृप्ती लढवून आम्ही तुमची फजिती करू आणि त्रास देऊ " यावर मोठ्या लोकानी घाबरून म्हणायच असत, " नको रे भुता मला त्रास देऊ हे बघ, मी तुला देणगी देतो. " अस म्हणून मोठी माणस मुलांना चॉकलेटस्, गोळ्या, केक वगैरे देतात तीनचार वर्षांची मुल आणि मुली जेव्हा आईच्या किंवा वडिलाच्या हाताला धरून घरोघर जातात आणि तोंडावर चेटकिणीचा मुखवटा घालून भीती दाखवतात, तेव्हा मोठ्या मौजेचं दृश्य दिसतं. त्या रात्री प्रत्येक घरात चॉकलेट-गोळ्याची बडी पाकिटं आणून ठेवली जातात आणि मुल ती खडणी वसूल करून कृतार्थ होऊन परत येतात

विद्याधरला दोन मुलगे आहेत मी त्याच्याकडे गेलो तेव्हा मोठा असेल तीन वर्षांचा, आणि धाकटा सव्वा वर्षाचा. त्या दोघांना घेऊन आई हॅलोविनला जायच्या तयारीत होती. दारात एकसारखी मुलं येत होती आणि विद्याधरची मुलं त्यांना चॉकलेट्स देत होती एक छोटा मुलगा आपल्या वडलाच्याबरोबर आला त्याला चॉकलेट्स दिल्यावर विद्याधरनं माझी आणि त्या मुलाच्या वडिलाची ओळख करून दिली मिशिगन स्टेट विद्यापीठात ते भौतिकशास्त्राचे एक नामवत प्राध्यापक आहेत अस सागितलं त्यानीही काही नम्र उत्तर दिल आणि दोनचार मिनिट थट्टाविनोद करून ते मुलाला बोटाला धरून गेले मग विद्याधर म्हणाला, " हा गृहस्थ इतका साधा दिसतो पण या वर्षीच्या भौतिकशास्त्राच्या नोबेल पारितोषिकासाठी त्याचं नाव सुचवण्यात आल होतं, इतका तो महान आहे " मी कौतुकानं त्या पाठमोऱ्या शास्त्रज्ञाकडे पहात राहिलो एक जुना ओव्हरकोट घालून तो आपल्या मुलाच कौतुक करीत चालला होता

विद्याधरची पत्नी वीणा मुलाना घेऊन हॅलोविनसाठी गेली आम्ही प्रवासाहून दमून आलो होतो विद्याधरन टेपरेकॉर्डरवर शास्त्रोक्त सगीताचा टेप लावला आणि आपल्या मद्याच्या कपाटाकडे नेऊन मला विचारल, ' तुमच आवडतं पेय कोणत ?" त्याच्याकडे शिवास रीगल, व्हॅट, टीचर्स, जॉनी अशी सर्व प्रकारची व्यवस्था होती आम्ही शिवासची बाटली उघडली आणि सगीताच्या पार्श्वभूमीवर गप्पाचा अड्डा टाकला थोड्या वेळान वीणाताईही आल्या आणि सामील झाल्या मुल माझ्याभोवती ' अंकल अकल ' म्हणून घुटमळत होती घराच्या काचेच्या भितीतून आसपासच्या घरात केलेली हॅलोविनची रोषणाई दिसत होती दिवाळीचाच थाट होता मुलांचे थवे ' ट्रिक ऑर ट्रीट ' करीत हिंडत होते वातावरण अगदी उत्साही, आनंदी होत त्या साऱ्या सुखद आसमतात आमचा वेळ फारच छान गेला. आम्ही जेवायला उठलो तेव्हा रात्रीचा एकदीड तरी वाजला असावा

इतक्या रात्री झोपूनही मला सकाळी सहालाच जाग आली. घरात आणि बाहेरही सार शात होत कारण हॅलोविननिमित्त काल सर्वांनाच जागरण झाल होत. मी तोंड धुऊन

सगीताचा टेप लावला आणि एक मासिक चाळीत दिवाणखान्यात बसलो. सहज माझं लक्ष समोरच्या जिन्याकडे गेल, तर विद्याधरचा धाकटा मुलगा जिन्यावरून खाली येत होता तो रागतच येत होता जिना उतरून तो माझ्या जवळ आला आणि मला बिलगून म्हणाला, " अंकल, क्सि् मी " मी प्रेमभरानं त्याला जवळ घेतल आणि त्याचा पापा घेतला, तेव्हा तो खुषीत आला घरात सगळीजणं झोपलेली. तेव्हा हा छोटा मानवी स्पर्शासाठी आसुसलेला होऊन कुणालातरी शोधतशोधत आला होता हा पाव्हणा आपला पापा नक्की घेईल अशा विश्वासान मला त्यान तो हुकूम फर्मावला होता मीही त्या पडत्या फळाची आज्ञा घेतली मग खूप वेळ तो माझ्या अंगाखांद्यावर हसत-खेळत होता अमेरिकेच्या माझ्य' प्रवासातली ती एक हृद्य आणि रम्य आठवण आहे.

सकाळी विद्याधरनं मला मिशिगन स्टेट विद्यापीठ दाखवल अमेरिकेत एखाद विद्यापीठ पहावं अशी माझी खूप इच्छा होती. पण मोटार असल्याशिवाय अमेरिकेतल विद्यापीठ पहाण महा कर्मकठिण आहे कारण विद्यापीठाच ' कॅंपस ' किंवा क्षेत्र कित्येक एकर पसरलेल असत. विद्याधरन मला विद्यापीठाच्या वेगवेगळ्या इमारती, होस्टेल्स, ग्रंथालय वगैरे सर्व विभाग दाखवले मग आम्ही त्याच्या गणिताच्या विभागात आलो त्यानं माझी आणि आपल्या सहकाऱ्याची ओळख करून दिली कॅन्टीनमधे चहा घेऊन आम्ही मराठी विभागाकडे गेलो. अमेरिकेत पधरासोळा विद्यापीठातून मराठी भाषा शिकवतात असं मी वॉशिंग्टनला लायब्ररी ऑफ कांग्रेसमधे ऐकल होत म्हणून म्हटल की, इथं कोणत नि काय मराठी शिकवतात ते तर पाहू मिशिगन स्टेट विद्यापीठात प्रा वसंत खोकले नावाचे उत्तर-हिंदुस्थानातले मराठीभाषिक प्राध्यापक हे मराठी विषयाचे प्रमुख आहेत त्यांनी माझ हार्दिक स्वागत केल आणि मराठी विषयाची पुस्तकं दाखवली मी सहज ती पुस्तक पाहिली, तर त्यात माझं एकही पुस्तक नव्हत. मी विचारलं, " या पुस्तकाची निवड तुम्ही कशी केलीत ? " कारण माझ्याप्रमाणच पु. ल. देशपाडे, आचार्य अत्रे, प्रा फडके अशा इतर लेखकाचीही पुस्तक त्यात नव्हती. त्यावर प्रा. खोकले म्हणाले, " खर तर ही पुस्तक आम्ही शिकागो विद्यापीठाकडून आणली आपल्याला नको असलेली पुस्तक ते विद्यापीठ दर वर्षी ' रिजेक्टेड ' म्हणून काढून टाकतं, त्यातली काही आम्ही आणतो. ' मी थट्टेनं म्हटल, " मग बरोबरच आहे. माझी पुस्तकं कुठलच विद्यापीठ टाकून देणार नाही, आणि म्हणून ती इथ दिसणारही नाहीत '

लॅन्सिंगसारख्या बाजूच्या गावी कोण मराठी शिकत असेल, असाही प्रश्न माझ्या मनात होताच त्याला उत्तर देताना प्रा. खोकले म्हणाले, " मराठीचे विद्यार्थी मिळवणं घोड अवघड आहे हे खर सध्या आमच्या विषयाला एकच चिनी विद्यार्थिनी आहे " म्हणजे एक विद्यार्थिनी आणि तीन प्राध्यापक असं हे प्रमाण आहे. प्रा गुप्ते आणि दुसरे कोणीतरी पार्ट-टाइम प्राध्यापक तिथ मराठी शिकवतात. या चिनी विद्यार्थिनीला बौद्धधर्माचा अभ्यास करायचा आहे. त्याला उपयोगी पडेल म्हणून ती हिंदी आणि मराठी शिकते आहे. अधिक विद्यार्थी येईपर्यंत प्रा. खोकले आणि त्यांचे सहकारी ' अमेरिकन सस्कृतीचा आफ्रो-

एशियन सस्कृतीवर परिणाम ' या विषयावर सशोधन करीत आहेत प्रा खोकले हे मराठीचा अमेरिकेत विकास व्हावा याबद्दल अतिशय आस्था बाळगणारे आहेत त्यांनी गेल्या काही महिन्यांतील सशोधनविषयक परिषदा आणि प्रबध यांचा एक अहवाल नंतर माझ्याकडे पाठवला त्यावरून सध्या जरी मिशिगन स्टेटला मराठीच्या विद्यार्थ्यांची कम-तरता असली, तरी मराठी विषय टिकावा आणि वाढावा म्हणून प्रा खोकले आणि त्यांचे सहकारी यानी चालवलेल्या प्रयत्नाची कल्पना येते.

महाराष्ट्राचा अभ्यास करण्यासाठी अमेरिकेत ' महाराष्ट्र स्टडीज् ग्रूप ' या नावाची एक सघटना स्थापन झाली आहे तिची माहिती प्रा वसंत खोकले यांनी सागितली या ग्रूपची वार्षिक सर्वसाधारण सभा मे महिन्यात होऊन जी समिती निवडण्यात आली, तीत दोन महाराष्ट्रीय ( प्रा खोकले आणि प्रा बी जी. गोखले) आणि चार अमेरिकन आहेत. त्यांपैकी काही अमेरिकन पुणे येथील ' अमेरिकन इन्स्टिटयूट फॉर इडियन स्टडीज्'-मधे अभ्यास करून गेले आहेत पेन विद्यापीठात झालेल्या परिषदेत एकोणीस प्रबध सादर करण्यात आले त्यांचे विषय आणि लेखक याची काहीशी कल्पना पुढील यादीवरून येईल

(१) ' महाराष्ट्रातील बौद्धपथ ' बी जी गोखले, वेक फॉरेस्ट विद्यापीठ (इ. स. ५०० ते ७०० हा काळ या संशोधनासाठी घेतला आहे ) (२) ' संत एकनाथ ' श्रीमती एलिनॉर झिलियट, कार्लटन कॉलेज (३) ' खडोबाचे अनुयायी आणि सोमवती अमा-वास्या जॉन स्टॅन्ले, लॉरेन्स विद्यापीठ. (४) ' महाराष्ट्रातील नावे ' इदिरा जगह रे मिनेसोटा विद्यापीठ (५) ' महाराष्ट्रातील सगीत ' मायकेल रोझेस, पेन्सिल्वेनिया विद्या-, पीठ (६) ' महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा ' जॉन रॉबर्टसन, पेन्सिल्वेनिया विद्यापीठ. (७) ' छत्रपती शाहूमहाराजांच्या कारकीर्दीतील कोल्हापूरची ब्राह्मणेतर चळवळ ' चद्र मुदलियार, हैडलबर्ग विद्यापीठ (८) ' महाराष्ट्राच्या शहरीकरणाचे शतक ' बी. डी काळे, मिनेसोटा विद्यापीठ. (९) ' टिळक आणि मुसलमान ' व्ही डी. राव, फिस्क विद्यापीठ. (१०) ' अठराव्या शतकातील माळवा ' स्टुअर्ट गॉर्डन, मिशिगन विद्यापीठ. (११) ' मोडी लिपी ' प्रा वसत खोकले.

विशेष म्हणजे या ग्रूपने इरावती कर्वे यांच्या नावे एक निधी जमवला आहे आणि त्यातून काही भारतीय ग्रंथांची खरेदी केली आहे महाराष्ट्रातील विद्वानाकडूनही सस्थेने प्रबंध मागवले आणि त्यांत दि के बेडेकर, ग ह. खरे, अशोक केळकर, नरेश कवडी इत्यादींनी उत्तम सहकार्य दिले आहे धनगराच्या रीतिरिवाजांवर एका अमेरिकन प्राध्या-पकांनी लिहिलेला एक प्रबध यात आहे एलिनॉर झिलियट या मराठी साहित्याची विस्तृत सूची तयार करीत आहेत. अमेरिकेसारख्या दूरच्या देशातही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनावर चाललेल इतक मोठं सशोधन पाहून मला सानंद आश्चर्य वाटल

लॅन्सिगजवळच जगप्रसिद्ध ओल्डस्मोबाइल मोटारींचा कारखाना आहे, तो पहायला मी आणि विद्याधर गेलो. तिथ आपल्या डोळ्यासमोर दर अर्ध्या मिनिटाला एक मोटार तयार होताना दिसते विविध रगाच्या, सुबक, सुदर मोटारी पटपट बाहेर पडताना मोठी

मत वाटते. आम्ही दीड तास फिरून सबंध कारखाना पाहिला आणि घरी आलो. मला दुपारी चारला डेट्रॉइटला निघायच होत. विद्याधरकडे आम्ही जेवण केलं आणि त्याच्या कुटुंबियाचा प्रेमळ निरोप घेऊन मी त्याच्याबरोबर विमानतळावर गेलो तिथं ' वन फॉर द रोड ' म्हणून आम्ही बारमधे शेवटची बीअर घेतली डेट्रॉइटला सुदर्शन गोखले याना मी फोन केला होता तेही मला न्यायला आले होते त्या रात्री त्यांच्या पत्नीनं उत्तम जपानी पद्धतीच जेवण केल होत. लाकडी काड्यांनी ते जेवण घेण्याची कसरतही मी केली. गोखल्याच्या पत्नी पाकशास्त्रात तज्ज्ञ होत्या हे त्या लाकडी काड्याकरवी मुखात पोचलेल्या अन्नान सिद्ध केलं. माझ्या तिकिटाचा आता एकच दिवस उरला होता, आणि तिकिट बफे–लोला ( नायगारा ) संपवायचं होतं त्यामुळ दुसऱ्या दिवशी फोर्डचा जगप्रसिद्ध कारखाना पाहिल्याबरोबर मला लगेच बफेलोला जाणं भाग होत. सुदर्शन गोखले हे बऱ्याच खस्ता खाऊन तावूनसुलाखून निघालेले, सर्वांना साहाय्य करण्याचा मनापासून प्रयत्न करणारे रसिक मित्र होते पु ल देशपांडे त्यांच्याकडे राहून दोन दिवसापूर्वीच गेले होते ते ज्या खोलीत रहात होते तीच खोली जेव्हा सुदर्शन गोखले यानी मला दिली, तेव्हा मी गमतीन म्हटल, " अरे वा ! शेवटी पु. ल. देशपांडे याची गादीच नव्हे, तर उशीही मला मिळाली की ! "

गोखले याच घर अमेरिकेच्या अगदी टोकाला आहे. इतक, की त्याच्या घरापासून तीसचाळीस फुटावर जी नदी आहे तिच्या अलिकडची अमेरिका आणि पलिकडचा कॅनडा देश. जेवण झाल्यावर गोखले यानी मला गावातल्या आइस रिंककडे नेल तिथ त्याची मुलगी बर्फावर स्केटिंग करायला गेली होती एका प्रचड घुमटाखाली यत्रान पाणी गोठवून भलीमोठी आइस रिंक तयार केली होती आणि तीवर पन्नासपाऊणशे स्त्री–पुरुष–मुल स्केटिंग करीत होती तिथं अर्धा तास थाबून आम्ही घरी परतलो दुसऱ्या दिवशी फोर्ड कारखाना पाहिल्यावर डॉ. पाटील या गोखल्यांच्या स्नेह्याकडे जेवायला जायच होत फोर्ड कारखान्याच्या प्रवेशद्वाराजवळ गोखल्यांनी मला सोडल आणि ते गेले. आमची कारखान्याची सफर पूर्ण झाल्यावर ते पुन्हा परत येणार होते कारण त्यानी कारखाना अनेक वेळा पाहिला होता या कारखान्यात ठराविक वेळी वीसपंचवीसजणाच्या गटाला सबंध कामकाज दाखवण्याची व्यवस्था केलेली असते मी तिथ असलेला फॉर्म भरला आणि इतर लोक जमण्याची वाट पहात बसलो तेवढ्यात मला अचानक शुद्ध कोल्हापुरी आवाजात कुणीतरी हाक मारली, " अहो, तुम्ही कोल्हापूरचे ना ?" मी चमकून पाहिल, तो एक उंच, भरदार, रुबाबदार कोल्हापुरी तरुण समोर उभा तो म्हणाला, " मी जयसिंग कुसाळे. मीही कोल्हापूरचाच या बावड्याच्या राणीसाहेब " त्यानं बावड्याच्या राणीसाहेबाची ओळख करून दिली मी पधरासोळा वर्षांपूर्वी कोल्हापूरला पत्रकार असताना त्याना कुठतरी पाहिल्याच, भेटल्याचं आठवल हा कुसाळे म्हणजे भारतात शूटिंग किंवा नेमबाजीत पहिला आलेला आणि ऑलिंपिकमधे भारताच प्रतिनिधित्व केलेला दिलदार, उमदा तरुण आहे अतिशय गरिबीतून तो वर आला अनेक लहानसहान काम करीत तो एका तुरुंगाचा नायब

जेलर झाला पण त्या नोकरीचा राजीनामा देऊन तो कोल्हापूरच्या ह्यूम पाइपमधे काम करू लागला नेमबाजीत तो इतका निष्णात आहे, की हवेत टाचणी उडवून तो ती टाचणी अचूक बंदुकीने टिपून दाखवतो त्यानं 'नायसन ट्रॅव्हल्स' नावाची प्रवासी एजन्सीही कोल्हापूरला काढली आहे, आणि त्या एजन्सीचा प्रतिनिधी म्हणून तो या वेळी अमेरिकेला आला होता. अर्थात अमेरिकेला तो पूर्वीही येऊन गेला होता. त्यानं पाच वेळा जगप्रवास केला आहे. एकमेकांना डेट्रॉइटसारख्या दूरच्या गावी भेटून आम्हा दोघांनाही खूप आनंद झाला पण फोर्ड कारखान्याच्या सफरीनंतर तो आणि मी विरुद्ध बाजूंना जाणार होतो. त्यामुळं अमेरिकेत आम्ही पुन्हा भेटू शकलो नाही

आमची फोर्डची सफर सुरू झाली. जगातला हा सर्वात मोठा मोटार–कारखाना चार लाख कामगार त्यात काम करतात, तरीही अनेक विभाग संपूर्णपणे ऑटोमॅटिक आहेत जगात खपणाऱ्या एकंदर मोटारींपैकी तेरा टक्के मोटारी फोर्डच्या असतात, यावरून त्याच्या अवाढव्य कारभाराची काहीशी कल्पना येईल पोलादाच्या प्रचंड ओंडक्यापासून संपूर्ण मोटार आपल्या डोळ्यासमोर घडत जाताना इथं दिसते. या कारखान्याच्या फौंडरी विभागात तप्त पोलाद पाहून आणि दूरवरही येणारी धग सोसून भोवळ यायची पाळी येते. एकदा चेसवर एकएक भाग यंत्रानं बसू लागले, की मग मात्र गंमत वाटते. फाल्कन, मुस्टांग, मॉव्हरिक अशी नयनमनोहर मॉडेल्स सुखद रंगात पटपट बाहेर पडतात आणि लगेच प्रत्येक मोटारीत एकएक ड्रायव्हर बसतो नि ती चाचणीसाठी घेऊन जातो

डेट्रॉइट हे अमेरिकेतलच नव्हे, तर जगातलं मोटारउत्पादनाचं सर्वात मोठं केन्द्र आहे मोटारींचे शेकडो प्रकार, रंग, नव्या सुधारणा या फोर्ड कारखान्यात पहायला मिळतात त्याबद्दल अनेक विनोद अमेरिकन वृत्तपत्रांत आणि दूरचित्रवाणीत दिसतात. मी अमेरिकेत होतो तेव्हा तेलटंचाईला नुकतीच सुरुवात झाली होती. म्हणून फोर्डनं नवी मोटार शोधून काढली ती तेलावर चालत नाही, तर आपल्या घरातल्या विजेवरही चालू शकते. फक्त तीन डॉलरच्या विजेवर ही मोटार न्यूयॉर्क ते लॉस एंजेलिस हे २८०० मैलांचं अंतर जाऊ शकते त्यात अडचण एकच आहे -- तिला तीन हजार मैल लांबीची वायर जोडावी लागते !

डेट्रॉइटनं एक नवी मोटार तयार केली तिला रंगाऐवजी गाईचं कातडं लावलं होतं. ती दिसायला चांगली होती पण रस्त्यातून ती जाऊ लागली की बैलांचे तांडेच्या तांडे तिचा पाठलाग करीत ! म्हणून ती मोटार रद्द करावी लागली !

एक माणूस डेट्रॉइटच्या एका सेकंडहँड मोटारच्या दुकानात आपली मोटार विकायला गेला. मोटारीची तपासणी करून दुकानदार म्हणाला, "पन्नास सेंट देऊ" मोटारमालक संतापानं म्हणाला, "पन्नास सेंट ? एवढ्या मोठ्या मोटारीची फक्त एवढीच किंमत ?" दुकानदारानं सांगितलं, "मोटार आम्हाला फुकटसुद्धा नको पेट्रोलटँकमधे कपभर पेट्रोल शिल्लक आहे, त्याचे पन्नास सेंट देऊ !"

ऐन गर्दीच्या वेळी न्यूयॉर्क शहरात उपयोगी पडेल अशी एक मोटार फोर्ड कारखान्यानं शोधून काढली आहे ती जागची हलतच नाही !

फोर्डचा कारखाना पाहून झाला, तेव्हा सुदर्शन गोखले बाहेर आलेलेच होते त्याच्याबरोबर डॉ पाटील याच्या घरी जेवायला गेलो दरम्यान थोडा पाऊस पडून गेला होता. त्याच्या घरापर्यंतचा रस्ता छानदार झाडीजवळून जात असल्यान ती हिरवीगर्द झाड ताजीतवानी दिसत होती हवा मोठी प्रसन्न होती सौ पाटील आणि डॉ पाटील यानी आमचं मनमोकळ स्वागत केल थोडी बीअर, थोड्या गप्पा आणि रुचकर जेवण झालं. मग आम्ही पुन्हा गोखल्यांच्या घरी गेलो आणि तिथून विमानतळावर.

मी नायगारा धबधबा पहाण्यासाठी बफेलोला जात होतो खरा पण तिथं माझ्या ओळखीच कुणीही नव्हतं अर्थात 'यग मेन्स ख्रिश्चन असोसिएशन'मधे उतरून दुसऱ्या दिवशी सकाळी नायगारा पहायला प्रवासी बसमधून जाण्याशिवाय गत्यतर नव्हतं माझ विमानाच तिकिटही त्या रात्री सपत होत गेले एकवीस दिवस मी या विमानातून त्या विमानात आणि त्यातून तिसऱ्यात अस सारखं उड्डाण करीत होतो. तोही फार वेगळा, गमतीचा अनुभव आता सपणार होता कधीकधी मला एकाच प्रवासात तीनतीन जेवणं मिळाली, तर कधी जेवणाशिवाय सहासात तास रखडाव लागल कस ते पहा एक विमानप्रवास दुपारी साडेबाराला सपला, तेव्हा बाराला जेवण मिळाल मग एक वाजता दुसऱ्या विमानात बसलो तेव्हाही जेवण आल सध्याकाळी सात वाजता तिसऱ्या विमानात बसलो तर तिथही डिनर आल एका जेवणाच्या वेळी माझ्या शेजारी एक अमेरिकन बसला होता आमच्या जेवणात स्टीक हा मौल्यवान मटनचा भलामोठा तुकडा होता मी त्यापूर्वीच्या विमानप्रवासात नुकताच जेवलो असल्यान त्या स्टीकला मी हातही लावला नाही तेव्हा शेजारचा अमेरिकन म्हणाला, "तुम्ही ते स्टीक खाणार नसाल तर मी ते घेतल तर चालेल का ?" मी म्हटल, "अवश्य घ्या" त्यावर त्यान ते घेतलच, पण मला जेवण कमी पडू नये म्हणून त्यानं विचारलं, "माझ्या ताटातल काही तुम्हाला त्याबदली घालू का ? निदान ही वाइनची बाटली तरी ?" मी आभार मानून 'नको' म्हटल पण फुकट जाणार अन्न मागून घेण्यात त्याला मुळीच सकोच वाटला नाही एका विमान–प्रवासात सगळ्याच जेवणाच्या वेळा चुकल्यामुळ मला पाच कप कॉफी मिळाली दोन वेळा विमान बदलाव लागल एक विमानतळ इतका लहान होता, की तिथं उपाहारगृहच नव्हत दुसरा विमानतळही लहानच होता पण तिथं काचेच्या कपाटात पाव, अंड, बिस्किट असा कोरडा, थंड माल नाणी टाकून मिळत होता तो बेचव थडा फराळ मला करावा लागला विमान उतरताना दोन गोष्टी ध्यानात येत एक, त्या त्या गावाजवळच्या झाडांच्या गर्दीत लोकानी टाकून दिलेल्या मोटारी अशा मोटारींचे प्रचड ढीग विमान खाली उतरत असताना दिसत अमेरिकेत जुन्या मोटारींना काहीच किंमत येत नाही उलट ती टाकून देण्यासाठी पन्नास डॉलर आपणच द्यावे लागतात म्हणून जुनी मोटार घेऊन गावाबाहेर मोटारींच्या ढिगाकडे जायच, जातानाच बायकोनं मागून नवी मोटार घेऊन यायच, नवऱ्यान जुनी मोटार त्या

ढिगाऱ्यात कचऱ्यासारखी सोडायची नि मग नवरानायकोनं नव्या मोटारीतून परतायचं. असा उपद्व्याप करावा लागतो त्या विविध कंपन्यांच्या विमानप्रवासात आपल्या नातेवाइकांना उतरवून घ्यायला आलेल्यांच आणि प्रवासातून आलेल्या लोकांचं मीलन ही आणखी एक लक्षात रहाण्यासारखी गोष्ट होती प्रियकर–प्रेयसी, पति–पत्नी, वडील–मुलगी, आई–मुलगा, आजी–आजोबा आणि नातवंडं यांची आतुरता, उत्सुकता आणि मायेच्या मिठ्या पहाताना खूपच आनंद होई. विशेषत पाचसात वर्षांची मुलं विमानातून उतरल्यावर समोर दिसणाऱ्या नातेवाइकाना भेटण्यासाठी धावत जात आणि मिठ्यांत अडकून पडत. ती दृश्य अतिशय हृद्य होती. छोट्या मुली रंगीबेरंगी फ्रॉकमधे धावताना तर वेगानं जाणाऱ्या फुलांच्या ताटव्यांसारख्याच दिसत. अशी सुखावह दृश्यं, हवाईसुंदरींचं व्यावसायिक अगत्य, तिकिटविक्रेत्या पोरींचं हसणं, कार–रेंटलच्या उफाड्याच्या छोकऱ्या, विमानतळांवरची प्रसन्नता, भव्यता, हे सार आता सपणार होत संपलच होत

बफेलो विमानतळ आला तेव्हा रात्र सुरू झाली होती सामान ताब्यात घेण्यापूर्वीच मी 'वाय एम् सी ए.'ला फोन करून जागा आहे का विचारलं. तिथल्या रिसेप्शनन सांगितलं, "सॉरी. वुई आर फुल्ली बुक्ड टुनाइट. वुईल यू प्लीज रिंग अप टुमॉरो आफ्टरनून ?" मी सर्दच झालो. इथ खात्रीन जागा मिळेल अस मला वाटल होत. आणि मला तर एका रात्रीपुरतीच जागा हवी होती दुसऱ्या दिवशी तर मी कॅनडाला जाणार होतो मग आजची रात्र कुठं काढायची ? अमेरिकेतला हा माझा अखेरचा मुक्काम होता आणि शेवटचा हा दिन गोड व्हावा अस मला वाटणं साहजिक होतं पण नुसत आपल्याला वाटून काय उपयोग ? आतापर्यंतचा माझा सर्व प्रवास उत्तम झाला होता. मला कसलाही त्रास झाला नव्हता आता ही शेवटची रात्र कशी काय जाते या विचारात मी होतो. विमानतळावरच एका खुर्चीवर बसून मी माझी छोटी अटॅची उघडली. तीत एक यादी होती बफेलोला त्या यादीत फक्त सौ श्यामला पंडित अस एकच नाव होत अशा रात्री अपरिचित स्त्रीला फोन करावा का, असाही विचार मनात आला. पण निदान त्याच मार्गदर्शन तरी घ्यावं म्हणून धीर धरून फोन केला त्यांचे पती डॉ हेमचंद्र पंडित यांनी फोन घेतला. मी माझ नाव सांगितल, तेव्हा ते आश्चर्यान म्हणाले, " रमेश मंत्री ? ते 'थंडीचे दिवस'वाले का ?" मी नम्रपणं 'होय' म्हटल. पुण्यात जसे मांडववाले लिमये, मोतीवाले दाते आहेत, तसा मी थंडीचे दिवसवाले मंत्री म्हणून बफेलोमधे ज्ञात होतो तर !

' अहो मंत्री, तुम्ही विमानतळावर आहात ना ? आमचा पत्ता हा––" पत्ता सांगून पंडित म्हणाले, " आम्ही आता जेवायला बसलो आहोत विमानतळापासून आमचं घरही अवळच आहे. टॅक्सीवाल्याला पत्त्याची चिठ्ठी द्या. तो तुम्हाला सातआठ मिनिटात आणून सोडील "

मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले, लगेज–काउंटरवर जाऊन माझं सामान घेतल, आणि पत्ता टिपून घेतलेली चिठ्ठी टॅक्सीवाल्याला दिली. त्यान थोड्याच वेळात मला डॉ. पंडिताच्या घरासमोर नेल. ते वाटच पहात होते त्यानी मला माझी खोली दाखवली

आणि 'जेवण तयार आहे' म्हणून सांगितलं. आयुष्यात काय योगायोग येतात पहा! पंधरा मिनिटांपूर्वी या अनोळखी गावात माझं कसं होणार या चिंतेत मी होतो; आणि आता तर पंडित, सौ पंडित, त्यांच्या मुली अशा छानदार कुटुंबात मी अगदी मराठी पद्धतीचं भात, भाजी, पोळी, आमटी असं रुचकर अन्न जेवत होतो याचं सारं श्रेय माझ्या लेखक असण्याला, आणि त्यातल्या त्यात 'थंडीचे दिवस' या पुस्तकालाच आहे. कारण डॉ पंडित म्हणाले, "तुमचं ते पुस्तक मला अतिशय आवडलं तुम्ही अतिशय कष्ट सोसून, धडपड करून इंग्लंडचा अभ्यासक्रम पुरा केलात मलाही भारतात असताना अनेक संकटांना तोंड द्यावं लागलं. आणि मी अमेरिकेला आलो तोही अत्यंत अनपेक्षितपणेच. एकदा तर या अमेरिकेच्या वारीबद्दल मी अतिशय निराश झालो होतो तेव्हा मला तुमच्या 'थंडीचे दिवस'ची आठवण झाली आणि मी धीर धरून सगळ्या अडचणींवर मात करून आता इथं स्थिरावलो आहे "


अगदी अनपेक्षितपणे पंडित हे फार छान गृहस्थ मला गवसले त्यांच्याकडे मी दोन दिवस होतो. तो वेळ फार चांगला गेला बायको आणि मुलांना भारतात ठेवून ते प्रथमच जेव्हा अमेरिकेत आले, तेव्हा काही मराठी गाण्याच्या ध्वनिमुद्रिका त्यांना कुटुंबियांनी पाठवल्या होत्या पण कुटुंबीयमंडळी अमेरिकेत येईपर्यंत डॉ. पंडितांनी त्यांपैकी एकही ध्वनिमुद्रिका लावली नाही त्याचं कारण सांगताना सद्‌गदित होऊन ते म्हणाले, "ही गाणी ऐकली की मला घरची फार फार आठवण येणार आणि मला रडू आवरणार नाही जास्तच क्लेश होणार म्हणून मी त्या ध्वनिमुद्रिका लावल्याच नाहीत!"

# नायगारा ते टोरंटो

## १०

बफेलो इथ डॉ हेमचंद्र पंडिताची जी अचानक भेट झाली, ती अतिशय रंजक, उद्‌बोधक ठरली डॉ. पडित हे पूर्वी मुबईला हाफकिन्स इन्स्टिट्यूट-मधे काम करीत होते अनेक वर्षांपूर्वी ते अमेरिकेला आले, आणि सुरुवातीच्या काळात अतिशय कष्टमय जीवन काढून आता ते बफेलोलाच स्थायिक झाले आहेत एक अतिशय लोकप्रिय प्राध्यापक आणि आसपासच्या लोकांना उत्साही सहकार्य देणारे निरलस समाजकार्यकर्ते म्हणून ते ख्यातनाम झाले आहेत पहिल्या रात्री आम्ही जेवण केल आणि सौ श्यामला पडिताना त्याच्या शाळेत घेऊन गेलो सौ पंडित या रात्रीच्या शाळेत विणकामासारखे काही अभ्यासक्रम घेत आहेत. त्या स्वत उत्तम गायिका असून बालगधर्वांच्या घराण्यातल्या आहेत त्याना शाळेत पोचवून मी आणि हेमचंद्र पडित त्याच्या विद्यापीठात गेलो

विद्यापीठाच्या दाराशी बराच मोठा घोळका होता आम्ही जरा पुढं घुसून पाहिल, तर कॉलेजच्या चारपाच मुली हातात झाडू घेऊन जमीन साफ करीत असताना दिसल्या कॉलेजच्या फॅशनेबल मुली स्वत झाडलोट करीत आहेत हे पाहून मला आश्चर्य वाटल पडित म्हणाले, " मीसुद्धा अद्यापपर्यंत कधीच असं दृश्य पाहिलं नव्हत " आमच हे बोलण सपतं न सपत, तोच जमीन झाडणारी एक मुलगी खाली वाकली आणि कसलीतरी अदृश्य वस्तू चिमटीत धरून म्हणाली, " सापडलं ! " त्याबरोबर सर्व मुलींनी हातातले झाडू कोपऱ्यात फेकून दिले आणि ' सापडलं ' म्हणणाऱ्या मुलीच्या भोवती त्या गोळा झाल्या. बाहेरून आत येणाऱ्याना थोपवण्यासाठी




नायगारा एक विहंगमदृश्य. डावीकडच्या उंच टॉवरवर सुंदरसे उपाहारगृह आहे. या चित्रातील लहान धबधबा अमेरिकेत आहे, तर घोड्याच्या नालाच्या आकाराचा मोठा धबधबा कॅनडात आहे.

एक मुलगी उभी होती तिन काचेचं दार उघडलं आणि आम्हाला आत येण्याची सूचना केली. हा काय प्रकार आहे याची आम्ही उत्सुकतेन चौकशी केली, तेव्हा ती म्हणाली, " अहो, आमच्या एका मैत्रिणीच कॉन्टॅक्ट लेन्स पडल होतं, ते आम्ही शोधीत होतो साप-डलं ते एकदाच ! " — आता आम्हाला कॉलेज-कन्यकाच्या सफाईच्या कार्यक्रमाचं रहस्य कळल. चष्म्याऐवजी थेट डोळ्यांनाच चिकटवायच ' कॉन्टॅक्ट लेन्स ' नावाच जे बारीकस भिंग असत, ते पडल होत आणि त्यावर कुणाचा पाय पडून ते फुटू नये म्हणून बाहेरून येणारी रहदारी थोपवून त्या मुली झाडून सफाई करीत होत्या. म्हणजे मुख्य उद्देश विद्या-पीठ स्वच्छ ठेवण हा नसून कॉन्टॅक्ट लेन्स शोधण हा होता.

आम्ही आत जाऊन विद्यापीठाची निरनिराळी खाती पाहिली रात्र असली तरी काही वर्ग चालू होते, काही प्रयोगशाळा चालू होत्या. विद्यार्थ्यांसाठी एक चित्रपट चालू होता, तोही आम्ही थोडा वेळ उभ राहून पाहिला पंडितांनी आपल्या काही सहकाऱ्यांशी माझी ओळख करून दिली. परत येताना ते म्हणाले," आमच्या विद्यापीठात प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच मूल्यमापन करतातच, पण वर्षअखेर विद्यार्थ्यांनाही प्राध्यापकांच्याविषयी आपल मत नोंदता याव अशी व्यवस्था आहे " मग आम्ही घरी आल्यावर बीअर घेताघेता पंडितानी मला विद्यार्थ्यांनी त्यांच्याविषयी मारलेले शेरे असलेले फॉर्मस् दाखवले बहुतेक विद्यार्थ्यांनी ' डॉ पंडित हे उत्कृष्ट प्राध्यापक आहेत ' अस म्हटलं होत पण काहींनी ' त्यांना विषय सोडून दुसऱ्याच गोष्टीविषयी बोलण्याची सवय आहे असे काही तिरकस शेरेही मारले होते त्याला उद्देशून पंडित म्हणाले, " कधीकधी मी वर्गात प्रचलित विषया-वरची परखड मतं व्यक्त करतो, हे खर आहे उदाहरणार्थ, बांगलादेशाच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या वेळी अमेरिकेचं धोरण पाकिस्तानला झुकत माप देण्याच आणि भारत-बांगलादेश यांच्या-वर अन्याय करण्याच कस आहे याबद्दल मी अनेकदा वर्गातून भाषणं केलेली आहेत जबाब-दार नागरिक म्हणून विद्यार्थ्यांची प्रचलित घडामोडींविषयीची मत समतोल असावीत अशी खबरदारी घेण हे मी माझ कर्तव्यच समजतो ' अशी वक्तव्य करण्याच भरपूर व्यक्ति-स्वातंत्र्य अमेरिकन विद्यापीठात असतं, याचा त्यांनी अभिमानपूर्वक उल्लेख केला

दुसऱ्या दिवशी मला नायगारा धबधबा पहायला जायच होत. पंडिताना तास घ्यायचे असल्यान ते माझ्याबरोबर येऊ शकत नव्हते. पण नायगारा फॉल्स हे कॅनडात गाव आहे, तिथ रहाणाऱ्या डॉ सुरेश उपाध्ये याना पंडितानी फोन करून मी दुसऱ्या दिवशी तिथ येणार असल्याच कळवलं. डॉ. उपाध्ये यांनाही हॉस्पिटलची ड्यूटी होती पण त्यांच्या पत्नी म्हणाल्या, ' तुम्ही उद्या इकडे आल्यावर बस-स्टेशनवरून मला फोन करा मी तुम्हाला न्यायला येईन " त्याप्रमाण मी सकाळीच बफेलोच्या बसस्टेशनवर गेलो या ठिकाणी नायगाराच तिकिट घेताना खूपच काळजी घ्यावी लागते कारण ' नायगारा फॉल्स ' या एकाच नावाची दोन गाव आहेत. एक अमेरिकेत आहे नि दुसरं कॅनडात आहे. अमेरिकन गावाच तिकिट घेतल की बराच बाधा येतो. कारण प्रत्यक्ष धबधब्यापासून ती जागा दीड-दोन मैल आहे कॅनडातल्या त्याच गावाचं तिकिट काढल तर ती जागा मात्र धबधब्या-



नायगारा येथील जगप्रसिद्ध धबधब्याचा एक भाग

पासून एक फर्लांगाच्या आतच आहे सौ उपाध्ये यांनी मला नीट सूचना दिल्या होत्या म्हणून मी बरोबर योग्य त्या जागेचं तिकिट काढलं

ती सकाळ जरा ढगाळच होती बफेलो गावातून बस निघाली पण त्या गावात विशेष असं काही नाही अमेरिकेतल्या इतर मध्यम वस्तीच्या गावासारखंच ते गाव आहे. गावाबाहेर पडल्यावर थोड्या वेळानं नायगारा नदीच्या काठानंच आमचा प्रवास सुरू झाला. नायगारा नदीचं पात्र विस्तीर्ण होतं आणि तिच्या निळ्या पाण्यावर आकाशातल्या काळ्या ढगांचा काळसर रंग चढला होता सीगल पक्षी नदीवरून थव्याथव्यानं उडत होते आणि त्यांच्या पांढऱ्याशुभ्र रंगामुळं आकाशात तारका धावत असल्याचा भास होत होता नायगारा धबधबा कधी एकदा दिसतो अशा असीम उत्सुकतेनं मी बसच्या काचेतून पहात

होतो जगातलं हे अत्यंत प्रसिद्ध असं प्रेक्षणीय स्थळ शिवाय ' नायगारा ' या अप्रतिम चित्रपटात ' मादक सौंदर्याचा धबधबा ' मेरिलिन मन्रोबरोबरच या नायगाराचही दर्शन झाल होत त्याची असंख्य चित्रं आतापर्यंत पाहिली होती हे विचार माझ्या मनात येतात तोच नायगाराच्या ऑब्झर्व्हेशन टॉवरचा उंचच उंच मनोरा प्रथम दिसला मग धबधबाही लांबून दिसला उंच कड्यावरून उडी घेताना काळसर पाण्याच एखाद्या सुंदरीच्या प्रसन्न हसण्यासारख्या पांढऱ्याशुभ्र, फेसाळ पाण्यात रूपांतर होत होत, ते लांबून पाहून माझ्या चित्तवृत्ती उल्हसित झाल्या.

कॅनडातल्या नायगारा फॉल्स बस-स्थानकावर जाण्यापूर्वी, दोन देशांतल्या सीमेवर थांबून पासपोर्टवर व्हिसाचा शिक्का मारून घेतला ती तारीख ४ नोव्हेंबर ही होती (योगायोगाची गोष्ट म्हणजे त्यानंतर बरोबर एक वर्षानं, ४ नोव्हेंबर याच तारखेला, मी पुन्हा नायगारा धबधबा पहायला गेलो ! ) बसस्टेशनवर उतरलो. सौ सुधा उपाध्ये याना फोन केला त्या दहा मिनिटातच मोटार घेऊन आल्या त्यानी मला नायगारा धबधब्याचं विविध अंगानी दर्शन घडवलं लिफ्टमधून उंचच उंच जाऊन ऑब्झर्व्हेशन टॉवरवरून नायगारा नदी, धबधबा आणि आसमंत यांचं मनोहर विहंगम दृश्य पहाता येत जवळच दोरीवरून चालणारी तीनचार डब्यांची गाडी आहे तीवरून नदीच्या पलिकडे जाऊन परत येता येत धबधब्याजवळच जमिनीत खोल जाण्याची सोय आहे. तिथ जाऊन मी विचारल, " मला नायगाराच्या पोटात जाऊन पहाता येईल का ?" तिथला रक्षक गमतीन म्हणाला, " इफ यू हॅव्ह द मनी, यू कॅन गो एनीव्हेअर " मी दोन डॉलरच तिकिट काढल आणि लिफ्टन पाचसहा मजले खोल गेलो तिथं तळघरात कपडे बदलण्याच्या खोल्या आहेत प्रत्येकाला आपले नेहेमीचे बूट काढून ठेवावे लागतात, आणि गुडघ्यापर्यंत येणारे उंच रबरी बूट घालावे लागतात शिवाय डोक्यापासून गुडघ्यापर्यंत येणारा रबरी पावसाळी कोटही घालावा लागतो हा सगळा जामानिमा करून मी इतिहासकालीन भुयारासारख्या दिसणाऱ्या वाटेनं इतर वीसतीस लोकांच्या बरोबर निघालो डावीकडेच एक वाट फुटत होती त्या वाटेन थोडा पुढ गेलो, तो अंगावर एकदम पाण्याचे तुषार आले मग लक्षात आल की, आपण नायगारा धबधब्याच्या पोटात उभे असून पाण्याचा महाप्रचंड ओघ आपल्यासमोर अगदी हाताच्या अंतरावरून खाली कोसळत आहे तो अनुभव अगदी विलक्षण, अवर्णनीय असा होता खाली पडत असता त्या पाण्याचे तुषार अंगावर पडत आणि प्रसन्न करून सोडीत. एकदा ते दृश्य रुद्र वाटे, तर एकदा अतिशय मोहक वाटे किंचित पुढ गेल तर शेकडो फुटावरील दगडांवर आपटून फेसाळणारं पाणी चहूकडे पडताना दिसत होत तिथंच थांबून ते अद्भुत दृश्य पहाताना भान हरपण्याचा अनुभव प्रत्येकालाच येतो त्या ठिकाणाहून मग माग परताव लागत आणि डावीकडे वळून सरळ पुढ जाऊन नायगाराच्या पोटातून आणखी असच दृश्य पहाता येत तिथंही पाण्यान खूप भिजायला होत, पण त्यात मोठी गमतही असते


सुधा उपाध्ये यानी मला नायगारा फॉल्स गावातली बाग दाखवली. धबधब्याच्या



पुन्हा न्यूयॉर्क कुप्रसिद्ध आणि सुप्रसिद्ध असा ४२ वा रस्ता या रस्त्यावर ब्ल्यू फिल्म्स, नगे तमाशे, कॅबेरे याबरोबरच काही अतरावर 'युनो'ची कचेरीही आहे

आजूबाजूनं आणखी दोन चकरा मारल्या, आणि आम्ही त्याच्या घरी आलो थोडया वेळान डॉ उपाध्येही आले आम्ही जेवण केल नायगारा धबधबा पहायला मी गेलो आणि माझा कॅमेरा न्यायला विसरलो ! पण डॉ उपाध्यानी आपला कॅमेरा काढला आणि पुन्हा मला धबधब्याजवळ आणून माझे फोटो काढले मी भारतात आल्यानतर आठवणीन त्यानी ते माझ्याकडे पाठवले धबधबा पाहून चार–साडेचारला मी बफेलो बसस्थानकावर आलो तिथं येऊन पडितानी मला घरी नेल त्या रात्री त्यांच्या एका मित्राकडे दिवाळीच्या पार्टीला जायच होतं म्हणून डॉ पडितांच कुटुब आणि मी गेलो दहाबारा मराठी कुटुब जमली होती मग गप्पागोष्टींत आणि खाद्यपेयात छान वेळ गेला आणि रात्री बारा–साडेबाराला आम्ही घरी परत आलो

डॉ. पंडिताच्या बुद्धिमान, रसिक सगतीत बफेलोचे दिवस फार सुखद गेले. पण मला टोरटोला जाऊन पुन्हा अमेरिकेतल्या सार्वत्रिक निवडणुका पहाण्यासाठी लवकर



टोरंटो येथील महापालिकेची ' सिटी हॉल ' ही इमारत

न्यूयॉर्कला पोचायचं होतं म्हणून मी अगदी सकाळचीच बस पकडायचं ठरवलं आम्ही जायला निघालो आणि सौ पंडित म्हणाल्या, " अहो मंत्रींचे फोटो काढायचे राहिले " मग आम्ही थांबलो फोटो काढण्याचा कार्यक्रम झाला, आणि पंडितांनी मला बफेलो स्थानकावर सोडलं. टोरंटोला श्री गोविंद पाच्छापूरकर यांना आधीच फोन केला होता, त्यामुळ तिथल्या मुक्कामाबद्दल मी निश्चित होतो

टोरंटोला पोचल्यावर बसस्टेशनवरून पाच्छापूरकरांना फोन केला दहा मिनिटांतच ती उभयता मला न्यायला आली टोरंटो आणि अमेरिकेतली फिलाडेल्फियासारखी इतर गावं यांत मला काही फरक दिसला नाही तेच डाउन टाउन, उंच इमारती, शॉपिंग कॉम्प्लेक्स, बार्स वगैरे वगैरे त्या दिवशी हवाही कुंद होती अधूनमधून बारीक पाऊस येत होता घरी जाऊन आम्ही थोडा वेळ औपचारिक गप्पा मारल्या आणि जेवण करून खरा गप्पांचा अड्डा सुरू केला रात्री दहापासून पहाटे साडेतीन–चारपर्यंत आम्ही बोलत होतो. त्यात विनोद, परदेशातलं जीवन, भारतातली परिस्थिती, या सगळ्यांचं कडबोळं होतं दुसऱ्या दिवशी सुटी होती आणि अर्थातच लवकर उठून कामावर जायची कुणालाच घाई नव्हती दहा–साडेदहाला सावकाश आम्ही उठलो मग मी आणि पाच्छापूरकर फिरायला गेलो सौ दुर्गाबाई या टोरंटोच्या महाराष्ट्र–मंडळाच्या कार्यकारिणीवर होत्या त्यांनी त्या दिवशी मला भेटायला अनेक मराठीभाषिक कार्यकर्त्यांना बोलावलं होतं त्यांच्या खाण्या-पिण्याच्या व्यवस्थेसाठी त्यांना घरी रहावं लागलं.

संध्याकाळी महाराष्ट्र–मंडळाच्या अध्यक्षा सौ. टिळक आणि इतर कार्यकर्ते यांच्याशी खूपच गप्पागोष्टी झाल्या. मुख्य विषय होता. भारतातून कॅनडाला येणारे कलावंत आणि त्यांचे कार्यक्रम करण्यात येणाऱ्या अडचणी या कलावंतांच्या पैशाबद्दलच्या फार अपेक्षा असतात. स्थानिक परिस्थितीची त्यांना कल्पना नसते. आणि विशेष म्हणजे जो तो -- अथवा जी ती -- म्हणतो की, ' आम्हाला काही फायदा नको, पण येण्याजाण्याचा

आणि रहाण्याचा खर्च सुटला म्हणजे झाल ' महाराष्ट्र–मंडळावर आपली सर्व व्यवस्था करायची जबाबदारी आहेच या खात्रीनं अनेक कलावंत भारतातून निघतात आणि ते मंडळाला शक्य नसतं, कार्यक्रमांना फारशी उपस्थिती नसली तर मंडळावर दोषाचं खापर फोडण्यात येतं वगैरे मुद्दे या कार्यकर्त्यांनी मांडले वस्तुस्थिती अशी आहे की, महाराष्ट्रा–तल्या काही कलावंतांचे अमेरिका–कॅनडाचे दौरे साफ पडले तरी पुण्या–मुंबईच्या वृत्तपत्रात ते ' प्रचंड यशस्वी ' अशी आपली जाहिरात करून घेतात, आणि त्या बातम्या खऱ्याच आहेत अशा समजुतीनं अधिक कलावंत दौरे आखतात. त्यापैकी काहीजणांचे दौरे यशस्वी होतातही पण त्यांची संख्या पंचवीस टक्क्यांहून अधिक नाही कधीकधी पाहुणे कलावंत आणि परदेशातील मराठी मंडळी या दोघांचीही बाजू बरोबर असते, पण एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न न झाल्यानं अप्रियता निर्माण होते, असे काही अनुभव ऐकायला मिळाले



नाटकाच्या मध्यंतरात लॉबीमध्ये जमलेले रसिक प्रेक्षक

दुसऱ्या दिवशी दुर्गा पाच्छापूरकरचं अत्यंत प्रिय असं कार्य तिनं केलं ते म्हणजे टोरंटो शहराचा सिटी हॉल दाखवणं नगरपालिकेची ही इमारत पहाण्यासारखी आहे आणि तिच्या टॉवरवरून टोरंटोचं विहंगम दृश्य सुंदर दिसतं पण येणाऱ्या प्रत्येक पाव्हण्याला या सिटी हॉलचं दर्शन घडवल्याशिवाय दुर्गाला चैन पडत नाही, म्हणून श्री पाच्छापूरकर तिची खूपच थट्टा करीत 'लवकर ती सिटी हॉलमधे गाइड म्हणून नोकरी धरणार आहे' असही ते गमतीनं म्हणत दुर्गा नेहेमी हसतमुख असायची तिनं मला सिटी हॉलजवळचं आइस रिंक आणि गावातली काही इतर प्रेक्षणीय स्थळं दाखवली तिचे मित्र श्री साने आणि त्यांच्या पत्नी सौ साने यांनी आम्हाला त्याच दिवशी दुपारी लंचला बोलावलं होतं. विशेष म्हणजे ही दोघही आर्किटेक्ट आहेत आणि साहित्यातली रसिक आहेत. 'महाराजा' नावाच्या उत्कृष्ट भारतीय पद्धतीच्या उपाहारगृहात त्यांनी समग्र, सामिष आहार दिला. मी आणखी काही दिवस टोरंटोला रहावं असा त्यांनी खूप आग्रह केला पण अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षीय निवडणुका ७ नोव्हेंबरला होत्या त्या पहाव्यात म्हणून दुसऱ्या दिवशी—६ नोव्हेंबरलाच — रात्री निघायचं मी ठरवलं होतं

बसनं टोरंटोहून निघालो बारा तासाचा प्रवास होता पहाटे न्यूयॉर्कपासून पचरावीस मैलाच्या अंतरावरून वर्ल्ड ट्रेड सेंटरचे दोन उंचच उंच मनोरे आणि एम्पायर स्टेट बिल्डिंगचा सहज ओळखता येण्यासारखा मनोरा दिसला, आणि अगदी थोड्या वेळात न्यूयॉर्क आपल्याला किती प्रिय झालं आहे याची कल्पना आली न्यूयॉर्क गजबजलेलं आहे, घाईगर्दीचं आहे, त्याचे काही भाग बकाल आहेत, हे सारं खरं असलं तरी मला हे शहर अतिशय आवडतं इतकं, की तिथं आपला एखादा फ्लॅट असावा आणि वर्षातून चारसहा महिने तरी तिथं रहावं असं वाटतं

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षीय निवडणुका पहाण्यासाठी कॅनडाहून मी घाईघाईनं अमेरिकेला आलो खरा, पण त्या निवडणुकांनी माझी निराशाच केली मतदानाच्या दिवशी मी एका मित्राच्या मोटारीतून बऱ्याच चकरा टाकल्या, आणि तीनचार मतदानकेंद्राजवळ थाबून थोडफार निरीक्षणही केलं पण त्या वेळच्या निवडणुकांत चुरसच नव्हती रिपब्लिकन पक्षाचे निक्सन निवडून येणार याबद्दल एवढी खात्री होती, की मतदान फार कमी झालं निक्सन यांचे डेमॉक्रॅटिक-पक्षीय विरोधी उमेदवार श्री.मॅक्गव्हर्न यांना नजरेत भरण्यासारखं व्यक्तिमत्त्वही नव्हतं आणि त्यांचं विशेष कार्यही नव्हतं संघर्ष अजिबात नसल्यानं निवडणुका अगदीच निर्जीव झाल्या दुपारनंतर मी निवडणुकीची नि मतमोजणीची दृश्य घरात बसून दूरचित्रवाणीवरच पाहिली. टोरंटोची मित्रमंडळी तेच सांगत होती की, 'इथंच तुम्हाला टी व्ही वर सारी निवडणूक दिसेल' एके काळी पत्रकार म्हणून काम केल्यामुळं की काय कोण जाणे, पण न्यूयॉर्कला जाऊन प्रत्यक्ष निवडणूक पहाण्याचं औत्सुक्य मला कॅनडात राहू देईना. ती थंडी निवडणूक पाहिल्यावर मात्र टोरंटोलाच आणखी दोनचार दिवस राहिलो असतो तर बरं झालं असतं, असं वाटू लागलं

त्यानंतर मी न्यूयॉर्कमधे पाचसहा दिवस राहिलो दोनतीन नाटकं पाहिली या

आवडच्यातला सर्वात लक्षात रहाण्यासारखा विशेष म्हणजे, एका लावण्यवती स्त्रीबरोबर मी केलेलं टेलिफोनवरचं प्रदीर्घ भाषण. तिच्याशी मी सतत तीन तास वीस मिनिट बोलत होतो ! अतिशय मनमोकळ्या अशा या गप्पागोष्टींत आम्ही काही विलक्षण रहस्याची देवघेव केली सहज केलेला फोन सुरुवातीला पाचदहा मिनिटात जुजबी बाबींवर थांबेल असं वाटलं पण बोलताबोलता आम्ही साडेतीन तास काढले !

आता माझी अमेरिका पाहून झाली होती न्यूयॉर्कहून आता मला हॉलंडला जायचं होत सोळा वर्षांपूर्वीच्या एका डच मैत्रिणीला भेटण्यासाठी मी इंग्लंडमधे शिक्षणासाठी असताना आन्स कैसर नावाच्या एका डच मुलीशी माझी मैत्री झाली होती तिच्या जीवनावर मी 'महानगर' ही कादंबरीही लिहिली. १९५६ साली झालेली ती मैत्री अजूनही टिकून होती — नव्हे, दृढ झाली होती इतक्या वर्षांनी तिला भेटावं म्हणून मला युरोपचा दौरा करायचा होता मी भारतातून निघण्यापूर्वीच तिला भेटणार असल्याचं कळवलं होत नि तिनही 'आय अॅम ऑनर्ड अँड डिलायटेड' असं उत्तर धाडल होत. न्यूयॉर्कला आल्यावर तिला 'नोव्हेंबरच्या आठ ते बारा या तारखादरम्यान मी येईन असं कळवल होत तिनही आपल्या गावी कसं यायच हे कळवल होत नि घरचा फोन–नंबर दिला होता पर्मरेंड हे तिच गाव अॅमस्टरडॅमपासून आठ मैलावर आहे

युरोपला जायचच तर पॅरिस आणि लंडनलाही जाव या विचारानं मी न्यूयॉर्क–अॅमस्टरडॅम–पॅरिस–लंडन–न्यूयॉर्क असं तिकिट घेतलं न्यूयॉर्कहून मी एअर इंडियानं रात्री आठ वाजता निघालो आणि दुसऱ्या दिवशी सकाळी साडेसातच्या सुमाराला लंडनला पोचलो साडेनऊ वाजता के एल् एम् कंपनीचं अॅमस्टरडॅमचं विमान सुटणार होत त्याच रिझर्व्हेशन करावं म्हणून त्या कंपनीच्या काउन्टरवर मी गेलो तिथली डच मुलगी फार छान होती—दिसायला आणि वागायलाही ती म्हणाली, "आपल्याला दोन तास खोळंबून रहावं लागणार मी तुम्हाला सुचवू का ? आत्ता पधरा मिनिटात एक विमान अॅमस्टरडॅमला सुटणार आहे त्या विमानान तुम्हाला पाठवण्याचा मी प्रयत्न करू का ?"

दोन तास विमानतळावर कंटाळवाणा वेळ घालवण्यापेक्षा अॅमस्टरडॅमला लवकर पोचलेल मला हवच होत पण माझी एक अडचण होती ती तिला सागताना मी म्हटल, "पण माझी बॅग अजून एअर इंडियाच्या विमानातच आहे ती पधरा मिनिटात इथ कशी येणार ? त्या मुलीन माझ्या बॅगेच्या कार्डाचा नंबर घेतला आणि पटकन एअर इंडिया कार्गोशी संपर्क साधून अवघ्या आठनऊ मिनिटात ती बॅग के. एल् एम् मधे ठेवण्याची व्यवस्था केली लगेच मला विमानातला सीट नंबर देऊन तिनं गेट क्रमाक सोळामधून जायला सांगितलं. माझ्या वेळाची बचत व्हावी म्हणून तिनं दाखवलेली तत्परता खरोखर वाखाणण्यासारखी होती

लंडन–अॅमस्टरडॅम प्रवास दीड तासाचा होता अॅमस्टरडॅम विमानतळावर मी उतरलो, आणि तिथून आन्सला फोन करावा असा विचार केला पण नतर म्हटलं की, अचानक तिच्या दारात उभं राहून होणारी गमतही पहावी म्हणून फोन करण्याचा बेत

रहित करून पर्मरेंड गावी कस जायच याची चौकशी केली विमानतळावरच दहा डॉलर्सच डच चलन घेतल पर्मरेंड गाव जरी जवळ असलं, तरी तिथ जाण्यापूर्वी आधी ॲमस्टरडॅम विमानतळावरून स्टेशनवर जायला हव होत नि मग तिथून रेल्वेनं पर्मरेंड गाठायच होत मी विमानतळावरच्या बसनं निघालो ॲमस्टरडॅमच्या अवाढव्य रेल्वेस्टेशनवर आलो तिथ सगळ्या पाट्या डच आणि फ्रेंचमधून होत्या तिकिटघर कुठं दिसतच नव्हत रस्ता खोलात होता आणि रेल्वेकडे जाण्यासाठी जिना चढून जायच होतं. मी तिकिट कुठं मिळत याची चौकशी करावी म्हणून जिना चढून गेलो, तर थेट प्लॅटफॉर्मवरच पोचलो ! रेल्वेचा एक अधिकारी गाडीजवळ उभा होता. त्याला मी विचारल, " मला पर्मरेंडला जायच आहे. " तो म्हणाला " अहो, आत्ता दोन मिनिटात ही गाडी सुटणार आहे. " मी विचारल, " तिकिट कुठ काढू ? " तो म्हणाला, " तुम्ही गाडीत बसा मी जागेवर तिकिट देईन ' मी आत चढलो थोड्या वेळान तो अधिकारी आला त्यान मला विचारल, " कुठ जायच आहे ? " मी गावाचं नाव सागितल. त्यानं पुन्हा विचारल, " पण कोणत स्टेशन ? " त्याचा प्रश्न मला काही कळला नाही. मी म्हटलं, " त्या गावच कोणतंही स्टेशन द्या " कारण कोणत्या स्टेशनापासून आन्सच गाव जवळ होतं हे मला आठवत नव्हत तिनं मला पूर्वी लिहिलेल्या पत्रात कुठ उतरायच, घरी कस जायचं, हे सार कळवलं होत पण ते पत्र राहिल होतं भारतातच. त्या तिकिट-चेकरनं ' कोणत्या गावाहून आला, भारत कसा आहे याची थोडी औपचारिक चौकशी केली आणि ' हॅव ए नाइस डे ' अशी शुभेच्छा व्यक्त करून तो पुढ गेला

मी ज्या स्टेशनवर उतरलो, ते अतिशय लहान होत सबंध गाडीतच तीसचाळीस उतारू होते त्यांतले दोनतीनच त्या स्टेशनवर उतरले मी एका कागदावर आन्सचा पत्ता लिहिला आणि नुकत्याच उतरलेल्या एक डच तरुणाला तो दाखवला. त्याला इंग्रजी येत नव्हत आणि मला डच समजत नव्हत. त्यान गाडी गेली त्या दिशेला बोट दाखवल. पण तेवढ्या मार्गदर्शनावर हातात बॅगा घेऊन पायी निघण कठिण होत. हवेत खूपच थडी होती त्या थडीपासून उतारूच रक्षण कराव म्हणून स्टेशनवर एक गरम हवा असलेली उबदार काचेची खोली होती तिच्यात बसून मी थोडा वेळ विचार केला मग ठरवलं की अचानक आन्सच्या दारात दत्त म्हणून -— किंवा दत्त न म्हणता -- उभ रहाण्याची कल्पना कितीही रोमाचकारक असली, तरी झोंबणारे वारे, कडक थडी, दोन हातांत दोन बॅगा आणि अनोळखी रस्ते या सर्व प्रतिकूल अंगाचा विचार करता, तो रोमाच आपल्याला न परवड-णारा म्हणून सोडून दिला पाहिजे तिला फोन करणं हा आता एकच उपाय होता. टेलि-फोनचा बूथ बाहेर रस्त्यावर होता स्टेशनची ती उबदार खोली उंचावर होती आणि वीसपचवीस पायऱ्या उतरून खाली जाव लागणार होतं मी बॅगा उचलल्या आणि खाली उतरलो टेलिफोनवर डच भाषेत सूचना लिहिलेल्या होत्या फोनसाठी जे नाणं टाकायच होत त्याहून थोड्या मोठ्या किमतीचं नाण माझ्याजवळ होत आता टेलिफोनच नाण मिळणार कुठून ? हा विचार मी करतो आहे, तोच समोरची शाळा सुटली आणि शे-

दोनशे छान, छोट्या, अनघ डच मुली पाण्याच्या लोंढ्यासारख्या बाहेर पडल्या. त्यांच्या– पैकी आठदहा मुली माझ्याभोवती जमा झाल्या आणि माझ्याकडे कुतूहलानं पाहू लागल्या त्या लहानशा गावात भारतीय माणूस क्वचितच जात असावा मी खुणेनच एका मुलीला माझ्या हातातलं मोठं नाण दाखवून ' टेलिफोनच लहान नाण आहे का ' असं विचारल आठनऊ वर्षांच्या त्या मुलीनं आनंदान आपली छोटी पर्स उघडून टेलिफोनसाठी लागणारं नाणं दिलं, आणि त्याहून किंचित अधिक किंमतीचं नाण माझ्याकडून घेतल अगदी जाता-जाता मोठं नाण सहजपणं मिळाल म्हणून ती अगदी खूष झाली मग फोन कसा करायचा याबद्दल त्या मुलींनी मला सूचनाही दिल्या. मी नाण टाकून आन्सचा नबर फिरवला फोनवर तीच होती

" रामिश, यू हॅव कम ? व्हेअर आर यू ?" तिनं उत्सुकतेन विचारल

सोळा वर्षांत तिच्या इंग्रजी उच्चारावर बराच परिणाम झाला होता आवाज मात्र तोच अगदो लाख आवाजात मी ओळखला असता. तो आवाज लाब हातांनी कुर–वाळीत होता.

मी तिला स्टेशनच नाव सांगितल ती म्हणाली, " तुम्ही एक स्टेशन आधीच उतरलात. तरी हरकत नाही. मी सायकलवरून दहा मिनिटात येते माझ्या नवऱ्यान आमची मोटार ऑफिसला नेली आहे तुम्ही काचेच्या खोलीत उबेला थाबा. मी येतेच. "

मी बॅगा घेऊन पुन्हा वर आलो रस्त्याकडे डोळे लागले होते सोळा वर्षांनतर आता आन्स कशी दिसत असेल ? किती जाड झाली असेल ? ती आपल्याशी कशी वागेल ? काय बोलेल ? असे अनेक प्रश्न माझ्या मनात गर्दी करून राहिले होते. सोळा वर्षं मी वाट पाहिली, पण ती दहाबारा मिनिट मात्र कधी एकदा लोटतात असं झालं होत ती येईपर्यंत काहीतरी करावं म्हणून मी चहाकॉफीच्या स्टॉलकडे गेलो तोही बद होता. गाडीच्या वेळेलाच तो पाचदहा मिनिट उघडीत असावेत. वर्तमानपत्राचा स्टॉल उघडा होता. पण मला त्याचा काही उपयोग नव्हता. सारी वर्तमानपत्र, मासिकं डच, जर्मन, फ्रेंच होती. मी परत पूर्वीच्या जागेवर आलो आणि काचेतून रस्त्याकडे पहात राहिलो इतक्यात आन्स सायकलीवरून येताना दिसली मी काचेतून हात वर केला. तिनंही पाहिल आणि हात वर केला तिनं स्लॅक्स आणि स्वेटर घातला होता. ती पूर्वीसारखीच कृश, सुदर होती.

तिन एकदम सायकल रस्त्यावरच टाकली हरणान सपाट जमिनीवर उड्या घेत द्रुतगतीनं जावं तशी ती एकदोन पायऱ्या सोडीत वेगानं वर आली आणि काचेच दार ढकलून आत येऊन तिनं एकदम मला मिठीच मारली. मी घुसमटत म्हटल, " अग, हे तुझ गाव. तुझ स्टेशन. ' ती बेदरकारपणं म्हणाली, " आय डोन्ट केअर. माझी मुलगी तर समोरच्या शाळेतच शिकते आहे. पण म्हणून काय झाल ? माझा मित्र युगायुगानतर आला,

आणि अशा वेळी मी दुसऱ्या कुणाचा विचार करीन की काय ? — चल माझ्याकडे बॅग दे तुझी "

मी तिच्या हातात छोटी अटॅची दिली आणि मग बॅग घेऊन आम्ही हातात हात घालून स्टेशनच्या पायऱ्या उतरलो खाली आल्यावर आन्सनं सायकल उचलली, कॅरियरवर बॅग ठेवली, आणि आम्ही तिच्या घराच्या दिशेनं चालू लागलो

# पुन्हा महानगर !

११ हॉलंड हा अतिशय शांत, सुंदर, लाडका देश आहे. निरागस लहान मुलांनी खेळण्यातला देश वसवावा तसा हा वाटतो. या सबंध देशात डोंगरच नाही. कारण समुद्र मागे हटवून हा देश डच लोकांनी स्वकष्टानी तयार केला आहे परमेश्वरान पृथ्वी निर्माण केली, पण हॉलंड देश मात्र डच लोकांनी निर्माण केला, असं म्हणतात ते सार्थच आहे

पर्मरेंड स्टेशनवरून मी आणि आन्स छानदार उन्हातून गप्पा मारीत जात होतो वाटेत अनेक छोटे कालवे, पूल, कालव्यातच नावा टाकून त्यावर बांधलेली लहान घरं लागत होती आन्सला लंडनला भेटून आता सोळा वर्षं झाली होती या सोळा वर्षांत आमचा पत्रव्यवहार होता. पण कागदाच्या बाहेरचे अनेक प्रश्न होते, ते आतापर्यंत अनुत्तरितच राहिले होते. गावात कालव्याच्या किनाऱ्याला अगदी छोटी, सुबक एकमजली घर होती ती लाकडी खेळण्यातल्या घरासारखी दिसत होती आता सूर्यही चमकू लागला होता आणि थंडी कमी झाली होती गप्पा मारतामारता आम्ही आन्सच्या घराजवळ आलो. जगप्रसिद्ध संशोधक व समाजकार्यकर्ते आल्बर्ट श्वायत्झर याच नाव तिच्या रस्त्याला दिलेलं आहे त्या रस्त्यावरच्या १०१ क्रमांकाच्या घरासमोर आम्ही आलो. ते तीनमजली घर अतिशय कलापूर्ण आहे. समोर छोटीशी बाग आहे. घरात जाण्यापूर्वी मी आन्सला म्हटल, " थांब चागलं उन्ह पडल आहे तोपर्यंत तुझा फोटो काढतो." मी दोनतीन फोटो काढले आणि आम्ही घरात गेलो. आत गेल्याबरोबर एक गुबगुबीत मांजर जवळ आल त्याची ओळख करून देताना आन्स म्हणाली, " याच नाव टोबी.

आमच्याकडे एक बोका आणि एक मांजरीण आहे. ही पहा आली" अंगावर उडया घेणाऱ्या भाटी मनीला जवळ घेत आन्स म्हणाली, " ही ना फार चावट आहे गल्लीतल्या सगळ्या बोक्यांशी हिची मैत्री आहे म्हणून तिची दोन बाळंतपण झाल्यावर आम्ही डॉक्टरकडे नेऊन तिच कुटुंबनियोजनाच ऑपरेशन करून घेतलं आहे." भाटी मनीला खाली ठेवीत आन्सन माझी बॅग घेतली आणि आपल्या मुलाची ओळख करून दिली. त्याचं नाव किम साधारण नऊदहा वर्षांचा असावा बुद्धिमान, देखणा

" चल, मी तुला तुझी खोली दाखवते" अस म्हणून आन्सन माझी बॅग घेतली आणि दुसऱ्या मजल्यावरची खोली मला दिली मग मी प्रवासातल तोंड वगैरे धुऊन खाली दिवाणखान्यात आलो टोबी आपोआप माझ्या जवळ येऊन बसला त्याचा गुबगुबीत स्पर्श मजेदार वाटत होता. आन्स म्हणाली, " काय घेणार ?" मी विचारल, " तू या वेळी काय घेतेस ?" ती म्हणाली, " तुला काय हव ते आहे कॉफी, वाइन, बिअर, व्हिस्की, ब्रँडी— सगळा साठा करून ठेवला आहे तुझ्यासाठी"

आम्ही थोडी रेड वाइन घेतली इतक्यात शाळा आटोपून आन्सच्या मुली आल्या त्याची तिन ओळख करून दिली. एक साधारण चौदा वर्षांची, नि दुसरी बारा वर्षांची असेल त्याना इंग्रजी फारसं येत नव्हत त्यामुळ आमच दळणवळण यथातथाच होतं. वाइन घेतल्यावर आन्सन मला सबंध घर दाखवलं तिला दोन मुली नि एक मुलगा होता आन्सचा नवरा यान या पाचजणाना पुरून निदान सहा खोल्या शिल्लक राहिल्या होत्या. इतकं मोठं ते घर होतं. यान हा जगातील सर्वात मोठ्या पेट्रोल कपनीत चांगल्या अधिकाराच्या जागेवर आहे आन्सन मला आपलं ग्रथालय दाखवल ते अद्ययावत होत आणि विशेष म्हणजे त्यात उत्तमोत्तम असे शेदीडशे इंग्रजी ग्रथ होते ते दिवस थंडीचे होते म्हणून फार काळ बाहेर फिरणं कठिण होत अर्थातच तिच ग्रथालय म्हणजे मला फार मोठा आसरा वाटला

जेवणाची वेळ झाली आन्स म्हणाली, " आत्ताच्यापुरतं आमच्याकडे आहे ते जेव. सध्याकाळी आपण स्टोअरमधे जाऊ तिथ तुला जेवायला काय हव ते घेऊ आज रात्रीपासून तुला पाहिजे तसं जेवण करून घालीन" मी म्हटल, " ठीक आहे" आणि डच पद्धतीच मटन रोल, पाव, चीज अस काहीस वेचव जेवण कसंबस जेवलो मैत्रीण झाली म्हणून काय झाल ? मला काही ते जेवण आवडलं नाही त्यात ना तिखट, ना मसाला ! पण त्याला तिचाही इलाज नव्हता सध्याकाळी मी आणि आन्स गाव पहायला निघालो. गावाची वस्ती हजार–बाराशेच आहे त्यामुळं गाव पहायच म्हणजे घराच्या दोन रांगा आणि दुकानाची एक रांग पहायची एवढंच ते काम वीस–पचवीस मिनिटातच आटोपलं मग आम्ही दुकानाच्या केंद्रात गेलो तिथं मी ' चिली सॉस ', ' इंडियन स्पाइस ' अशी नावं असलेल्या आठदहा बाटल्या घेतल्या आणि आन्सला म्हटलं, " याचा वापर करून तुला तादळाच जे जमेल ते कर." तिन बराचसा तांदूळ, पापड असलं खास पौर्वात्य सामान खरेदी केल. इंडोनेशिया हा देश अनेक वर्ष डचांच्या अमलाखाली असल्यानं हॉलंडमधे पापड



**पर्मरॅड गावी आन्स व्हॉलिद, तिचा
मुलगा किम आणि रमेश मंत्री.**

हा पदार्थ मुबलक मिळतो आमचा बाजारहाट होतो न होतो तो अंधार पडायला सुरुवात झाली आणि थंडीही वाढू लागली. त्या दिवसांत दुपारी चारलाच अंधार पडे. आम्ही घराच्या उबदार सहवासात परतलो थोड्या वेळान आन्सचा नवरा यान आला त्यान माझ मन पूर्वक स्वागत केलं त्याच्याबरोबर मी बिअर घेतली बोलण्यात सहज विषय निघाला, की तो चागला बुद्धिबळपटू आहे मग आम्ही जेवणानंतर दोन डाव टाकायचे ठरवले. त्या रात्री आन्सनं भात केला त्याच्याबरोबर भाजी–आमटी करण्याच साहित्य नव्हतं म्हणून मी भाताबरोबरच चिनी पद्धतीचं चिली सॉस चापल

यान उत्तम बुद्धिबळ खेळतो हॉलडमधल्या राष्ट्रीय सामन्यात त्याचा तिसरा क्रमांक आला आहे. मला त्याच्याबरोबर खेळण्यात खूप आनद वाटला, खूप नव शिकता आलं. त्यानतर बहुतेक रोज रात्री आम्ही डाव टाकीत असू. साठ–सत्तर टक्के डाव तो जिंकत असे पण त्याला सहजासहजी विजय मिळत नसे हे मात्र खरं बुद्धिबळ खेळताना आन्स आम्हाला बिअर, वाइन वगैरे आणून देत असे. याननं माझा पराभव केला, की मी आन्सचा बुद्धिबळात पराभव करून बदला घेत असे खेळताखेळता एकदा यान म्हणाला, "तुम्ही सोमवार ते बुधवार येईन अस लिहिल होतं, आणि ॲमस्टरडॅमला आल्यावर फोन करीन अस म्हटलं होत गंमत अशी की, या तीन दिवसात आन्स फोनजवळून बहुधा हललीच नाही! घरातल्या घरात कुठ जावंच लागलं तर मुलीला फोनजवळ बसवून जायची!"

हे ऐकत असताना आन्स अशी सुदर लाजली, की महाराष्ट्रातल्या लग्न ठरलेल्या मुलींनीही त्या लाजण्याचा हेवा करावा!

दुसऱ्या दिवशी सकाळी मी आणि आन्सन ॲमस्टरडॅम पहायला जायचं ठरवल. मी सूट घातला, बाहेर थंडी असल्यामुळ हातमोजे चढवले आणि खाली येऊन माझा ओव्हरकोट घालू लागलो. खर तर मी न्यूयॉर्कमधल्या माझ्या एका मित्राचा जुना ओव्हर–

कोट घेतला होता त्याचे खिसे फाटले होते. बरीच बटणं तुटली होती. पण मी आता तो घालून पहातो तो सारी बटण लावलेली, खिसे शिवलेले मी आन्सकडे पाहून म्हटल, " अग, हा काय चमत्कार झाला ? " ती हसून म्हणाली, " चमत्कार नाही कालच मी तुझ्या कोटाची बटणं तुटलेली पाहिली रात्री तू झोपल्यावर मी बटण लावली आणि खिसेही शिवले तुझी काही हरकत नाही ना ? " फार वर्षांपूर्वी 'माणूस' चित्रपट मी पाहिला होता, त्यातल्या एका दृश्याची मला आठवण झाली पोलिसपरेडला गेलेल्या शिपायाच्या पायात चप्पल नसते फौजदार विचारतो, इतक्यात शिपायाची बायको फाटलेली चप्पल दुरुस्त करून आणते आणि पटकन नवऱ्याच्या पायाजवळ ठेवते

ॲमस्टरडॅमला जाण्यासाठी बाहेर पडताना आन्सनं दार नुसतं ओढून घेतलं कुलूप लावलं नाही ते पाहून मी विचारल. 'असच घर उघड टाकून जातेस का तू ?" काही क्षण मी काय म्हणतोय ते तिच्या लक्षातच आलं नाही मग एकदम ती म्हणाली, " म्हणजे चोरापासून सरक्षण वगैरे म्हणतोस का ? छे छे ! आमच्या गावात कुणाच्या मनात ती कल्पनाही येत नाही इथ चाळीस वर्षांत कुणाचीही चोरी झाल्याच उदाहरण नाही आम्ही कोणीच कड्याकुलप लावीत नाही. आमच्या गावचच असं नाही, जवळजवळ सबंध हॉलंड-मधे अगदी जडजवाहिन्यांचे दुकानदार आणि इतर मोठे स्टोअरवाले घराना कुलुप लाव-तात पण सर्वसामान्य नागरिक तस काही करीत नाही आमचंच पहा ना ! समज चोर घरात आला, तरी काय नेणार ? फार तर टेलिव्हिजन. तो काय गेला तर गेला ! अगदी थोड्या किमतीत दुसरा आणायचा पण आमच्याकडे चोरी होण्याची कल्पनाच शिवत नाही कुणाला. "

आन्सच हे म्हणण मला आणखी एका उदाहरणावरून पुढं अधिकच पटल. रविवारी मी, आन्स, यान आणि किम त्याच्या मोटारीनं फिरायला बाहेर पडलो. जाताना पेट्रोल घ्यायचं होतं. पण रविवार असल्यानं पेट्रोलपंपावर कुणीच नव्हतं. पण यान म्हणाला, " त्यामुळं काही अडत नाही. आमच्याकडे पेट्रोलपपावर सुटीच्या दिवशी सेल्फ सर्व्हिस असते आपल्याला हवं तेवढं पेट्रोल घ्यायच आणि त्याचे पैसे जवळच्या पेटीत टाकायचे. " डच लोकांच्या या प्रामाणिकपणाचं कौतुक करावं तेवढ थोडच. कारण, पैसे देताना कुणी बनवाबनवी करीत नाही म्हणूनच हे व्यवहार चालू आहेत, हे उघड आहे

आम्ही बाहेर पडलो आणि जवळच्या बसस्टॉपवर उभे राहिलो. पण थंडी इतकी कडाक्याची होती की दहा मिनिटं बसची वाट पाहिल्यावर मी आन्सला म्हटल, " मला हा प्रवास झेपेलस वाटत नाही. आपण परत जाऊ या. ' ती म्हणाली, " बस उबदार असते. पण तुला थंडीचा त्रास होत असेल तर परतू या. " आम्ही घरात आलो बाहेरच्या हवेत बाकी अग झाकलं तरी तोंड आणि कान उघडे रहातच. ते इतके थंड वाटू लागले की गरम रक्ताच्या धडावर बर्फाच शिर ठेवल आहे असा भास मला होऊ लागला. पण आम्ही पाचसहा मिनिट घराच्या उबेत बसतो न बसतो तोच समोरून येणारी बस दिसली. आन्सन घराच्या काचेतूनच ड्रायव्हरला थांबण्याची खूण केली आणि आम्ही बसमधे शिरलो.

हॉलंडच्या लहान गावी हे एक बर असत बस ड्रायव्हर्स, आगगाडीचे कंडक्टर्स हे आपल्या उतारूना अगदी नावानिशी आणि पत्त्यानिशी ओळखतात.

ॲमस्टरडॅम येईपर्यंत सूर्य थोडा दिसू लागला आणि थंडीही कमी झाली. आम्ही स्टेशनजवळ उतरलो गावात भटकू लागलो त्या रस्त्यावर आपल्याकडच्या पुण्यासारखी सायकलींची खूप गर्दी होती बहुतेक रस्ते दगडांचे इमारती जुनं शिल्प दाखवणाऱ्या. देशाची राजधानी असूनही धावपळ, घाईगडबड नाही सारा कारभार निवान्तपणं, रसिकतेनं चाललेला आम्ही गावातल्या मुख्य केंद्रात आलो हा एक प्रचंड चौक आहे आणि त्यात मध्यभागी नॅशनल मॉन्युमेंट — राष्ट्रीय स्मारक — हा स्तंभ उभा आहे या चौकाचा आजचा विशेष म्हणजे जगातल्या सर्व हिप्पी तरुणतरुणींची ही राजधानी आहे या चौकात शेकडो हिप्पी दिसतात त्यापैकी काहीजणांच्या मोटारी असतात आणि ते गळ्यात पाट्या अडकवून या चौकात हिंडतात या पाट्या अशा असतात 'ॲमस्टरडॅमहून मंगळवारी पॅरिसला जाणार. उत्तम मोटार तीस अमेरिकन डॉलर्स किंवा बारा पौंड ' जर हिप्पींच्या-बरोबर प्रवास करायची इच्छा असेल तर निम्मा आकार देऊन आपली जागा रिझर्व्ह करायची मीही ॲमस्टरडॅमहून काही दिवसानी पॅरिसला जाणारच होतो मला अशी एखादी सफर करण्याची खूप इच्छा होती म्हणून मी आन्सला विचारलं, " मी नाव देऊ का या सफरीत ?" ती म्हणाली, " नको कारण असं की, तू ज्यांच्याबरोबर जाणार ते खरोखर हिप्पी असले तर काही भीती नाही पण हल्ली अशी बरीच उदाहरणं घडली आहेत की, युरोपातले गुन्हेगार हिप्पींचं सोंग घेऊन इथ येतात, हौशी प्रवाशांना पैसे घेऊन किंवा मोफतसुद्धा लिफ्ट देतात आणि आडवाटेत मोटार उभी करून त्या बिचाऱ्या प्रवाशाचे पैसे, पासपोर्ट वगैरे सगळ काढून घेऊन त्याला दूर सोडून देतात म्हणून म्हणते, तू असा धोका न पत्करलेला बरा " अर्थातच तो सल्ला मानून मी हिप्पींचा अनुभव घेण्याचा विचार सोडून दिला

मग आम्ही ॲन फ्रँकचं घर पाहिल. ' डायरी ऑफ ॲन फ्रँक ' हे जगप्रसिद्ध पुस्तक आणि त्याच नावाचा चित्रपट यामुळ मला त्या घराबद्दल खूपच उत्सुकता होती ते घर ॲमस्टरडॅममधल्या इतर घरासारखंच होत, तरी त्याच ठिकाणी ॲन आणि तिची कुटुंबीय-मडळी नाझी आक्रमणाच्या काळात रहात होती ॲन फ्रँकच्या घरानंतर आम्ही डुकराच्या मंडईला भेट दिली हॉलंडमध्ये डुकराचा फार मोठा व्यापार चालतो या विभागात रस्त्यांच्या कडेला बाधलेल्या लाकडी हौद्यात डुकरं ठेवलेली होती आणि त्यांची घाऊक किंवा किरकोळ खरेदी चाललेली होती. डुकरापेक्षाही लोणी आणि चीज यांचा हॉलंडचा अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापार मोठा आहे या बाजारात लोण्याचे व चीजचे नारळाएवढे गोळे करून ते विकण्यात येतात. थंडीमुळे ते वितळत नाहीत. या गोळ्यांचे प्रचंड ढीग फार गमतीचे दिसतात त्या बाजारातून जाताना आन्स थट्टेन मला म्हणाली, " आता मी तुला आणखी एका बाजारातून नेणार आहे. त्यातल तुला काही खरेदी करायचं असेल तर पहा. "

" कसला बाजार ? काय विकतात तिथ ?" मी उत्सुकतेनं विचारलं. हॉलंडच्या

पवनचक्कीचे नमुने किंवा खेळणी असं काहीतरी ते असावं अशी साहजिकच माझी समजूत होती त्यावर आन्स छद्मीपणानं हसून म्हणाली, 'तिथं काय विकत मिळत ते प्रत्यक्षच पहा म्हणजे समजेल." आम्ही कोपऱ्यावर वळलो, आणि एकदम माझ्या लक्षात आलं की ती ॲमस्टरडॅमच्या वेश्यांची वस्ती होती रस्त्याच्या मधूनच एक कालवा जात होता आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या इमारतींच्या तळमजल्याना दर्शनी भिंतीऐवजी काचा होत्या त्या काचांच्या मागे सौंदर्यात एकमेकींशी स्पर्धा करणाऱ्या वेश्या खुर्च्या टाकून आरामात बसल्या होत्या. बहुतेकजणी रस्त्याकडे पहात होत्या. कुणी मासिक चाळत होत्या, कुणी बेफिकीरपणे सिगरेटी ओढीत होत्या सर्वांचे पोषाख--म्हणजे जे काही मूठभर कपडे अंगावर होते ते— उन्मादक होते अर्ध्यावर अधिक उघडे असलेले बडखोर स्तन आणि चड्डीपर्यंत उघड्या दिसणाऱ्या आव्हानयुक्त मांड्या मी काचेतून ते पहात होतो, तोच आन्स खट्याळपणे म्हणाली, "आता कळलं का इथं काय विकतात ते ?" मी तिला एक चापट मारून म्हटलं, "यू आर नॉटी !"

त्याच रस्त्यावर ब्ल्यू फिल्म्सची थिएटर होती. — थिएटर कसली ? छोटेसे हॉलच एका वेळी फार तर पंचवीस ते चाळीस लोक बसतील एवढेच आन्स म्हणाली, "एखादा चित्रपट पहायचा का ?' मी म्हटलं, "न्यूयॉर्कच्या 'टाइम्स स्क्वेअर'च्या आसपास वाटेल तेवढे असे सिनेमे पहायला मिळतात पण ठीक आहे. तुझ्याबरोबर म्हणून पाहीन पण तुला उघडपणं माझ्याबरोबर अशा सिनेमाला येताना काही गैर तर वाटणार नाही ?" त्यावर हसून ती म्हणाली, "आमच्याकडे याला काहीच महत्त्व नाही माझ्या मुलींना वर्गातसुद्धा सेक्स फिल्म्स दाखवतात कारण लैंगिक अज्ञानामुळं मुलींना अकाली गरोदरपण येऊ नये आणि त्यांचं आयुष्य मातीमोल होऊ नये म्हणून आमच्याकडे बारा ते तेरा वर्षां-पुढच्या मुलींना लैंगिक विषयावरचे चित्रपट दाखवतात इतकच नाही, तर हॉलंडच्या टेलिफोन डिरेक्टरीत अगदी राजरोसपणं 'सेक्स फिल्म्स' या शीर्षकाखाली त्या गावात लैंगिक चित्रपट दाखवणाऱ्या चित्रपटगृहांची नावं आणि टेलिफोन नंबर्स असतात "

आम्ही जवळच्याच एका निळ्या चित्रपटांच्या थिएटरमधे गेलो तिकिटं विकणाऱ्याची खोली रिकामी होती आत पहातो तो थिएटरही रिकामच इतक्यात एक पंचविशीचा तरुण आला आणि त्यानं अभिवादन करून विचारलं, "मी इथला ऑपरेटर आहे मी आपल्या-साठी काय करू शकतो ?" आम्ही सिनेमा पहायचाय म्हणून सांगितलं त्यानं तीन गिल्डर घेतले आणि सिनेमा सुरू करून तो कुठतरी निघून गेला. सबंध थिएटरमधे आम्ही दोघच सिनेमा संपला तरी तो ऑपरेटर आलाच नव्हता आम्ही बाहेर पडलो एका उपाहारगृहात गरमगरम खाल्लं, कॉफी घेतली आणि घरी परतलो येताना बदल म्हणून आगगाडीनं आलो मी दोन दिवसापूर्वी गाडीनं पर्मरेंडला जाताना जो गार्ड होता तोच याही गाडीला होता त्यानं मला पाहिल्यावर प्रसन्नपणं विचारलं, "तुम्हाला त्या दिवशी घर सापडलं ना ?" मी आभारपूर्वक 'होय' म्हणून सांगताच तो आन्सला म्हणाला, "तुमचा हा पाहुणा उमदा आणि छान आहे" खरं तर त्याला माझी काहीच माहिती नव्हती

पण परकीय असो की स्वकीय असो, आपल्या गाडीनं जाणाऱ्या प्रवाशाच कुशल विचाराव, त्याच्याबद्दल थोडं सुखद बोलाव, ही हॉलंडच्या रेल्वे-अधिकाऱ्याची पद्धतच आहे गाडीत प्रवासीही मोजकेच असतात त्यामुळ प्रवासाला योग्य अस प्रसन्न वातावरण करण्यात त्या अधिकाऱ्यांनाही आनद वाटतो आन्सनंही त्याची मुलगी कशी आहे, धाकटा मुलगा काय शिकतो, अशी घरगुती चौकशी केली त्या रात्री आन्सन आपल्या ग्रामोफोनवर एक भारतीय गाण्याची रेकॉर्ड लावली शास्त्रोक्त सगीताची ती ध्वनिमुद्रिका तिला कुठ मिळाली अस मी विचारलं, तेव्हा ती म्हणाली, "सोळा वर्षांपूर्वी मी ही लडनला घेतली आणि सोळा वर्षांत आजच लावली !" मी आश्चर्यानं विचारल, "पण तुला तर भारतीय सगीतातल काही कळत नाही मग कशासाठी ही रेकॉर्ड घेतलीस ?" ती म्हणाली, "कधी ना कधी तू मला भेटायला येणार हे मला माहीतच होत. आणि त्या वेळी तुला सगीताची कमतरता पडू नये म्हणून मी ही जपून ठेवली होती ' इतका बारीक विचार बायकाच करू शकतील !

त्या रात्री आन्स म्हणाली, 'आज आमचा रायडिंगचा दिवस आहे तू येणार का


ॲमस्टरडॅममधील एक सार्वजनिक उद्यान





आमच्याबरोबर ?" मी म्हटलं, "नाही बुवा ! मला काही घोड्यावर बसायची सवय नाही उगीच घोड्यान खाली पाडल तर घडपणं भारतात जायची सोय नाही !"

"पण प्रत्येकानं घोड्यावर बसलच पाहिजे असं नाही नुसतं पहाणाऱ्यासाठीही जागा असते" या तिच्या उद्‌गारानी मला बरं वाटलं आणि मी निघालो थानच्या मोटारीतून मी आणि सारं व्हॅलिद कुटुंब घोड्याच्या रायडिंगच्या जागेकडे गेलो घरापासून ती जागा फार तर मैल -- सव्वा मैल असेल. सर्कशीच्या प्रचड तबूसारखी पण लाकडी बांधकामाची ती जागा होती मधल्या रिंगणात वीसपचवीस घोडेस्वार तालीम करीत होते. मध्यभागी त्याचा ट्रेनर होता आणि तो समुदायाला किंवा कधीकधी व्यक्तिश घोडेस्वाराला सूचना देत असे. जमिनीवर लाकडाचा भुसा टाकलेला होता. त्यामुळं कुणी घोडेस्वार शिकताशिकता खाली पडला तरी त्याला दुखापत होण्याची भीती नसे. घोड्यावर



हॉलंडमधील निसर्गसान्निध्यात उभार-
लेल्या दोन वैशिष्टयपूर्ण पवनचक्क्या

बसणाऱ्यात बहुसंख्य स्त्रिया होत्या आन्स, तिच्या मुली आणि मुलगा घोड्यावरून रपेट करीत असताना मी आणि यान त्या जागेच्या भोवती असलेल्या बारच्या स्टुलावर बसून बिअर घेत त्या रपेटीच निरीक्षण करीत होतो

सकाळी मी सर्वांच्याबरोबर ब्रेकफास्ट घेतला आणि गावात एकटाच फिरून आलो परत आल्यावर आन्सन कॉफी दिली तिच्याकडे 'एक्स्प्रेसो कॉफी'चं यंत्र नेहेमीच तयार असे दर पंधरावीस मिनिटांनी ती 'कॉफी हवी का' अस विचारी, आणि तिथ राहून मलाही ती सवय होऊ लागली होती त्या वेळी कॉफी घेताघेता मी आन्सला म्हटल, "मी अमेरिकेहून इतक्या लांब कशासाठी आलो असेन असं तुला वाटत ?"

"मला भेटायला." ती सहजपण म्हणाली

"ते खरंच." मी सांगितल, "पण या भेटीत मला काही सांगायचं आहे मी

तुझ्यावरून एक कादंबरी लिहिली आहे तिच नाव ' महानगर ' इंग्लंडमधे झालेली आपली मैत्री हा त्या कादबरीचा मुख्य विषय आहे" इथ मी तिला ' महानगर'च कथानक थोडक्यात सांगितल त्यावर ती किंचित हसून म्हणाली, " एका कादंबरीचा सारांश सागायला का तू इतक्या लाब आलास ?"

" तसं नाही. मी तुला लंडनमधे असताना जी एक गोष्ट सांगितली नव्हती, ती सागायला मी आलो आहे"

" कोणती ?"

"ती अशी की, जेव्हा तुझीमाझी लडनमधे मैत्री होती, तेव्हा माझं लग्न झालं होत पण मी अविवाहित आहे अस तुला मी तेव्हा सागितल होतं."

आता ती गंभीरपणे त्या सुखद काळाची मनाशी आठवण करू लागली थोड थाबून ती म्हणाली, " पण तुझ लग्न झालेलं आहे असं तेव्हा तू मला सांगितल असतस, तरी तुझ्यामाझ्या मैत्रीत फरक पडला नसता कधीही पडणार नाही "

' तुझं मन दुखावेल अशी मला तेव्हा भीती वाटत होती." मी म्हटलं.

" दुसऱ्याच मन समजून घेण्याचा मी नेहेमीच प्रयत्न करते त्या वेळी सत्य न सांगण्यात तुझा हेतू माझी कदर करण्याचाच होता " अस म्हणून आन्सन माझ्या मनातला एक भावनिक गुंता सोडवला

मग ती म्हणाली, " काल मी शाळेत गेले, तेव्हा आमचे प्रिन्सिपॉल म्हणाले की, तुझ्याकडे आलेल्या भारतीय पाहुण्याला उद्या आमच्या शाळेत बोलव मुलाना प्रत्यक्ष ज्ञान मिळेल येणार का आज ?"


मी विचार केला की, हॉलंडच्या शाळेचाही अनुभव घ्यावा पण अडचण होती ती भाषेची मला डच भाषा येत नव्हती आणि मुलाना इग्रजी येण्याची शक्यता नव्हती मी तस आन्सला सागितल, तेव्हा ती म्हणाली, " काही हरकत नाही आमचे इग्रजीचे शिक्षक दुभाष्याच काम करतील." मग मी शाळेत यायच कबूल केल आणि तिनं मुख्याध्यापकांना फोन करून मी येत असल्याचं सांगितल थोड्या वेळान आम्ही निघालो दहाबारा घराची गल्ली ओलाडली आणि शाळा आली शाळेच्या काचेतून अनेक मुलंमुली नाकं चपटी करून आमच्या येण्याची वाटच पहात होती. मुख्याध्यापकानी माझ स्वागत केल शिक्षकाच्या खोलीत नेऊन इतर शिक्षक–शिक्षिकाची ओळख करून दिली इग्रजीचे शिक्षक माझ्या-बरोबर एका वर्गात आले आठवीचा तो वर्ग होता साधारण तीसपस्तीस मुलमुली त्यात होती. फळ्यावर माझ नाव लिहिलेल होत त्याच्या आजूबाजूचा मजकूर म्हणजे ' भारतीय लेखक रमेश मत्री याची भेट ' असा होता अस त्या शिक्षकानी मला सागितलं आन्सन त्यांना पुरवलेल्या माहितीच्या आधारे त्यानी मुलाना माझी ओळख करून दिली आणि मग मी भारताविषयी थोडक्यात भाषण केलं त्यानतर मुलानी प्रश्न विचारले.

बारातेरा वर्षांची एक चुणचुणीत मुलगी उभी राहिली आणि म्हणाली, " इडियन भाषेत तुमच नाव फळ्यावर काढून दाखवा " मी माझ नाव फळ्यावर लिहिल आणि ती

देवनागरी लिपी पाहून मुलांना खूपच गमत वाटली. दुसरी मुलगी म्हणाली, " माझं नाव अँजेला अस आहे ते नाव इडियन भाषेत लिहाल का ?' मी ते फळ्यावर लिहिल मग ती मुलगी पुन्हा उभी राहिली आणि आपली वही पुढं करून म्हणाली, " माझ्या आईवडलाना मला इडियन भाषेतलं नाव दाखवायच आहे या पानावर कृपया अँजेला अस लिहाल का ? ' मी तिच्या वहीवर लिहिल त्याबरोबर सगळ्याच मुलानी आपल्या वह्या काढल्या आणि आपल नाव इडियन भाषेत लिहायला सागितल तेव्हा शिक्षकानी त्याना शांत करून म्हटल, " पाव्हण्याना इतर प्रश्न विचारा सगळे प्रश्न झाल्यावर शेवटी ते तुमची नाव वह्यात लिहितील "

एक मुलगा विचारता झाला, " इडियामधे वीज आहे काय ?" मी ' अर्थातच आहे ' असं सागितलं आणि आमच्या देशात कितीतरी औद्योगिक सुधारणा झाल्या आहेत अस म्हटल त्यानतर एका मुलीन जो प्रश्न विचारला तो मात्र अफलातून होता, आणि इतक्या वर्षात आपल्याला तो प्रश्न कधीच कसा सुचला नाही याचंही मला आश्चर्य वाटल तिनं विचारल, " तुमच्या देशात हॉकी खेळणारे शीख लोक डोक्यावर कोणत फळ बांधतात आणि ते फळ का बाधतात ?"

ती काय विचारते आहे ते प्रथम माझ्या ध्यानातच आलं नाही नतर समजलं की सरदारजी आपले केस डोक्यावर बाधतात ते फोटोत किंवा टी व्ही वर पाहून त्या मुलाना वाटल की काही धार्मिक अथवा वैद्यकीय समजुतीसाठी शीख लोक डोक्यावर कसलतरी फळ बाधीत असावेत ! तो गैरसमज मी लगेच दूर केला मग मुलानी इदिरा गाधी, हिमालय पर्वत, भारतीय जगलातील वाघ–सिंह–हत्ती वगैरेंबद्दलचे प्रश्न विचारले. एकान विचारलं, " तुम्हाला हॉलडमधे सर्वात काय आवडल ?" मी म्हटल, ' हॉलंडमधली मुल




ॲमस्टरडॅममधील एक नितान्तसुदर कालवा

मला सर्वात अधिक आवडली " हे उत्तर ऐकल्यावर मुलांनी खुषीच्या टाळ्या वाजवून आणि बाकांवर हात आपटून गहजब केला माझं ते उत्तर त्याना खूष करण्यासाठी नव्हत. गोरीपान, निळ्या डोळ्याची गुबगुबीत डच मुल अत्यंत सुंदर दिसतात. प्रश्नोत्तरं झाल्यावर प्रत्येक मुलामुलीन आपलं नाव मला सांगितलं आणि मी ते इमानेइतबारे देवनागरी लिपीत त्याच्या वहीवर लिहिल उभयपक्षी आभारप्रदर्शन झाल्यावर आन्सन मला त्या शाळेत मुलानी तयार केलेल्या शोभेच्या वस्तू आणि चित्र दाखवली तिथ अशी पद्धत आहे की, या वस्तू आणि चित्र गावातले दुकानदार विक्रीसाठी ठेवतात आणि कमिशन वजा जाता विकलेल्या वस्तूचे पैसे त्या त्या मुलाना देण्यात येतात ते वस्तुसंग्रहालय पाहिल्यावर शिक्षकशिक्षिकाबरोबर चहापान झाल आणि मी आन्सबरोबर घरी परतलो. त्या शाळेतला सौंदर्यान आणि अनघतेनं गजबजलेला तो तास म्हणजे माझी एक अतिशय प्रिय अशी आठवण आहे.

रविवारी सध्याकाळी यानच्या गाडीतून तो, मी, किम आणि आन्स जवळच्याच एका खेड्यात गेलो त्या गावाचं नाव व्हॉलडॅम. त्याच वैशिष्टय अस की, जुन्या — म्हणजे शे–दीडशे वर्षांपूर्वीच्या — हॉलंडचे अनेक अवशेष त्या गावात राखून ठेवलेले आहेत. इतकच नव्हे, तर दर रविवारी त्या गावातल्या स्त्रिया शभर वर्षांपूर्वी हॉलंडच्या बायका जो पोषाख घालीत असत, तसा पोषाख करून गावात फिरतात मी अतिशय उत्सुकतेनं त्या गावात गेलो आणि त्या औत्सुक्याचं सार्थकही झालं सबध गावात एकही तिमजली इमारत नाही सगळी बैठी घर. क्वचित दुमजली प्रत्येक घराच्या पुढ किंवा मागं सुदर कालवा बायकांचा पोषाख म्हणजे कमरेपासून पायापर्यंत रेघारेघाचा पाढरा मॅक्झीसारखा फ्रॉक, काळा ब्लाउज आणि डोक्याला पाढऱ्या टोपीसारख काहीतरी कापड बाधलेल गळ्यात नक्षीच पांढरं कापड. ओळख नसली तरी या सुदरी जाणाऱ्यायेणाऱ्याला हात करून ' हॅलो ' म्हणत अगदी छोटी रेस्टॉरंट्स होती त्यांत बटाटयाच्या फिंगरचिप्स तुम्ही ऑर्डर दिल्यावर लगेच तळून देतात. बरोबर ताजे फिश, कॉफी आणि हे सार भरपूर स्वस्त गावात एकच मोठ हॉटेल आहे तिथ जुन्या हॉलंडचं वस्तुसंग्रहालय आहे. बोटींचे नागर, जुने दिवे अशा वस्तू त्यात ठेवलेल्या आहेत गावात कोपऱ्याकोपऱ्यावर पवनचक्क्या आहेत आणि विशेष म्हणजे त्या केवळ शोभेच्या नसून प्रत्यक्ष काम करतात एका पवनचक्कीवर पिठाची गिरणी चाललेली आम्ही पाहिली. मग झांडेम नावाच्या भागात आम्ही ओपन एअर रेस्टॉरंटमधे गेलो तिथ नदीच्या काठावर सुदर उपाहारगृह आहे आम्ही बिअर, व्हिस्की आणि गरम खाद्यपदार्थ घेतले आणि रात्र पडण्याच्या सुमाराला घरी परतलो

आन्सचा मुलगा किम हा ज्युडोच्या वर्गात जात असे. तो ज्युडो — म्हणजे जपानी आत्मसंरक्षणाच शिक्षण — पहायला मी तिच्याबरोबर गेलो सहासात वर्षांपासून दहाबारा वर्षांपर्यंतची मुल तिथं जमिनीवर अथरलेल्या गाद्यावर ज्युडोचं शिक्षण घेत होती. त्यानी नेहरूशर्टासारखा अधिक पसरट असा जपानी पद्धतीचा सदरा आणि सैल विजार घातली



व्हॉलडॅम खेड्यात शंभर वर्षांपूर्वीच्या वेषात फिरणाऱ्या डच स्त्रिया

होती. दोन जपानी आणि तीन डच शिक्षक ज्युडोचं शिक्षण देत होते. तीसचाळीस गोरीपान लुसलुशीत मुलं आनंदानं त्या मऊ गाद्यांवर पडत किंवा दुसऱ्याला पाडीत, ते दृश्य मोठं गमतीचं दिसे जवळच पोहण्याचा तलाव होता. तोही आम्ही पाहिला असे आन्सकडचे पंधरा दिवस फार सुखात गेले. यथेच्छ भटकायचं, घरी बिअर, वाइन, व्हिस्की अशी अनेक पेयांची कोठार, बुद्धिबळाचे उत्तम डाव. वाचायला छान पुस्तकं आणि आन्सचा सुंदर, बुद्धिवान, भावनाशील सहवास यामुळं हॉलंडमधले हे निवान्त सुखाचे दिवस माझ्या जीवनात अविस्मरणीय शिल्प होऊन राहिले आहेत

अखेर माझा जायचा दिवस उजाडला खरं तर मी दोनदा जायचं ठरवलं, आणि आन्सच्या आग्रहामुळं मला ते जाणं लांबणीवर टाकावं लागलं पण प्रत्येक सुखाला शेवट असतोच — असावा मी जाण्याच्या आदल्या दिवशी आन्स म्हणाली, " तुला काहीतरी प्रेझेंट द्यायचं आहे. काय देऊ ते तूच सांग. " मी म्हटलं, " सुखाचे दिवस येणं हे सर्वांत मोठं प्रेझेंट ते कुठं हरवत नाही, पडत नाही, तुटत नाही की फिकट होत नाही ! ते तू मला दिलंस. आता आणखी कसलीही भेटवस्तू मला नको. " तरी पण तिनं मला ॲमस्टर-डॅमचं सुंदर सचित्र पुस्तक आणि पवनचक्कीची प्रतिकृती या वस्तू भेट म्हणून दिल्याच.

मी ॲमस्टरडॅमहून पॅरिसला जाणार होतो. सकाळी नऊच्या सुमारालाच मी आणि आन्स सामान घेऊन निघालो गाडी सुटायला खूप वेळ होता साडेअकरा–बारा वाजता सुटणार होती आम्ही स्टेशनवर क्लोकरूममधे सामान ठेवलं आणि ॲमस्टरडॅमच्या बगिच्यातून फिरलो मग एका उपाहारगृहात वाइन घेतली आणि खाद्यपदार्थ घेतले गेले पंधरा दिवस आनंदी, ताजा टवटवीत असलेला आन्सचा चेहरा मी जाणार या जाणिवेनं आता उतरू लागला होता; रडवेला होत होता. मी त्या चेहऱ्याची रया ओळखून तिला यत्नानं म्हटलं, " आता रडणार हं तू ! मलासुद्धा तुला रडताना पहायचंच आहे. "

नजर दुसरीकडेच वळवून ती म्हणाली, " छट ! मला किती वाईट वाटत याची तुला कल्पना नाही पण मी रडणार नाही रडून मी स्वत:ला हास्यास्पद करून घेणार नाही "

आम्ही स्टेशनवर आलो मी म्हटल, " माझ्या डॉलर्सचे डच गिल्डर्स करून आणतो ' आन्स म्हणाली, " नको मी तुझ तिकिट काढणार आहे " अस म्हणून तिनं शभर गिल्डर्सची नोट काढली मी तिला ' नको ' म्हणत विचारलं, " अग पण मी परतीची व्यवस्था केली आहे तुझे पैसे कशाला खर्च करतेस ?" त्यावर तिन उलट प्रश्न केला, " तुझे पैसे नि माझे पैसे यात अजून तू फरक करतोस की काय ?" या प्रश्नाचं उत्तर देणं मला शक्य नव्हत तिन माझ पॅरिसच तिकिट काढल नि माझ्या हाती दिल आम्ही सामान घेतल. प्लॅटफॉर्मवर आलो तीही माझ्याबरोबर थोडा वेळ डब्यात बसली गाडी सुटायला अजून दहा मिनिट होती आता आन्स फारच अस्वस्थ झाली होती माझा हात धरून खिडकीतून बाहेर शून्यपण पहात ती म्हणाली, ' मी गेले तर चालेल का ? गाडी सुटेपर्यंत थांबण मला फार कष्टाचं वाटत ' मी तिची मनोव्यथा ओळखली आता अश्रू आवरून धरण तिला फार अवघड होत होत. आणि माझ्यासमोर रडणार नाही अस तर तिन आव्हान दिल होत मी विचारल, " तुला लवकर गेलच पाहिजे का ?" काय उत्तर द्याव हे तिला समजेना अखेर ती म्हणाली, " तस नाही मी इथ दिवसभरसुद्धा राहीन — तू रहाणार असलास तर

त्या शेवटच्या क्षणी मला वाटल, असच उतराव नि पुन्हा पर्मरेंडला चारसहा दिवस तिच्याकडे रहाव पण पुन्हा चार दिवसानी निघताना हेच होणार, असच वाटल, त्याला अंत आहे का ? इतक्यात गाडी सुटायला पाच मिनिट असल्याची शिटी झाली आन्स उठली आणि म्हणाली, " आता मी खाली उतरते. नाहीतर तुझ्याबरोबर पॅरिसला याव लागेल नि बायको पळून गेली म्हणून माझा नवरा घटस्फोटाचा अर्ज करील ! '

या वाक्यावर मी हसलो. तीही विषण्ण हसली. वरवरच्या या विनोदात किती क्लेश, किती यातना, किती विखार आहे याची दोघानाही जाणीव होती गाडी हलण्यापूर्वी उठलच पाहिजे या विचारानं तिन मला अखेरचं जवळ घेतलं, आवेगान माझं चुंबन घेतल आणि विजेच्या गतीनं ती खाली उतरली. खिडकीतून हात पुढ करून तिनं अखेरचं हस्तांदोलन केल, तेव्हा मनापासून तिन रडायला सुरुवात केली होतीच, पण वरकरणी ओढूनताणून चद्रबळ आणल होत गाडी हलली आणि चटकन आन्स माझ्याकडे पहाण्याऐवजी पाठमोरी झाली तिनं रुमाल काढून डोळ्याजवळ नेल्याचं मला स्पष्ट दिसल आपण रडणार नाही या प्रतिज्ञेत तिन म्हटलं तर यश मिळवलं होत, म्हटल तर अपयश

मी सुन्न होऊन तिच्या पाठमोऱ्या, ओक्साबोक्शी रडणाऱ्या, लहानलहान होत जाणाऱ्या आकृतीकडे पहात होतो. पुन्हा आम्ही हजारो मैल दूर फेकले जात होतो, आणि तरीही जवळ येत होतो .

# आणि पॅरिसच्या रात्री नग्न झाल्या !

## १२

ॲमस्टरडॅमहून आन्सचा निरोप घेऊन निघालो माझ्या डब्यात एक डच गृहस्थ होता चाळिशीच्या वयाचा, मारदस्त, खानदानी दोन मुले होती — भाऊबहीण भाऊ होता आठनऊ वर्षांचा बहीण होती दहाअकराची त्याची आई त्याना पोचवायला स्टेशनवर आली होती पॅरिसला मुलांचे वडील त्याना उतरून घ्यायला येणार होते.

आमची गाडी सुटून अर्धापाऊण तास झाला, तेव्हा त्या डच गृहस्थाने मुलांना विचारले, "तुम्ही पॅरिसला जाणार आहात ना ? मग तुमच्या आईच पत्र बरोबर घेतल आहे का ?' मुलांनी "नाही, पण आमचे वडील येणार आहेत उतरून घ्यायला," असे सांगितले त्यावर तो गृहस्थ म्हणाला, "सरहद्द ओलांडून गाडी जेव्हा फ्रान्समधे जाईल, तेव्हा पोलिस येऊन तुमच्यांकडे पत्र मागतील कारण सोळा वर्षांखालच्या मुलांना फ्रान्स-मधे एकट्यान प्रवास करता येत नाही. त्याच्याबरोबर कुणीतरी प्रौढ नाते-वाईक असावा लागतो, किंवा 'ही मुल आमच्या परवानगीनं या गावापासून त्या गावापर्यंत प्रवास करीत आहेत' असं आईचं किंवा वडिलाचं किंवा ज्येष्ठ नातेवाइकाचं पत्र असाव लागत "

मला या नियमाचे आश्चर्य वाटले आणि फ्रेंच सरकारने तसा नियम का केला असेल असे मी त्या गृहस्थाला विचारले, तेव्हा त्याने सांगि-तले, "लहान मुल घरातून पळून जाण्याचे वाढते प्रकार फ्रान्समधे घडत आहेत अशा प्रकारांना आळा बसावा म्हणून सरकारन हा कायदा केला आहे " आमच्या डब्यातली ती दोन मुले अमेरिकन होती. आईबापाच्या



समतीनेच ती प्रवास करीत होती हे खरे असले तरी त्याचा काहीच लेखी पुरावा त्याच्यापाशी नव्हता म्हणून ती घाबरली त्यांतली बहीण भेदरून म्हणाली, " अहो मग आम्हाला पोलिस पकडतील का ? " तो इच गृहस्थ फार सज्जन होता त्याने त्याच्या भीतीचे निराकरण करीत म्हटले, " तुम्ही काळजी करू नका. ही माझ्या नात्यातली मुलं आहेत असं मी पोलिसाना सांगेन तुम्हीही मी तुमचा 'अंकल' आहे असं विचारल्यास सांगा."



' फॉलीज बर्जर'मध्ये ' गे पारी ' (रंगेल पॅरिस)
हे पहिले स्वागतगीत म्हटले जात आहे.

त्याने सांगितले तसेच घडले आम्ही फ्रेंच सरहद्द ओलांडल्यावर पाचदहा मिनिटातच पोलिस आले आणि त्यांनी आमचे पासपोर्ट–व्हिसा वगैरेंची तपासणी केली पोलिसांनी विचारण्यापूर्वीच त्या इच माणसाने सांगितले, " ही मुलं माझ्याबरोबर प्रवास करीत आहेत " त्यामुळे कसलीही अडचण न येता मुले पॅरिसला पोचू शकली रात्री साडेसातच्या सुमाराला गाडी पॅरिसला आली तिथे गेल्यावर काय करायचे ते मी आधीच ठरवले होते

पॅरिसची रात्र नाइट क्लबमधे काढायची, पहाटे गार दु नॉर्द स्टेशनजवळच्या एखाद्या हॉटेलात जायचे, आणि दिवसभर झोपून चारपाचला उठायचे आणि थोडे भटकून पुन्हा नाइट क्लब, हा माझा गेल्या वेळच्या पॅरिसच्या कार्यक्रमासारखाच कार्यक्रम मी मनाशी योजला होता त्यासाठी प्रथम पॅरिसच्या स्टेशनवर क्लोकरूममधे सामान ठेवणे आवश्यक होते मी हॉलंडमधेच फ्रेंच चलन घेतले होते. त्याचा उपयोग करून मी एका लॉकरमधे सामान ठेवीत होतो, तोच पचविशीतिशीच्या एका भारतीय दिसणाऱ्या तरुणाने मला म्हटले, "आपल्याकडे पेन आहे का ?" मी त्याला माझे पेन दिले त्याने काहीसा पत्ता डायरीत टिपून घेतला आणि ती डायरी आपल्याबरोबरच्या पाच तरुणापैकी एकाकडे दिली. मग तो माझे पेन देताना म्हणाला, "माफ करा, पण आपण भारतीय किंवा पाकिस्तानी आहात काय ? तुमचं गाव कुठलं ?" त्याना मी मुबईचा असल्याचे सांगितले

त्यावर त्याने आपली आणि आपल्या पाच मित्रांची विलक्षण कहाणी सांगितली तो म्हणाला, 'आम्ही सहाजण पाकिस्तानचे तिथं आम्हाला कामधंदा मिळेना आम्हाला एकजण भेटला त्यानं सांगितलं, 'तुम्हाला हॉलंडला काम मिळेल ' पण आम्हाला पासपोर्ट मिळेल का याची पचाईत होती. त्यान आमच्याकडून प्रत्येकी तीनतीन हजार रुपये घेऊन पासपोर्ट मिळवून दिले आमच्याकडे तेवढे पैसे नव्हते आम्ही जवळच्या वस्तू विकून, कर्ज काढून पैसे दिले आणि पासपोर्ट घेतले परदेशी जायला मिळणार आणि हॉलंडमधे काम मिळवून स्थायिक होणार म्हणून आम्ही चार दिवसापूर्वी अतिशय आनंदान पाकिस्तानातून निघालो ॲमस्टरडॅमला आम्ही उतरलो आणि विमानतळावर आमचे पासपोर्ट, व्हिसा दाखवले, तेव्हा तिथल्या अधिकाऱ्यानं आम्हाला विमानतळावरच्या क्वारंटाइनमधे ठेवल आम्हाला त्यानं सांगितलं, 'तुमचे पासपोर्ट खोटे, बनावट आहेत आम्ही वरिष्ठ अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून तुमच काय करायचं ते ठरवू तोपर्यंत तुम्ही क्वारंटाइनमधे रहा ' आमच्याकडून पैसे घेऊन पासपोर्ट देणाऱ्यान आम्हाला फसवल हे आमच्या लक्षात आल. पण आता फार उशीरा ही गोष्ट ध्यानी आली होती दोन दिवस आम्ही तुरुगात होतो आज सकाळी सहा वाजता डच पोलिसांनी आम्हाला सांगितलं, 'वास्तविक बनावट पासपोर्ट घेऊन आल्याबद्दल तुम्हाला कडक शिक्षा आणि कारावास भोगावा लागला असता पण तुमच्या सांगण्यावरून असं दिसत की दुसऱ्या कुणातरी कारस्थानी इसमाचे तुम्ही बळी आहात. म्हणून आम्ही तुमचा हॉलंडचा व्हिसा कॅन्सल करीत असून एका पोलिस-अधिकाऱ्याबरोबर तुम्हाला पॅरिसला पाठवणार आहोत तुम्ही पुन्हा हॉलंडमधे शिरण्याचा प्रयत्न केलात तर मात्र तुम्हाला सश्रम कारावास घडेल.' आज ॲमस्टरडॅमहून याच गाडीन एका पोलिस-अधिकाऱ्यानं आमची तिकिट काढून आम्हाला इथ आणून सोडल आहे पॅरिसमधे आमची रहायची व्यवस्था नाही आणि आमच्याजवळ पैसाही नाही तुम्ही जिथ रहाणार तिथं आमची रहायची काही सोय करू शकाल काय ? '

मला त्या सहा पाकिस्तानी तरुणाची दया आली, पण मी त्यांच्यासाठी काहीच करू शकत नव्हतो म्हणून मी त्यांना खेदपूर्वक नकार दिला आणि पॅरिसच्या मेट्रोच

म्हणजे जमिनीखालच्या रेल्वेचं तिकिट घ्यायला निघालो पॅरिसच्या मेट्रोचं कुठंही जायचं एकच तिकिट असतं ते स्टेशनात शिरतानाच घ्यायचं आणि मग कोणत्याही स्टेशनवर उतरायचं मला नाइट क्लबचा विभाग अगदी पाठ होता. फास पिगॅल किंवा ॲन्व्हर्स या स्टेशनवर उतरलं की हा मांसमात्र भाग लागतो मी फास पिगॅलला उतरलो. जमिनी-खालच्या स्टेशनावरून रस्त्यावर आलो, आणि ओळीनं असलेल्या नाइट क्लब्सच्या झग-मगाटानं डोळे दिपूनच गेले 'पिगॅल', 'ईव्ह', 'स्फिक्स', 'नार्सिस', 'मूलॉं रूझ' असे अनेक क्लब्स आणि त्यांचे विजेरी फलक रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दिवाळीच्या रोषणाई-सारखे उजेड फेकीत होते चौकात गर्दी मी म्हणत होती पॅरिसच्याच नव्हे, तर जगातील रंगेलपणाचं मध्यवर्ती केंद्र. मी सोळा वर्षांपूर्वी येथे आलो होतो, तेव्हा पॅरिसची प्रत्येक



'काउबॉय' नृत्याच्या या दृश्यात नंतर हा तरुण आपल्या प्रेयसीला हंटरने बेदम मारतो.

रात्र याच भागातली मौज लुटण्यात घालवली होती. आणि आताचाही माझा इरादा तोच होता रेस्टॉरंट्स, मद्यांचे बार्स, नाइट क्लब्स, ब्ल्यू फिल्म्सची चित्रपटगृहं, अश्लील पुस्तिका-–मासिकांची दुकानं, वेश्या, त्यांचे एजंट, अश्लील फोटो विकणारे फिरस्ते, हातगाड्यावर कॉफी–हॅंबर्गर इत्यादी विकणारे, जगाच्या सर्व भागातून आलेले प्रवासी आणि अलबते–गलबते यानी हा भाग रात्रभर गच्च भरून गेलेला असतो.

या चौकात एक विलक्षण चैतन्य आहे आणि चौकात पाऊल ठेवणाऱ्या कोणालाही ते चैतन्य झपाटून टाकते. प्रथम मी या टोकापासून त्या टोकापर्यंत नुसतीच चक्कर टाकली. पॅरिसचा हा भाग गेल्या सोळा वर्षांत फारसा बदलला नव्हता बहुतेक नाइट क्लब्स तेच होते जगप्रसिद्ध ' मूलां रूझ ' या नाइट क्लबवरची शोभेच्या पवनचक्कीची चाके तशीच फिरत होती ओसंडणारा उत्साह तसाच होता दिव्यांचा झगमगाट वाढला होता. नाइट क्लब्स आणि वेश्या अधिक धाडसी झाल्या होत्या मी पिगॅल चौकात परत आलो, तेव्हा लगडणारा एक फ्रेंच दलाल माझ्या जवळ येऊन हलक्या आवाजात म्हणाला, " पोरगी पाहिजे का ?" मी म्हटले, " नको. " पण इतक्या सहजासहजी कुणाला सोडणाऱ्यापैकी तो नव्हता त्यान माझा पाठलाग करीत म्हटले, " तुम्ही भारतीय लोक खूप श्रीमंत असता. फक्त पधरा अमेरिकन डॉलर्स ओके ? ठीक आहे, बारा फक्त तुमच्यासाठी बिकॉज यू आर माय फ्रेंड. "

दोन मिनिटापूर्वी मी याला पाहिलेही नव्हते आणि आता तो मला ' जिवलग मित्र ' म्हणत होता मी वारंवार नको म्हटले तरी तो आग्रहाने सागू लागला, " अहो नुसतं पोरी पहायला काय हरकत आहे ? तुम्ही माझ्याबरोबर या मी तुम्हाला दहाबारा छान पोरी दाखवतो फ्रेंच, जर्मन, चिनी — एनी चॉइस तुम्हाला नाही आवडली तर सोडून द्या मग तर झालं ? या बाजूला — इकडे " असे म्हणून त्याने मला हाताला धरून जवळ–जवळ ओढीतच बाजूच्या गल्लीत एका हॉटेल–कम–बाररूममधे नेले.

आम्ही आत शिरल्याबरोबर बारापधरा पोरी आमच्याभोवती गोळा झाल्या मला उद्देशून कुणी ' डार्लिंग ', कुणी ' प्रिन्स ', कुणी ' लव्ह ' असे म्हणत होत्या. एकदोघी मला बिलगल्या. एकीने हात नाजुकपणे दाबला. अर्थात अशा मायावी स्वागताने हुरळून जायला मी भाबडा, नवशिका नव्हतो. पॅरिसचे रंगेल जग आणि त्यातल्या खाचाखोचा मला चांगल्या अवगत होत्या. मी काही बोलण्यापूर्वीच त्या बारवाल्याने " स्कॉच सर ? एनिथिंग फॉर युवर गर्ल्स ?" अशी चौकशीही केली. मी त्याला तातडीने ' नॉन् सिल्वु प्ले ' (नको प्लीज) असे लगेच सांगितले. त्या धंदेवाईक छोकऱ्यापैकी कोणीही माझी मैत्रीण नव्हती हे त्याला माहीत होते नि मलाही माहीत होते. पण प्रवाशाकडून पैसा उकळण्याचा तो एक मार्ग असतो झाले. मी पाचदहा मिनिटे थाबून त्या पोरी न्याहाळल्या. प्रत्येक पोरगी सुदर, तरुण होती. अर्थात पॅरिससारख्या जगातील या क्षेत्रातील सर्वश्रेष्ठ जागी व्यवसाय करायचा, तर ते येरागबाळ्याचे काम नाही सर्वांचे कपडे पारदर्शक. जवळजवळ सारेच काही दिसत होते. छाती तर अर्ध्याहून अधिक उघडीच मला कोमल मासाचे ढीगच्या



'फॉलीज बर्जर'मधील जपानी नृत्याचे भव्य दृश्य

ढीग टाकले आहेत आणि त्यांत आपण उभे आहोत असे वाटू लागले त्या सर्वच तरुणींनी लावलेल्या उंची अत्तरांचा संमिश्र सुवास मात्र अस्वस्थ करीत होता. मी त्या लंगड्या मित्राला म्हटले, " जरा एक मिनिट बाहेर ये. " त्याला वाटले, याने पोरगी निवडली असावी आणि पोरींच्या समोर पैसे द्यायला याला सकोच वाटत असावा. बाहेर दरवाज्या-जवळच आम्ही उभे होतो तो खुषीत येऊन म्हणाला, " तुम्ही काही काळजी करू नका. याच बारवर हॉटेल आहे तिथं उत्तम खोली देतो तुम्हाला. माझी टिप पाच फ्रँक विसरू नका म्हणजे झाल "

' इर्मा ला दूस ' हा पॅरिसच्या वेश्यावरचा चित्रपट ( किंवा त्याचं हिंदीकरण — ' मनोरजन ' ) कोणी पाहिला असेल, तर बरोबर तसेच वातावरण तिथे होते. मी त्या दलालाच्या हातावर एक फ्रँक ठेवला आणि म्हटले, " थँक यू. पण मला जायला हव " त्याने ते नाणे खिशात ठेवून म्हटले, " ठीक आहे उद्या रात्री या इथंच याच ठिकाणी यू आर वेलकम द गर्ल्स वुइल बी वेटिंग फॉर यू " मला गंमत वाटली रोज शे–दोनशे लोक येणारजाणार काहीजण मौजमजा करण्यासाठी थांबणार. तासाभराने तोच माणूस समोर आला तर या पोरी ओळखणार नाहीत आणि खिशात पैसा नसेल तर ओळख दाखवणारसुद्धा नाहीत. पण त्याचा ' पब्लिक रिलेशन्स ऑफिसर ' मात्र सांगतो की, " या पोरी उद्या रात्री तुमची वाट पहातील " ठीक आहे आपण तरी कुठे असा जीव लावायला निघालोय ? तेवढीच गंमत एक फ्रँकला मिळाली म्हणायचे, नि सोडून द्यायचे झाले !

अजून माझे जेवण व्हायचे होते पिगॅल चौकातल्या एका उपाहारगृहात हॉट डॉग्ज, पाव, कॉफी घेतली आणि समोरच्याच ' ईव्ह ' या नाइट क्लबमधे गेलो हा पहिल्या दर्जाचा क्लब आहे त्यात अत्यंत लावण्यवती अशा तीसचाळीस नग्न तरुणींची नृत्ये, काही विनोदी प्रवेश, गाणी वगैरेंचे कार्यक्रम झाले पण पूर्वी मी पॅरिसला आलो होतो, त्यापेक्षा आताच्या कार्यक्रमात विनोदी प्रसंगाचे प्रमाण मात्र खूपच कमी दिसले. ' ईव्ह'मधला एकच विनोदी प्रसंग आठवतो इतर बऱ्याच नाइट क्लब्सप्रमाणे या दृश्यातही एक श्रीमंत अमेरि-कन माणूस पॅरिसमधे येतो असे दाखवलेले होते त्याचे वय साधारण पचेचाळीस तो बागे–तल्या एका बाकावर बसला होता इतक्यात पॅरिसची एक वारयोषिता येते, त्याच्या जवळ बसते, ओळख काढते ' वीस डॉलर्स देऊन माझ्या खोलीवर येतोस का ' म्हणून विचारते. तो ' नाही ' म्हणतो. त्याला आकर्षित करण्यासाठी ती स्कर्ट काढते, तरी तो दुर्लक्ष करतो मग आतले पांढरे वस्त्र काढते, ब्रेसियर काढते तरी तो तयार होत नाही. याला दर फार जास्त वाटत असावा म्हणून त्याला बिलगून ती म्हणते, " बरं बाई ! पधरा डॉलर्स द्या. मग तर झाल ? " तरीही तो ' नाही ' म्हणतो. ती त्याला जास्तजास्त मिठी मारते आणि दर कमी करीत बारा, अकरा — फक्त दहा डॉलर्सला या म्हणते. तरी तो आपला हुप्पच ! इतक्यात एक ब्रिटिश तरुण येतो मग या अमेरिकनाचा नाद सोडून ती वेश्या ब्रिटिश तरुणाला आपल्या जाळ्यात ओढायला जाते पण त्यालाही तिच्यात इंटरेस्ट नसतो इतक्यात या दोन पुरुषांचे एकमेकाकडे लक्ष जाते आणि दोघेही एकमेकाच्या प्रेमात पडतात.

गळ्यात गळा घालून जातात ती पोरगी विषण्ण चेहेऱ्याने पुन्हा अंगावर कपडे चढवू लागते. पाश्चात्य देशात समलिंगी सहवासाचे प्रमाण वाढत आहे, त्यावर हा विनोदी प्रवेश आधारलेला होता

'ईव्ह'मधला कार्यक्रम रात्री दोन वाजताच संपला. तिकिट काढण्यापूर्वी मला पहाटेपर्यंत कार्यक्रम चालू राहील असे सांगण्यात आले होते पण अखेरचा पडदा पडला, बार बंद झाला आणि प्रेक्षक उठून जाऊ लागले त्यामुळे तिकिट काढताना मिळालेले आश्वासन सरकारी आश्वासनाप्रमाणेच आता निरुपयोगी होते. सोळा वर्षांपूर्वी मी पॅरिसला आलो होतो, तेव्हा मात्र पहाटे चार-साडेचारपर्यंत नाइट क्लब्स चालत असत आणि मग तासभर उपाहारगृहात किंवा रस्त्यावर भटकून काढला, की मेट्रो ( भुयारी आगगाड्या ) सुरू होत आता मात्र दोन वाजल्यापासून पाच वाजेपर्यंतचे तीन तास कसे काढायचे हा प्रश्नच होता कॉफी घेण्यासाठी कॅफेमध्ये गेले तरी गर्दीमुळे फार तर अर्धा तास तिथे काढता येईल रस्त्यावर थडी चिकार होती आणि वाराही वाहात होता त्यामुळे पिगॅल चौकातली उंचच उंच झाडे छान दिसत होती पण त्या सौंदर्याचे रसग्रहण उबदार उपाहार-गृहात बसून करायला ठीक होते रस्त्यावर पाऊल ठेवले की बोचरी थंडी चावू लागे मी अंगात स्वेटर, सूट, ओव्हरकोट हा सगळा जामानिमा चढवला असला तरी चेहेरा आणि कान अतिशय थंड, बर्फासारखे होत अर्थात अशा रस्त्यावर पाच मिनिटे उभे राहिल्या-बरोबर कॅफेच्या आश्रयासाठी धावावे लागत असे

पिगॅल चौकातल्या अशाच एका छोट्या कॅफेमध्ये मी शिरलो आतल्या उबदार वातावरणामुळे बरे वाटले फार तर वीसपचवीस लोक त्यात असतील, पण तेवढ्यानेही गर्दी वाटावी इतके ते छोटे उपाहारगृह होते मी एका टेबलावर बसलो आणि हॅंबर्गर व कॉफी घेतली शेजारच्या माणसाने ठराविक प्रश्न विचारले, " तुम्ही इंडियातले का ?" मी ' होय ' म्हणून सांगितल्यावर तो म्हणाला, " मी १९४५ साली मुंबईला होतो व्हेरी गुड पीपल. " मी त्याला म्हटले, " तुम्ही काय करता ? तुम्हाला पॅरिसमधे रहायला आवडत असेल, नाही ?" त्यावर तो म्हणाला, " मी आता निवृत्त सैनिक आहे मी वेश्यांना गिऱ्हाइक गाठून देण्याचा धंदा करून माझ्या पेन्शनमधे भर घालतो. मला हा धंदा आवडतो का ? — मुळीच नाही अहो, जगातले सारे प्रवासी येणार आणि पॅरिसच्या बायकाबरोबर मौज करणार ! साली सगळी घाण इथं ! कुणीही, कसाही — गलिच्छ, म्हातारा, लंगडा, आंधळा, कुरूप असला तरी मला त्याला ' काय साहेब तुम्ही देखणे दिसता ! छानशी पोरगी आणू का ?' असं अजीजीनं म्हणावं लागतं रोज रात्री दोनतीन वाजेपर्यंत जागरण थंडीच्या दिवसात टूरिस्ट ट्रॅफिक बंद झाला की आमची बोंब ! रोज रात्री स्त्रिया बघून, गिऱ्हाइकं पटवून आणि स्वतः फावल्या वेळात संबंध ठेवून आता साला स्त्रीचा वीटच आला आहे ! तरी पण दुसरं काहीच करता येत नाही, म्हणून त्यांच्याशी संबंध ठेवतो गिऱ्हाइकोंची अपेक्षा न ठेवता तुमच्यासारखा एखादा प्रवासी गप्पा मारायला मिळाला म्हणजे बरं वाटतं — बोस्वाँ जीन ! बोस्वाँ बेट्टी !"

हे शेवटचे स्वागत आमच्या पलिकडे उभ्या असलेल्या दोन वेश्यांचे होते त्यांना बसायला खुर्च्या नव्हत्या म्हणून त्या हातात वाइनचे ग्लास घेऊन उभ्याच होत्या माझ्या जवळच्या त्या दलालाने उठून त्याना आपली जागा देऊ केली. मीही आपली जागा दिली. त्या दोघींनी आमचे आभार मानून खुर्च्या घेतल्या त्यांच्यापैकी एकजण त्याला म्हणाली, "अरे, तूही रेड वाइन आण. आज हिचा वाढदिवस आहे" त्यावर त्याने तिच्या गालाचे चुंबन घेतले आणि वाढदिवसाचे अभिनदन केले. मग तो मला म्हणाला, "या. आपण रेड वाइन घेऊन तिच शुभचिंतन करू. पण तुमच्या वाइनचे पैसे तुम्हालाच द्यावे लागतील ह! मला ड्रिंक देण परवडत नाही" त्याचे हे स्पष्ट बोलणे मला आवडले. चहाला किंवा जेवायला बोलावून ऐन वेळी बिल दुसऱ्याच्या पुढे सरकवण्याचा गनिमी कावा इथे नव्हता.

मीही विचार केला, कसा तरी आपल्याला वेळ काढायचाच आहे पॅरिसमधे मांतमात्र विभागात जगप्रसिद्ध पिगॅल चौकात एका वेश्येचा वाढदिवस साजरा करण्याची अगदी वेगळी गमत पहायला मिळते, तर पाहू आम्ही वाइन घेऊन टेबलाशी येतो, तो आणखी तीनचार वारयोषिता आपल्या मैत्रिणीभोवती जमा झाल्या होत्या. मग सर्वांनी मिळून 'हॅपी बर्थ डे टू यू' अशा आशयाचे एक फ्रेंच गाणे म्हणून तिचे अभिनंदन केले आणि वाइन प्राशन केली. मग एकीने तिला विचारले, "आज वाढदिवसानिमित्त तू काय करणार आहेस?" ती म्हणाली, "आज रात्री एकटी झोपून मी वाढदिवस साजरा करणार आहे! गेल्या कित्येक वर्षांत मी रात्री एकटी झोपले नाही रोज असतात गिऱ्हाइक! आज मात्र मी गिऱ्हाइक घेणार नाही आता खोलीवर जाणार आणि उद्या दुपारपर्यंत मस्त झोपणार!"

सर्वांनी तिचे पुन्हा या सुदर निर्णयाबद्दल अभिनंदन केले

थोडा वेळ गप्पागोष्टी करून जीन बाहेर पडली तिच्या पाठोपाठ मी आणि तो फ्रेंच मित्रही निघालो. तो मला म्हणाला, "तुम्ही एक गमत बघा. आज वाढदिवसानिमित्त गिऱ्हाइक घेणार नाही अस ही म्हणाली ना? आपण थोडा वेळ लाब राहून तिचा पाठलाग करू." आम्ही पंधराएक मिनिटे तिच्या मागून जात होतो. ॲन्हर्स स्टेशनजवळ समोरून एक प्रौढ इसम आला, तिच्याशी थोडा वेळ कुजबुजला आणि तिने त्याचा हात हातात घेऊन जवळच्या 'रोश आर्ट' हॉटेलात प्रवेश केला. माझा मित्र म्हणाला, "पाहिलंत? वाढदिवसालाही तिला पैशाचा मोह आवरता आला नाही. — बरं, आता मी जातो. आमच्या व्यावसायिकांची एक बैठक तीन वाजता आहे" असे म्हणून त्याने हस्तांदोलन केले आणि तो पिगॅलच्या दिशेने चालू लागला मी ॲन्हर्स स्टेशनकडे गेलो. कारण आता थंडी आणि वारा यांचे प्रमाण इतके वाढले होते, की आठदहा मिनिटांच्या चालण्याने खूपच कष्ट झाले होते भुयारी रेल्वेकडे जाणारा रस्ता पायऱ्यापायऱ्यांचा, खोलवर गेलेला असतो. रेल्वेच्या फलाटाकडे जाण्याच्या आधीच्या चारपाच पायऱ्यावरचा लोखंडी दरवाजा रात्री बद असतो. पण जमिनीत खोल गेलेल्या पायऱ्यावर बसले की रस्त्यावरच्या थंडी-वाऱ्यापासून बचाव करता येतो मात्र त्या पायऱ्यांवर बराचसा अंधार असतो.




'फॉलीज बर्जर'च्या जाहिरातीचा एक नमुना

मला आणखी दोन तास कसेबसे काढायलाच हवे होते. त्यामुळे पायऱ्याचा आसरा घेण्यावाचून गत्यंतर नव्हते. मी सावधपणे उतरू लागलो. आधीच तीसचाळीस लोक पायऱ्यावर बसलेले होते कोणी आडवे होऊन झोपण्याचा प्रयत्न करीत होते कुणी भितीच्या आधाराने डुलक्या घेत होते. मी दहाबारा पायऱ्या खाली उतरून थोडी बरी जागा पाहून बसलो आणि डुलकी घेण्याचा प्रयत्न करू लागलो तिथे आसऱ्याला आलेले बहुतेक सगळे लोक भटके, निराश्रित, अगदी गरीब असे दिसत होते माझ्या शेजारी साठीच्या वयाचा एक बेकार वाटणारा ग्रीक माणूस होता मी बसतो न बसतो तोच त्याने सिगरेट मागितली. पण मी सिगरेट ओढीत नसल्याने मजजवळ सिगरेट नव्हती मग त्याने गप्पा मारायला सुरुवात केली त्यातही अडचण अशी की, त्याला इंग्रजी येत नव्हते, आणि त्याचे ग्रीक-मिश्रित फ्रेंच मला कळत नव्हते. केवळ खुणेने 'कुठून आला ? कुठे जाणार ? ' अशा जुजबी प्रश्नाची तितकीच जुजबी उत्तरे देण्याचा मी प्रयत्न करीत होतो. इतक्यात जिन्याच्या वरच्या टोकाला पोलिसांची कर्कश शिटी झाली आणि पायऱ्यावर रखरखीत बॅटरीचा प्रकाश पडला. मी दचकून वर पाहिले, तेव्हा दोन पोलिस-अधिकारी आणि साध्या वेषा-तला एक अधिकारी उभे होते साध्या वेषातील अधिकाऱ्याजवळ पिस्तुल होते आणि त्याने ते जिन्यावरील आम्हा लोकांवर रोखले होते. हा काय प्रकार असावा हे मला समजेना. तोच तो अधिकारी करारी आवाजात म्हणाला, " कुणी कसलीही हालचाल केली तर गोळी उडेल ! सर्वांनी या बाजूला चेहेरे करा. "

गुन्हेगारांसारखे आम्ही वरच्या बाजूला चेहेरे केले. मग गणवेषातील अधिकारी प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर बॅटरीचा प्रकाश टाकून साध्या वेषातील अधिकाऱ्याला विचारू लागले, "हाच काय तो ?" त्याने दहाबाराजणांचे चेहेरे पाहून 'नाही' म्हटले, आणि मग त्याला हवा

होता तो चेहेरा दिसल्याबरोबर ' हाच तो इसम ' असे फ्रेंचमधून सांगितले पोलिसांनी त्याला पकडले आणि ते त्याला घेऊन गेले. तो इसम अगदी तरुण, फार तर बावीसचोवीस वर्षांचा होता पायऱ्यांवरच्या माहितगार लोकांनी नंतर सांगितले की तो अफू, चरस इत्यादी अमली पदार्थांच्या चोरट्या व्यापारात गुतलेला होता म्हणून पोलिसांनी त्याला अटक केली या प्रकारानतर मात्र मी धडा घेतला की, गमत म्हणून किंवा काटकसर म्हणून पुन्हा पॅरिसमधील मेट्रोच्या पायऱ्यावर रात्रीअपरात्री मुक्काम करायचा नाही 'ईव्ह नाइट क्लब'मधील उत्कृष्ट शृंगाररसाच्या नमुन्यानंतर इतक्या अल्पावधीत मला रुद्ररस अनुभवायला मिळेल असे वाटले नव्हते.

अशा अस्वस्थ मन स्थितीत झोप किंवा डुलकी येणे शक्यच नव्हते. दुसरे असे की, माझ्या खिशात पासपोर्ट, पैसे वगैरे होते, आणि भोवतालचे बरेच लोक उचले, खिसेकापू इत्यादी कलावंतांच्यापैकी दिसत होते म्हणून मी फार जपून वागत होतो अखेर एकदाचे रेल्वेचे दरवाजे उघडले आणि मी तिकिट काढून गार दु नॉर्द स्टेशनवर उतरलो तिथे सामान घेतले आणि जवळपास असलेल्या असंख्य हॉटेलात जागेची चौकशी करायला बाहेर पडलो

स्टेशनच्या बाहेरच फूटपाथवर मला दोन फ्रेंच म्हाताऱ्या दिसल्या. त्या अक्षरशः कार्डबोर्डच्या एकेका मोठ्या खोक्यात बसल्या होत्या आणि त्यानी वर्तमानपत्राची रद्दी पांघरायला घेतली होती विलासाची राजधानी म्हणून त्रिखंडात गाजलेल्या पॅरिस शहरात अशा निर्धन वृद्धाची ती दयनीय अवस्था पाहून मला अतिशय वाईट वाटले. त्यानंतर पधरा दिवस मी पॅरिसला होतो आणि अनेकदा त्या दोन म्हाताऱ्या पुठ्ठ्याच्या नावेसारख्या खोक्यात बसून एकमेकीशी बोलताना मी पाहिल्या अजूनही अनेकदा मला त्या अनामिक दुर्दैवी स्त्रियाची आठवण येते.

दोन हॉटेलात ' जागा नाही'ची उत्तरे ऐकल्यावर एका बऱ्यापैकी हॉटेलात जागा मिळाली मला आठवले सोळा वर्षांपूर्वी याच हॉटेलात मी चौकशी केली होती कारण आन्स कैसरन मला तेव्हा तो पत्ता दिला होता तेव्हा मला जागा मिळाली नव्हती, पण आता मात्र मिळाली खोली ताब्यात घेतल्याबरोबर मी खिडक्या–पडदे वगैरे लावून जो झोपलो, तो दुपारी अडीचतीनला जागा झालो गेल्या वेळी आणि याही वेळी पॅरिसमधल्या मुक्कामात बहुतेक दिवशी माझा हाच कार्यक्रम होता. रात्रभर नाइट क्लब, थिएटर्स, तमाशे पहायचे, पहाटे झोपायचे आणि सध्याकाळी उठून पुन्हा नाइट क्लब्सच्या कार्यक्रमासाठी सायंदैनिके पहायची नाइट क्लब्स सुरू होईपर्यंत शहरात भटकायचे माझे दुपारचे जेवण पाच वाजता आणि रात्रीचे जेवण पहाटे तीन वाजता होई

सध्याकाळी हॉटेलमधून बाहेर पडताना मालकीणबाईला विचारले, " रात्री किती वाजता दरवाजे बद होतात ?" ती म्हणाली, " एक वाजेपर्यंत आलात तरी चालेल " मला ही वेळ सोयीची नव्हती. पण हॉटेलचे नियम मी बदलू शकत नव्हतो. दुसरे असे की, ते हॉटेल त्या दोघी प्रौढ अविवाहित भगिनी चालवीत होत्या देखभाल करणारे पुरुषमाणूस

कोणी नव्हते म्हणून इतर हॉटेलासारखी रात्रभर उतारूना येण्याची सोय तिथे नव्हती उद्या सकाळी हॉटेल बदलायचे आणि पिगॅल भागातलेच हॉटेल निवडायचे असे ठरवून मी बाहेर पडलो. नाइट क्लब्स सुरू व्हायला अजून तीनचार तास अवकाश होता. पॅरिसमधला हिंडण्याफिरण्याचा सर्वात आकर्षक रस्ता म्हणजे आर्कद ट्रायंफवरून जाणारा साँझे एलीसी या रस्त्याच्या दोन्ही बाजूना देखणे विशाल वृक्ष आहेत, फूटपाथवरून चहा–कॉफी–बीअर–मद्य घेण्याची सोय आहे पॅरिसमधील सुंदरी नट्टापट्टा करून या रस्त्यावरून दिमाखात मिरवतात. जगातली सर्वात फॅशनेबल दुकाने याच मार्गावर आहेत. इतका विविधतेने, सौंदर्याने, उत्साहाने नटलेला दुसरा रस्ता जगात नसेल! या रस्त्यावरून या टोकापासून त्या टोकापर्यंत नुसते भटकणे हीही मोठी चैन आहे ती मी मनमुराद उपभोगली.

रात्री साडेआठला ' फॉलीज बर्जर ' थिएटरचा कार्यक्रम सुरू होतो हे मी पॅरिसच्या गाइडमधे वाचले होते. पूर्वी मी ' फॉलीज बर्जर'चा तमाशा पाहिला होता. पण ' फॉलीज'ला भेट दिल्याशिवाय पॅरिसची सफर पूर्ण होतच नाही म्हणून मी रु रिशे या रस्त्यावर जाण्यासाठी निघालो वाटेतच आदल्या रात्रीच्या जागरणाने डोके किंचित दुखू लागले. म्हणून मेट्रोमधून बाहेर पडल्यावर एका केमिस्टच्या दुकानात गेलो आणि अॅस्परिनच्या गोळ्या घेतल्या अॅस्परिन घेतल्यावर मी दुकानदाराला विचारले, " ' फॉलीज बर्जर'कडे कस जायच ? " त्यावर हसून तो गमतीने म्हणाला, " तुम्ही टूरिस्ट दिसता पहा बर, तुमचं डोकं दुखतंय तरी तुम्हाला ' फॉलीज बर्जर ' पहायला जायचंय ' मी म्हटले, " तुमचं म्हणण खरं आहे. ' फॉलीज ' पाहून माझी डोकेदुखी जाईलच आणि असल्या किरकोळ डोकेदुखीसाठी पॅरिसमधली एक रात्र अथरुणात पडून वाया कशाला घालवायची? " त्याला माझे पटले यात नवल नाही पॅरिसच्या ख्यालीखुशालीच्या भागात रात्रदिवस औषधे विकणाऱ्या त्या गृहस्थाने अॅनासिनपेक्षा अधिक महत्त्वाची आणि जालीम अशी औषधे अनेकाना विकली असतील आणि ती औषधे घेऊन ते प्रवासी ' फॉलीज 'सारख्या निर्मळ करमणुकीपेक्षाही अधिक झणझणीत मौजमजा करण्यासाठी गेले असतील हे उघडच होते.

' फॉलीज बर्जर ' हा नाइट क्लब नाही, थिएटर आहे ते अतिशय भव्य आहे. त्यात पाचमजली उंचच उंच असे स्टेज आहे कार्यक्रमाच्या पहिल्याच प्रवेशात सुमारे सत्तर तरुण सुंदरी दिसतात त्यापैकी काही वरून पक्ष्यासारख्या मोठ्या पिंजऱ्यातून येतात पत्त्याचा बंगला असावा तशा त्या तरुणी दर मजल्यावर पधरावीस अशा उभ्या असतात आणि सगीताच्या तालावर नृत्य करतात. ' फॉलीज 'मधे पूर्ण नग्न स्त्री दाखवीत नाहीत अंगावर फक्त रेशमी लंगोटीसारखा वीतभर कपडा असतो पण भव्य नृत्ये, नेत्रदीपक सजावट, उचीतली उची वस्त्रे यात ' फॉलीज बर्जर'ला जगात तोड नाही त्यातल्या सुदरीही ' मूलाँ रूझ ', ' लिडो ' या पहिल्या दर्जाच्या नाइट क्लब्समधील कलावत तरुणींच्याप्रमाणेच अगदी निवडक असतात. नाइट क्लबप्रमाणे ' फॉलीज'मधे टेबलावर मद्य मिळत नाही. एकदा तिकिट काढले—ते साधारण पाऊणशे रुपयापासून दीडशे रुपयापर्यंत असते—की मग इतर कोणताही खर्च येत नाही. दर दोनतीन महिन्यानी ' फॉलीज'चे खेळ बदलत

असतात. मी पाहिलेल्या कार्यक्रमात व्हेनिसचे एक नृत्य होते, एका चिनी गावातले लोक–नृत्य होते, राजवाड्यातले दरबारी नृत्यगायन होते शिवाय स्पॅनिश नृत्य, 'कॅन–कॅन' हे खास एकोणिसाव्या शतकातले फ्रेंच नृत्य वगैरे बादशाही कार्यक्रम होते 'फॉलीज'चा प्रयोग म्हणजे डोळ्यांचे पारणे फेडणे. त्याची भव्यता, नर्तिकांचे नग्न सौंदर्य आणि दृश्यांची कलात्मक मांडणी ही केवळ अविस्मरणीय आहेत

'फॉलीज'चा कार्यक्रम सपला, तेव्हा रात्रीचा एक वाजून गेला होता भुयारी रेल्वे बद झाल्या होत्या टॅक्सी करण्यावाचून गत्यंतर नव्हते. मी एक टॅक्सी थांबवली आणि माझ्या हॉटेलचा पत्ता सांगितला त्यावर टॅक्सीवाला इसम म्हणाला, " तुम्ही पॅरिसमधे नवखे दिसता तुमचं हॉटेल समोरच आहे ते पहा — ते दिवे दिसतात तेच रेल्वे स्टेशन. आणि त्यापलिकडेच तुमचं हॉटेल आहे. उगीच पैसे कशाला वाया घालवता ? " मी त्याचे आभार मानले आणि त्या दिशेने चालू लागलो. तर अवघ्या सातआठ मिनिटांतच हॉटेल आले गार दु नॉर्दवरून जाताजाता पाहिले त्या दोन फ्रेंच म्हाताऱ्या कागदी खोक्यांत निवान्तपणे झोपल्या होत्या

दुसऱ्या दिवशी हॉटेलचे बिल भागवले बॅगा घेऊन ॲन्व्हर्स स्टेशनवर उतरलो कारण नाइट क्लब्सच्या भागातच हॉटेल घेतले तर तीनचार वाजेपर्यंत आले तरी चालेल. जे हॉटेल रात्रभर उघडे असते असेच निवडायचे ठरवले. रोश आर्ट रस्त्यावर हॉटेल डेल्टा हे असे मिळाले खोलीही शात आणि छानशी होती पॅरिसच्या सबध मुक्कामात मी तिथंच राहिलो. सामान ठेवल्यावर पॅरिसमधे असलेल्या ओळखीचे कोणी मिळते की काय ते फोन करून पाहिले 'टाइम्स ऑफ इंडिया'चे दिलीप पाडगावकर याना फोन केला पण त्याची बदली होऊन ते भारतात परत गेले होते हैद्राबादचे अरविंद कोरटकर 'मेझाँ द ला इंद' या भारत–सरकारच्या इमारतीत सिटे युनिव्हर्सिटीमधे होते पॅरिसहून मी लडनला जाणार होतो. तिथे मी ज्या मैत्रिणीकडे रहाणार होतो त्या मिसेस शार्प यांना मी हॉलंडहून कळवले होते की, मी लडनला केव्हा येणार ते पॅरिसहून कळवीन. पॅरिसच्या 'ऑपेरा'-जवळ असलेल्या 'एअर इंडिया'च्या कचेरीच्या पत्त्यावर उत्तर लिही असेही मी तिला कळवले होते एअर इंडिया'ला फोन केला, तेव्हा माझ्या नावावर इंग्लंडहून पत्र आल्याचे कळले. म्हणून त्या कचेरीत गेलो आणि पत्र घेतले श्रीमती शार्पने आपला फोन नबर त्यात लिहिला होता आणि लंडनच्या कोणत्या मोठ्या स्टेशनवरून आपल्या घरी कसे यायचे याबद्दल मार्गदर्शनही केले होते.

'ऑपेरा' या भुयारी स्टेशनवरून मी सिटे युनिव्हर्सिटीच्या स्टेशनवर गेलो. रस्ता ओलाडला की पॅरिसचे एक अत्यत श्रेष्ठ विद्यापीठ लागते या विद्यापीठाचे वैशिष्ट्य असे की अनेक देशानी आपल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाच्या आवारात इमारती बाधल्या आहेत भारत–सरकारच्या इमारतीला 'मेझाँ द ला इंद' असे नाव आहे तिथे अरविंद कोरटकर रहातात, त्याना भेटा, असे माझे स्नेही उमाकात ठोमरे यानी सांगितले होते. अरविंद तिथे 'फ्रेंच रूल इन इंडिया' अशा काहीशा विषयावर सशोधन करीत होते.

पॅरिसमधे त्यांचीमाझी छान मैत्री झाली. त्यांनी पॅरिसला रहाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांचे अनेक किस्से सांगितले. त्यांपैकीच एका सत्यकथेवर आधारलेली ' पॅरिसमधे पुणेकर ' ही विनोदी कथा मी १९७३ च्या ' मोहिनी'च्या दिवाळी-अंकात लिहिली आहे

पॅरिसच्या मुक्कामात एका रात्री मी आणि अरविंद कोरटकर सॅनसॅनिए ' नावाच्या एका वेगळ्या प्रयोगाला गेलो त्यात नाटक, सिनेमा, संगीत, नृत्य वगैरे सगळ्यांचे मिश्रण असते सर्वच कार्यक्रमाची घाटणी हलकीफुलकी, विनोदी असते कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच प्रमुख विनोदी नट प्रेक्षकांतील एका जोडप्याला विचारतो, " तुम्ही नवरा-बायको आहात काय ?" ती दोघे ' होय ' म्हणतात मग तो बायकोला विचारतो," तुमच्या नवऱ्याच पोट जरा सुटल आहे. रात्री शृंगाराच्या वेळी त्याचा तुम्हाला त्रास होतो काय ?" या प्रश्नाचे उत्तर देण्याऐवजी ती लाजून चूर होते आणि प्रेक्षकातून हास्याची लाट येते. या कार्यक्रमात फ्रान्सचे त्या वेळचे राष्ट्राध्यक्ष जनरल द गॉल, पोप अशा ज्येष्ठ नेत्याचीही थट्टा केलेली असे चित्रपटात एखादे दृश्य ट्रिकसीनने गमतीचे केलेले असे उदाहरणार्थ, पोप याना भेटायला आलेले जनरल द गॉल टोपी काढून टकलावरून एकसारखे हात फिरवीत बसतात आणि पोप त्याना सतत नमस्कार करीत असलेले दिसतात एकच दृश्य वारवार अती वेगाने दाखवून ही गमत साधलेली असते

' फिगॉल ' या नाइट क्लबमध्ये मी एका रात्री गेलो माझ्या जवळच्याच टेबलावर एक अमेरिकन तरुण आणि एक फ्रेंच वारयोषिता बसलेली होती ती त्याला मिठ्या मारीत होती, चुंबने घेत होती. तो अगदी खूष झाला होता दर वीसपचवीस मिनिटानी वेटर येऊन शँपेनची बाटली फोडीत होता आणि ती पोरगी घटाघट शँपेन रिचवीत होती त्या टेबलावर जेवढे मद्य खपते त्यातली निम्मी किंमत त्या पोरीला मिळते. त्यामुळे या पोरी पुरुषाला मोहात पाडून भरमसाट खर्च करायला लावतात त्यांची गमत मी पहात होतो, तोच माझ्या टेबलाजवळ एक तरुणी अर्ध्यावर अधिक स्तन उघडे टाकून आली आणि म्हणाली, " मी तुमच्या जवळच्या खुर्चीवर बसल तर चालेल काय ?" ही कशाची प्रस्तावना आहे हे मी ओळखले होते. पण ' इथ बसू नकोस ' असे तरी मी तिला कसे सांगणार ? ती बसली आणि माझा हात हातात घेऊन म्हणाली, " तुमचा हात फार सुंदर, स्ट्राँग आहे तुम्ही कोणत्यातरी पौर्वात्य देशाचे आहात का ? " मी म्हटले, ' मी भारताचा आहे " त्यावर ती अतिशय आनद दाखवून म्हणाली," वा ! तुम्ही भारताचे आहात काय ? तर मग मजाच झाली ! मी ब्रिटनची आहे. माझं नाव मार्गरिट आम्ही भारतावर दीडशे वर्षं राज्य केल हे माहीतच आहे तुम्हाला पण मी काही तुमचा देश पाहिला नाही " त्यावर अशा पोरीची साहजिकच अशी अपेक्षा असते -- आणि बहुधा ती खरी ठरते -- की प्रवासी म्हणेल, ' अस ? मग या ना एकदा आमच्या देशाला.' मग ती त्याला बिलगून, " तुम्ही नेणार ना मला ?" असा लाडिक प्रश्न करते. बुद्धिबळात ज्याला फोर्स्ड मूव्ह म्हणतात, तशाच प्रकारचे हे संवाद असतात. अर्थात मी प्रथेप्रमाणे त्यात अडकला गेलो. पण सावधपणाने म्हटले, " पण आता मी अमेरिकेला चाललो आहे. परत जाताना पॅरिसला

उतरून तुला मुंबईला नेईन " या पोरी आमच्यापेक्षा बिलंदर असतात कारण रोज रात्री त्यानी आमच्यासारखे अनेकजण पाहिलेले असतात

तिने माझ्या जवळ खुर्ची सरकवून म्हटले, " भारताला केव्हा नेशील तेव्हा ने सध्या मला वरच्या खोलीत तर ने !" मी बावळटपणाने विचारले, " वरच्या खोलीत काय आहे ?" ती उत्साहाने म्हणाली, " वरच्या खोलीत आपल्याला हवी ती वस्तू आहे. " मी पुन्हा विचारले, " कोणती ?" ती म्हणाली, " पलंग. भारताला गेल्यावर मी तुझ्यासाठी काय करू शकेन याची झलक आत्ताच दाखवते, चल फक्त वीस डॉलरमधे " माझ्या लक्षात ही गोष्ट मघाच आली होती. पण आपण त्या गावचेच नाही असे दाखवण्याचा प्रयत्न मी करीत होतो. मी तिला म्हटले, " छे छे ! तसं काही मला करायचं नाही. " पण ती पक्की होती ती म्हणाली, " ओके. पण मला ड्रिंक तर देशील की नाही ?" तिने मला अशा गोत्यात पकडले होते, की परखडपणे ' नाही ' म्हणणे कठिण होते. पण मी अशा अनेक नाइट क्लब्समध्ये जाऊन निर्ढावलो होतो ड्रिंक देत नाही असे म्हटले तर या व्यावसायिक पोरी काही हाय खाऊन जीव देत नाहीत हे मला माहीत होते. म्हणून मी स्पष्टपणे म्हटले, " सॉरी, नो. " त्यावर मार्गारेट फणफणत म्हणाली, " दॅट्स नॉट व्हेरी नाइस. " मी काय म्हणणार त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून ती उठून दुसऱ्या टेबलावर गेली आणि दुसरे गिऱ्हाइक पटवू लागली मीही सुटकेचा निःश्वास टाकला आणि शेजारच्या प्रणयी जोडप्याकडे पाहू लागलो

आता तिथे गुलाबाची फुले विकणारी एक वृद्ध बाई आली आणि त्या तरुणाला म्हणाली, ' सर, तुमच्या स्वप्नसुंदरीसाठी गुलाब देऊ का ?" तो आलिंगनातून घुसमटल्या आवाजात ' नको ' म्हणत होता पण त्याच्या कवेतली पोरगी आनंदाने म्हणाली, " ओ यस् ! आय लव्ह इट " तिने दोन फुले उचलली त्या तरुणाने वैतागानेच पाकिट काढले. गुलाब विकणारी बाई म्हणाली, " टेन फ्रँक्स प्लीज " त्याने ते जवळजवळ अडीच डॉलर (पधरा रुपये) दोन फुलासाठी दिले. तेव्हा त्या बाईने पुन्हा " माय टिप प्लीज " असे म्हणून ठाण माडले त्याने आणखी दोन फ्रँक्स दिले. मी त्या क्लबमध्ये तीनसाडेतीन तास होतो अर्धा तास असा आंबटशौकी रोमान्स करून तो तरुण निघून गेला. गमत म्हणजे तो गेल्यावर त्या फ्रेंच पोरीने गुलाब विकणाऱ्या बाईला बोलावले आणि ते गुलाब परत करून तीनचार फ्रँकची नाणी घेतली ! हौशी प्रवाशाला लुटण्याचे पॅरिसमधे जे अनेक मार्ग असतात त्यांच्यापैकीच हाही एक. जाताना त्या तरुणाने तिच्या हाती — नव्हे, खरे तर ब्रेसियरमध्ये — काही फ्रँकच्या नोटा खुपसल्या, त्या काढून तिने निर्विकारपणे पर्समधे ठेवल्या आणि पलिकडच्या टेबलाजवळ बसलेल्या वयस्क इटालियन माणसाला विचारले, " डू यू नीड कंपनी, सर ?" त्याने तिला जवळ बसवून घेतली, आणि तिची नवी वाटमारी सुरू झाली

' पिगॅल'मधे तेव्हा ' हॉट पँट्स ' नावाचा रेव्ह्यू ऊर्फ तमाशा चालू होता. तो बराच पुरोगामी किंवा बोल्ड, धाडसी होता. त्यातील सर्व स्त्रिया आणि बहुतेक सर्व पुरुष

नग्न होते. चुबने–आलिंगने तर एकसारखी चालूच होती. पण एका दृश्यात सहा जोडपी स्टेजवर समागम करताना दाखवलेली होती. त्यातील दोन स्त्रिया आणि दोन पुरुष निग्रो होते आणि त्या सर्वांचे हे कार्यक्रम संगीताच्या तालावर चालले होते एका दृश्यात एका मोगल बादशहापुढे एक नर्तकी येते असे दाखवलेले होते. बादशहाने फर्मावले तरी ती नृत्य करायला नकार देते म्हणून तिला चाबकाचे फटके मारताना या दृश्यात दाखवले होते. पॅरिसमधे हा क्रौर्याचा भाग नव्यानेच म्हणजे गेल्या पाचसहा वर्षांतच आला आहे

दुसऱ्या एका नाइट क्लबमधे मी पाहिलेल्या एका दृश्यात एक प्राध्यापक गणित शिकवीत असताना एक तरुण विद्यार्थिनी बाकाखाली अश्लील मासिक वाचत असते. प्राध्यापक ते मासिक काढून घेतो त्यात संभोगाची दृश्ये असलेली पाहून प्राध्यापक शिक्षा म्हणून विद्यार्थिनीला नग्न करतो आणि तिच्या पार्श्वभागावर छड्या मारतो हे दृश्य चालू असताना माझे टेबल स्टेजपासून अगदी जवळ म्हणजे दोन हाताच्या अंतरावर होते त्या तरुणीच्या नितंबावर छडीचे लाल वण उमटताना मी पाहिले एवढेच नव्हे, तर थोड्या वेळाने रक्तसुद्धा ठिबकू लागले. एवढा मार तिला बसला. आणखी एका नाइट क्लबमधे एक काउबॉय अमेरिकन गुंड एका तरुणीला पकडतो, तिचे कपडे फाडतो आणि आपल्या कमरेभोवतीचा पट्टा सोडून तिला बेदम बडवतो अशी क्रूर दृश्ये पहाताना आनंद होण्याऐवजी ती पहाणेच नको असे होऊन जाते. पण काही सॅडिस्ट प्रवृत्तीच्या प्रेक्षकांसाठी ती दाखवण्यात येत असावीत. मार्किस डी सेड नावाचा एक फ्रेंच उमराव अठराव्या शतकात होता. त्याला प्रियपात्राचे हाल करून मग शृंगार करण्याची विकृत सवय होती. त्याच्या नावावरून सॅडिस्ट हा शब्द आला आहे

' पिगॅल'चा कार्यक्रम पाहून मी बाहेर पडलो, तेव्हा रात्रीचे दोन वाजत आले होते. माझे हॉटेल अर्धा फर्लांग दूर होते. आता थंड वारे वहात होते. पिगॅल चौकात अगदी तुरळक वस्ती होती काही वेश्या, थोडे पोलिस, पाचपंचवीस निरुद्योगी, काही नाइट क्लबवरून परतणारे. मी ' ईव्ह क्लब'जवळच्या कॅफेमध्ये गरम कॉफी घेतली आणि ' डेल्टा ' हॉटेलकडे जाऊ लागलो

# कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही...

१३

पॅरिसच्या रात्री जागत होत्या. सौंदर्याचे, कलेचे नवेनवे उन्मेष रोज रात्री पहायला मिळत होते एका कलनात तुरुंगाच फार परिणामकारक दृश्य दाखवल होत पंधरावीस कैदी वर्षानुवर्षं तुरुगात खितपत पडलात त्यांना स्त्रीसुखाची सतत आठवण येत असते त्यांचं एकमेकाशी बोलणं होतं तेसुद्धा कामिनीविषयी एका रात्री सगळे कैदी झोपलेले असताना अचानक पंधरा-वीस सुंदर तरुणी तुरुंगात त्याच्या बराकीत येतात, असं त्यांना स्वप्न पडत मग ते सगळे कैदी अगदी हैदोस घालतात सर्वात सुदर स्त्रीवरून त्याच्यात मारामाऱ्या होतात चेंगीजखानच्या सैन्यान विजय मिळवल्यावर पराभूतांच्या स्त्रियावर बेबंद अत्याचार करावे तसे ते कैदी अत्याचार करतात काही क्षण धुंदपणे जगतात इतक्यात तुरुंगाच्या पहारेकऱ्याच्या शिट्ट्या वाजतात स्वप्न सपतं, आणि सगळे कैदी हातात कटोरे घेऊन दैनदिन कामाला निघतात. पण त्याना पडलेल स्वप्न मात्र ते विसरू शकत नाहीत

या दृश्यात अनेक वर्षांनंतर स्त्री पाहिल्यावर वखवखलेल्या हातानी कैदी त्या तरुणींना पकडतात, त्यांचे कपडे फाडतात, त्यांना नग्न करतात आणि रानटीपणान उपभोग घेतात तेच जगली कैदी स्वप्न सपल्यावर मात्र भेदरलेले, कष्टी, निराश होतात, हा वातावरणातला बदल सस्मरणीय होता.

एक दिवस मला वाटलं, पॅरिसमधे राहूनही पॅरिस पहायच नाही हे काही बरं नव्हे. गेल्या खेपेला मी पॅरिसच्या सगळ्या कंडक्टेड टूर्स इमाने-इतबारे घेतल्या होत्या हे खर पण या खेपेला पुन्हा फिरल्या सफरीतून

पॅरिस पाहिल नाही तर त्या शहराचा 'फील' येणार नाही, म्हणून मी एका कंडक्टेड टूरमधे नाव घातलं. मी त्या कंपनीच्या कचेरीत शिरणार, तोच एका फोटोग्राफरनं मला थांबवलं आणि 'वन् मिनिट सर' म्हणून 'क्लिक' केलं मी माझ्याच विचारात होतो. त्यामुळ तो काय करतो आहे नि काय म्हणतो आहे इकडे माझ लक्ष नव्हतं. इतक्यात त्यानं माझा फोटो माझ्या हाती ठेवला आणि म्हटलं, "टेन फ्रँक्स प्लीज." मी चकितच झालो आणि त्याला सांगितलं, "अरे बाबा, पण माझा फोटो काढ म्हणून मी तुला सांगितल होत का?" पण तो हटून बसला आणि म्हणाला, "दहा फ्रँकमधे मी तीन कॉपीज देतो. पॅरिसमधे तुम्हाला इतके स्वस्त फोटो कुठंच मिळणार नाहीत!" त्याच्याशी फार हुज्जत घालायला मला वेळ नव्हता. पॅरिसमधे येणाऱ्या प्रवाशाला लुबाडण्याच्या आणखी एका प्रकाराला मी बळी पडलो होतो, हे ओळखून मी तीन फ्रँक्स त्याच्या हातावर टेकवले आणि एकच फोटो घेतला

सिटी टूर्सच्या अलिशान बसमधून पॅरिसभर फिरलो. इफेल टॉवर, लुव्हर, आर्क द ट्रायफ, नॉमदेमचं चर्च, नेपोलियनच थडग, सीन नदीचे काठ, राजवाडा — अशी सारी पॅरिसची प्रेक्षणीय स्थळ पुन्हा एकदा पाहिली आणि छान वाटलं आतापर्यंत पॅरिसमधे राहूनही नुसत नाइट क्लब्स नि हॉटेलची खोली यातच राह्यल्यासारखं वाटत होत. मॉंतमार्त्र भागात पिकासो, हेन्री मिलर, पॉले लुत्र, फ्लुबर्ट, रूसो असे नामवत चित्रकार व लेखक रहात असत तो भाग मी नव्यानं पहात नव्हतो. मी त्याच भागात, सुप्रसिद्ध सेक्र क्युअर चर्चसमोर रहात होतो. पण या नामवंत लेखक-चित्रकारांच्या घराची मला त्या भागात राहूनही कल्पना नव्हती. सेक्र क्युअर (सॅक्रेड हार्ट) चर्चजवळ आमची बस थांबली आणि आमची गाइड म्हणाली, "आता पधरा मिनिटं इथं बस थांबेल. तेवढ्या वेळात आपण आत जाऊन चर्च पाहू या." बाकी सगळे प्रवासी निघून गेले, तरी मी तसाच बसून राहिलो कारण रोज सकाळी पहिला चहा झाल्यावर मी याच चर्चकडे फिरायला येत असे मला बसमधे पाहून गाइड म्हणाली, "तुम्हाला चर्च पहायच नाही का?" मी म्हटलं, "मी सोळा वर्षांपूर्वी पॅरिसला आलो होतो तेव्हा सगळी प्रेक्षणीय स्थळं पाहिली आहेत आणि सध्या मी समोरच्याच 'डेल्टा हॉटेला'त रहातो आहे माझ्या खिडकीतून मला पहिली इमारत कोणती दिसत असेल तर ती या चर्चची"

ती कौतुकानं म्हणाली, "सोळा वर्षांपूर्वी? अहो पण तुम्ही फारच उमदे आणि तरुण दिसता आहात तेव्हा तुम्ही खूप लहान असाल" तिन आपल्याला उमदा तरुण म्हटल आहे, तेव्हा आपणही थोडी प्रशसा करावी म्हणून मी म्हटलं, "तुमचं नाव काय? तुम्ही फार सुदर दिसता" तिन हसून माझ्या स्तुतीचा स्वीकार करीत म्हटलं, "थँक यू. माझ नाव लॉरेटा थुपॉं." मी विचारलं, "तुम्हाला हा व्यवसाय कसा काय वाटतो? तुमचा पुढच्या आयुष्याचा प्लॅन काय आहे?" ती म्हणाली, "ऑफिसच्या टेबलावर आठ-आठ तास कोंडून घेऊन काम करण्यापेक्षा हे काम आवडतं मला. कधीकधी फार ताप पडतो म्हणा विशेषत दुसऱ्या एखाद्या मुलीन अनपेक्षित रजा घेतली की जादा शिफ्ट

करावी लागते पण या कामात गमत असते तुमच्यासारखे इंटरेस्टिंग लोक भेटतात. माझ्या भावी आयुष्याच्या प्लॅनबद्दल म्हणाल, तर माझं लग्न ठरल आहे माझा भावी नवरा स्टॉक एक्स्चेंजमधे आहे " मी गमतीन म्हटलं, " अरेरे ! काय हे ? मला भेटण्यापूर्वी लग्न ठरवूनसुद्धा टाकलत ? कमाल आहे बुवा ! नाहीतर मी मागणी घातली असती ना ! " तिनही त्या गमतीत सहभागी होत म्हटलं, " मीही नक्की लग्न केलं असतं तुमच्याशी ! मला इंडिया खूप आवडतो "

ही सारीच थट्टामस्करी होती पण पंधरा मिनिट वेळ काढण्यासाठी आम्ही दोघही ती गमत 'एन्जॉय' करीत होतो आणखी थोड्या वेळान ती कायमची आपल्या मार्गान जाणार नि मीही पुन्हा कधीच न भेटण्यासाठी माझ्या रस्त्यान जाणार, हे दोघानाही पुरेपूर




माहीत होतं पण हाती असलेला थोडा वेळ आबट चेहेरे करून आणि कुसकट बोलणी करून एकमेकांना दु ख देण्यात घालवण्यापेक्षा अशी दोघांच्याही जीवनाची रुची वाढवण्यासाठी त्याचा उपयोग करावा हे अधिक शहाणपणाचं नाही का ? आयुष्यात कधीकधी असे योगायोग येतात, की एखादी खुबसुरत, बुद्धिवान स्त्री थोडया वेळासाठी का होईना, पण आपलं जीवन सुगंधित करून जाते याउलट काही खडूस माणस अगदी विनाकारण क्षुद्रपणा दाखवून जीवनात कडवटपणा निर्माण करतात.

पॅरिसच्या दोन आठवडयाच्या मुक्कामात मी बहुतेक सर्व नामवंत नाइट क्लब्स पाहिले होते राहिला होता तो सर्वश्रेष्ठ असा 'मूलाँ रूझ' हा. प्लास ब्लाँश चौकातला हा नाइट क्लब म्हणजे पॅरिसची सर्वांत शुद्ध, निर्मळ आणि कलात्मक करमणूक. जगातल्या

'मूलाँ रूझ'च्या भव्य स्टेजवर अखेरचे दृश्य चालू असताना प्रेक्षक आपली पसंती सानंद व्यक्त करीत आहेत





‘मूलाँ रूझ’ या नाइट क्लबमध्ये डॉल्फिन मासा पाण्यातील युवतीची ब्रेसियर सोडतो.

सर्वांत सुंदर तरुणी ‘मूलाँ रूझ’, ‘लिडो’ आणि ‘फॉलीज’मधे असतात. ‘मूलाँ रूझ’चा इतिहास फार जुना आणि दिलखेचक आहे पॅरिसचे अनेक नामवत चित्रकार या क्लबात नियमान येत आणि चित्रही काढीत पॉलि लुत्र या ठेंगण्या चित्रकाराचं सारं जीवनच य क्लबाशी निगडित झालं होतं त्याच्या जीवनावर चित्रपटही निघाला आहे फ्रान्सच्या सांस्कृतिक इतिहासात ‘मूलाँ रूझ’च स्थान अद्वितीय आहे.

या क्लबची फी जबरदस्त म्हणजे ७० फ्रँक ( सुमारे सव्वादोनशे रुपये ) होती. पण जीवनाची मौज लुटायची तर ‘मूलाँ रूझ’ पाहिजेच. रोज रात्री ९ आणि ११ वाजता असे दोन खेळ असतात त्या दोन तासांत स्त्रीसौंदर्य, रमणीय दृश्यं, भारी कपडे, नृत्यं याचा नुसता खच पडलेला असतो. अलीबाबाला गुहेत संपत्तीची रास सापडावी तसं या ठिकाणी आपलं होत नृत्याबरोबरच काही चित्ताकर्षक प्रकारही या खेळात दाखवतात त्यात प्रचंड काचेचा स्विमिंग पूल स्टेजखालून सरकत वर येतो, तो ट्रिकसीन्सचा एक विक्रमच म्हटला पाहिजे या पूलमधे एक मोठा डॉल्फिन मासा फिरत असतो तो इतक्या जोरानं पोहतो आणि शेपटी आपटतो की पहिल्या रांगेतले काही प्रेक्षक त्या शेपटीच्या तडाख्यान उडालेल्या



ब्रेसियर सोडण्याची गोड कामगिरी केल्याबद्दल
डॉल्फिन माशाला ती तरुणी खाऊ घालीत आहे.

पाण्यात भिजून जातात त्या प्रेक्षकांनाही त्या थंड आल्हादकारक तुषाराची गंमतच वाटते. थोड्या वेळान एक तरुणी त्या काचेच्या तळ्यात उतरते, त्या माशाला खाऊ घालते, त्याच्या अंगावर बसून मजेत फिरते एकदा पोहत असताना मासा समोरून येऊन चक्क तिचं चुंबन घेतो. पण माशाचा हेवा वाटावा असा त्याचा सर्वात नाजुक खेळ म्हणजे ती जलसुंदरी पोहत असताना तो चावट मासा मागून येऊन दातांनी तिची ब्रसिअर सोडतो आणि तिच्या उफाड उरोजाच दर्शन घडवतो या वेळी त्या माशाचा हेवा न वाटणारा एकही प्रेक्षक त्या नाइट क्लबात नसतो, हे सागण नकोच

चीन, इटली, जपान इत्यादी देशांच्या पार्श्वभूमीवरची भव्य नृत्यही ' मूलाँ रूझ'मधे झाली त्यापैकी प्रत्येक नृत्यात ४० ते ५० सुंदरी आणि १०–१५ तरुण असत ही नृत्य अत्यत कलात्मक होती बदल म्हणून कधी जादूचे खेळ, कधी कसरत असेही कार्यक्रम होते. एका दृश्यात एक जादूगार आपल्या मोकळ्या खिशातून कोंबडीची दहाबारा पिलं काढून दाखवतो. इतकच नव्हे, तर काही प्रेक्षकाच्या पँटमधूनही तशीच पिलं निघतात, तेव्हा सगळा नाइट क्लब खदखदा हसू लागतो

पॅरिसच्या त्या पधरा दिवसात मी जितक्या सुंदर नग्न स्त्रिया पाहिल्या, तेवढ्या इतर आयुष्यात कपडे घातलेल्या सुदर स्त्रियाही पाहिल्या नाहीत. स्वर्गाच्या आपल्या

कल्पनेशी सर्वांत जवळच कोणतं शहर असेल, तर ते पॅरिसच होय यात शंका नाही. मी पाहिलेल्या एका रात्रीच्या थिएटरमधे शेवटी पॅरिसचा संबंध इफेल टॉवर नाट्यगृहाच्या छपरातून खाली येतो आणि त्यावर निदान तीसपस्तीस नग्न सुंदरी उभ्या आहेत असं दृश्य दाखवलेलं होतं भव्यता, सौंदर्य, मोकळेपणा आणि रसिक विपुलता या बाबतीत पॅरिसला तोड नाही.

पॅरिसचे दिवस कसे भर्रकन उडून गेले लंडनला जायचा दिवस उगवला. मी 'डेल्टा हॉटेल' सोडलं गार दु नॉर्द स्टेशनवर आलो पॅरिस–कॅले–लंडनचं १०८ फ्रँक्सच तिकिट काढलं या प्रवासात पॅरिसहून कॅलेपर्यंत आगगाडीच, कॅले ते डोव्हरपर्यंत आगबोटीच आणि डोव्हरहून लंडनच्या व्हिक्टोरिया रेल्वेस्टेशनपर्यंत आगगाडीच, अशी तिकिटं समाविष्ट असतात विशेषत कॅलेपासुन इंग्लंडपर्यंतचा बोटीचा दोन तासांचा प्रवास फारच छान असतो भराऱ्या मारणाऱ्या पाण्यातून बोट चाललेली असते, सर्वत्र उत्साह असतो, उत्तमोत्तम पेय अत्यंत स्वस्त दरान मिळतात. मी शार्पबाईसाठी एक व्हिस्कीची आणि 'ड्यू बॉने' या जगप्रसिद्ध वाइनची बाटली आणि दोनशे सिगरेट्स घेतल्या मी सिगरेट ओढीत नाही; पण ती ओढते हे माझ्या लक्षात होतं दुपारी साडेतीनच्या सुमाराला व्हिक्टोरिया स्टेशनवर पोचलो या लंडन शहरात पूर्वी मी सव्वा वर्ष राहिलो होतो आणि हे महानगर तेव्हा माझं फार आवडतं, जिव्हाळ्याचं झालं होतं

गर्ट्रूड शार्प खुद्द लंडनमधे रहात नव्हती. व्हार्लेज हूक नावाच्या पचवीस मैलांवरच्या उपनगरात रहात होती मी त्या गावी गेल्यावर तिला फोन केला आणि टॅक्सीनं घरी पोचलो. तिनं फार आपुलकीनं माझं स्वागत केलं ती कवयित्री आणि चित्रकर्ती आहे जेवणापूर्वी 'ड्यू बॉने' वाइन घेताना तिनं मला आपल्या काही नव्या कविता वाचून दाखवल्या आणि चित्रही दाखवली जेवण खास ब्रिटिश पद्धतीच म्हणजे अगदीच बेचव होतं पण त्याचा गौरव करताना मी खास ब्रिटिश पद्धतीचं खोटं बोलून शार्पच्या हातचं जेवण फारच रुचकर असल्याचा अभिप्राय व्यक्त केला. उद्यापासून जेवणाची कोणती वेगळी व्यवस्था करावी याचाही मी तेव्हापासूनच विचार करू लागलो सकाळी आम्ही गावात फिरलो गावात पहाण्यासारखं काहीच नव्हतं इतर ब्रिटिश खेड्यांसारखच ते एक. त्यामुळं तो दिवस पदरात पाडण्यासाठी मी लंडनला नाटक पहायला जायचं ठरवलं चेरिंग क्रॉस विभागात खूपच नाट्यगृह आहेत आणि तिथं चालू असलेल्या अनेक नाटकांपैकी कोणतं ना कोणतं तरी मिळेल म्हणून मी दुपारीच लंडनला गेलो. रात्री शार्पच्या हातचं बेचव जेवण टळेल, हाही छुपा विचार होताच 'मूव्ह ओव्हर मिसेस् मार्केनॉन' ही छान कॉमेडी पाहिली रात्री साडेदहाला नाटक सुटलं. व्हार्लेज हूकला येईतो साडेअकरा झाले होते. शार्पबाईनं मला घराची चावी दिली होती खरं, पण स्टेशनपासून गावापर्यंतची बस बंद झाली होती आणि टॅक्सी तर अजिबात दिसत नव्हती लंडनमधे मला नाटकं पहाणं हेच मुख्य आकर्षण होतं. तेव्हा तो कार्यक्रम यशस्वी करायचा, तर शार्पच्या गावी लंडनपासून दूर राहून



नीग्रो लोकाच्या वसाहतीतले एक दृश्य

चालणार नव्हत, याची मला त्या रात्री प्रकर्षानं जाणीव झाली साडेबाराच्या सुमाराला अगदी सुदैवान एक टॅक्सी मिळाली आणि थंडीवाऱ्यात कुडकुडत मी एक वाजता घरी पोचलो

दुसऱ्या दिवशी सकाळीच लंडनच्या 'युसिस'च्या कचेरीत गेलो. त्या कचेरीचे प्रमुख बिल मिलर हे पूर्वी मुंबईच्या आमच्या विभागाचे प्रमुख होते त्यांनी आणि मी अनेकदा कचेरीच्या कामासाठी प्रवास केला होता आणि आमची चागलीच मैत्री झाली होती मला पाहून त्याना अतिशय आनद झाला ते मला म्हणाले, "रमेश, तुम्ही लंडनमधे आहात तोपर्यंत मी तुम्हाला माझ्या कचेरीत जागा देतो तुम्हाला स्वतन्त्र टेबल–खुर्ची देतो. काही लिहायच–वाचायचं असेल तर खुशाल तुम्ही इथ बसा. तुम्हाला स्वतंत्र टेलिफोन असेल अमेरिकन वकिलातीचं कॅन्टीन खालीच तळघरात आहे तिथं जेवा, चहा प्या आणि मी जेव्हा मोकळा असेन तेव्हा माझ्याबरोबरच जेवण घ्या." मला त्यानी दिलेल्या त्या जागेचा लिहायलावाचायला अतिशय उपयोग झाला.

त्या रात्री मी लंडनचे माझे स्नेही मुकुंद सोनपाटकी याना फोन केला. त्यांनी मला आपल्याकडेच रहायला बोलावलं आणि मीही पडत्या फळाची आज्ञा घेऊन ते निमंत्रण स्वीकारलं शनिवारी सकाळी शार्पबाईचा निरोप घेतला आणि मुकुंद सोनपाटकीकडे गेलो त्याच्याकडे मात्र माझी उत्तम व्यवस्था झाली त्यानी शनिवारी रात्री मला भेटण्या-साठी अनेक मराठी मित्रांना बोलावल होत. त्याच्याबरोबर दीर्घकाळ गप्पा मारण्यात चांगला वेळ गेला. दोन–तीन दिवसांनी मी लडन विद्यापीठातले मराठीचे प्राध्यापक रेसाइड यांना भेटायला गेलो. ते मूळचे ब्रिटिश, पण त्यानी मराठी भाषेचा चांगला अभ्यास केला आहे. ते काही काळ महाराष्ट्रात होते आणि त्यांनी दोन मराठी पुस्तकांचं इग्रजीत भाषांतरही केल आहे.

मी आणि रेसाइड यांनी एका पबमधे थोडी बीअर घेतली. मग आम्ही लंडन विद्या-पीठाच्या कँटीनमधे जेवलो गप्पा मारताना मी त्यांना त्याच्या भाषांतरित मराठी पुस्तकाचा अनुभव काय आला ते विचारलं. त्यावर ते म्हणाले, "अगदी निराशाजनक ! त्या पुस्तकांची विक्री जवळजवळ मुळीच झाली नाही गेल्या वर्षीचा हिशोब मला प्रकाशकानं पाठवला, त्यात एका पुस्तकाच्या अठ्ठावीस आणि दुसऱ्या पुस्तकाच्या सोळा प्रती खपल्या, अस म्हटल आहे. खपाचे हे आकडे मूळ लेखकाला आणि भाषांतरकाराला निराश करणारे आहेत की नाहीत ?" मी त्यांचं म्हणण मान्य केल. वर्षाला जर लेखकाला तीस रुपये आणि भाषातरकाराला चौदा रुपये मिळाले, तर त्या प्रकाशनाचं स्वागत कस झाल असेल याची कल्पनाच करा अर्थातच अधिक मराठी पुस्तक इंग्रजीत करण्याचा उत्साह रेसाइड यानी दाखवला नाही यात आश्चर्य नव्हे थोडा वेळ विचार करून रेसाइड यानी मला विचारलं, "लडन विद्यापीठात मराठी शिकवायला तुम्ही येऊ शकाल काय ?" मला ही 'ऑफर' अगदीच अनपेक्षित होती. एरवी मी ती घेतली असती, पण मी आता अमेरिकन सरकारच्या कायम नोकरीत आहे नि माझी इथ पंधरासोळा वर्ष नोकरी होऊनही गेली आहे म्हणून मला रेसाइड यांचा देकार दिलगिरीपूर्वक नाकारावा लागला

अशा काही गाठीभेटी सोडल्या, तर एकंदरीत लडन शहर मला उदास, भकास वाटलं. हवेच्या दृष्टीन अत्यत खराब मोसमात मी लंडनला पोचलो होतो त्यामुळं ते दिवस वाईटच लागले. सारखा पिरपिर पाऊस. थंडी, वारे. छत्री घेऊन रस्त्यावून चालल तरी हातात छत्री ठरत नव्हती माझ्या आवडीच्या अनेक जुन्या ठिकाणी मी गेलो –– नव्हे, मला गतस्मृतींनी ओढून नेलं सोळा वर्षांपूर्वी ज्या 'रीजंट स्ट्रीट पॉलिटेक्निक'मधे मी शिकत होतो, तिथ गेलो मला ओळखणार तिथं आता कुणीही नव्हत यात नवल नव्हत पण प्रत्यक्ष ती जाणीव झाली, आणि मन कळवळल. एक काळ असा होता, की याच कॉलेजात आम्हा मित्रमैत्रिणींचा गट ख्यालीखुशालीत, मौजमजा करीत शिकत होता. जिन्यावर, प्रवेशद्वारात, कॅन्टीनमधे दर क्षणी कुणी ना कुणी ओळखीच भेटत असे. जॉन पिलग्रिम नावाचा बीटनिक, फ्रिजरेल्ड नावाचा ऑस्ट्रेलियन, एड्विना नावाची चिनी पोरगी, मिसेस् मॅक्लीन व्हाइट नावाची घटस्फोटिता –– अशा दहाबाराजणाचा आमचा गट होता

पण आता मात्र त्या संस्थेत कुणी अपरिचित विद्यार्थी सभ्यपणं पण थंडपणं माझ्या जवळून जात होते मला तिथं फार वेळ रहावलं नाही.

मार्बल आर्चला आलो जीवनातल्या कितीतरी गोड स्मृती त्या भव्य रोमन कमानीशी निगडित झाल्या होत्या आन्स कैसर या डच मैत्रिणीचं नि माझं भेटण्याचं हे ठिकाण होत आम्ही इथ भेटत असू, हाइड पार्कमधे किंवा रीजंट पार्क बागेत यथेच्छ भटकत असू, कुठल्याही उपाहारगृहात खात असू, पबमधे बीअर, व्हिस्की घेत असू. एके काळी रोमान्सची प्रतीक म्हणून उन्हात न्हाऊन उभी असलेली ती भव्य मार्बल आर्च आता पावसात भिजणाऱ्या गरीब झोपडीसारखी दयनीय दिसत होती मला गडकऱ्यांच्या काव्यातली ओळ आठवली

' मनात माझ्या गुणगुणते हे रसिका कोणी काही
कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही '

लंडनमधे आता काहीच पहिल उरल नव्हत लंडन शहराचा दिमाख कुठल्या कुठे उडून गेला होता एके काळी वैभवात असलेला पण आता पडकाफुटका झालेला ओसाड वाडा असावा तस आता लंडन शहर दिसत होतं त्याची रयाच गेली होती इंग्लंडच्या प्रतिकूल आर्थिक परिस्थितीची कळाहीन छाप ठायीठायी दिसत होती लंडन आता बकाल दिसत होत नीग्रोंची वाढती गलिच्छ वस्ती, परंपरा आणि दर्जा संभाळण्याचा वृथा प्रयत्न



पॅरिसच्या नाइट क्लबातील आणखी एक उन्मादक दृश्य

करणाऱ्या, खालसा झालेल्या गरीब संस्थानिकासारखा हैराण ब्रिटिश नागरिक, डळमळत सरकार, सगळीकडून जागतिक बाजारपेठेत होणारी परागती, यामुळ लडन शहर दयनीय झाल होत त्याचं ते जर्जर रूप पाहून मला फार वाईट वाटलं जुन्या जागा पुन्हा पहाव्या म्हणून मी लडनच्या सर्वात रगेल चौकात — पिकॅडेली सर्कसमधे गेलो. पण तिथही निरुत्साह, अवकळा दिसत होती. याचजवळच्या एका रस्त्यावर 'वुइड मिल' नावाचं तमाशाच जगप्रसिद्ध थिएटर पूर्वी होत अर्धनग्न स्त्रियाचा आयुष्यातला पहिला नाच मी तिथ पाहिला होता त्या थिएटरचा मागोवा काढीत गेलो. पॅरिसला हे प्रकार मी नुकतेच भरपूर पाहिले होते. पण जुन्या आठवणीसाठी 'वुइड मिल'ला भेट द्यावी म्हणून तिथ गेलो पण तिथला तमाशा सपला होता त्या जागी आता ब्ल्यू फिल्म्स दाखवणारं एक चित्रपटगृह झाल होत लडनच्या चेल्सी भागात चेल्सी मॅनर पोस्ट ऑफिसात मी एके काळी काम करीत होतो नाताळच्या सुट्टीत विद्यार्थ्यांना तशी कामं मिळतात पावसातून, पाण्यातून मी तिथ गेलो पण मला ओळखणारं आता तिथ कोण असणार ? तिथल्या पोस्टमास्तरला मी माझी जुनी आठवण सागितली, तेव्हा 'असं का ? हाउ नाइस ' अस थंडपण म्हणून तो आपल्या कामाला लागला. त्यात त्याची काही चूक होती अस नव्हे. पण माझा तिथ जाण्यातला उत्साह पार लयाला गेला. याच हॉटेलजवळ 'मेट्रोपॉलिटन' नावाच तमाशाच थिएटर होतं. त्या जागी गेलो, पण ती इमारत पाडली गेली होती आणि आता तिथ लाँड्री, डिपार्टमेंट स्टोअर असे गाळे तयार झाले होते. स्ट्रॅटफर्ड स्ट्रीटला मी ज्या घरात पूर्वी रहात होतो, ते फार रमणीय होत समोरून एक सुंदर ओढा वहात असे आता तो ओढा होता, पण घर बदलल होत कुणी उच्च, भारदस्त ब्रिटिश नागरिक तिथ रहात होते 'ब्रिटिश म्युझियम'मधे गेलो. त्या ठिकाणी पूर्वी मी तासन् तास अभ्यास करीत असे कार्ल मार्क्स आणि मी या एकाच ग्रंथालयात वाचनमनन करीत असू अस मी लोकाना गमतीन सागत असे आता मात्र ते ब्रिटिश म्युझियम मला भयाण, ऱ्हास पावत असलेल्या अवशेषा-सारख वाटलं 'कृष्णाकाठी कुडल आता पहिले उरले नाही ' ही ओळ मी स्वत शीच पुन्हा जड अंत.करणानं म्हटली.

नाही म्हणायला लंडनला सर्वोत्कृष्ट नाटक मात्र मी पाहिली. मी रोज नाटक पहात असे कधी दररोज दोन, तर एकदोनदा रोज तीन नाटकही पाहिली. उन्हाळा नसल्यान नाटकाची तिकिट सहज मिळत बाहेर पाऊसथडी असल्यामुळं फारसं भटकणफिरण शक्य नव्हत आणि सुदैवान त्यावेळी लंडनमधे 'ओ कलकत्ता', 'आफ्टर दि फेअर', 'मूव्ह ओव्हर मिसेस् मार्कॅनॉन ', 'पायजमा गेम', 'अ फ्लॉज ' अशी जगातली काही सर्वोत्कृष्ट नाटक मला पहायला मिळाली डेबोरा केर, लॉरेन बेकॉल अशा नामवत नटच्या समक्ष पाहिल्या. लडनच्या त्या बारा दिवसात मी इतकी नाटक पाहिली, की तितकी आयुष्यात इतर कधी पाहिली नाहीत. शनिवारी तर मी दोनदोन आणि क्वचित एकाच दिवसात तीन नाटकही पहात असे.

लडनचा मुक्काम सपायला आला. मी 'एअर इडिया'च्या कचेरीत जाऊन न्यूयॉर्कचं

रिझर्व्हेशन घेतलं माझ्या लंडनच्या मुक्कामात उत्तम व्यवस्था आणि सहवास देणाऱ्या मुकुंद सोनपाटकींचे व त्यांच्या पत्नीचे आभार मानले, आणि एका सकाळी बसनं हीथ रो हवाई–अड्ड्याकडे गेलो. ते विमान मुंबईहूनच येणार होतं पण त्यात कुणीच ओळखीचं भेटलं नाही.

न्यूयॉर्कला आल्यावर मात्र अगदी स्वगृही आल्यासारखं वाटलं. ते डिसेंबरचे सुरुवातीचे दिवस होते अमेरिकेतला नाताळ पहायचा आणि भारताला परत जायचं असं मी




'प्लेबॉय क्लब' या जगप्रसिद्ध क्लबमधली एक 'बनी'

ठरवल होतं अमेरिकेत आता माझ फक्त फिलाडेल्फिया राहिलं होतं. ते न्यूयॉर्कपासून अवघ्या दोन तासाच्या बसच्या रस्त्यावर असल्यानं ते कधीही करू म्हणून बाजूला ठेवलं होत. मग एक दिवस यशवंत कानिटकराना फोन करून मी आणि सी. रामचंद्र फिलाडेल्फियाला गेलो कानिटकरांनी शनिवारी रात्री तीसचाळीस महाराष्ट्रीयनाना आमच्या-बरोबर गप्पा मारण्यासाठी आणि जेवण्यासाठी बोलावलं होतं एका सकाळी सी. रामचंद्र, मी, यशवत आणि त्यांच्या पत्नी विजया फिलाडेल्फियाचा सुप्रसिद्ध 'इंडिपेंडन्स हॉल' पहायला गेलो या ठिकाणी अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यावर सह्या करण्यात आल्या. देशाचं स्वातत्र्य ज्या प्रचंड घटेन जाहीर केल गेलं, ती घटा आणि इतर इतिहास-प्रसिद्ध वस्तू नि जागा या ठिकाणी आहेत. या इमारतीजवळ मोटारींना पार्किंगची परवानगी नाही. म्हणून विजयाबाई म्हणाल्या, "मी तुम्हाला इथ सोडते आणि या भागाभोवती मोटारीन दोन घिरट्या घालते पंधरा मिनिटात तुमच पाहून होईल. मग मी मोटार इथंच थाबवीन आणि आपण परत जाऊ."

आम्ही स्वातत्र्य हॉल पाहून खाली आलो, तेव्हा सी रामचद्र मघाशीच बेपत्ता झाल्याचं आमच्या लक्षात आलं. चुकला फकीर मशिदीत या न्यायान आम्ही स्वातंत्र्य हॉल-जवळचे बार धुडाळले, तेव्हा त्यापैकी एकात अण्णा आरामपण व्हिस्की पीत बसलेले आढळले. ते म्हणाले, "अहो, मला फार थडी वाजायला लागली म्हणून इथ आलो." मग मी आणि यशवतही त्याच्याबरोबर अपेयपान करीत बसलो. आमचं मद्य आणि गप्पा इतक्या रगल्या, की विजया कानिटकर आमच्यासाठी 'इंडिपेन्डन्स हॉल'भोवती घिरट्या घालीत आहेत हे आम्ही साफ विसरून गेलो! पधरा मिनिटांत परतणारे आम्ही पावणेदोन तासांनी 'इंडिपेन्डन्स हॉल'समोर उगवलो. तोपर्यंत विजयाबाईंनी पन्नाससाठ फेऱ्या केल्या असतील! कारण गाडी उभी करण्याची परवानगी नसली तरी ती सतत फिरत ठेवण्याची परवानगी होती. आम्हाला इतका उशीर का झाला हे विजयाबाईंनी ओळखलंच पण मी त्याना गमतीनं सांगितल, "अहो काय करणार? आमच्या सी रामचंद्राना अमेरिकेच्या स्वातत्र्याच्या जाहीरनाम्यात एवढा इंटरेस्ट निर्माण झाला, की त्यानी प्रत्येक कलमाची तिथल्या गाइडशी सागोपाग चर्चा केली मग इतका वेळ होण साहजिकच नाही काय?"

फिलाडेल्फियाहून मी आणि अण्णा बाल्टिमोरला डॉ बोरगावकराच्याकडे गेलो. तिथला मुख्य कार्यक्रम म्हणजे 'प्लेबॉय क्लब'ला भेट हा होता शिकागो येथून निघणारं 'प्लेबॉय' मासिक हा आधुनिक जगातला एक चमत्कारच आहे त्याचे सपादक ह्यू हेफ्नर यानी अमेरिकेतील खुल्या समाजाच एक तत्त्वज्ञानच 'प्लेबॉय फिलॉसॉफी' म्हणून रूढ केल आहे. या मासिकातर्फेच 'प्लेबॉय क्लब' नावाचे क्लब अनेक प्रमुख शहरांत चालू आहेत. बाल्टिमोरचे आमचे स्नेही डॉ बोरगावकर हे त्या क्लबचे सभासद असल्यान मी व सी. रामचंद्र त्यांच्याबरोबर एका रात्री त्या क्लबमधे गेलो या क्लबातल्या वेट्रेसेसना 'प्लेबॉय बनी' (सशाची मादी) असं नाव आहे. वास्तविक अमेरिकेत आता अनेक उपाहारगृहांत टॉपलेस म्हणजे स्तन सपूर्ण उघडे टाकलेल्या वेट्रेसेस असतात. त्या मानानं



न्यूयॉर्कच्या 'टाइम्स स्क्वेअर'मध्ये ३१ डिसेंबरच्या रात्री
नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी जमलेला जनसागर

या बनींची वक्षःस्थळ बरीच झाकलेली असतात आणि तरीही त्या अतिशय आकर्षक आणि सुंदर दिसतात अलिकडे सिलिकॉनच्या उपचाराने सपाट स्तन खूपच उभारी मारू शकतात. त्यामुळे त्यांचे हे अवयव खरोखरच नैसर्गिक आहेत की वैद्यकशास्त्राच्या कृपेने उंचावले आहेत हे समजण्यास मार्ग नाही. पण कारण काहीही असलं तरी आम्हाला 'प्लेबॉय क्लब'मधे जे सौंदर्य दिसलं ते अतिशय रमणीय, उच्च दर्जाचं आणि दीर्घकाळ लक्षात रहाण्यासारखं होत हे मात्र खरं.

बाल्टिमोरहून आम्ही वॉशिंग्टनला गेलो माझे मित्र अमान मोमीन यांना कचेरीत फोन केला. ते म्हणाले, " इथं ख्रिसमस पार्टी चालू आहे तुम्ही सामान घेऊन इकडेच या मग आपण बरोबरच जाऊ." आम्ही त्या नाताळच्या पार्टीत सहभागी झालो. मोमीन हे आमच्याच ऑफिसच्या 'व्हॉइस ऑफ अमेरिका' या नभोवाणी विभागात काम करीत

आहेत पार्टी संपल्यावर आम्ही त्याच्या घरी गेलो वॉशिंग्टनमधे चारपाच दिवस काढून आम्ही पुन्हा फिलाडेल्फियाला राजा पाठक याच्याकडे राहिलो. या वेळी मी पेन विद्यापीठातील मराठी विभाग पाहिला. 'सह्याद्रीची चोरी' हे माझं पुस्तक तिथ पाहिलं एवढंच नव्हे, तर त्या पुस्तकावर मराठी शिकणाऱ्या एका अमेरिकन विद्यार्थ्यानं एक निबंधही लिहिला होता, अशी माहिती तिथ काम करणाऱ्या सौ रत्नपारखी यांनी दिली. ३१ डिसेंबरची रात्र न्यूयॉर्कमधे काढायची आणि नव्या वर्षाची मौज जगप्रसिद्ध 'टाइम्स स्क्वेअर'मधे पहायची, अस मी आणि सौ रामचद्र यांनी ठरवल होत. म्हणून ३० तारखेलाच मी, अण्णा, राजा पाठक व त्याची पत्नी कला अशी सारीजणं त्याच्या मोटारीतून फिलाडेल्फियाहून न्यूयॉर्कला गेलो ती रात्र आम्ही त्याच्या एका स्नेह्याकडे काढली.

३१ डिसेंबरची संध्याकाळ न्यूयॉर्कमधे ती सबध रात्र नृत्य, गाणी, मद्यपान, पार्ट्या वगैरेंनी धमाल जागवली जाते मी ३१ चा दिवस दुपारी चारपर्यंत चक्क झोपूनच काढला संध्याकाळी सहाला सौ रामचद्राच्याकडे गेलो ते मोहन नाडकर्णीकडे रहात होते त्याच्याबरोबर आम्ही नव्या वर्षाच्या स्वागताच पहिल मद्यपान केल मग मोहन म्हणाला, "गड्यानो, मला एक काम अस आहे की ते केलच पाहिजे. तुमची हरकत नसेल तर तुम्हीही माझ्याबरोबर येऊ शकाल"

त्यान जे काम सांगितलं ते मला गमतीच आणि फार अर्थपूर्ण वाटलं. मोहनचा अमेरिकन बॉस न्यूयॉर्कमधे मॅनहटन विभागात सेकड अव्हेन्यूवर रहात होता. तो आपल्या सबध कुटुंबाला घेऊन नाताळच्या सुटीत मायामीला गेला होता पण त्यानं त्याचं मांजर मात्र आपल्या फ्लॅटवरच ठेवल होत मोहनला त्यान अस काम दिलं होतं की, रोज सध्याकाळी त्यान फ्लॅटवर जाऊन त्या माजराला कॅट फूड घातलं पाहिजे. आणि तेसुद्धा मांजरापुढ त्याच अन्न टाकून लगेच दार बद करून परत जायच नाही, तर दररोज अर्धापाऊण तास तरी त्या मांजराच्या संगतीत राहिल पाहिजे. कारण त्या मांजराला रोज माणसाच्या स्पर्शाची, सहवासाची इतकी सवय झाली होती, की तो त्याला मिळाला नाही तर ते बेचैन होईल आणि आजारीही पडेल

आम्ही तिघेही मोहनच्या मोटारीनं निघालो. आज कत्तल रात्रच होती, म्हणून आम्ही जाताना खिशातूनही बाटल्या घेतल्या होत्या वाटेत एका ग्रोसरी शॉपमधे थाबून मोहननं कॅट फूडचा एक डबा घेतला आम्ही सेकड अव्हेन्यूवरच्या त्या फ्लॅटच दार उघडलं न उघडल, तोच त्या गोंडस माजरानं आमच्या अंगावर प्रेमानं उडीच घेतली चोवीस तास कोंडून राहिल्यानंतर त्याला मानवी स्पर्श मिळाल्याबरोबर ते अगदी खूष झालं रोज सध्याकाळी मोहन एकटाच येत असे पण आज तर नव्या वर्षाची सध्याकाळ असल्यामुळं की काय, त्या मांजराला तीन माणसाचा सुखद स्पर्श मिळाला होता म्हणून ते आम्हा तिघाच्याही अगावर उड्या मारून मांडीवर बसू लागल, प्रेमानं अग चाटू लागल, 'गुर्रर' आवाज काढीत शेपटीचं वेटोळ करून पायाशी बसू लागल मोहननं आणलेल्या कॅट फूडचा डबा उघडून एका प्लेटमधे पालथा केला. पण माजराला मात्र अन्नापेक्षा मानवी स्पर्शात,

माणसाची ऊब घेण्यातच अधिक समाधान वाटत होतं. त्याच्याकडे कौतुकानं पहाताना माझ्या मनात विचार आला हे न्यूयॉर्क क्रूर आहे म्हणतात, इथ रात्रीअपरात्री सुरामारी, बेदरकार खून होतात; पण अशा या प्रचंड यांत्रिकी नगरातही मायेचे नाजुक धागे कितीतरी असतात केवळ माणसामाणसातलेच नव्हे, तर माणूस आणि इतर प्राण्यातलेही नाही तर एका मांजराला ऊब मिळावी म्हणून अमेरिकन चित्रपटसृष्टीतला एक अधिकारी, एक संगीत–दिग्दर्शक आणि एक लेखक ' न्यू इयर इव्ह 'सारख्या आनंदाच्या सोहळ्याच्या वेळी एका खोलीत कोंडून घेऊन कशाला बसले असते ?

माजराच कौतुक करीत आम्ही त्या फ्लॅटवरही थोडं अपेयपान केलं. माजर तुष्ट होऊन जेवून आपल्या जागेवर जाऊन सुखानं झोपलं तेव्हा आम्ही निघालो. ' टाइम्स स्क्वेअर 'मधे जाण्यापूर्वी वॉशिंग्टन चौकात आणखी एका मित्राकडे आम्ही पार्टीला गेलो मग मोहननं आम्हाला ' टाइम्स ' चौकात सोडलं, तेव्हा रात्रीचे साडेदहा वाजून गेले होते आम्हाला निरोप देण्यापूर्वी मोहन आणि आम्ही आणखी एका बारमधे गेलो आणि त्या वर्षीच अखेरच मद्यपान केलं.

मोहननं आम्हाला ' टाइम्स स्क्वेअर 'मधे सोडल असं मी आताच म्हटल. पण ते तितक खर नाही ' टाइम्स ' चौकापासून अर्ध्या फर्लांगावर त्यानं आम्हाला सोडलं. कारण चौकापर्यंत मोटार जाण शक्यच नव्हत, इतकी तिथं गर्दी होती. हजारो स्त्री–पुरुषानी चौकच नव्हे, तर त्या आसपासचे म्हणजे ४२ व्या रस्त्यापासून पन्नासाव्या रस्त्यापर्यंतचे सगळे रस्ते भरलेले होते. नद्या सागराला मिळाव्या तशी या सगळ्या रस्त्यातली गर्दी ' टाइम्स ' चौकाच्या सागराकडे जात होती — तीसुद्धा पाण्यासारखी धो–धो वहात नव्हे, तर ग्लेसियरसारखी मद–मंद प्रगती करीत. लोक नव्या वर्षाच्या स्वागतासाठी शिट्या वाजवीत होते, भर रस्त्यात मद्यपान करीत होते, स्त्रियाची — परिचित आणि अपरिचित — चुंबन घेत होते, मोठमोठ्यानं ओरडून गाणी म्हणत होते, हसतखिदळत होते अकरा–सव्वा-अकरा वाजता तर चौकात इतकी प्रचंड गर्दी झाली, की जरा म्हणून जराही पुढं किंवा मागं सरकता येईना आम्ही दोघे हातात हात घट्ट धरून ' अलाइड केमिकल ' इमारतीकडे पहात होतो कारण रात्री बारा वाजता त्या इमारतीवरून एक प्रचड फुगा सोडला जातो आणि त्याबरोबरच ' हॅपी न्यू इयर 'च्या गगनभेदी आरोळ्या झाल्या. त्या अवाढव्य चौकातले हजारो लोक जागच्या जागी उभे राहून डुलत, आदोलत समूहगीत म्हणू लागले आणि उच हात करून बीअर अथवा इतर पेयाच पान करू लागले. अनेक हौशी लोकानी बारा वाजल्याबरोबर मिळेल त्या स्त्रीचं चुबन घेऊन नव्या वर्षाच स्वागत केल, आणि ' टाइम्स ' चौकातला तो शिरस्ताच असल्यान स्त्रियानीही त्याचा प्रतिकार केला नाही. मोक्याच्या जागी असलेल्या टेलिव्हिजन कॅमेऱ्यानी ही उन्मादक दृश्य टिपली आणि त्याच क्षणी टी व्ही.वर ' लाइव्ह ' दाखवली.

रात्री बारानतर अर्धा तास असा हा नव्या वर्षाचा धुमाकूळ अगदी शिगेला पोचला होता मग मात्र गर्दी हळूहळू कमी होऊ लागली. वास्तविक अमेरिकेत जाहीर ठिकाणी

मद्यपान करणं बेकायदा आहे, पण नाताळात लोक असा ताळ सोडणार हे गृहीतच धरून पोलिस त्या रात्री या गुन्ह्याकडे काणाडोळा करतात. गर्दी कमी झाली तेव्हा आम्ही आसपासच्या रस्त्यावरही भटकून मौज पाहू लागलो पाचव्या अव्हेन्यूवरच्या एका प्रचंड चर्चमधे नव्या वर्षानिमित्त प्रार्थना चालली होती आणि दोनतीन हजार लोक हातात बायबल घेऊन प्रार्थना म्हणत होते 'रॉकफेलर' चौकात आमचे काही मित्र भेटले. इतर अनेक रस्त्यावरही अनेक भारतीय — विशेषत' प्रवासी — भेटल ती सबंध रात्र 'टाइम्स' चौकातच भटकून मी काढली. अण्णा मात्र लवकर निघाले. 'टाइम्स' चौक या भुयारी स्टेशनवर मी त्याना निरोप दिला. दुसऱ्या दिवशी फोनवर ते म्हणाले, "अहो, काल माझी मलतीच पचाईत झाली ! मी 'टाइम्स स्क्वेअर' स्टेशनवर अनेकाना विचारून खात्री करून घेऊन 'वुडहॅवन बुलेव्हार्ड' या स्टेशनकडे जाणाऱ्या भुयारी रेल्वेत बसलो. पण ती सहासात स्टेशन्स गेली, तिथं थाबली आणि पुन्हा 'टाइम्स स्क्वेअर'ला आली. मी त्या गाडीतून उतरून आणखी दहापाच लोकाना विचारून गाडीत बसलो तीही गाडी त्याच स्टेशनवर परत आली. असा मी चार वेळा 'टाइम्स स्क्वेअर'ला परत आलो आणि पाचव्या वेळी मात्र गार्डाला विचारून बरोबर ई ट्रेनन आलो."

अस का व्हावं हे मलाही सांगता येईना कारण त्या स्टेशनवरून मी आणि सी रामचद्र अनेकदा आमच्या घरी आलो होतो. नतर चौकशी करता कळल, की १ जानेवारीपासून त्या भुयारी रेल्वेचा मार्ग बदलला होता रात्री बारानतर नव वेळापत्रक सुरू झाल आणि आमचे मित्र त्या गोत्यात अडकले !

अमेरिकेत नाताळ आणि नवं वर्ष साजर करण्याचा माझा बेत समाप्त झाला. त्या चार महिन्यात मी भरपूर हिंडलो, अनेक नवे अनुभव घेतले, अनेक नवे मित्र जोडले, जुने अधिक दृढ झाले. हा काळ कितीही सुखाचा असला, तरी कधीतरी तो सपायलाच हवा होता पाच जानेवारीला मी न्यूयॉर्कहून निघालो. केनेडी विमानतळावर अण्णा, मोहन, शशि, रंजू, शेखर — अनेक मित्र आले होते त्या सर्वांचा निरोप घेताना हृदय जड झालं. आमचं बोइंग मुंबईचा हवाईरस्ता कापीत होतं, तेव्हा मी अमेरिका, हॉलड, पॅरिस, लंडन इथल्या सुखाच्या दिवसांची आणि उन्मादाच्या रात्रींची आठवण पांघरली होती.

RFFBK-0021130